# प्रथम वर्ष कला

## सत्र - II (CBCS)

## इतिहास अभ्यासपत्रिका क्र - I

# आधुनिक भारताचा इतिहास : समाज आणि अर्थव्यवस्था

## विषय कोड : UBA 2.28

© UNIVERSITY OF MUMBAI

**प्राध्यापक सुहास पेडणेकर**
कुलगुरू,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्राध्यापक रविंद्र द. कुलकर्णी**
प्र-कुलगुरु,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्राध्यापक प्रकाश महानवार**
संचालक,
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्रकल्प समन्वयक** : **प्रा. अनिल आर. बनकर**
सहयोगी प्राध्यापक, इतिहास विभाग व
प्रमुख, मानव्यविद्याशाखा,
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई

**अभ्यास समन्वयक व संपादक** : **प्रा. शिवदास चांगदेव घाडगे**
सहायक प्राध्यापक, इतिहास विभाग,
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**लेखक** : **डॉ. अजयकुमार लोखंडे**
सहायक प्राध्यापक, इतिहास विभाग,
के.व्ही.पेंढारकर महाविद्यालय,
डोंबिवली, जि. ठाणे.

: **डॉ. प्रदिप वाघमारे**
सहायक प्राध्यापक, इतिहास विभाग,
रूईया महाविद्यालय, माटुंगा, मुंबई.

: **डॉ. विन्सेन्ट डीमेलो**
विभाग प्रमुख, इतिहास विभाग,
सेंट जोसेफ कॉलेज, विरार, जि. पालघर.

: **डॉ. बी. डी. शिंदे**
इतिहास विभाग प्रमुख,
महात्मा फुले कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
पनवेल.

**जानेवारी २०२१, मुद्रण - १, ISBN 978-93-91735-53-1**

**प्रकाशक :** संचालक, दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ,
विद्यानगरी, मुंबई - ४०० ०९८.

**अक्षर जुळणी व मुद्रण :** मुंबई विद्यापीठ मुद्रणालय,
विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई - ४०० ०९८

# अनुक्रमणिका


| क्रमांक | शीर्षक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १. | सामाजिक धार्मिक सुधारणा चळवळी : सुधारणा व पुनरूज्जीवन भाग - १ | १ |
| २. | सामाजिक धार्मिक सुधारणा चळवळी : सुधारणा व पुनरूज्जीवन भाग - २ | २२ |
| ३. | शिक्षण, वृत्तपत्र आणि वाहतूक पाश्चिमात्य शिक्षणाची सुरुवात आणि त्याचे परिणाम | ३८ |
| ४. | वृत्तपत्रांचा विकास | ४७ |
| ५. | दळणवळण व वाहतूक क्षेत्रातील प्रगती | ५६ |
| ६. | भारतीय अर्थव्यवस्थेवर ब्रिटिश राजवटीचा परिणाम | ६७ |
| ७. | ब्रिटीश काळातील सामाजिक घटक - महिला | ८७ |
| ८. | ब्रिटीश काळातील सामाजिक घटक - दलित | १०२ |
| ९. | शेतकरी चळवळ | ११६ |
| १०. | आदिंवासीचे उठाव | १३२ |


❖❖❖❖

# HISTORY OF MODERN INDIA : SOCIETY & ECONOMY
# (Revised Syllabus under Semester System)

## SEMESTER - II SYLLABUS

**Module I: Socio Religious Reform Movements: Reforms and Revival**

a) Brahmo Samaj, Arya Samaj and Ramakrishna Mission

b) Satyashodhak Samaj, Aligarh movement and Singh Sabha Movement.

c) Impact of Reform Movements

**Module II: Education, Press and Transport**

a) Introduction of Western Education and its Impact

b) Development of Press

c) Transport and Communications

**Module III: Impact of the British Rule on Indian Economy.**

a) Revenue Settlements, Commercialisation of Agriculture

b) Drain Theory

c) Deindustrialisation and Growth of Large Scale Industry

**Module IV: Nationalism and Social Groups: interfaces.**

a) Women

b) Dalits

c) Peasants and Tribals

**References:**


- Aloysius G., *Nationalism Without Nation in India,* OUP, New Delhi, 1998.
- Bandyopadhyay Sekhar, *From Plassey to Partition, A History of Modern India,* Orient Longman, New Delhi, 2004.
- Bhattachaterjee Arun, *History of Modern India (1707 – 1947),* Ashish Publishing House, New Delhi 1976.
- Chakravarti Aroop, *The History of India (1857 – 2000),* Pearson, New Delhi 2012.
- Chandra Bipan et al., *India's Struggle for Independence,* Penguin, New Delhi,
- Chandra Bipan, A. Tripathi, Barun De, *Freedom struggle,* National Book Trust, India, 1972.
- Chandra Bipan, *Rise and Growth of Economic Nationalism in India,* Delhi, 1966.

- Chattergy Partho, *The Nation and its Fragments,* OUP, New Delhi, 1933
- Chopra P.N.,Puri B.N, Das M.N,Pradhan A.C, *A Comprehensive History of Modern India,* Sterling Publishers 2003.
- Desai A.R., *Social Background of Indian Nationalism,* 5th Edition,Popular Prakashan, Bombay, 1976.
- Ganachari Arvind, *Nationalism and Social Reform in a Colonial Situation,* Kalpaz Publication, New Delhi, 2005.
- Grover B.L, Grover S., *A New Look at Modern Indian History (1707 – present day),* S. Chand and Company, New Delhi 2001.
- Keswani K.B., *History of Modern India (1800 – 1964),* Himalaya Publishing House, Bombay 1996.
- Majumdar R.C., Comprehensive History of India, Vol.3 (Part III), People's Publishing House.
- Mehrotra S.R., *Emergence of Indian National Congress,* Vikas Publication, Delhi, 1971.
- Nanda S.P., *History of Modern India (1707 – Present Time),* Dominant Pub, New Delhi 2012.
- Pannikar K.N. (ed). *National and Left Movement in India,* Vikas Publishing House Pvt. Ltd... New Delhi. 1980.
- Pawar Jaisinghrao, *Aadhunik Hindustanacha Itihas,* Vidya Publications, Nagpur.
- Ray Rajat, *Industrialization of India: Growth and Conflict in the Private Corporate Sector, 1914-47,* OUP, Delhi, 1982.
- Sarkar Sumit, *Aadhunik Bharat,* Rajkamal Publication, New Delhi, 2009.
- Sarkar Sumit, *Modern India 1885-1947,* Macmillan, Madras, 1996.
- Seal Anil, *The Emergence of Indian Nationalism: Competition and Collaboration in the Later Nineteenth Century,* Cambridge University Press, 1971.
- Shukla Ramlakhan, *Aadhunik Bharat ka Itihas,* Hindi Madhyam Karyalay Nideshalay, Delhi.


❖❖❖❖

# १

# सामाजिक धार्मिक सुधारणा चळवळी:
# सुधारणा व पुनरुज्जीवन भाग-१

## (अ) ब्राम्हो समाज, आर्य समाज आणि रामकृष्ण मिशन

**प्रकरणाची रचना**

१.० उद्दिष्टे

१.१ प्रस्तावना

१.२ ब्राम्हो समाज

- १.२.१ राजा राममोहन रॉय
- १.२.२ आत्मीय सभा
- १.२.३ ब्राम्हो समाजाची स्थापना
- १.२.४ ब्राम्हो समाजाची तत्वे
- १.२.५ धार्मिक सुधारणा
  - १. एकेश्वरवादाचा प्रसार
  - २. मूर्तिपूजेला विरोध
- १.२.६ सामाजिक कार्य
  - १. सती प्रथेचे उच्चाटन
  - २. बहुविवाहास विरोध
  - ३. अनिष्ट सामाजिक प्रथांना विरोध
  - ४. शेतकऱ्यांना पाठिंबा दिला
  - ५. वृत्तपत्र स्वातंत्र्य
- १.२.७ शैक्षणिक कार्य
  - १. पाश्चात्य शिक्षण पद्धतीला चालना
  - २. स्त्रियांच्या शिक्षणास पाठिंबा
  - ३. साहित्यिक कार्य

१.३ आर्य समाज

- १.३.१ प्रस्तावना
- १.३.२ स्वामी दयानंद सरस्वती
- १.३.३ वेदांकडे चला
- १.३.४ आर्य समाजाची स्थापना

१.३.५ आर्य समाजाची तत्वे
१.३.६ धार्मिक कार्य
१. मूर्तिपूजेस विरोध
२. एकेश्वरवाद
३. शुद्धी चळवळ
४. पुरोहित वर्गास विरोध
५. कर्मकांडास विरोध
१.३.७ सामाजिक कार्य
१. जातिव्यवस्थेला विरोध
२. समानतेची शिकवणूक
३. बालविवाहास विरोध
४. विधवा पुनर्विवाहास प्रोत्साहन
५. स्वदेशी चळवळ
६. राष्ट्रीय जागृती
७. अनाथगृहे
१.३.८ शैक्षणिक कार्य
१. दयानंद अँग्लो-वैदिक महाविद्यालय
२. गुरुकुल
३. स्त्रियांच्या शिक्षणास प्रोत्साहन
१.४ रामकृष्ण मिशन
१.४.१ रामकृष्ण परमहंस
१.४.२ स्वामी विवेकानंद
१.४.३ विश्वधर्मपरिषद
१.४.४ रामकृष्ण मिशनची स्थापना
१.४.५ रामकृष्ण मिशनची शिकवण
१.४.६ रामकृष्ण मिशनची कामगिरी
१. समाजसेवा
२. सामाजिक सुधारणा
३. हिंदुत्त्ववाद
४. राष्ट्रप्रेम जागृती
१.५ सारांश
१.६ प्रश्न
१.७ संदर्भ सूची

## १.० उद्दिष्टे

१. सामाजिक-धार्मिक सुधारणा चळवळीच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीचे ज्ञान होणे.
२. राजा राममोहन रॉय ह्यांचे जीवन व कामगिरी ब्राम्हो समाजाद्वारे स्पष्ट करणे.
३. स्वामी दयानंद सरस्वतींचे जीवन व कामगिरी आर्य समाजाद्वारे मिळविणे.
४. स्वामी विवेकानंदांचे भारतातील व भारताबाहेरील कार्य समजून घेणे.

## १.१ प्रस्तावना

एकोणिसाव्या शतकाचा पूर्वार्ध हा आधुनिक भारताच्या इतिहासातील धार्मिक व सामाजिक प्रबोधनाचा उषःकाल मानला जातो. ज्या विचार प्रवाहांनी सोळाव्या शतकात युरोपीय राष्ट्रांना प्रबोधनाची प्रेरणा दिली, ते आधुनिक विचारप्रवाह भारतात एकोणिसाव्या शतकाच्या आरंभापासून वाहू लागले. त्यापूर्वी अठराव्या शतकात भारतीय समाज जणू अंधकारयुगातून जात होता. बुध्दिस्वातंत्र्य पूर्णपणे लयाला जाऊन त्याची जागा परंपरावादाने घेतली होती. यामुळे समाजातील गतिशीलता, विकसनशीलता, सृजनशीलता नाहीशी होऊन समाजजीवनावर अज्ञानाची, गतिहीनतेची, हतबलपणाची छाया पसरली होती. समाजाचा नैतिक कणाच मोडला होता.

ऐतिहासिक योगायोग असा की अशा अवनतीच्या अंधकारयुगातून वाटचाल करीत असलेल्या, कालबाह्य मध्ययुगीन जीवननिष्ठांना चिकटून बसलेल्या गतिहीन भारतीय समाजाला पुरोगामी विचारांनी पुष्ट झालेल्या, आक्रमक पाश्चात्या संस्कृतीचे प्रतिनिधित्व करणाऱ्या ब्रिटिश सत्तेशी सामना करावा लागला. यांचे संमिश्र परिणाम देशावर झाले. आधुनिक बलशाली शक्तीपुढे भारत हतबल ठरला आणि राजकीय स्वातंत्र्य घालवून बसला तर, त्याच आधुनिक शक्तीच्या संपर्काने आधुनिकतेचे वारे देशात वाहू लागले आणि सर्वांगीण पुनरुत्थानाची, प्रबोधनाची प्रक्रिया सुरु झाली. मानवी जीवनाकडे पाहण्याचा नवा बुद्धिनिष्ठ शास्त्रीय दृष्टिकोन समाजात प्रसृत होऊ लागला. अंधश्रद्धेची जागा विवेकाने व तर्कनिष्ठेने घेतली.

प्रबोधनाची प्रक्रिया एकोणिसाव्या शतकाच्या आरंभी भारतात सुरु होण्यास प्रामुख्याने दोन गोष्टी कारणीभूत झाल्या. पहिली महत्वाची बाब म्हणजे बलशाली ब्रिटिश राज्यकर्त्यांच्या संपर्कात आलेल्या काही सुबुद्ध भारतीयांना त्यांच्या भौतिक विकासाचे गमक ध्यानात आले व त्या तुलनेत भारतीय समाजाची अवनती ज्यांना प्रकर्षाने जाणवू लागली. भारतीय समाजात पसरलेली मरगळ नाहीशी करावयाची असेल, तर त्या समाजात पाश्चात्य विचारांचे नवे रक्त ओतायला पाहिजे, हितकारक अशा पाश्चात्य विचारप्रणालीचा व शास्त्रीय दृष्टिकोनाचा अंगिकार करुनच भारतीय समाजाचे पुनरुज्जीवन करता येईल अशी त्यांची धारणा बनू लागली. या धारणेला बळकटी असणारी दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या कार्याचा काही सुजाण भारतीयांवर झालेला परिणाम. मिशनऱ्यांनी सुरु केलेल्या शाळांतून शिक्षण घेणाऱ्या भारतीय तरुणांना उदारमतवादी, पुरोगामी विचारप्रणालीचे बाळकडू इंग्रजी शिक्षणाच्या माध्यमातून मिळू लागले आणि या विचारप्रणालीत त्यांना भारतीय समाजाच्या पुनरुत्थानाची गुरुकिल्ली सापडली. काही नवशिक्षीत भारतीय तरुण पाश्चात्य विचार प्रवाहात इतके वाहवून गेले की आपले ते सर्वच हीन व त्याज्य मानण्याची आणि पाश्चात्यांचे सर्वच श्रेष्ठ मानून त्यांचे अंधानुकरण करण्याची प्रवृत्ती त्यांच्यात निर्माण झाली. हा गट भारतीय समाजप्रवाहाबाहेर फेकला गेला. भारतीय

समाजाचे नेतृत्व त्याला करता आले नाही. याउलट काही नवशिक्षित भारतीय पाश्चात्य विचारसरणीने प्रभावित झाले असले तरी त्यांच्यात रुजलेली भारतीयत्वाची बीज नष्ट झाली नाहीत. उलट मिशनऱ्यांनी हिंदू धर्मावर उगारलेल्या टीकास्त्रामुळे त्यांच्यातील विवेक जागृत झाला आणि पाश्चात्यांचा शास्त्रीय, चिकित्सक व पुरोगामी दृष्टिकोन स्वीकारुन भारतीय समाजव्यवस्थेचा, धर्मव्यवस्थेचा अभ्यास करुन, त्यात शिरलेल्या अनिष्ट चालीरिती, रुढी, कर्मकांड दूर करुन, मूळ धर्मतत्वांवर चढलेली घातक अंधश्रद्धेची पुटे फाडून टाकून खऱ्या धर्मतत्वांची लोकांना ओळख पटवून देऊन आणि पाश्चात्य विचार प्रणालीतील चांगल्या व उपकारक तेवढ्याच गोष्टी ग्राह्य करुन त्या आधारे निरोगी, गतिमान, विकसनशील समाज उभा करण्याची निकड त्यांना जाणवू लागली. या विचारप्रणालीने प्रेरित झालेल्या काही समाजभिमुख नवशिक्षित भारतीयांनी भिन्न माध्यमांद्वारे आपले विचार प्रसुत करण्यास प्रारंभ केला त्यांनीच भारतात धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक प्रबोधनाचा प्रारंभ केला. ते भारतीय समाजाच्या सर्वांगीण पुनरुज्जीवनाचे प्रणेते व प्रवर्तक ठरले.ब्रिटिशांची सत्ता प्रथम बंगालमध्ये स्थिर झाल्यामुळे आणि तेथेच प्रथम इंग्रजी शिक्षणाला प्रारंभ झाल्यामुळे प्रबोधन युगाचा उषःकालही बंगालमध्येच झाला आणि त्यानंतर या विचारप्रणालीचा प्रादुर्भाव इतर प्रांतातही झाला.

**आपली प्रगती तपासा**

१. सामाजिक-धार्मिक सुधारणा चळवळींची ऐतिहासिक पार्श्वभूमी स्पष्ट करा.

## १.२ ब्राम्हो समाज

आपल्या विचारसरणीद्वारे व प्रत्यक्ष कार्याच्या माध्यमातून भारतीय समाजाला परंपरेच्या विळख्यातून मुक्त करुन आधुनिक काळात आणण्याचे, समाजात बुद्धिप्रामाण्यवादी विचारांचा प्रभाव निर्माण करण्याचे पहिले व महत्त्वपूर्ण कार्य राजा राममोहन रॉय ह्यांनी केले. त्यांनी भारतीयांच्या सर्वांगीण प्रगतीची व प्रबोधनाची प्रक्रिया सुरु केली, त्यामुळे त्यांना भारतीय प्रबोधनाचे प्रेषित व प्रणेते म्हणून आधुनिक भारताच्या इतिहासात विशेष महत्व दिले जाते. भारतातील धार्मिक व सामाजिक सुधारणा चळवळींचे ते आद्यप्रवर्तक असल्यामुळे त्यांना 'भारतीय प्रबोधनाचे जनक' असेही म्हटले जाते.

भारताच्या प्रबोधनकार्यात ब्राम्हो समाजाने महत्वाची भूमिका पार पाडली. ख्रिश्चन धर्माच्या प्रभावाने हिंदू धर्मापासून दूर गेलेल्यांनी ब्राम्हो समाजाचा आश्रय घेतला. धार्मिक क्षेत्रातील ब्राम्हो समाजाचे महत्व त्याने हिंदू धर्मातील प्राचीन परंपरा टिकवून ठेवल्या ह्यात नसून हिंदू धर्मातील त्याज्य गोष्टींचा त्याग केला ह्यात आहे. भारतातील धार्मिक सुधारणा क्षेत्रातील अग्रणी राजा राममोहन रॉय सामाजिक सुधारणांमध्येही शुक्रताऱ्याप्रमाणे चमकून उठले.

### १.२.१ राजा राममोहन रॉय (१७७२-१८३३)

राजा राममोहन रॉय हे 'आधुनिक भारताचे जनक' म्हणून ओळखले जातात. दि.२२ मे १७७२ रोजी बंगालमधील हुगळी जिल्ह्यातील राधानगर येथे एका संपन्न ब्राम्हण कुटुंबात त्याचा जन्म झाला. त्यांचे वडील रामकांतो रॉय आणि माता तैरिणीदेवी यांनी राममोहन यांना प्राथमिक बंगाली शाळा ह्या पारंपारिक पाठशाळेत शिक्षण घेण्यासाठी पाठविले. त्यांनी खाजगीरित्या मौलवीकडून पार्शियन व अरेबिक भाषा शिकून घेतल्या. त्या नंतर त्यांना अरेबिक व पर्शियन भाषांचे सुयोग्य ज्ञान देण्याऱ्या पाटणा येथील मोठ्या केंद्रावर अभ्यासासाठी पाठविण्यात आले. येथील अभ्यासानंतर ते बनारस येथे गेले व तेथे राहून, त्यांनी संस्कृत वाङ्मय, कायदा व तत्वज्ञान आणि विशेषकरुन वेद व उपनिषदे यांचा अभ्यास केला. तेथून घरी परत आल्यानंतर धर्मश्रद्धांच्या संदर्भात वडिलांशी झालेल्या मतभेदावरुन त्यांनी घर सोडले आणि तिबेट येथे जाऊन बौद्ध धर्माचा अभ्यास केला.

१८०५ मध्ये राजा राममोहन रॉय हे ईस्ट इंडिया कंपनीत महसूल अधिकारी जॉन दिग्बी यांचे सहाय्यक म्हणून रुजू झाले. नंतर त्यांना 'दिवाण' म्हणून बढती मिळाली. दहा वर्षाच्या सेवेनंतर ते सेवानिवृत्त झाले आणि बंगालच्या जनतेच्या सेवेमध्ये स्वतःला झोकून दिले. मोगल सम्राट दुसरा अकबर यांनी राममोहन रॉय यांना राजा ही पदवी त्याच्या महत्त्वपूर्ण सेवेबद्दल बहाल केली. त्यानंतर त्यांना राजा राममोहन रॉय असे संबोधले जाऊ लागले. २७ सप्टेंबर १८३३ रोजी इंग्लडमधील ब्रिस्टॉल येथे अल्पशा आजारपणामुळे त्यांचे निधन झाले.

### १.२.२ आत्मीय सभा

राजा राममोहन रॉय यांना हिंदू धर्मासंबंधी अतिशय आदरभाव होता. हिंदूना आपला धर्म खऱ्या अर्थाने उमगलेला नाही असे त्यांना वाटत होते.तथापि ते हिदूंच्या मूर्तिपूजा, कर्मकांड, अनिष्ट प्रथा (उदा. सतीप्रथा, बालविवाह) यांच्याविरुद्ध होते. त्यांचा स्त्री पुरुष समानतेवर विश्वास होता. अशा विचारांना पाठिंबा असणाऱ्यांनी एकत्र येऊन १८१४मध्ये कोलकत्ता येथे आत्मीय सभा या नावाची संघटना स्थापन केली. आत्मीय सभा म्हणजे मित्रांचा समाज होय.

### १.२.३ ब्राम्हो समाजाची स्थापना

१९व्या शतकात बंगालच्या पुनरूज्जीवनाला कारणीभूत ठरलेली ब्राम्हो समाज ही सामाजिक व धार्मिक चळवळ सुरु केली. ब्राम्हो म्हणजे जो ब्रम्हाची म्हणजे विश्वातील सर्वश्रेष्ठ शक्तीची आराधना करतो तो होय आणि समाज म्हणजे लोकांचा समुदाय होय. ह्या संघटनेमार्फत त्यांनी सर्व धर्मातील विविध समुदायांचे ऐक्य निर्माण करण्याचा व त्यांना आपण सर्व एकाच परमेश्वराची लेकरे आहोत, याची जाणीव करुन देण्याचा प्रयत्न केला.

राजा राममोहन रॉय व त्यांचे अनुयायी हे ख्रिश्चन चर्चमधील प्रार्थनेला उपस्थित राहत असत. राजा राममोहन रॉय यांच्या काही अनुयायांना आपले स्वतःचे प्रार्थनास्थळ असावे असे वाटत होते. शेवटी त्यांनी रामकमल बासू यांच्याकडून एक इमारत भाड्याने घेऊन तेथे प्रार्थना स्थळ सुरू केले. कोलकता येथे २० ऑगस्ट १८२८ रोजी सुरु झालेल्या व सार्वजनिकरित्या २३ जानेवारी १८३० रोजी उद्धाटन झालेल्या ह्या प्रार्थना स्थळाला 'ब्राम्हो सभा' असे नाव दिले व नंतर त्याचेच 'ब्राम्हो समाज' असे नामकरण करण्यात आले.

ब्राम्हो समाजाचे सभासद हे प्रत्येक शनिवारी एकत्र भेटत असत व धार्मिक चर्चा आणि वेदातील स्तोत्रांचे गायन (पठण) करीत असत. त्यांचा एकाच देवावर विश्वास होता व त्यामुळे ते एकाच देवाची प्रार्थना करीत ब्राम्हो समाजाने विश्वबंधुत्वाची भावना जोपासली व जात, पंथ, वंश, राष्ट्रीयत्व यावर आधारीत भेदभावावर विश्वास ठेवला नाही. पूर्वीच्या अत्मीय सभा व नंतरच्या ब्राम्हो समाजामार्फत त्यांना धार्मिक दांभिकपणा उघड करावयाचा होता आणि हिंदू समाजावरील ख्रिश्चन धर्माच्या प्रभावास अटकाव करावयाचा होता.

### १.२.४ ब्राम्हो समाजाची तत्वे

१. जगाची निर्मिती करणारा व त्याचे अस्तित्व कायम ठेवणारा ईश्वर एकच असून, त्याची शक्ती, शहाणपण, प्रेम व पावित्र्य अमर्याद आहे.
२. मानवी आत्मा हा अविनाशी असून तो (सतत) शाश्वत प्रगती करण्याची क्षमता असणारा व आपल्या कर्मासाठी ईश्वरास जबाबदार असणारा असा असतो.
३. ईश्वराशिवाय इतर कोणत्याही निर्मित वस्तूची (मानवासह) पूजा करू नये. ईश्वर स्वतः होऊन प्रत्यक्षात मानवी आत्म्यात अवतरतो आणि म्हणूनच आत्मा आणि ईश्वर यांच्यामध्ये कोणत्याही देवदूत व धर्मग्रंथांची मध्यस्थी आवश्यक नाही.
४. सत्य हाच ब्राम्होचा एकमेव धर्म आहे. वेद वा अन्य कोणतेही धर्मग्रंथ हे अचूक वा खात्रीलायक नाहीत. सर्व धर्मांचे उपदेश व धर्मग्रंथ हे आत्म्याच्या दैवी प्रकटीकरणाशी एकरूप होत असल्यामुळे त्याचा आदर (सन्मान) करावा.
५. प्रेम व श्रद्धेने ईश्वराची रोज पूजा करावी.
६. ईश्वराच्या दृष्टीने सर्व मानव समान आहेत आणि त्यामुळे जात, वर्ण किंवा लिंग यावर आधारीत गट असू नयेत.
७. मूर्तिपूजा यज्ञात प्राण्यांचा बळी देणे, कर्मकांड यांना धर्मात स्थान नाही.

### आपली प्रगती तपासा

१) ब्राम्हो समाजाच्या स्थापनेचा व तत्वांचा आढावा घ्या.

_______________________________________________

_______________________________________________

_______________________________________________

_______________________________________________

_______________________________________________

### १.२.५ धार्मिक सुधारणा

राजा राममोहन रॉय यांनी घडवून आणलेल्या काही महत्वाच्या धार्मिक सुधारणा पुढीलप्रमाणे आहेत.

#### १) एकेश्वरवादाचा प्रसार :

इस्लाम, ख्रिश्चन व उपनिषदीय धर्मांचा तुलनात्मक अभ्यास केल्यानंतर राजा राममोहन रॉय यांनी एकेश्वरवादाचा पुरस्कार केला. एकेश्वरवाद म्हणजेच एकाच देवाच्या अस्तित्वावरील विश्वास होय. त्यांनी अतिशय प्रखरपणे मूर्तिपूजा, कर्मकांड, बळी व बहुदेववाद यांना विरोध केला. १८०९ मध्ये रॉय यांनी 'एकेश्वरवाद्यांची देणगी' या नावाचे पर्शियन भाषेतील पुस्तक लिहिले. देव एकच असल्याची शिकवणूक दिली व त्याचप्रमाणे त्यांनी जात,

पंथ, धर्म इ. बाबी लक्षात न घेता सर्वांचा समावेश असलेल्या विश्वबंधुत्वाच्या संकल्पनेवर विश्वास ठेवला.

### २. मूर्तिपूजेला विरोध :

देवावर विश्वास असणारे अनेक लोक देवाच्या मूर्ती वा देवाच्या फोटोची पूजा करतात. मात्र राजा राममोहन रॉय यांनी देव निराकार असल्याने मूर्तिपूजेला विरोध केला. हिंदू धर्माचे एक प्रकांड पंडित या नात्याने रॉय यांची मूर्तिपूजा ही हिंदू धर्मात नंतर आलेली संकल्पना असून, ती खऱ्या हिंदू धर्माचा भाग नसल्याची खात्री झाली होती आणि म्हणूनच त्यांनी मूर्तिपूजा प्रथा त्याज्य ठरविली. परमानंद (मोठ सुख) मिळविण्याचे उत्तम साधन म्हणजे शुद्ध आत्मचिंतन आणि सर्वश्रेष्ठ शक्तीची आराधना होय. देवापर्यंत पोहोचण्यासाठी आहूती व निरर्थक कर्मकांड याची गरज नाही आणि ते बौद्धिक पातळी निम्न असणाऱ्यांच्याकडूनच केले जातात. रॉय यांच्या मते सहिष्णूता, प्रेम, सहानुभुती आणि द्वेषभावनेला वाव नसणे यांनी युक्त असलेली पूजा हीच खरी पूजा आहे.

### १.२.६ सामाजिक कार्य

भारतीय समाजात त्यावेळी अस्तित्वात असलेल्या अनिष्ट प्रथांविषयी राजा राममोहन रॉय समाधानी नव्हते. धर्माच्या नावाखाली अनेक अनिष्ट प्रथांना मान्यता होती. जातिभेद, अस्पृश्यता पालन, बहूविवाह, हुंडापद्धती, सतीप्रथा, विधवाविवाहास प्रतिबंध ह्या अनिष्ट प्रथा समाजात अस्तित्वात होत्या. मृत पतीच्या चितेवर सती जाताना रडणारी आपली वहिनी त्यांनी पाहिली होती. या घटनेचा त्यांच्या सामाजिक विचारांवर मोठा प्रभाव पडला. राजा राममोहन रॉय यांचे सामाजिक कार्य पुढीलप्रमाणे आहे.

### १. सती प्रथेचे उच्चाटन

पतीच्या निधनानंतर अंत्यसंस्काराच्यावेळी चितेवर पतीबरोबर पत्नीला जिवंत जाळण्याच्या प्रथेला सतीप्रथा असे म्हणतात. राजा राममोहन यांच्या मते विवाहाच्या वेळच्या होमकुंडातील ज्वाला आणि अंत्यसंस्काराच्या वेळच्या चित्तेवरील ज्वाला यात फारसा फरक नव्हता, कारण वडिलांच्या वयासमान असणाऱ्या वृद्ध पुरुषांबरोबर तरुणीचा विवाह होत असे व अल्पावधीत मृत्यू पावणाऱ्या पतीच्या चितेवरच तिचेही आयुष्य संपुष्टात येत असे. नवऱ्याच्या मृत्यूबरोबरच तिचे दैव ह्या प्रथेमुळे बांधले गेले होते. १८१८मध्ये त्यांची भावजय अलकमंजरी (थोरले बंधू जगमोहन यांची पत्नी) ही सती गेली या घटनेचे रॉय हे साक्षीदार होते. ते आपल्या भावजयीचे मन वळविण्यात अपयशी ठरले होते. तिचे जिवंत शरीर पतीच्या मृत शरीराबरोबर बांधून अंत्यसंस्कारासाठी चितेवर ठेवण्यात आले. त्यावेळी चितेवरून उठून सुटका करुन घेण्याचा तिचा प्रयत्न सभोवताली उभ्या असलेल्या सनातनी लोकांनी विरोध केल्याने यशस्वी होऊ शकला नाही. ह्या लोकांनी ‘महासती, ‘महासती असा घोष केला. राजा राममोहन रॉय यांना ह्या दु:खद घटनेचा मोठा धक्का बसला व त्याच वेळी ही अमानवी सतीप्रथा नष्ट होईपर्यंत विश्रांती न घेण्याची त्यांनी शपथ घेतली.

राजा राममोहन रॉय यांनी सतीप्रथा बंद करण्यास ब्रिटिश अधिकाऱ्यांना प्रवृत्त करण्यासाठी खूप कष्ट घेतले. मात्र ही धार्मिक बाब असल्याने ब्रिटिश अधिकाऱ्यांनी लोकांच्या धार्मिक श्रद्धेमध्ये प्रथम हस्तक्षेप केला नाही. त्यामुळे त्या वेळेचे गव्हर्नर जनरल ऑफ इंडिया लॉर्ड विल्यम बेंटिक व त्यांच्या कौन्सिलला हिंदू धर्मग्रंथांनी सतीप्रथेला मान्यता दिलेली नाही हे

पटवून देण्यासाठी रॉयना खूप कष्ट घ्यावे लागले. त्यांनी ब्रिटिश अधिकाऱ्यांना हे पटवून दिले की मृत पतीच्या मालमत्तेमध्ये स्वारस्य असणाऱ्या लोभी नातेवाईकांच्याकडून ह्या प्रथेचे समर्थन केले जाते. राजा राममोहन रॉय यांनी अत्यंत तळमळीने हा मुद्दा मांडल्यामुळेच शेवटी १८२९ मध्ये सती बंदी कायदा संमत झाला.

### २. बहुविवाहास विरोध

राजा राममोहन रॉय यांनी बहुविवाहाला आणि विवाहासाठी मुलींच्या विक्री करण्याला विरोध केला. कनिष्ट जातीच्या मुलींनी उच्च जातीच्या पुरुषांशी विवाह करण्याच्या बंगालमधील कुलीनवाद प्रथेला रॉय यांनी नापसंती दर्शविली. अनेक मुलींशी विवाह करणे हा काही लोकांचा धंदाच बनला होता. पती हा दुसऱ्या मुलीशी विवाह करण्यासाठी पहिल्या पत्नीला सोडून देत असे व अशावेळी ह्या तरुण मुलींचे (पत्नी) भवितव्य हे पिता किंवा भाऊ यांच्यावर अवलंबून असावयाचे. हिंदू धर्मग्रंथात विशिष्ट परिस्थितीतच पुरुषाला दुसरे लग्न करण्याची परवानगी असल्याचे उल्लेख आहेत, हे राजा राममोहन रॉय यांनी निर्दशनास आणून दिले. अशा प्रकारे त्यांनी बहुविवाहास विरोध केला.

### ३. अनिष्ट सामाजिक प्रथांना विरोध :

राजा राममोहन रॉय हे जातिभेद, अस्पृश्यता पालन, बहुविवाह, बालविवाह व सतीप्रथा यांच्याविरुद्ध होते. त्यांनी विधवा पुनर्विवाह, आंतरजातीय विवाह, आंतरजातीय भोजन समारंभ यांना पाठिंबा दिला. विविध जातींच्या लोकांनी एकत्र यावे असे त्यांना वाटत होते. अशा पद्धतीने त्यांनी सनातन वाद्यांचा सामना केला.

### ४. शेतकऱ्यांना पाठिंबा दिला

राजा राममोहन रॉय हे स्वतः मोठे श्रीमंत जमीनदार होते. परंतु ते कामगार व शेतकरी यांची निर्दयी पिळवणूक करणाऱ्या जमीनदारांच्या विरुद्ध होते. जमीनदारांनी मनात येईल त्याप्रमाणे कुळांच्याकडून वाढीव खंडासाठी मागणी करू नये, यासाठी शासनाने दक्ष असावे असे त्यांना वाटत होते. शेतकरी व जमीन मालक यांच्यात सौहर्द संबंध असावेत असेही त्यांना वाटत होते. ब्रिटिश शासनाकडे राजा राममोहन रॉय यांनी शेतकऱ्यांच्या कुळांच्या हक्कांचे सरंक्षण कायद्याने झाले पाहिजे अशी मागणी केली.

### ५. वृत्तपत्र स्वातंत्र्य

वृत्तपत्रांच्या बाबतीत त्यावेळी आजच्या इतकी जागृती झालेली नव्हती. सर्व वृत्ते ही केवळ इंग्रजी मध्येच छापली जात होती. राजा राममोहन रॉय यांनी 'मिरतुल-अखबर' या नावाचे पर्शियन भाषेतील वृत्तपत्र व 'संवाद कौमुदी' या नावाचे बंगाली भाषेतील साप्ताहिक प्रकाशित केले. कोणतीही बातमी प्रसिद्ध करण्यापूर्वी भारतीयांना ब्रिटिश सरकारची पूर्व परवानगी घ्यावी लागत असे. मुक्त वृत्तपत्रे ही स्वातंत्र्याचे खरे रक्षक आहेत, असे त्यांना वाटत होते. त्यांनी इतरांच्या मदतीने १८२३ मध्ये ब्रिटिश सरकारकडे दावा दाखल केला आणि त्यात त्यांनी वृत्तपत्र स्वातंत्र्याच्याबाबतीत जोरदारपणे बाजू मांडली. या दाव्यात त्यांनी राज्यकर्ते व प्रजा ह्या दोघांनाही वृत्तपत्राचा सन्मान करावा हे स्पष्ट केले. त्याचाच परिणाम म्हणून सर चार्ल्स मेट्काफ ह्या प्रभारी गव्हर्नर जनरलनी १८३५ वृत्तपत्रावरील बंधने काढून टाकली.

### १.२.७ शैक्षणिक कार्य

राजा राममोहन रॉय हे विद्वान होते व अनेक भाषांचे त्यांना ज्ञान होते. पाश्चात्य शिक्षणाने ते खूप प्रभावित झाले होते. प्राचीन काळाप्रमाणे संस्कृतमध्ये दिले जाणारे शिक्षण हे लोकांना अज्ञानाच्या अंधारात ढकलेल असे त्यांना वाटत होते आणि म्हणूनच त्यांना इंग्रजी शिक्षण आवश्यक आहे असे वाटते. त्यांचे शैक्षणिक कार्य पुढीलप्रमाणे.

**१. पाश्चात्य शिक्षण पद्धतीला चालना :**

राजा राममोहन रॉय यांना असे वाटत होते की फक्त पाश्चात्य शिक्षण पद्धतीच भारतीय समाजाच्या समस्या सोडवू शकेल. संस्कृत, पर्शियन, अरेबिक भाषांच्याबद्दल त्यांना आदर होता, परंतु त्यांची अशी ठाम भूमिका होती की, फक्त इंग्रजी भाषेमुळेच एखाद्याला आपल्या देशात प्रत्यक्षात काय घडत आहे व जगाच्या इतर भागांत काय घडत आहे हे समजू शकेल ही त्यांची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी त्यांनी स्वतःची 'अँग्लो हिंदू स्कूल या नावाची शाळा १८२२ मध्ये सुरु केली व तेथे पाश्चात्य व भारतीय शिक्षणात सुसंवाद साधण्याच्या दृष्टीने गणित, तत्वज्ञान, रसायनशास्त्र, ज्योतिषशास्त्र, तंत्रज्ञान व खगोलशास्त्र यासारखे विषय सुरू केले. त्यांनी शासनाकडे शिक्षणाच्या जून्या संस्कृत अध्ययन पद्धतीऐवजी नवीन पाश्चात्य अध्ययन पद्धतीस उत्तेजन देण्याचा आग्रह धरला कारण ही पद्धती अधिक उदारमतवादी व प्रबोधनकारी आहे. मार्च १८३५ मध्ये लॉर्ड विल्यम बेंटिक यांनी रॉय याच्या स्वप्नांची पूर्ती करणाऱ्या पाश्चात्य शिक्षण पद्धतीचा पुरस्कार करणारी प्रसिद्ध शिक्षण सनद जाहीर केली.

**२. स्त्रियांच्या शिक्षणास पाठिंबा :**

पारंपारीक भारतीय समाजात स्त्रियांच्या शिक्षणाला बंदी होती. शिक्षणासाठी स्त्रियांना प्रोत्साहन दिले जात नव्हते. राजा राममोहन रॉयनी मात्र स्त्रियांच्या शिक्षणाला पाठिंबा दिला.

**३. साहित्यिक कार्य :**

इ.स. १८१५ व १८२०च्या दरम्यान राममोहन रॉय यांनी बंगाली भाषेतील प्रमुख १४ साहित्य कृती व इंग्रजीमधील १० साहित्य कृती पूर्ण केल्या. हिंदू धर्मग्रंथ हे बहुतांशी संस्कृतमध्येच होते व त्यामुळे ते सामान्य माणसांना न समजणारे वा त्यांच्यामार्फत न पोहचणारे होते. म्हणून ह्या धर्मग्रंथाचे त्यांनी इंग्रजी, बंगाली व हिंदी भाषांच्यामध्ये अनुवाद कले. त्यास त्यांनी वेदांतसार संक्षिप्त अनुवाद असे नाव दिले. १८२० मध्ये त्यांनी द प्रिसप्टस ऑफ जिझस, 'द गाईड टू पीस अँड हॅपीनेस' हा ग्रंथ प्रकाशित केला. ते बंगाली गद्याचे ही कर्ते होते. यापूर्वी बंगाली साहित्य हे केवळ पंक्तीस्वरूपात होते.

बंगालमधील हिंदूमध्ये स्वधर्मजागृती करण्याचे व बंगालमध्ये बौद्धिक, नैतिक, आध्यात्मिक व वैचारिक जागृती निर्माण करण्याचे महान कार्य राजा राममोहन रॉय ह्यांनी केले. निद्रिस्त पडलेल्या या हिंदू समाजात नवविचारांचे चैतन्य निर्माण करुन नवजागृती निर्माण करण्याचे परमोच्च श्रेय राजा राममोहन रॉय ह्यांनाच दिले पाहिजे. 'आधुनिक हिंदुस्थानचा निर्माता ह्याच शब्दांत आपल्याला राजा राममोहन रॉय ह्यांची थोरवी सांगावी लागते. भारतात धार्मिक व सामाजिक सुधारणांच्या चळवळींचे बीजारोपण करण्याचे श्रेय ब्राम्हो समाजालाच द्यावे लागते.

**आपली प्रगती तपासाः**

१) ब्राम्हो समाजाची कामगिरी स्पष्ट करा.

## १.३ आर्य समाज

### १.३.१ प्रस्तावना

आर्य समाजाची स्थापना स्वामी दयानंद सरस्वती ह्यांनी केली. १९व्या शतकाच्या उत्तरार्धात ज्या धार्मिक व सामाजिक सुधारणा चळवळींनी भारताचे लक्ष वेधले त्यांत आर्य समाजाचे स्थान महत्वपूर्ण आहे. सामाजिक सुधारणांबरोबरच स्वदेश व स्वधर्म या विषयीच्या अस्मितेला संजीवनी देण्याचे कार्य आर्य समाजाने केले. पाश्चिमत्यांचा धर्म, आचार, विचार व ज्ञान हेच केवळ सर्वश्रेष्ठ नसून आमच्या प्राचीन संस्कृतीमध्येही शाश्वत मानवी मूल्यांचे महत्व विशद करणारे अमर तत्त्वज्ञान आहे, याची भारतीयांना महती पटवून देण्याचे कार्य समाजाने केले. अनिष्ट सामाजिक व धार्मिक परंपरांवर आघात करतानाच त्यांनी आर्य समाजाच्या माध्यमातून हिंदू धर्माचे पुनरुज्जीवन व सामाजिक सुधारणा घडवून आणण्याचे कार्य केले.

### १.३.२ स्वामी दयानंद सरस्वती (१८२४ - १८८३)

स्वामी दयानंद सरस्वती हे एक महत्वाचे हिंदू विद्वान, सुधारक व आर्य समाजाचे संस्थापक होते. ते भारतीय समाजाच्या इतिहासातील एक क्रांतीकारक सामाजिक-धार्मिक सुधारक होते. त्यांचे मूळ नाव मुळाशंकर तिवारी असे होते. त्यांचा जन्म गुजरातमधील मोरवी संस्थानातील टंकारा येथे १२ फेब्रुवारी १८२४ रोजी झाला. करसनजी लालजी तिवारी व यशोदाबाई हे त्यांचे पिता व माता अतिशय धार्मिक व सनातनी हिंदू होते. मुळाशंकर यांनी वडिलांच्या अधिकाराविरुद्ध बंड करुन हिंदूच्या पारंपारिक श्रद्धा व देवाच्या (ईश्वराच्या) अस्तित्वाबद्दल प्रश्न विचारण्यास सुरुवात केली. त्यांना बहुदेवतावाद व मूर्तिपूजा मान्य नव्हती. त्यांनी एका महाशिवरात्रीच्या दिवशी देवाच्या मूर्तिसमोर ठेवलेल्या भेटवस्तू देवाने स्वीकारल्या की नाही याचे निरीक्षण केले. त्यांचे सर्व कुटुंबीय हे गाढ निद्रेत होते व त्यावेळी उंदीर भेटीदाखल ठेवलेल्या अन्नपदार्थांचे भक्षण करीत असलेले त्यांनी पाहिले. त्यामुळे त्यांना मूर्तिमध्ये सर्वशक्तीमान देव असतो ही कल्पना काही पटली नाही. त्यामुळे त्यांना असा प्रश्न पडला की, जो देव स्वतःच्या भेटीदाखल आलेल्या अन्नपदार्थाचे रक्षण करू शकत नाही तो मानवाचे काय रक्षण करू शकेल? तेव्हा अशा असहाय देवाची पूजा करू नये, असे त्यांनी त्यांच्या वडिलांच्यासमोर प्रतिपादन केले. या घटनेने निराश होऊन त्यांचा मूर्तिपूजेवरील विश्वास उडला. त्यानंतर आयुष्यभर त्यांनी कोणत्याही धार्मिक विधीमध्ये सहभागी होण्यास नकार दिला.

त्यांच्या आवडत्या लहान बहिणीचा वयाच्या १४व्या वर्षी मृत्यू झाला. तिच्या मृत्यूनंतर त्यांच्या चुलत आजोबांनी त्यांना मृत्युचा खरा अर्थ समजावून घेण्यास भाग पाडले. विवाहापासून सुटका करुन घेण्यासाठी व जीवनाचा खरा अर्थ समजावून घेण्यासाठी त्यांनी १८४६ मध्ये घर सोडले. त्यांनी नंतर भिक्षेकऱ्यांच्या छावणीत दाखल होऊन ब्रम्हचर्यव्रताची शपथ घेतली व त्यांनी

त्याचे लौकिक जग व नाव सोडून देऊन शुद्ध चैतन्य हे नाव धारण केले. पूर्णानंद सरस्वती यांनी त्यांना निर्धारित विधी व संस्कारानुसार संन्यास दीक्षा दिली व दयानंद असे त्यांचे नामाभिमान केले, तसेच या नावाबरोबर सरस्वती हे शीर्षकही दिले. त्यामुळे ते शंकराचार्य सन्याशांच्या १०उपवर्गांपैकी एक बनले. त्यांना त्यांच्या नावापूर्वी आदरार्थी स्वामी ही उपाधी वापरण्यासही परवानगी दिली. त्यानंतर १५ वर्षे ते साधू अवस्थेत आपल्या सर्व शंकांचे निरसन करणाऱ्या ज्ञानाच्या शोधात फिरत राहिले. फिरत फिरत शेवटी ते मथुरेला आले व एक अंध साधू विरजानंद यांचे शिष्य बनले व त्यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी वेदांचा अभ्यास केला.

वेदांचा अभ्यास पूर्ण केल्यानंतर त्यांचे गुरु विरजानंद यांनी त्यांना गुरुदक्षिणा म्हणून वेदांचे ज्ञान सर्व समाजात पसरविण्यासंबंधीची आज्ञा केली. ही आज्ञा शिरसावंद्य मानून दयानंद यांनी संपूर्ण देशाचा प्रवास केला व अतिशय ज्वलंत अशी व्याख्याने देऊन त्यात त्यांनी जातिव्यवस्था, मूर्तिपूजा व बालविवाहाच्या विरोधात प्रखर निषेध व्यक्त केला. वेदांचे त्यांना जे नवे आकलन झाले त्याच्या सहाय्याने त्यांनी धर्ममार्तंड व धर्मगुरुंना आव्हाने देण्यास सुरुवात केली. त्यांची व्याख्याने (प्रवचने) ऐकण्यासाठी लोक मोठ्या संख्येने येत असत. इतकेच नव्हे तर अनेक राजांनी त्यांना व्याख्यान देण्यासाठी निमंत्रित केले.

### १.३.३ वेदांकडे चला

दयानंद सरस्वती हे पाश्चात्य शिक्षणामुळे तसेच एकेश्वरवादी ख्रिश्चन व इस्लाम धर्मामुळे प्रभावित झाले नाहीत. त्यांच्या दृष्टीने वेद हेच सत्य व सर्वश्रेष्ठ ज्ञानाचे स्त्रोत आहेत. त्यांनी त्यांच्या ‘सत्यार्थ प्रकाश या ग्रंथात वेदांचा अर्थ स्पष्ट केला आहे.

वैदिक धर्म हाच खरा धर्म असून, वैदिक समाज हा सर्व प्रकारच्या अनिष्ट प्रथांपासून मुक्त होता असे त्यांचे मत बनले. ह्या समाजात जातिव्यवस्थाही नव्हती व अस्पृश्यताही नव्हती आणि स्त्रियांना समान दर्जा होता. वैदिक धर्माचे महत्व त्यांना पटले होते म्हणूनच त्यांनी आध्यात्मिक व नैतिक जीवनाच्या प्रगतीसाठी वेदांकडे परत चला अशी हाक या ग्रंथाद्वारे दिली. वेदातील ज्ञानाचा प्रसार करण्यासाठी, हिंदू धर्मात सुधारणा घडवून आणण्यासाठी व अनिष्ट सामाजिक प्रथांचे निर्मूलन करण्यासाठी त्यांनी आर्य समाजाची स्थापना केली.

### आपली प्रगती तपासा.

१) स्वामी दयानंद सरस्वती यांच्या विषयी थोडक्यात माहिती लिहा.

____________________________________________

____________________________________________

____________________________________________

____________________________________________

____________________________________________

### १.३.४ आर्य समाजाची स्थापना :

दयानंद सरस्वती हे वैदिक धर्माचे एका अर्थाने धर्मयोद्धे ठरले. त्यांनी वेदांना प्रमाण मानले. वेदकालीन समाजव्यवस्थेची पुनर्स्थापना करण्यासाठी १० एप्रिल १८७५ रोजी दयानंद सरस्वतींनी आर्य समाजाची मुंबईत स्थापना केली. आर्य समाज ही हिंदूधर्म सुधारणा चळवळ होती. त्याचा अर्थ आदरणीय व्यक्तींचा समाज असा होतो. आपल्या आयुष्यातील महत्वाचे ध्येय

पूर्ण करण्यासाठी त्यांनी आपले उर्वरित आयुष्य आर्य समाजाच्या वेगवेगळ्या ठिकाणी शाखा सुरु करण्यासाठी खर्ची घातले. आर्यसमाजाच्या माध्यमातून त्यांनी समताधिष्ठीत समाजाचा पाया घातला. आर्य समाजाने मूर्तिपूजा, पशूबळी, पूर्वजपूजा, पुरोहित वर्ग, जातिव्यवस्था, अस्पृश्यता, बालविवाह, बहुदेवतावाद, सतीप्रथा इत्यादींना वैदिक मान्यता नाही म्हणून तीव्र शब्दांत निषेध केला.

### **१.३.५ आर्य समाजाची तत्वे :**

आर्य सामाजाची खालील दहा मार्गदर्शक तत्वे आहेत.

१) देव हाच सर्व प्रकारच्या यथार्थ ज्ञानाचा प्राथमिक स्त्रोत आहे.

२) देव हा सर्व सत्य, सर्वज्ञानी, सर्वशक्तीमान, अमर्त्य, विश्वनिर्माता असून, तो एकटाच पूजेसाठी (आराधनेसाठी) पात्र आहे.

३) वेद हे यथार्थ ज्ञानाचे ग्रंथ आहेत.

४) आर्यांनी नेहमी सत्य स्वीकारण्यासाठी व असत्याचा त्याग करण्यासाठी सिद्ध असले पाहिजे.

५) बरोबर काय व चूकीचे काय आहे याची खात्री करुन घेतल्यावरच (वा विश्लेषण केल्यावरच) सर्व प्रकारच्या कृती कराव्यात.

६) जगाच्या भौतिक, आध्यत्मिक व सामाजिक उन्नतीस चालना देणे हे आर्य समाजाचे प्रमुख ध्येय आहे.

७) सर्व व्यक्तीशी प्रेमाने व न्यायाने वागले पाहिजे.

८) अज्ञानाचा नाश करुन ज्ञानवृद्धी केली पाहिजे.

९) प्रत्येकाने स्वतःबरोबरच इतरांच्याही भल्यांचा विचार केला पाहिजे.

१०) व्यक्तिगत उन्नतीऐवजी संपूर्ण मानव जातीच्या उन्नतीस प्राधान्य दिले पाहिजे.

### **आपली प्रगती तपासा.**

१) आर्य समाजाची तत्त्वे लिहा.

____________________________________________________________

____________________________________________________________

____________________________________________________________

____________________________________________________________

____________________________________________________________

### **१.३.६ धार्मिक कार्य**

हिंदू धर्मात प्रचलित असलेल्या संभ्रम अवस्थेची दयानंद सरस्वती यांना कल्पना होती. म्हणूनच हिंदू धर्म सुधारणेसाठी वैदिक धर्माच्या पुनरुज्जीवनाचा पुरस्कार त्यांनी केला. स्वामी दयानंदांनी केलेल्या धर्मसुधारणा पुढीलप्रमाणे आहेत.

### **१. मूर्तिपूजेस विरोध :**

आर्य समाजाने सनातनवादी ब्राम्हण समुदायाविरुद्ध लढा देऊन वेदांमध्ये कोठेही मूर्तिपूजेसंबंधी उल्लेख वा पुरावा नसल्याचा विचार प्रस्थापित केला. देव हा सर्वत्र असतो त्याला कुलपात किंवा पंडितांची दुकाने असलेल्या मंदिरात बंदिस्त करू नका असे मत मांडले. त्याचप्रमाणे दयानंद सरस्वती यांनी हिंदू धर्मातील बहुदेवतावाद व मूर्तिपूजा ह्या श्रद्धांवरही हल्ला

चढविला. त्यांनी पशुबळी व नरबळीला प्रखर विरोध केला आणि निरर्थक विधी संस्काराचा धिक्कार केला. त्यांनी १८८६ मध्ये 'भगवत खानदानम्' ह्या नावाचा ग्रंथ प्रकाशित केला. त्यांच्या लिखाणात त्यांनी जाहिररित्या मूर्तिपूजेचा निषेध केला व मूर्तिपूजेसंबंधी वेदांच्यामध्ये ओझरता तरी पुरावा आहे का ते दाखवा असे पंडितांना धाडसाने सुनावले. हिंदू धर्माची पुरोहिताच्या कचाट्यातून सुटका करण्याची त्यांची इच्छा होती.

### २. एकेश्वरवाद :

वेदांतील उल्लेखाप्रमाणे देव एकच आहे यावर त्यांचा पूर्ण विश्वास होता. विष्णू, रुद्र व अग्नी हे वेगवेगळे देव नसून ते एकाच देवाची वेगवेगळी नावे आहेत असे सांगून त्यांनी त्या एकाच देवाचे निरनिराळे पैलू प्रकट करुन दाखविले. वैदिक धर्म हा खरा धर्म असल्याचा प्रचार केला व आपल्या अनुयायांना वेदाप्रमाणे वागण्याचा सल्ला दिला.

### ३. शुद्धी चळवळ :

इस्लाम व ख्रिश्चन धर्मांची आव्हाने परतविणे हे आर्य समाजाच्या अनेक उद्दिष्टांपैकी एक उद्दिष्ट होते. अनेक हिंदुनी ख्रिश्चन व इस्लाम धर्म स्वीकारला होता. शुद्धीकरण विधी करुन त्यांनी हजारो धर्मांतरित हिंदूना परत हिंदू धर्माच्या प्रवाहात आणले.

### ४. पुरोहित वर्गास विरोध :

आर्य समाजाने मूर्तिपूजेला, कर्मकांडांना व जातिव्यवस्थेत प्रचलित असलेल्या पुरोहित वर्गाला विरोध केला आणि आपल्या स्वार्थासाठी सनातनवादी हिंदू धर्मगुरुंनी शिकवलेल्या हिंदू धर्मांच्या लोकप्रिय स्वरूपालाही विरोध केला. व्यक्ती व देव यांच्यात मध्यस्थी करण्यासाठी पुरोहित वर्गाचा गरज तर नाहीच तसेच हा वर्ग हिंदू धर्माचा अभिरक्षकही नाही असे त्यांनी प्रतिपादन केले. स्वतःच्या फायद्यासाठी सामान्य माणसांची पिळवणूक करणाऱ्या अज्ञानी व स्वार्थी पुरोहित वर्गाच्या विरोधी ते होते.

### ५. कर्मकांडास विरोध :

मूर्तिपूजा, अवतार कल्पना, तीर्थयात्रा, कर्मकांड इ. गोष्टी वैदिक धर्मात नसल्याची शिकवण दयानंदांनी दिली. त्यांनी तर्कबुद्धीच्या कसोटीवर न उतरलेल्या श्रद्धा व चालीरिती नाकारल्या. म्हणूनच वेदांची मान्यता नसणाऱ्या सर्व गोष्टी सोडून देण्यासंबंधीचा सल्ला त्यांनी लोकांना दिला.

### आपली प्रगती तपासा.

१) आर्य समाजाच्या धार्मिक कार्यांचे वर्णन करा.

### १.३.७ सामाजिक कार्य

स्वामी दयानंद सरस्वती हे केवळ धर्मसुधारक नव्हते तर समाज सुधारकही होते. त्यांच्या काळात बालविवाह, विधवाविवाह बंदी, अस्पृश्यतापालन इत्यादी प्रथा समाजात अस्तित्वात होत्या. आर्य समाजाने समाजातील या प्रकारच्या अनिष्ट प्रथांचे निर्मूलन करण्याचा प्रयत्न केला आणि तसेच समाज कल्याणासही चालना दिली. दयानंद सरस्वती यांचे सामाजिक कार्य पुढीलप्रमाणे.

#### १. जातिव्यवस्थेला विरोध

वर्णव्यवस्था ही आनुवांशिक आहे हे मत स्वामीजींनी नाकारले. त्यांना जातिव्यवस्था मान्य नव्हती. त्यांनी हे सिद्ध करून दाखविले की, वेदांच्यामध्ये अस्पृश्यतेचा उल्लेख नाही. कोणतीही व्यक्ती ही जन्माने लहान अगर मोठी नसते तर ती आपल्या कतृत्वाने आपले स्थान निश्चित करते. त्यांनी अस्पृश्यतेच्या विरुद्ध चळवळ सुरू केली. त्यांनी आंतरजातीय विवाहासाठी प्रोत्साहन दिले.

#### २. समानतेची शिकवणूक

स्वामी दयानंद सरस्वती यांनी सर्व लोक जन्माने समानच आहेत, जन्माने कोणीही ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य वा शुद्र नसतो तर जो व्यवसाय व्यवती निवडते त्यावर ते अवलंबून असते, शिवाय वर्ण हे एकमेकांना पूरक असून कोणीही श्रेष्ठ अगर कनिष्ठ नाही असा उपदेश केला. त्यांनी आर्य समाजाच्या सर्व सदस्यांना समानतेची वागणूक दिली. जात व पंथ यावर आधारीत भेदभाव त्यांनी केला नाही.

#### ३. बालविवाहास विरोध

स्वातंत्र्यपूर्वकाळात बालविवाहाची प्रथा सामान्य होती. स्वामी दयानंद यांनी हिंदू समाजाला असलेल्या या प्रथेच्या विरोधात भूमिका घेतली व तसा प्रचारही केला. आजही देशाच्या काही भागात ही प्रथा प्रचलित आहे. ही प्रथा बंद व्हावी असे दयानंद यांनी प्रतिपादन केले. आर्य समाजाने विवाहाची वयोमर्यादा निश्चित करताना मुलांसाठी २५वर्षे व मुलींसाठी १६ वर्षे वय असावे असे स्पष्ट केले.

#### ४. विधवा पुनर्विवाहास प्रोत्साहन

स्वामी दयानंद सरस्वतींनी विधवा पुनर्विवाहाला प्रोत्साहन दिले. विधवा पुनर्विवाहाचे समर्थन करतानाच त्यांनी लोकांना रानटी व सनातनी 'सतीप्रथा बंद करा असे आग्रहाने सांगितले. सक्तीच्या विधवावस्थेतून विधवांची सुटका व्हावी यासाठीच स्वामी दयानंद सरस्वती यांनी विधवा पुनर्विवाहाचे समर्थन केले. त्यांनी विधवांच्यासाठी नियोग पद्धती सुचवली.

#### ५. स्वदेशी चळवळ

स्वामी दयानंद सरस्वती हे स्वदेशााचे अत्यंत कडवे समर्थक होते आणि म्हणून त्यांनी देशात उत्पादित झालेल्या वस्तूंचाच वापर करावा, असा आग्रह धरला. तसेच त्यांनी परदेशात उत्पादित झालेल्या वस्तूंवर बहिष्कार टाकावा असेही स्पष्ट केले. ते लोकशाही व स्वयंशासित शासन व्यवस्थेचेही समर्थक होते.

### ६. राष्ट्रीय जागृती

भारतातील ब्रिटिश राजवटीने देशाच्या कल्याणाच्या दृष्टीने काहीच योगदान दिलेले नाही हा विचार लोकांच्या गळी उतरविण्याचा स्वामी दयानंद यांनी प्रयत्न केला. ब्रिटिश राजवटीने इतर कोणाहीपेक्षा ब्रिटिशांचाच अधिक फायदा झालेला आहे असे विचार मांडून आर्य समाजाने लोकांच्यामध्ये राष्ट्रभावना जागृत करण्याचा प्रयत्न केला. आर्य समाजाने मोठे विचारवंत व नेते उदा. लाला लजपतराय, स्वामी श्रद्धानंद, बिपीनचंद्र पॉल, मुंशी रामानंद इत्यादी राष्ट्रीय चळवळीला दिले. ह्या राष्ट्रीय जागृतीमुळे लोकांना संघटित होऊन स्वातंत्र्यासाठी लढा देणे शक्य झाले.

### ७. अनाथगृहे

आर्य समाजाने पहिले अनाथगृह पंजाबमधील फिरोजपूर येथे सुरु केले व त्यानंतर संपूर्ण देशभरात अनाथगृहांची साखळी उभी केली. आर्य समाजाने विधवा व परित्यक्त्या यांच्यासाठीही गृहे निर्माण केली. तेथे त्यांच्या निवासाबरोबरच त्यांना एखाद्या उपयुक्त व्यवसायाचे प्रशिक्षण देण्याची आणि सुयोग्य जोडीदाराबरोबर त्यांचे विवाह करुन देण्याची व्यवस्था करण्यात आली होती.

### आपली प्रगती तपासा.

१) आर्य समाजाचे सामाजिक कार्य लिहा.

________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________

## १.३.८ शैक्षणिक कार्य

### १. दयानंद अँग्लो-वैदिक महाविद्यालय

स्वामी दयानंद सरस्वती यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ (स्मरणार्थ) त्यांच्या अनुयायांनी देशभर शाळा, महाविद्यालये, वसतिगृहे स्थापन केली. १ जुलै १८८६ रोजी लाला हंसराज यांच्या प्रयत्नाने पहिले दयानंद अॅग्लो-वेदिक महाविद्यालय, लाहोर येथे स्थापन केले. या महाविद्यालयामध्ये भारतीय संस्कृतीच्या संरक्षित मार्गदर्शनाखाली पाश्चात्य व वैज्ञानिक शिक्षण दिले जात होते. हिंदू साहित्य, अभिजात संस्कृती आणि वेद यांच्या अभ्यासाला प्रोत्साहन देणे, त्यात सुधारणा करणे आणि त्याची कार्यवाही करणे ही ह्या महाविद्यालयाची प्रमुख उद्दिष्टे होती.

### २. गुरुकुल

प्राचीन आर्य पद्धतीचे शिक्षण देण्यासाठी आर्य समाजाने मोठ्या संख्येने गुरुकुलांची स्थापना केली. हरिद्वारजवळील कांग्री येथे अतिशय प्रसिद्धी पावलेले गुरुकुल लाला मुन्शीराम यांनी स्थापन केले. येथे वयाच्या आठव्या वर्षी विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जात असे. प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना शिक्षण पूर्ण करण्यासाठी गुरुकुलात १६ वर्षी विद्यार्थ्यांना शिक्षण पूर्ण करण्यासाठी गुरुकुलात १६ वर्षे राहावे लागत असे. विद्यार्थ्यांना साधे राहणीमान, पावित्र्य व अज्ञाधारकपणा, कारणाशिवाय विद्यार्थ्यांना अध्ययनाच्या प्रदीर्घ कालावधीत घरी सोडले जात नसे. कांग्री गुरुकुल हे वेदाध्ययनाचे एक केंद्र म्हणून विकसित झाले होते.

### ३. स्त्रियांच्या शिक्षणास प्रोत्साहन

दयानंद सरस्वती यांनी विविध व्याख्यानाद्वारे स्त्रियांच्या शिक्षणाला प्रोत्साहन दिले. वेदकाळात स्त्रियांना समानतेची वागणूक दिली जात होती. व त्यांना शिक्षणच स्त्रियांनाही दिले जावे असे त्यांनी प्रतिपादित केले. त्यांनी स्त्रियांच्यासाठी लष्करी शिक्षणाची शिफारस केली. आर्य समाजाने मुलीच्या शिक्षणासाठी पंजाबात अनेक शाळा व महाविद्यालये सुरु केली.

हिंदू समाजात निर्माण झालेला न्यूनगंड आपल्या शिकवणुकीद्वारे दूर करुन या समाजात नवी चेतना जागविण्याचे तद्वतच समाजाची अस्मिता जागृत करण्याचे कार्य आर्य समाजाने केले. या समाजाने समाजोन्नतीची प्रेरणा प्राचीन वैदिक धर्मातच शोधली. प्राचीन भारतीय संस्कृती व वैदिक वर्णाश्रम धर्म यांचे श्रेष्ठत्व प्रतिपादन करुन भारतीय संस्कृतीच्या महान परंपरेची आपल्या लोकांना जाणीव करुन दिली. मानवसेवेचा नवा आदर्श त्यांनी भारतीयांपुढे ठेवला. भारतीय समाजातील सामाजिक व धार्मिक जीवनातील अनिष्ट रुढी व परंपरांवर प्रखरपणे टीका करुन वैदिक धर्माच्या श्रेष्ठत्वाच्या विचारांद्वारे भारतीय समाजाची अस्मिता जागृत करण्याचे, धार्मिक व सामाजिक सुधारणा घडवून आणण्याचे, शिक्षणाचा प्रचार-प्रसार करण्याचे व राष्ट्राभिमानाची जाणीव समाजात निर्माण करण्याचे कार्य आर्य समाजाने केले.

**आपली प्रगती तपासा.**

१) आर्य समाजाने केलेल्या शैक्षणिक कार्याचा आढावा घ्या.

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

## १.४ रामकृष्ण मिशन

भारतीय समाजाचे पुनरुज्जीवन करण्यासाठी प्राचीन भारतीय धर्मतत्वांपासून प्रेरणा घेणाऱ्या ज्या संस्था एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात भारतात जन्माला आल्या, त्यात आर्य समाजाइतकेच रामकृष्ण मिशनचे स्थानही महत्वपूर्ण आहे. पौर्वात्य आणि पाश्चात्य विचारसरणीचा संयोग रामकृष्ण मिशनमध्ये झाला. या संस्थेच्या सदस्याचे प्रेरणास्थान हे रामकृष्ण परमहंस हे होते परंतु रामकृष्ण मिशनची स्थापना स्वामी विवेकानंद ह्यांनी केली.

### १.४.१ रामकृष्ण परमहंस (१८३६-१८८६)

रामकृष्ण परमहंसाचा जन्म बंगालमधील हुगळी जिल्हयातील एका लहानश्या खेड्यात इ.स.१८३६मध्ये एका ब्राम्हण कुटुंबात झाला. लहानपणापासून ते ईश्वराच्या भक्तीमध्ये तल्लीन असत. त्यांनी कोणत्याही प्रकारचे शिक्षण घेतले नव्हते. वयाच्या सतराव्या वर्षी रामकृष्ण कलकत्त्याला गेले आणि कालिमातेचे उपासक बनले. त्यानंतर कलकत्त्यानजीकच्या दक्षिणेश्वर काली मंदिराचे ते पुजारी बनले आणि तेथूनच त्यांच्या आध्यात्मिक जीवनाला प्रारंभ झाला. रामकृष्ण परमहंसानी हिंदू धर्मग्रंथाचा तर सखोल अभ्यास केलाच, परंतु त्याचबरोबर इस्लाम आणि ख्रिश्चन धर्मांचेही अंतरंग जाणून घेतले. त्यामुळेच सर्व धर्मांची तत्त्वे समान आहेत व सत्य

सर्वच धर्मात आहे अशी त्यांची धारणा बनली. मानवतेची सेवा हीच ईश्वराची सेवा होय असा त्यांचा विश्वास होता.

### १.४.२ स्वामी विवेकानंद

स्वामी विवेकानंद रामकृष्ण परमहंस ह्यांचे एक प्रख्यात शिष्य होते. रामकृष्णांच्या विचारांचा प्रसार त्यांचे शिष्य स्वामी विवेकानंदांनी जगभर केला. विवेकानंदाचे मूळ नाव नरेंद्रनाथ दत्त होते. त्यांचा जन्म इ..स १८६३ मध्ये कलकत्यातील एक श्रीमंत कुटुंबात झाला. इ.स. १८८४ मध्ये ते पदवीधर झाले. जॉन स्टुअर्ट मिल, ह्यूम, स्पेन्सर, हेगेल, डार्वीन इत्यादी पाश्चात्य तत्ववेत्यांच्या साहित्याचा त्यांनी सखोल अभ्यास केला होता. स्वामी विवेकानंद हे एक महान तत्त्वज्ञानी, राष्ट्रवादी आणि सुधारक होते. सुरुवातीला ते ब्राम्हो समाजाकडे आकर्षित झाले. इ.स. १८८३मध्ये त्यांची स्वामी रामकृष्ण परमहंसांशी ओळख झाली. त्यांच्या सहवासात आल्यामुळे विवेकानंदाच्या आयुष्याला वेगळेच वळण लागले. रामकृष्णांनी त्यांना आपले वारस नेमले आणि आपले कार्य पुढे चालविण्याची जबाबदारीही त्यांच्यावर सोपवली. विवेकानंदांनी रामकृष्णांचा आध्यात्मिक संदेश प्रसृत करण्यास त्यांच्या देहावसनानंतर १८८७ मध्ये बारानगर येथे एका पडक्या घरात एक मठ स्थापन केला.

### १.४.३ विश्वधर्मपरिषद

इ.स. १८९३ साली अमेरिकेतील शिकागो येथे भरलेल्या विश्वधर्मपरिषदेसाठी हिंदू धर्माचे प्रतिनिधी या नात्याने स्वामी विवेकानंद उपस्थित राहिले. ''माझ्या अमेरिकेतील बंधू आणि भगिनींनो या शब्दांनी त्यांनी आपल्या भाषणास सुरुवात केली. त्या परिषदेत त्यांनी हिंदू धर्मतत्वांचे, अद्वैत तत्वज्ञानाचे विशदीकरण आपल्या प्रभावी वाणीने अतिशय परिणामकारकरीत्या करुन सर्व सभा मंत्रमुग्ध केली. हिंदूच्या अद्वैत तत्वज्ञानाच्या आधारेच जगाला विश्वधर्माची प्राप्ती करुन घेता येईल असे ठामपणे प्रतिपादन करुन जगातील सर्व धर्मांत हिंदू धर्माचे स्थान वैशिष्टपूर्ण असल्याचे मत त्यांनी श्रोत्यांच्या मनावर ठसविले. ज्या हिंदू धर्माविषयी ख्रिस्ती धर्मोपदेशक तिरस्काराने बोलत तोच धर्म जगाच्या उद्धाराचा मार्ग दाखविणारा धर्म आहे असे ठासून सांगून त्यांनी जिज्ञासू पाश्चात्यांची मने हिंदू धर्माकडे आकर्षित केली. अमेरीकेत अनेक लोक त्यांचे शिष्य झाले. अमेरिकेतील वृत्तपत्रांनी त्यांचा 'धर्मसभेतील महनीय व्यक्ती म्हणून गौरव केला. शिकागो येथे विवेकानंदांनी हिंदुधर्माची विजयपताका फडकविल्यामुळे ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या अखंड व बेलगाम टीकेमुळे निर्माण झालेला न्यूनगंड नाहीसा होऊन भारतीयांमध्ये स्वधर्माविषयी अभिमान जागृत झाला.

विश्वधर्मपरिषदेतील भाषणामुळे विवेकानंदाची कीर्ती सर्वदूर पसरली. इ.स. १८९६ मध्ये त्यांनी न्यूयॉर्क येथे वेदांत सोसायटीची स्थापना केली. त्यांची योगावरील पुस्तके अमेरिका व युरोपमध्ये लोकप्रिय झाली. अमेरीकेतून ते पॅरिस, लंडन व इतर शहरी गेले. या प्रवासात त्यांनी ठिकठिकाणी व्याख्याने देऊन रामकृष्णाच्या तत्वज्ञानांची जगाला ओळख करुन दिली. काही विद्यापीठांनी त्यांना तत्वज्ञान व धर्म शिकविण्यासाठी पाचारण केले. प्रवासकाळात त्यांची एक आयरिश महिला श्रीमती मार्गारेट नोबेल यांच्याशी भेट झाली. त्या पुढे विवेकानंदाच्या शिष्या बनल्या. त्याच पुढे सिस्टर निवेदिता म्हणून भारतात प्रसिद्धीस आल्या. 'प्रबुद्ध भारत आणि 'उद्बोधन ह्या दोन नियतकालिकामार्फत त्यांनी हिदुधर्माचा प्रसार केला. परदेशात अपार कीर्ती आणि काही शिष्य मिळवून ते स्वदेशी परतले तेव्हा आधुनिक भारताच्या या प्रतिभासंपन्न प्रतिनिधीचे भारतीयांनी अपार उत्साहाने स्वागत केले.

### १.४.४ रामकृष्ण मिशनची स्थापना

पाश्चात्य जगाचा दौरा करुन परत आल्यानंतर विवेकानंदांनी ५ मे १८९७ रोजी भारतात रामकृष्ण मिशनची स्थापना केली. रामकृष्ण मिशनची मुख्य ध्येय आणि उद्दिष्टये पुढीलप्रमाणे :

१. सर्व धर्म समान आहेत, सर्व धर्मांची तत्त्वे सत्य आहेत. सर्व धर्मात सत्यासी शिकवण असल्यामुळे व्यक्तीने धर्मांतर करु नये.
२. स्वतःच्या धर्माची कास धरुनच मनुष्याला ईश्वरप्राप्ती होऊ शकते. धर्म हा मोक्ष प्राप्तीचा मार्ग आहे आणि मोक्षप्राप्ती ही आत्मानुभूतीची अवस्था आहे.
३. आत्मा ईश्वराचा अंश असून ईश्वर निर्गुण, निराकार व सर्व शक्तिमान आणि सर्वव्यापी आहे.
४. जनसेवा हीच ईश्वरसेवा आहे.
५. रामकृष्ण परमहंसाच्या शिकवणुकीचा प्रसार करणे
६. आत्मा व परमात्मा यांच्या ऐक्याचा अनुभव घेऊन जसा आत्मसाक्षात्कार होतो तसाच मूर्तीपूजेच्या मार्गानेही आत्मसाक्षात्कार होतो.

**आपली प्रगती तपासा :**

१) स्वामी विवेकानंदावर टीप लिहा.

________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________

### १.४.५ रामकृष्ण मिशनची शिकवण

आपल्या भाषणाद्वारे व लिखाणाद्वारे स्वामी विवेकानंदानी प्राचीन हिंदु संस्कृती व वैदिक धर्म यांचा जोरदार पुरस्कार केला व मनुष्याच्या आध्यात्मिक उन्नतीवर भर दिला. प्रत्येक भारतीय माणसाने परिश्रम करुन हिंदुस्थानातील दारिद्र्य दूर करण्याचा प्रयत्न केला पाहिजे असे स्वामीजींचे मत होते. स्वामीजी प्रखर राष्ट्रवादी होते. प्रत्येक भारतीयाने आपल्या मातृभूमीची भक्तीभावाने पूजा करुन तिची उन्नती करण्याचा प्रयत्न केला पाहिजे असे त्यांना वाटत असे. विज्ञान आणि तंत्रज्ञान यांची कास धरल्याशिवाय हिंदुस्थानचा उद्धार होणे शक्य नाही असे विवेकानंदांचे ठाम मत होते. विवेकानंदांच्या शिकवणुकीत जुनी आध्यात्मिक मूल्ये आणि आधुनिक नवमतवाद यांचा सुंदर मिलाफ होता.

समाजसेवा, अस्पृश्यता निर्मूलन, स्त्रीयांचा उद्धार, शुद्धीकरण, भारतीय संस्कृतीचे संवर्धन नैतिकता आणि राष्ट्रवादाची जाणीव यासाठी रामकृष्ण मिशनने मोठे योगदान दिले.

### १.४.६ रामकृष्ण मिशनची कामगिरी

#### १. समाजसेवा

रामकृष्ण मिशनने धर्माचरणात समाजसेवेला प्राधान्य दिले. ख्रिश्चन मिशन यांच्या सेवाभावी संस्थाप्रमाणे विवेकानंदांनी अनेक सेवाभावी संस्था स्थापन करुन समाजसेवा घडवून आणली. भूकंप, महापूर, दुष्काळ, साथीचे रोग यासारख्या आपत्ती काळात मदत करणे हे

मिशनने ध्येय मानले. इतकेच नाही तर दवाखाने, शाळा, महाविद्यालये, ग्रंथालये, वसतिगृहे, अनाथ बालिकाश्रम इत्यादींची अनेक ठिकाणी स्थापना केली. आजही रामकृष्ण मिशनचे समाजसेवेचे कार्य अविरतपणे चालू आहे.

### २. सामाजिक सुधारणा

स्वामी विवेकानंदांनी जातीपद्धती आणि अस्पृश्यतेवर जोरदार प्रहार केले. स्त्रियांचा दर्जा सुधारण्यासाठी प्रयत्न केले. श्रीमंताकडून गरिबांच्या होत असलेल्या पिळवणूकीबाबत हिंदू धर्माने मौन राखणे ह्याबद्दलही त्यांनी खेद व्यक्त केला. उपाशी माणसाला धर्माचे ज्ञान शिकवणे हा देवाचा आणि मानवतेचा अपमान आहे असे त्यांचे प्रतिपादन होते. खरा धर्म म्हणजे मानवतावाद आहे, असा संदेश त्यांनी भारतीय समाजाला दिला. ईश्वराचा अंश प्रत्येक मानवात असल्यामुळे समाजात राहून दिनदुबळ्यांची, दरिद्रीनारायणांची सेवा करणे हाच खरा धर्म होय अशी शिकवण त्यांनी दिली. भारतीय समाजातील बहुसंख्य दलित वर्गाच्या शारीरिक, मानसिक, नैतिक उन्नतीवरही त्यांनी भर दिला.

### ३. हिंदुत्त्ववाद

भारतीय आध्यात्मिकता आणि तत्वज्ञान जगात सर्वश्रेष्ठ आहे यावर विवेकानंदांचा विश्वास होता. आधुनिक वेदांताची कल्पना त्यांनी लोकप्रिय केली. वेदांतील तत्त्वज्ञान त्यांनी सुस्पष्टपणे जगासमोर मांडले व प्रत्येक व्यक्तीच्या अंतःकरणात धैर्य, निर्भयता व आत्मविश्वास निर्माण केला. हिंदू धर्मकल्पना पाश्चात्यांच्या धर्मकल्पनेपेक्षा वा संस्कृतीपेक्षा रतिभरही कमी नाही, हे त्यांनी सोदाहरण पटवून दिले. त्यामुळे हिंदू धर्माविषयीचा आदरभाव वाढीस लागला. तथापि हिंदू धर्मातील दोषस्थळे वेचून बाहेर काढावयाला हवीत आणि मानवतावादी दृष्टिकोन उराशी बाळगून नेहमी कार्यरत व्हायला हवे असे विवेकानंद नेहमी सांगत. विवेकानंदांच्या कार्यामुळे हिंदू समाजातील सनातनी आणि सुधारक यांचा समन्वय साधला गेला. एका उच्च स्थानावरुन भौतिक ध्येय गाठण्यासाठी पौर्वात्य आणि पाश्चात्य जग जोडण्याचे कार्य रामकृष्ण मिशनने केले.

### ४. राष्ट्रप्रेम जागृती

राष्ट्राला आलेले दौर्बल्य नष्ट करुन भारतीयांत राष्ट्रवादाची भावना जागृत करण्यावरही त्यांनी भर दिला. धर्म व समाज सुधारणेइतकेच राष्ट्राला राजकीय दृष्ट्या बळकटी आणण्याचे महत्व प्रतिपादन करुन त्यांनी राष्ट्रवादाची दीक्षा समाजाला दिली. धार्मिक व सामाजिक सुधारणा हे साध्य नसून प्रबळ राष्ट्राची पायाभरणी करण्याचे ते साधन आहे याचीही जाणीव त्यांनी भारतीयांना आपल्या भाषणांतून व लिखाणांतून सतत करुन दिली.

इ.स.१९०२ मध्ये स्वामी विवेकानंदानी समाधी घेतली व त्यामुळे रामकृष्ण मिशनचेच नव्हे तर भारताचे अतोनात नुकसान झाले. विवेकानंदांच्या पश्चात त्यांच्या अनुयायांनी व सहकाऱ्यांनी त्यांचे व्रत निष्ठेने पुढे चालविले. रामकृष्ण मिशनच्या शाखा देशात व देशाबाहेर विशेषतः अमेरिका व इंग्लंड येथे स्थापन झाल्या. व्हॅलेंटाईन चिरोलसारख्या चिकित्सक पाश्चात्य लेखकानेही 'प्राचीन भारतीय संस्कृतीची व नवजात भारतीय राष्ट्रवादाची पाश्चात्यांना प्रभावीपणे जाणीव करुन देणारा पहिला हिंदू असे गौरवपर उद्गार त्यांच्यासंबंधी काढलेले आहेत.

**आपली प्रगती तपासा.**

१) रामकृष्ण मिशनची शिकवण व कामगिरी लिहा.

## १.५ सारांश

१९व्या शतकात दुसऱ्या दशकात राजा राममोहन रॉय ह्यांनी धार्मिक व सामाजिक प्रबोधनाच्या कार्याचा श्रीगणेशा केल्यापासून अनेक सुजाण, प्रबुद्ध भारतीयांनी देशाच्या भिन्न भागात, भिन्न गटांत, भिन्न संप्रदायात व्यक्तिगत अगर संघटितरीत्या हे कार्य नेटाने चालविले. समाजसुधारणेचे कार्य करणाऱ्या व्यक्तींची स्फूर्तीस्थाने वेगवेगळी होती. ब्राम्हो समाजाच्या प्रमुखाला ही स्फूर्ती पाश्चिमात्य विचार व जीवन प्रणालीतून मिळाली, तर आर्य समाज, रामकृष्ण मिशन यांच्या प्रमुखांना प्राचीन भारतीय संस्कृतीनेच भारताच्या पुनरुज्जीवनासाठी आवश्यक असलेली प्रेरणा दिली. या निरनिराळ्या संस्थांची स्फर्तिस्थाने वेगवेगळी असली तरी भारतीय समाजातील अनिष्ट परंपरा, चैतन्यहीनता दूर करुन या समाजाला प्रगतीशील व गतीशील बनविण्याचे समान उद्दिष्ट त्यांच्यासमोर होते. ब्रिटिश सत्तेच्या स्थापनेमुळे भारतीय समाजात निर्माण झालेला न्यूनगंड दूर करुन समाजाला नवी जीवनदृष्टी देण्याचे व या समाजात आत्मविश्वास निर्माण करण्याचे कार्य या चळवळींनी केले.

## १.६ प्रश्न

१) १९व्या शतकातील सामाजिक-धार्मिक सुधारणा चळवळीतील राजा राममोहन रॉय ह्यांच्या भूमिकेचे परीक्षण करा.

२) १९व्या शतकातील सामाजिक-धार्मिक सुधारणा चळवळीतील स्वामी दयानंद सरस्वती व आर्य समाजाच्या योगदानावर प्रकाशझोत टाका.

३) स्वामी विवेकानंदांच्या जीवन व कामगिरींचे वर्णन करा.

## १.७ संदर्भ ग्रंथ


१) आचार्य धनंजय, भारताचा इतिहास (१७६१-१९७१), श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, २००९.

२) कोलारकर, श.गो. भारताचा इतिहास (१७०७-१९५०), श्री मंगेश प्रकाशन, नागपूर,१९९५.

३) ग्रोवर बी.एल.व.बेल्हेकर एन.के.आधुनिक भारताचा इतिहास, एस.चंद आणि कंपनी लि.,नवी दिल्ली,२००३.

४) पंडित सुधाकर वि.,अर्वाचीन भारताचा इतिहास (१८००-१९६४), प्राची प्रकाशन, मुंबई,१९९४.

५) भिडे गजानन, आधुनिक भारताचा इतिहास, अनिरुद्ध पब्लिशिंग हाऊस, पुणे,२०००.
६) जाधव वसंत, आधुनिक महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास, विद्या प्रकाशन, नागपूर, १९९८.
७) वक्काणी नि.आ. आधुनिक भारताचा इतिहास, श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर,१९९४.
८) वैद्य सुमन व कोठेकर शांता, आधुनिक भारताचा इतिहास (१८५७-१९२०), श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर,२०१५.
९) शहा जी.बी.भामरे आर.पी.आणि पवार एम.डी., आधुनिक भारताचा इतिहास (१७५७ ते १९५०) प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव, २०१४.

❖❖❖❖

# २

# सामाजिक धार्मिक सुधारणा चळवळी:
# सुधारणा व पुनरुज्जीवन  भाग-२

## (ब) सत्यशोधक समाज, अलीगढ चळवळ आणि सिंग सभा चळवळ
## (क) सुधारणा चळवळीचा प्रभाव

**प्रकरणाची रचना :**

२.० उद्दिष्टे

२.१ सत्यशोधक समाज

- २.१.१ प्रस्तावना
- २.१.२ महात्मा जोतीबा फुले
- २.१.३ सत्यशोधक समाजाची स्थापना
- २.१.४ सत्यशोधक समाजाची तत्त्वे
- २.१.५ महात्मा फुले ह्यांचे सामाजिक कार्य
  - १) स्त्रियांची उन्नती
  - २) अस्पृश्यांची उन्नती
  - ३) शेतकऱ्यांची उन्नती
  - ४) गिरणी कामगारांचे कल्याण
  - ५) मद्यपानाविरुद्ध प्रचार
  - ६) दुष्काळग्रस्तांना मदत
- २.१.६ महात्मा फुले ह्यांचे शैक्षणिक कार्य
  - १) स्त्रीशिक्षणास चालना
  - २) कनिष्ठ जातीच्या शिक्षणास चालना
  - ३) मोफत व सक्तीचे शिक्षण
  - ४) इतर शाळांची स्थापना
  - ५) विशिष्ट अभ्यासक्रम

२.२ अलिगढ चळवळ

- २.२.१ पार्श्वभूमी
- २.२.२ सर सय्यद अहमद खान
- २.२.३ सर सय्यद - एक सुधारक
- २.२.४ सर सय्यद - एक शिक्षणतज्ज्ञ

२.२.५ ब्रिटिशांप्रति राजनिष्ठेची भावना
२.३ सिंग सभा चळवळ
२.३.१ पार्श्वभूमी
२.३.२ सिंग सभेची स्थापना
२.३.३ सिंग सभेची उद्दिष्ट्ये
२.३.४ सिंग सभेची कामगिरी
२.४ सुधारणा चळवळीचा प्रभाव
१. धार्मिक क्षेत्रात परिवर्तन
२. समाजविघातक प्रथा नष्ट करण्याचा प्रयत्न
३. आधुनिक शिक्षणाचा प्रसार
४. वृत्तपत्रांचा विकास
५. साहित्यातील योगदान
६. स्त्रीयांचा उद्धार
७. राजकीय जागृती
८. समानतेस चालना
९. ऐक्याची गरज
२.५ सारांश
२.६ प्रश्न
२.७ संदर्भ सूची

## २.० उद्दिष्टे

१. एक ब्राम्हणेतर चळवळ म्हणून सत्यशोधक चळवळीच्या कार्याचा आढावा घेणे.
२. अलिगढ चळवळीतील सर सय्यद अहमद खान यांच्या भूमिकेचे ज्ञान होणे.
३. सिंग सभा चळवळीची कामगिरी स्पष्ट करणे.
४. १९व्या शतकात भारतीय समाजातील सामाजिक-धार्मिक सुधारणा चळवळीच्या प्रभावाचे परीक्षण करणे.

## २.१ सत्यशोधक समाज

### २.१.१ प्रस्तावना

आधुनिक महाराष्ट्राच चेहरा मोहरा बदलून टाकण्यासाठी ज्या अनेक महापुरुषांनी आपले जीवन व्यतीत केले, त्यामध्ये ज्योतिबा फुले हे पहिले क्रांतिकारक महापुरुष होत. महाराष्ट्रात अस्पृश्यतानिवारणाच्या, दलितोद्धाराच्या आणि स्त्रियांच्या उद्धाराच्या चळवळींचा श्रीगणेशा करणारे जोतिबा फुले हे सत्यशोधक समाजाचे संस्थापक होत. हिंदू समाजात अस्पृश्य, शुद्र मानले गेलेले ब्राम्हणेत्तर वर्ग, स्त्रिया, शेतकरी हे जोतिबांच्या दृष्टीने दलित वर्ग होते. कारण हिंदू समाजाने शतकानुशतके या वर्गाची उपेक्षा केली होती; मानभंग केला होता,

त्यांच्यातील आत्मसन्मानाची भावना मारुन टाकून त्यांच्या विकासाचा मार्ग अवरुद्ध केला होता. भारतीय समाजाची उन्नती व्हावयाची असेल तर या बहुसंख्य वर्गाची व स्त्रियांची मानसिक व सामाजिक गुलामगिरी नष्ट करुन त्यांच्या विकासाचा मार्ग खुला करुन दिला पाहिजे अशी त्यांची धारणा बनली. हेच कार्य करण्याच्या हेतूने सत्यशोधक समाजाची त्यांनी निर्मिती केली. दलित वर्गावर पसरलेले दैववादाचे निराशेचे व औदासिन्याचे धुके दूर करुन त्याला आत्मोध्दाराचा मार्ग दाखविणारा त्याच वर्गातून पुढे आलेला समाजसुधारक म्हणून जोतिबांचे स्थान अनन्यसाधारण आहे. म्हणूनच महात्मा गांधींनी जोतिबांना महात्मा म्हणून गौरविले.

### २.१.२ महात्मा जोतीबा फुले

महात्मा जोतीबा फुले हे महाराष्ट्रातील थोर सामाजिक क्रांतीकारक होते. त्यांनी उच्च जातींच्या श्रेष्ठत्वाविरुद्ध लढा दिला आणि दलित वर्ग, स्त्रिया यांच्या उद्धाराचे कार्य केले. त्यांचा जन्म ११ एप्रिल १८२७ रोजी सातारा जिल्ह्यातील कटगुण या खेड्यात माळी कुटुंबात झाला.

जोतिबांचे कुटुंब हे 'गोऱ्हे' आडनावाने ओळखले जाई. हे कुटुंब पेशव्यांना फुले पुरवीत असे. त्यामुळे ते कुंटुंब पुढे फुले या आडनावाने ओळखले जाऊ लागले. त्यांचे वडिल गोविंदराव हे भाजीपाल्याचे व्यापारी होते. प्राथमिक शिक्षण पूर्ण केल्यानंतर जोतीबांनी वडिलांना त्याच्या व्यवसायात मदत करण्यात सुरुवात केली. तत्कालीन प्रथेप्रमाणे त्यांचा विवाह त्यांच्या वयाच्या बाराव्या वर्षी सावित्री बाईशी झाला. एक मुस्लिम शिक्षक व एक ख्रिस्ती सदगृहस्थ हे दोन जोतीबांचे शेजारी होते व या शेजाऱ्यांच्या प्रोत्साहनामुळे जोतीबांनी पुण्यातील एका स्कॉटीश मिशनरी शाळेत प्रवेश घेतला. ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या प्रभावामुळे जोतीबांना शिक्षण, सामाजिक सुधारणा व मानवतावाद यांचे महत्व पटले. थॉमस पेन या विचारवंताच्या 'मानवाचे हक्क' या पुस्तकातील विचारांचा जोतीबांवर मोठा प्रभाव पडला. छत्रपती शिवाजी महाराज व जॉर्ज वॉशिग्टन यांच्या जीवन कार्याद्वारेही जोतीबा खूपच प्रभावित झाले होते. ते हिंदू धर्माचे परखड टीकाकार होते. त्यांनी हिंदूच्या चातुवर्ण्य व्यवस्थेवर जोरदार हल्ला चढविला. त्यांनी वेद ग्रंथास विरोध केला व विवाह तसेच धार्मिक विधीमध्ये ब्राम्हण पुरोहिताची जी भूमिका होती ती नाकारली. त्यांनी मनुस्मृती हा ग्रंथ नाकारला व हिंदू धर्मग्रंथावरही हल्ला चढविला. आपल्या स्वार्थी हितसंबंधास अनुकूल ठरतील अशा प्रकारे ब्राम्हणांनी धार्मिक ग्रंथ लिहिले आहेत असे त्यांचे मत होते. कनिष्ठ जातीचा दर्जा उंचावणे हे त्यांचे उद्दिष्ट होते. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी त्यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली.

### २.१.३ सत्यशोधक समाजाची स्थापना

सत्यशोधक समाज ही पहिली ब्राम्हणेत्तर चळवळ होती. उच्च जातीच्या कचाट्यातून कनिष्ठ जातीची सोडवणूक करण्यासाठी म.फुले यांनी २४सप्टेंबर १८७३ रोजी पुणे शहरात सत्यशोधक समाजाची स्थापना केली. जातीऐवजी व्यक्तीच्या पात्रतेवर भर देणे हे सत्यशोधक समाजाचे उद्‌दिष्ट होते. या समाजाने अनेक सामाजिक, धार्मिक व शैक्षणिक सुधारणा घडवून आणल्या. या समाजाने स्त्रिया व कनिष्ठ जातीत शिक्षण प्रसार घडवून आणण्यास मोठी चालना दिली. तसेच जातीव्यवस्थेवर हल्ला केला या समाजाची तीन तत्वे होती (१) समता (२) बंधुत्व (३) धार्मिक कार्यातील मध्यस्थांचे (पुरोहित वर्गाचे) उच्चाटन करणे. व्यक्तीची जात व वंश विचारात न घेता सर्व लोकांना सत्यशोधक समाजात प्रवेश करण्यास मुभा होती. या समाजाच्या प्रत्येक सदस्यास ब्रिटिश सत्तेशी एकनिष्ठ राहण्याची शपथ घ्यावी लागे कारण ब्रिटिश सरकारने भारतात आधुनिक शिक्षणाची सुरुवात केली होती आणि कनिष्ठ जातींना शिक्षणाची संधी

उपलब्ध करुन दिलेली होती. भारतीयांनी स्थापन केलेल्या संघटनांकडे ब्रिटिश सरकार संशयाने पाहत असल्याने सत्यशोधक समाजात राजकीय विषयावर चर्चा करण्यास मनाई होती.

शुद्रातिशुद्र व इतर कनिष्ठ जातीवर ब्राम्हण पुरोहित वर्गाने जी धार्मिक व मानसिक गुलामगिरी लादली, त्यातून त्यांना मुक्त करणे तसेच ब्राम्हणांकडून होणारे त्यांचे शोषण व दमन थांबविणे हे सत्यशोधक समाजाचे मुख्य उद्‌दिष्ट होते. आपणास अनुकुल ठरेल अशाप्रकारे ब्राम्हणांनी प्रत्येक बाबतीत धर्माच्या नावाखाली आपली मक्तेदारी निर्माण केली असून त्यातून सामाजिक विषमता निर्माण झाली आहे असे महात्मा फुले यांचे मत होते, म्हणूनच त्यांनी हिंदूधर्म, ब्राम्हण पुरोहित वर्ग, मूर्तिपूजा, अन्य कर्मकांड आणि हिंदू धर्मग्रंथ या सर्वावर धणाघाती टीका केली. फुले यांनी कोणत्याही एका विशिष्ट धर्मावर किंवा देवावर श्रद्‌धा ठेवली नाही. त्यांनी ईश्वरास 'निर्मिक असे म्हटले. हे विश्व ईश्वराने निर्माण केले असून सर्व धर्म व धर्मग्रंथ हे मानवनिर्मित आहेत यावर त्यांचा दृढविश्वास होता.

### २.१.४ सत्यशोधक समाजाची तत्त्वे

१. ईश्वर हा एकच असून तो सर्वव्यापी, निराकार, विश्वनिर्माता व सत्यरुप असून सर्व मानव ही त्याची लेकरे आहेत.
२. ईश्वराची भक्ती करण्याचा हक्क सर्वांना असून त्यासाठी ब्राम्हण पुरोहितांच्या मध्यस्थीची गरज नाही.
३. मनुष्य हा त्याच्या जातीने (जन्माने) श्रेष्ठ ठरत नसून त्याच्या गुणांमुळे श्रेष्ठ ठरतो.
४. ईश्वराने धर्मग्रंथ लिहिलेले नाहीत म्हणून ते प्रमाण नाहीत.
५. पुनर्जन्म, कर्मकांड, उपास-तपास, जपतप, नवस करणे इत्यादी गोष्टी अज्ञानमूलक आहेत.

**आपली प्रगती तपासा.**

१) सत्यशोधक समाजाची तत्त्वे स्पष्ट करा.

### २.१.५ महात्मा फुले ह्यांचे सामाजिक कार्य

केवळ कनिष्ठ जातीच्या धर्मश्रद्धामध्ये सुधारणा घडवून आणणे हे फुलेंचे उद्दिष्ट नव्हते तर या जातीची उन्नती घडवून आणणे यामध्येही त्यांना विशेष रस होता. त्यावेळी बालविवाह, विधवाविवाह बंदी, अस्पृश्यतापालन, निरक्षरता, स्त्रिया व कनिष्ठ जातीचे शोषण इ. अनेक प्रथा समाजात होत्या. महात्मा फुले यांनी या सर्व अनिष्ट प्रथा नष्ट करण्याचा प्रयत्न केला. त्यांचे सामाजिक कार्य पुढीलप्रमाणे आहे.

**१) स्त्रियांची उन्नती :**

पितृसत्ताक भारतीय समाजात स्त्रियांना अनेक अन्याय अत्याचारास तोंड द्यावे लागत असे. पुरुषांपेक्षा त्यांचे स्थान दुय्यम मानले जाई. पारंपारिक भारतीय समाजात त्यांचे दमन व

शोषण होत असे. महात्मा फुलेंनी बालविवाह व विधवाविवाहबंदी या प्रथांना विरोध केला व विधवांच्या पुनर्विवाहास चालना दिली. त्यावेळी विधवा स्त्रीला जर मूल झाले तर त्या मुलाची हत्या केली जाई. ही बालहत्या रोखण्यासाठी महात्मा फुलेंनी विधवा व त्याची मुले यांची काळजी घेण्यासाठी अनाथालय सुरु केले. महात्मा फुले हे केवळ माणसा-माणसांतील समतेचे पुरस्कर्ते नव्हते तर स्त्री-पुरुष समतेचेही पुरस्कर्ते होते. स्त्री-पुरुषांना समान हक्क मिळाले पाहिजेत आणि लिंगभेद करणे हे पाप आहे असे त्यांचे मत होते. त्यामुळेच त्यांना स्त्रीशिक्षणाची गरज किंवा महत्त्व पटले व त्यांनी मुलींसाठी शाळा सुरु केली. मुलींसाठी तीन शाळा सुरु करुन त्यांनी स्त्रीशिक्षणास चालना देण्याचा व त्यांचे समाजातील स्थान उंचावण्याचा प्रयत्न केला.

महात्मा फुलेंनी विधवाविवाहाचा पुरस्कार केला. आणि बहुविवाह व बालविवाह यांना विरोध केला. हिंदू समाजात त्यावेळी ब्राम्हणांसह इतर उच्च जातीत बालविवाहाची प्रथा मोठ्या प्रमाणावर प्रचलित होती. आणि विधवा विवाहास मनाई होती. सत्यशोधक समाजाने विधवांना पुनर्विवाह करण्यास मदत केली. विवाहविधीसाठी ब्राम्हण पुरोहिताची गरज नाही असे सांगून त्यांनी वेगळी अशी विवाहपद्धती सुरु केली. त्यांनी केशवपन (विधवेच्या डोक्यावरचे केस कापणे) या अमानवी प्रथेस विरोध केला. यासाठी त्यांनी न्हाव्याचा संप घडवून आणला. विधवाविवाहास चालना दिल्याने सनातनी लोकांनी महात्मा फुलेंना खूप त्रास दिला. तथापि त्यांनी आपले हे कार्य चालूच ठेवले. महात्मा फुलेंनी उघडपणे विधवाविवाहाचा पुरस्कार केला व स्त्रीबालहत्या प्रथेवर कडाडून हल्ला चढविला. बालविवाहाच्या प्रथेमुळे बालविधवांचे प्रमाणे मोठे होते. विधुरास पुनर्विवाहाचा अधिकार होता. मात्र विधवेस पुनर्विवाह करण्यास मनाई होती. अनेकदा बालविधवा ह्या पुरुषाच्या वासनेला बळी पडत व त्यातून त्यांना अनौरस संतती प्राप्त होत असे. लोकलज्जेस भिऊन किंवा शरमेने अशा विधवा या एकतर आत्महत्या करीत किंवा गर्भपात करवून घेत. अशा या अनौरस बालकांचे संरक्षण करण्यासाठी फुलेंनी १८६३ मध्ये ''बालहत्या प्रतिबंधक गृह'' सुरू केले. त्यांनी टाकून दिलेली मुले, नवऱ्याने सोडून दिलेल्या बायका व बालविधवा यांच्यासाठी अनाथालये सुरु केले. त्यांनी गरोदर विधवांना संरक्षण दिले व त्यांना होणाऱ्या मुलांची काळजी अनाथालय घेईल असे त्यांना आश्वासन दिले. त्यांनी स्वतः काशीबाई या ब्राह्मण विधवेचे मूल दत्तक घेतले व त्याचे नाव यशवंत असे ठेवले.

## २) अस्पृश्यांची उन्नती

स्त्री उन्नतीप्रमाणेच फुले यांनी अस्पृश्यांची उन्नती करण्याचा प्रयत्न केला. फुलेंनी अस्पृश्यतापालन या निर्दयी प्रथेची पूर्ण जाणीव होती. उच्च जातीकडून होणाऱ्या अन्यायअत्याचाराचा त्यांना व्यक्तिगत अनुभव आलेला होता. जेव्हा ते आपल्या एका मित्राच्या लग्नाच्या वरातीत सहभागी झाले होते तेव्हा ते माळी या कनिष्ठ जातीचे असल्याने त्यांच्या मित्राच्या नातेवाईकांनी त्याचा अपमान केला होता. हा अपमानास्पद प्रसंग हा त्यांच्या जीवनास एक नवे वळण देणारा ठरला व त्यांनी समाजातून जातिव्यवस्थेचे उच्चाटन करण्याची प्रतिज्ञा केली. त्यांनी जातिव्यवस्थेच्या उच्चाटनाचा व सामाजिक समतेच्या प्रस्थापनेचा जोरदार पुरस्कार केला. त्यांनी अस्पृश्यांना आपल्या विहिरीवर पाणी भरण्यास परवानगी दिली. तसेच त्यांनी आपल्या सत्यशोधक समाज या संघटनेत अस्पृश्यांसह सर्वांना प्रवेश दिला. कनिष्ठ जाती या भारतातील मूळच्या रहिवासी असून ज्यांनी जातिव्यवस्था निर्माण केली ते आर्य हे परकीय आहेत असे त्यांचे ठाम मत होते. फुलेंनी आयुष्यभर कनिष्ठ जातींच्या कल्याणासाठी कार्य केले.

**३) शेतकऱ्यांची उन्नती**

फुलेंनी शेतकऱ्यांच्या उन्नतीचेही कार्य अत्यंत जोरदारपणे केले. आपल्या 'शेतकऱ्यांचा आसूड' या ग्रंथातून त्यांनी शेतकऱ्यांच्या समस्यांवर प्रकाश टाकला. त्यांनी सावकारांच्या कचाट्यातून शेतकऱ्याची सुटका करण्याचा प्रयत्न केला. सरकारने शेतकऱ्यांना कर्ज, जलसिंचन सुविधा तसेच खते व बी-बियाणे अशा सुविधा पुरवाव्यात म्हणून फुलेंनी शेतकऱ्यांना मदत केली. शेतकऱ्यांच्या मुलांना शिक्षण मिळावे म्हणून सुद्धा त्यांनी प्रयत्न केले.

**४) गिरणी कामगारांचे कल्याण :**

गिरणी कामगारांच्या कल्याणातही फुलेंनी रस घेतला. कामगाराच्या समस्या, त्यांच्यावर होणारा अन्याय व त्यांचे शोषण यांना वाचा फोडण्यासाठी त्यांनी दिनबंधू नावाचे साप्ताहिक सुरू केले. नारायण मेघाजी लोखंडे हे या साप्ताहिकाचे संपादक होते. लोखंडे यांच्या सहकार्याने फुलेंनी मुंबईतील सूतगिरणी कामगारांच्या बैठकीसमोर आपले विचार मांडले व गिरणी कामगारांची संघटना स्थापन केली. त्यांनी ब्रिटिश सरकारसमोर कामगारांच्या समस्या मांडल्या.

**५) मद्यपानाविरुद्ध प्रचार :**

फुले हे मद्यपानाच्या व्यसनाच्या विरोधी होते. मागासवर्गांमध्ये शिक्षणप्रसार करुन त्यांनी त्याद्वारे मदयपानाच्या समस्येच्या दुष्परिणामांविषयी लोकांमध्ये जागृती निर्माण केली. नवीन दारुची दुकाने सुरु करण्यास परवाने देऊ नयेत अशी फुलेंनी पुणे नगरपरिषदेस विनंती केली होती.

**६) दुष्काळग्रस्तांना मदत :**

१८७७ महाराष्ट्रात मोठा दुष्काळ पडला त्यामुळे अनेकांना आपली खेडी सोडावी लागली. खेडी सोडतना अनेक लोकांनी आपल्या मुलांना मात्र खेड्यातच ठेवले. अशा या अनाथ मुलांसाठी फुलेंनी १७मे १८७७ रोजी व्हिक्टोरिया अनाथालय सुरु केले. या मुलांचे पालक परत येईपर्यंत या अनाथालयात मुलांना अन्न व निवारा पुरविला गेला.

**आपली प्रगती तपासा.**

१) सत्यशोधक समाजाने केलेल्या सामाजिक कार्यांचे वर्णन करा.

**२.१.६ महात्मा फुले ह्यांचे शैक्षणिक कार्य :**

स्त्री व शुद्रांच्या उन्नतीसाठी फुलेंनी शैक्षणिक क्षेत्रात अथकपणे कार्य केले. स्त्रीशुद्रांच्या शिक्षणाचे ते मोठे पुरस्कर्ते होते. त्याचे शैक्षणिक कार्य पुढीलप्रमाणे.

**१) स्त्रीशिक्षणास चालना**

पारंपारिक भारतीय समाजात स्त्रीशिक्षणास बंदी होती. मुलींचे विवाह बालवयातच केले जात. मुलींना शाळेत प्रवेश दिला जात नसल्याने त्यांना शिक्षण घेणे शक्य होत नसे. त्यामुळे

महात्मा फुलेंनी स्त्रीशिक्षणास प्राधान्य दिले. इ.स.१८४८ मध्ये त्यांनी पुणे शहरात मुलींसाठी पहिली शाळा काढली. मुलींना शिकविण्यासाठी एकही शिक्षक धाडस करुन पुढे आला नाही म्हणून महात्मा फुलेंनी आपली पत्नी सावित्री बाईस घरात प्रशिक्षित केले आणि त्यांना मुलीच्या शाळेत शिकविण्यासाठी नेमले महात्मा फुले व त्यांच्या पत्नीस सनातनी लोकांनी प्रचंड विरोध केला. तथापि या दांपत्याने आपले हे आदर्श कार्य चालूच ठेवले.

**२) कनिष्ठ जातीच्या शिक्षणास चालना :**

स्त्रियांप्रमाणेच कनिष्ठ जातीदेखील शिक्षणापासून वंचित होत्या. शिक्षण ही केवळ उच्चजातीची मक्तेदारी होती. ब्राम्हणांनी कनिष्ठ जातींना शिक्षण घेण्यास अपात्र मानले होते. कनिष्ठ जातींना शिक्षण दिल्याशिवाय समाजाची प्रगती होणार नाही असा फुलेंचा विश्वास होता. म्हणून त्यांनी १८५१ मध्ये अस्पृश्यांसाठी शाळा सुरु केली. त्यांनी फक्त मुलींसाठी तीन तसेच अस्पृश्यांच्या मुलांमुलीसाठी तीन शाळा स्थापन केल्या. कनिष्ठ जातीच्या मुलांसाठी वसतिगृहे सुरु करणे व त्यांना शिष्यवृत्ती मिळवून देण्यास म.फुले हे कारणीभूत ठरले. शाळेत दाखल होणाऱ्या मुलांकडे ते जातीने लक्ष देत.

**३) मोफत व सक्तीचे शिक्षण :**

प्राथमिक शिक्षण ही बहुजन समाजाची महत्वाची गरज असून मुंबई प्रांतात त्याकडे दुर्लक्ष होत होते, याची म.फुलेंना जाणीव होती. ब्रिटिश सरकार हे महसुलातील मोठा हिस्सा हा उच्च जातीच्या शिक्षणावर खर्च करीत असून त्यामुळे सामाजिक विषमता निर्माण होत आहे या गोष्टीवर म.फुलेंनी टीका केली. १८८२ मध्ये त्यांनी हंटर आयोगाकडे सर्वांना मोफत व सक्तीचे शिक्षण देण्याची विनंती केली. अशा प्रकारे बहुजनाच्या शिक्षणाकडे ब्रिटिश सरकारचे लक्ष वेधण्याचे काम फुलेंनी केले.

**४) इतर शाळांची स्थापना :**

महात्मा फुले यांनी प्रौढ शाळा व रात्र शाळा स्थापन केल्या. तसेच शिक्षकांसाठी प्रशिक्षण शाळाही (अध्यापक विद्यालय) स्थापना केली.

**५) विशिष्ट अभ्यासक्रम :**

महात्मा फुले यांनी शाळेत येणाऱ्या मुलांचे पर्यावरण, त्यांची क्षमता, कौटुंबीक पार्श्वभूमी इत्यादी विचारात घेउन मुलांसाठी वेगळा अभ्यासक्रम तयार केला. महात्मा जोतीबा फुले आयुष्यभर बहुजन समाजाच्या उद्धारासाठी चंदनासारखे झिजले. मानवतेचे महान पुजारी होऊन गेले. जोतिबांनी अनेक सुधारणांना जन्म दिला. शूद्रातिशूद्रांचे शिक्षण, स्त्रियांचे शिक्षण, अस्पृश्यतेचे निवारण, शेतकरी, कामकरी समाजांचे परिवर्तन, सावकारशाहीचे निर्दालन, अधर्म, असत्य, अत्याचार यांचे निराकरण करण्यासाठी त्यांनी उभी हयात खर्ची घातली. जोतिबांनी आपली उभी हयात बहुजन समाजाच्या उद्धारासाठी घालवली. उच्चवर्णीयांच्या जुलूमातून अतिशूद्र व अस्पृश्य समाजाची सुटका केली. शिक्षणाने समाजबदलाची क्रांती करुन दाखविली. म्हणूनच जोतिबांना समाजसुधारणाचे अग्रदूत म्हटले आहे.

**आपली प्रगती तपासा :**

१) सत्यशोधक समाजाचे शैक्षणिक कार्य स्पष्ट करा.

## २.२ अलिगढ चळवळ

### २.२.१ पार्श्वभूमी :

अलिगढ चळवळ सर सय्यद अहमद खान ह्यांनी सुरु केली. पाश्चात्य शिक्षण व ब्रिटीश सरकारचे सहाय्य याद्वारे मुस्लिम समाजाची प्रगती साधणे हे या चळवळीचे ध्येय होते. ब्रिटिशांचा भारतावरील विजय याकडे पाहण्याचा मुसलमानांचा दृष्टकोन हिंदूपेक्षा भिन्न होता. मुसलमान ब्रिटीशांना आपले कट्टर शत्रू समजत होते. मात्र हिंदूनी मुस्लीम सत्तेकडून ब्रिटिशांकडे झालेल्या सत्तांतराचे स्वागत केले. मुघल बादशहाला पदच्युत करणाऱ्या इंग्रजांविरुद्धचा राग मुसलमानांनी पाश्चात्य शिक्षणापासून दूर राहून व्यक्त करायला सुरुवात केली. ज्यामुळे बदलत्या विचारधारेशी संपर्क तुटल्याने मुस्लीम शैक्षणिक व आर्थिक दृष्टीने मागासलेले राहिले. हिंदूनी मात्र या बदलत्या परिस्थितीचा वेध घेऊन इंग्रजी शिक्षण घेतले व प्रशासनात नोकऱ्या स्वीकारल्या. मुस्लिम समाजाने शिक्षणाकडे दुर्लक्ष केले. १८५८ ते १८७८ या काळात फक्त ५२ मुस्लीम पदवीधर तर ३,१५५ हिंदु पदवीधर होते.

भारतात ब्रिटिशांची सत्ता स्थापन होण्यापूर्वी मुसलमान शासक होते. त्यांना राजघराण्याच्या सर्व सोयीसुविधा मिळत होत्या. न्यायदान क्षेत्रात व प्रशासनात त्यांची मातृभाषा वापरली जात होती परंतु ब्रिटीश सत्ता भारतात प्रस्थापित झाल्यापासून गतकाळची सगळी अधिसत्ता व वैभव व न्याबरोबर सामाजिक क्षेत्रातील मुसलमानांचा वरचष्मा व प्रतिष्ठा नाहीशी झाली. एकेकाळी काहीसे कनिष्ठ दर्जाचे म्हणून ज्या हिंदूच्यांकडे त्यांनी पाहिले ते मुस्लीम सामाजिक क्षेत्रात बरोबरीच्या नात्याने वागू लागले होते, एवढेच नव्हे तर मुसलमानांच्या पुढे गेले होते. राजकारण व राष्ट्रीय चळवळीकडे पाहण्याचा मुसलमानांचा दृष्टीकोन हा हिंदूपेक्षा वेगळा होता. मुसलमानांनी राजकारण व राष्ट्रीय चळवळीपासून स्वतःला अलिप्त ठेवले व कोणत्याही संघटनेत कुठेही सहभागी झाले नाहीत. अशा या असंतुष्ट व विरोधी परिस्थितीत मुस्लीम समाजाचे पुनरुज्जीवन करण्यासाठी सर सय्यद अहमद खान ह्यांनी चळवळ सुरु केली. ज्याप्रमाणे हिंदु समाजात धार्मिक व सामाजिक सुधारणेचे कार्य राजा राममोहन रॉयांनी केले तेच कार्य मुसलमान समाजात सर सय्यद अहमद खान यांनी केले.

### २.२.२ सर सय्यद अहमद खान (१८१७ - १८९८)

नैराश्य व निष्क्रियता यामुळे मृतवत झालेल्या मुस्लीम समाजात आत्मविश्वासाचे व राजकीय जागृतीचे नवजीवन ओतून त्याचे पुरुत्थान करण्याचे श्रेय फार मोठ्या प्रमाणात सर सय्यद अहमद यांच्याकडे जाते. आर्थिक व सामाजिक क्षेत्रातील मुस्लिमांचा मागसलेपणा त्या समाजाला घातक ठरत असल्याची जाणीव सर सय्यदांना होती व त्या समाजाच्या सर्व दुःखाचे निराकरण इंग्रजी शिक्षण व ब्रिटिश कृपा यांमुळेच होऊ शकेल असा त्यांचा विश्वास होता.

सर सय्यद अहमद खान यांचा जन्म १७ऑक्टोबर १८१७ रोजी दिल्ली येथे एका उच्च मुसलमान कुटुंबात झाला. त्यांनी पारंपारिक मुस्लीम पद्धतीने शिक्षण घेतले. ते एक महान विद्वान, शिक्षणतज्ज्ञ, सुधारक व राष्ट्रवादी होते. अलिगढ चळवळ या नावाने त्यांचे कार्य ओळखले जाते. त्यांचे पूर्वज मोगल काळात उच्च पदी सरकारी सेवेत होते. त्यामुळे नंतरच्या काळात त्यांनी इंग्रजी शिक्षण घेतले पित्याच्या निधनानंतर ते कंपनीच्या सेवेत शिरले व १८५७ च्या सुमारास सद्र अमीन बनले. १८५७च्या बंडात त्यांनी इंग्रजांना मदत केली. त्यामुळे इंग्रजांची मर्जी त्यांच्यावर बसली व तिचा फायदा त्यांनी आपल्या समाजाच्या हितासाठी करुन घेतला.

१८७६ मध्ये सरकारी नोकरीतून निवृत्त झाल्यानंतर १८७८ मध्ये व्हाईसरॉयच्या कायदेमंडळाचे सदस्य म्हणून त्यांची नेमणूक झाली. १८८८मध्ये ब्रिटिश सरकारने सर ही उपाधी त्यांना बहाल केली. त्यांच्यावरील ब्रिटिश कृपेचे ते द्योतक होते. निवृत्तीनंतर जीवनाच्या अखेरीपर्यंत (१८९८) ते आग्रा येथे स्थायिक झाले होते. हा काळ त्यांनी मुसलमान समाजाच्या सामाजिक-धार्मिक सुधारणेसाठी खर्ची घातला. धार्मिक भाष्य, सामाजिक सुधारणा व शिक्षणाचा प्रसार हे त्यांचे तिहेरी कार्य होते त्यासाठी त्यांनी अलिगढ शहराची निवड केली.

### २.२.३ सर सय्यद - एक सुधारक

मुस्लिमांच्या उत्कर्षात धार्मिक कट्टरता आडवी येते हे पाहून सर सय्यद ह्यांनी धार्मिक व सामाजिक सुधारणांसाठी प्रयत्न केले. त्यांनी मुस्लिमांतील पडदा पद्धत, बहुपत्नी विवाह, स्त्री-शिक्षणास प्रतिबंध, अंधश्रद्धा यासारख्या सामाजिक अनिष्ट रुढींविरुद्ध प्रचार केला. कुराणाचा आधुनिकदृष्ट्या अर्थ प्रतिपादन करण्यासाठी त्यांनी उर्दू भाषेत लिखाण केले. आपल्या विचाराच्या प्रसारासाठी 'तहजीव-उल-अखलास' हे मासिक सुरु केले. यातून त्यांनी आपली सुधारणावादी भूमिका स्पष्ट केली. काही मुस्लिम धर्मतत्वांचा आधुनिक पद्धतीने अर्थ लावला व मुस्लिम धर्माच्या पारंपारिक तत्त्वज्ञानास तर्कसंगती लावली.

### २.२.४ सर सय्यद - एक शिक्षणतज्ज्ञ :

मुसलमान समाजाच्या उन्नतीसाठी सर सय्यद अहमदांना सर्वाधिक महत्त्व वाटत होते ते शिक्षणाचे. मुसलमान इंग्रजी शिक्षणापासून वंचित राहिले तर राजकीय, आर्थिक, सामाजिक क्षेत्रात ते हिंदूपेक्षा अगदीच मागे पडतील अशी त्यांना धास्ती होती. मुस्लिमांच्या सर्वांगीण प्रगतीकरिता पाश्चात्य शिक्षण अनिवार्य आहे, त्यात इस्लामविरोधी असे काही नाही, एवढेच नव्हे तर मुस्लीम स्त्रियांनीही पडदा झुगारुन देऊन इंग्रजी शिक्षण घ्यावे असे आवाहन त्यांनी केले. मुसलमान तरुण चारित्र्यसंपन्न बनावेत, त्यांच्यात बुद्धिवादी दृष्टीकोन बळावा व आधुनिक विज्ञानाचे शिक्षण त्यांना मिळावे, त्याचबरोबर इंग्रजी, उर्दू, पर्शियन व अरेबिक भाषांचेही अध्ययन व्हावे या हेतूने शिक्षण केंद्रे व विज्ञानसंस्था प्रस्थापित करणे, शैक्षणिक परिषदा आयोजित करणे, याकरिता त्यांनी प्रयत्न चालविले. त्याकरिता त्यांनी पत्रके, पुस्तके, लेख वगैरे लिहिले. त्याच उद्दिष्टाने १८७५ मध्ये त्यांनी अलीगढ येथे 'मोहमेडन अँग्लो ओरिएंटल स्कूल'ची स्थापना केली ज्याचे पर्यावसान पुढे अलीगढ मुस्लिम विद्यापीठात झाले. या संस्थेचा प्राचार्य व बराच मोठा कर्मचारी वर्ग ब्रिटिश होता. सरकारी सेवांकरिता कार्यक्षम व बुद्धिमान तरुण तयार करणाऱ्या ऑक्सफोर्ड व केंब्रिज विद्यापीठांसारखे उच्च दर्जाचे ते महाविद्यालय बनावे अशी सय्यद अहमद यांची आकांक्षा होती. ती पूर्णपणे फलद्रूप झाली नसली तरी अलिगढ येथील ते शिक्षण केंद्र अलीगढ चळवळीचा केंद्रबिंदू मात्र बनले. मात्र दुर्दैवाने ही चळवळ पुढे देशविरोधी झाली. भारतीय राष्ट्रवादाला ती एक आव्हान ठरली. ही चळवळ हिंदू समाज व राष्ट्रीय काँग्रेसची कट्टर विरोधक झाली.

### २.२.५ ब्रिटिशांप्रति राजनिष्ठेची भावना

मुसलमानांच्या मनात ब्रिटिशांप्रति राजनिष्ठेची भावना निर्माण करुन त्यांची कृपा संपादन करण्याचा प्रयत्न करणे हे सर सय्यद अहमद ह्यांचे मुख्य ध्येय होते. वांशिक, सामाजिक व राजकीय सर्वच दृष्टींनी ब्रिटिश श्रेष्ठ असल्याची त्यांची खात्री होती. तसेच ब्रिटिश कृपादृष्टी असली तरच मुसलमान समाजाची उन्नती होऊ शकेल अशी त्यांची धारणा होती. त्यामुळे सरकारी नीतीला कोणत्याही प्रकारे विरोध करु नये व राजकीय चळवळीपासून मुस्लिमांनी अलिप्त राहावे अशी शिकवण ते आपल्या धर्मबांधवांना देऊ लागले. सर सय्यद अहमद ह्यांनी आपल्या समाजबांधवांना असे समजावले की, ''इंग्रजांशी इमानदार राहण्यातच आपले कल्याण आहे'' आणि इंग्रज राज्यकर्त्यांना त्यांनी असे सांगितले की, मुसलमान हे इंग्रजी सत्तेच्या विरुद्ध नाहीत. इंग्रजी शासनाने जर थोडीफार सहानुभूती त्यांना दाखविली तर ते इंग्रजनिष्ठ बनतील. सर सय्यद अहमद ह्यांनी हा प्रचार नेमका अशावेळी केला ज्यावेळी हिंदू समाजाबद्दल इंग्रज राज्यकर्ते शंका बाळगू लागले होते. हिंदूमधील वाढत्या राष्ट्रीय जागृतीला प्रतिशह देण्यासाठीच धूर्त इंग्रजांनी मुसलमानांप्रति विशेष आस्था दाखविण्यास सुरुवात केली. याच कारणामुळे सय्यद अहमद खान यांना फार मोठे यश लाभले. ही चळवळ हिंदू समाज व राष्ट्रीय सभेची कट्टर विरोधक झाली.

अलिगढ चळवळीने मुस्लिम समाजाला निष्क्रियता व नैराश्याच्या दरीतून वर काढून मध्ययुगीन वातावरणातून आधुनिक युगात आणण्याचे कार्य केले. परंतु या चळवळीने मुस्लिम समाजात फुटीरतेची भावना निर्माण करुन पाकिस्तानच्या निर्मितीस फार मोठी मदत केली.

**आपली प्रगती तपासा.**

१) अलिगढ चळवळीतील सर सय्यद अहमद खान यांचे कार्य स्पष्ट करा.

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

## २.३ सिंग सभा चळवळ

### २.३.१ पार्श्वभूमी :

इ.स.१८७७ मध्ये आर्य समाजाचे संस्थापक स्वामी दयानद सरस्वती पंजाबमध्ये आले व लाहोरमध्ये त्यांनी आर्य समाजाची शाखा स्थापन केली. शुद्धी चळवळ ही आर्य समाजाच्या कामगिरीतील एक महत्वपूर्ण अंग असून यामुळे अनेक शीख हिंदु धर्माकडे वळाले. लवकरच सनातनी शीखांना कळून चुकले की स्वामी दयानंदाचा वेदांच्या स्वर्गगामी विचारावरील विश्वास संपूर्णतः व अढळ होता. स्वामी दयानंदांच्या मते शीखांचा धर्मग्रंथ हे दुय्यम दर्जाचे पुस्तक असून शीखांचे गुरु अल्पशिक्षीत होते. ज्यांनी गुरु नानकांना दंभी (ढोंगी) म्हणून घोषीत केले. स्वामी दयानंदांनी शीख गुरुंचा संस्कृतवरील दुर्लक्षपणामुळे उपहास केला.

अशा परिस्थितीत शीख जनतेने स्वामी दयानंद व त्यांच्या आर्य समाजाकडे पाठ दाखविली. यावेळीच पंजाबमध्ये बदलाचे वारे वाहण्यास सुरुवात झाली. ख्रिश्चन मिशन, ब्राम्हो

समाज व थिऑसोफिकल सोसायटी तर्फे पंजाबमध्ये कार्य करण्यास सुरुवात झाली. वाङ्मयीन व शैक्षणिक चळवळीमुळे पंजाबमध्ये गतीशीलता आली. याकाळात हिंदु व मुसलमानांनी स्वतःच्या शाळा आणि महाविद्यालये सुरु केली मात्र याबाबत शीख मागे राहिले.

### २.३.२ सिंग सभेची स्थापना :

सिंग सभा ही पंजाब मधील एक महत्वपूर्ण सामाजिक-धार्मिक चळवळ होती. पहिली सिंग सभा १ ऑक्टोबर,१८७३ रोजी अमृतसर येथे स्थापन झाली. सर खेम सिंग बेदी, ठाकूर सिंग सांधावालीया, कापूरथाला येथील कनवर बिक्रमसिंग आणि ग्यानी गियान सिंग या प्रमुख व्यक्तींनी सिंग सभेच्या स्थापनेत पुढाकार घेतला. पहिल्या सिंग सभेचे अध्यक्ष सांधावालिया व चिटणीस ग्यानी गियान सिंग हे होत.

### २.३.३ सिंग सभेची उद्दिष्ट्ये :

सिंग सभेची प्रमुख उद्दिष्टे ही खालीलप्रमाणे :

१. आधुनिक शिक्षण शिखांना मिळावे, त्यांना पाश्चात्य ज्ञानाचा साक्षात्कार व्हावा व त्याचे फायदे त्यांना मिळावेत.
२. ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या तसेच आर्य समाजाच्या हिंदू बुद्धिवाद्यांच्या प्रभावापासून शीख धर्माचा बचाव करणे.
३. खऱ्या शीख धर्माचा प्रसार करणे व शीख समाजाच्या शुद्ध वैभवाची पुनर्स्थापना करणे.
४. ऐतिहासिक व धार्मिक ग्रंथांचे संपादन, प्रकाशन व वितरण करणे.
५. पंजाबी भाषेतील अद्ययात ज्ञानाचा प्रसार करणे आणि पंजाबी भाषेत मासिके व वृत्तपत्रे सरु करणे.
६. शीख धर्मातील वैगुण्यांचा त्याग करुन त्यात सुधारणा करणे.
७. सभेच्या शैक्षणिक कार्यक्रमात उच्चपदस्थ ब्रिटिश लोकांचे सहकार्य मिळविणे.
८. अन्य धर्मांवर टीका करण्याचे सोडून देणे आणि राजकीय बाबींवर चर्च करणे.

### आपली प्रगती तपासा :

१) सिंग सभेच्या उद्दिष्टांची चर्चा करा.

---

---

---

---

---

### २.३.४ सिंग सभेची कामगिरी :

सिंग सभेचे सभासद पंधरवड्यातून एकदा जयंती साजरी करण्यासाठी, सणांच्या दिवशी विशेष सभेसाठी किंवा अन्य धर्मीय समूहाच्या विशिष्ट आव्हानांना प्रतिसाद देण्यासाठी एकत्र यायचे. शीख समाजातील नेते त्याचे प्रतिनिधित्व करीत असत. सुशिक्षित जमिनदार, अमीर-उमराव व विविध प्रकारचे मंदिरातील कर्मचारी जसे पुजारी, ग्रंथी, गुरुद्वारांचे प्रशासक तसेच शीख गुरुंचे वारस इ.चे सभासद सिंग सभेमध्ये सहभागी झाले.

इ.स. १८७९ मध्ये लाहोर येथे दुसरी सिंग सभा स्थापन झाली. तिचे नेतृत्व मध्यम वर्गातील उत्साही लोकांनी व सुशिक्षित समूहाने केले. पंजाबचे गव्हर्नर सर रॉबर्ट एगस्टन सिंग सभेचे आश्रयदाते बनले व ज्याने या सभेला पाठिंबा मिळविण्यासाठी व्हाईसरॉय लॉर्ड लँडसडाऊन ह्यांचेही मन वळविले. लाहोर सिंग सभेने अनेक शहरात आपल्या शाखा स्थापन केल्या. आपले धर्मप्रचारक गावागावांत पाठवले आणि आपल्या कार्यांचा प्रसार करण्यासाठी पंजाबी भाषेत वृत्तपत्रे प्रकाशीत केली. इ.स.१८८३मध्ये लाहोर सिंग सभा व अमृतसर सिंग सभा एकत्र आल्या. परंतु त्यांची एकी जास्त काळ टिकली नाही. लाहोर सिंग सभा ही मूलगामी असून त्यांनी महंताच्या (गुरुंच्या) संस्थांनाला विरोध केला. गुरुद्वारामध्ये पूजाअर्चा करण्यासाठी शीखांमधील अस्पृश्यांना हक्क मिळावा यावरुन त्यांच्यात संघर्ष झाला. सनातनी लोकांनी गुरुंना पाठिंबा दर्शविला आणि त्यामुळे या दोन गटांत मतभेद निर्माण होऊन एकी लयास आली.

आर्य समाजाचा जलद विस्तार व आर्य समाजाच्या नेत्यांचा शीख विरोधी असलेला कल हे सिंग सभा चळवळीला एक आव्हान ठरले. शीख धर्माच्या धर्मसंस्थापकांवर दयानंदानी हल्ला चढविल्याने सिंग सभेचे प्रवर्तक आर्य समाजास विरोध करु लागले. व पुन्हा एकदा दोन्ही सिंग सभा एकत्र येऊन मार्च १८९२मध्ये त्यांनी अमृतसर येथे खालसा कॉलेज सुरु केले.

सिंग सभेने शीख समाजात आधुनिकता निर्माण करुन नवीन सांस्कृतिक व राजकीय महत्त्वाकांक्षेला खतपाणी घातले. सिंग सभेचे सर्वांत महत्त्वाचे कार्य म्हणजे त्यांनी साहित्य व शिक्षणात दिलेले योगदान होय. पंजाबमध्ये शेकडो खालसा शाळा उघडण्यात आल्या. खालसा शाळांमध्ये गुरुमुखी आणि शीख धर्मग्रंथांचा अभ्यास अनिवार्य करण्यात आला. शैक्षणिक प्रगतीमुळे अनेक ग्रंथ, मासिके व वृत्तपत्रे प्रकाशित करण्यात आली. इ.स.१८९९मध्ये 'खालसा' अखबार हे साप्ताहिक व 'खालसा' समाचार हे दैनिक सुरु केले. भाई वीरसिंग या सदस्याने खालसा ट्रॅक्ट सोसायटी' स्थापन करुन शीखांचा इतिहास व धर्मावर आधारीत साहित्य प्रकाशित केले. इंग्रजी व गुरुमुखी भाषेत विविध ग्रंथ प्रकाशित करण्यात आले. ग्यानी गियान सिंग ह्यांचे गुरुमुखीतील 'पंथ प्रकाश' व 'तवारीख गुरु खालसा' आणि एम.ए. मेकॉलिफ ह्यांचे इंग्रजीतील गुरुंचे जीवन व शिकवण अशी काही महत्त्वाची पुस्तके प्रकाशित झाली.

सिंग सभेने ख्रिश्चन धर्मोपदेशक व हिंदू सुधारक यांना थोडाफार विरोध करुन शीख समाजाचे स्वतंत्र अस्तित्त्व टिकविण्याचा प्रयत्न केला. गुरुद्वारांमध्ये सुधारणा करण्यासाठी व महंतांची लाचलुचपतखोर वृत्ती नष्ट करण्यासाठी एक मध्यवर्ती संघटना निर्माण करण्यात आली. या संस्थेतर्फे शिखांच्या धर्माचरणात सुधारणा करण्यात आली.१९२० नंतर शीख समाजात 'अकाली चळवळ' या नावाची सुधारणावादी चळवळ सुरु झाली व शिखांना संघटित करण्याचे कार्य जोमाने सुरु झाले. त्यावेळी गुरुद्वारांमध्ये अनेक सुधारणा करण्यात आल्या. स्वार्थी व चैनी महंतांविरुद्ध चळवळ सुरु करण्यात आली. इ.स. १९२१मध्ये तर अकालींनी या महंतांविरुद्ध सत्याग्रह केला. त्यामुळे इ.स. १९२२मध्ये शीख गुरुद्वारा कायदा तयार करण्यात आला. इ.स.१९२५ मध्ये यात सुधारणा करण्यात येऊन महंतांचे अधिकार नियमित करण्यात आले. स्वातंत्र्याची चळवळ सुरु करताना शिखांना आपल्या राजकीय हक्कांची जाणीव होउ लागून त्यांनी पूर्व पंजाबांत शिखांचे स्वतंत्र राज्य असावे अशी मागणी केली होती. स्वातंत्र्याच्या वेळी ती बऱ्याच अंशी मान्य करण्यात आली.

**आपली प्रगती तपासा:**

१) सिंग सभेची कामगिरी स्पष्ट करा.

## २.४ सुधारणा चळवळीचा प्रभाव

१९व्या शतकातील सामाजिक-धार्मिक चळवळींनी भारतीय समाज व धर्मात क्रांतिकारक सुधारणा घडवून आणल्या आणि त्याचबरोबर आर्थिक, वाङ्मयीन, राजकीय व सांस्कृतिक जीवनाला फार मोठी कलाटणी दिली. देशाच्या स्वातंत्र्य आंदोलनाला या चळवळींनी अधिक प्रोत्साहीत केले. या चळवळीचा प्रभाव पुढीलप्रमाणे सांगता येईल.

### १. धार्मिक क्षेत्रात परिवर्तन :

सामाजिक-धार्मिक सुधारणा चळवळीमुळे हिंदु, मुस्लिम, शीख, पारशी अशा विविध धर्मांत जागृती झाली. प्रत्येक धर्मात सनातनी विचार, वाईट प्रथा, परंपरा, कर्मकांड या गोष्टी होत्या. त्या नष्ट करण्याचे श्रेय त्याकाळातील सामाजिक-धार्मिक सुधारणा चळवळींना द्यावे लागते. धर्माच्या नावावर केली जाणारी वाईट कृत्ये संपविण्याकडे लोकांचा कल निर्माण झाला. या चळवळीमुळे हिंदु धर्माचे पुनरुज्जीवन झाले. प्राचीन वाङ्मय, वेद व उपनिषदांचे संशोधन आणि अध्ययन करुन अनेकांनी त्याचा प्रचार केला. याची सत्यता विवेकानंदांनी युरोप व अमेरिकेला पटवून दिली. निरर्थक कर्मकांड व बाह्य अवडंबरातून हिंदू धर्म व तत्त्वज्ञान मुक्त झाले. धर्मात मोठे परिवर्तन झाल्यामुळे हिंदु संघटित होऊ लागले. मध्ययुगीन विचारांत जखडलेल्या इस्लाम धर्मियांचे पुनरुज्जीवन अलीगढ चळवळींने केले. अशा प्रकारे प्रत्येक धर्मांत परिवर्तन घडून आल्यामुळे वैचारीक क्रांती घडून आली.

### २. समाजविधातक प्रथा नष्ट करण्याचा प्रयत्न :

सामाजिक प्रथा किंवा परंपरा म्हणून ज्या गोष्टी भारतीय समाजावर प्रभाव टाकून होत्या आणि ज्या समाजाला विघातक होत्या अशांना चळवळीच्या नेतृत्वाने सरळ आव्हान दिले. समाजविघातक प्रथा नष्ट करण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले. जातीभेद, बालविवाह, सतीप्रथा, विधवाविवाह, अस्पृश्यता, बहुविवाह, पडदा पद्धत, बळीप्रथा, हुंडा प्रथा, कन्यावध, कन्याविक्रय, अंधश्रद्धा, देवदासी प्रथा, इत्यादी असंख्य वैगुण्ये दूर करण्याचा प्रयत्न करुन या चैतन्यहीन स्थितीप्रिय व मागासलेल्या समाजाला चळवळींनी आधुनिक युगात आणले. तसेच समाज स्वस्थ व बलवान करण्याचे कार्यही केले. स्त्रीशिक्षण, स्त्रियांचे अधिकार या चांगल्या गोष्टींना प्रोत्साहन दिले. धर्मांतरितांचे शुद्धीकरण करुन त्यांना हिंदू धर्मात येण्याचा मार्ग मोकळा केला.

### ३. आधुनिक शिक्षणाचा प्रसार :

सुधारणा चळवळींनी इंग्रजी माध्यम अथवा स्थानिक माध्यमातून आधुनिक शिक्षणाचा प्रसार करण्यास अग्रक्रम दिला. बहुतेक सुधारक हे मूलतः शिक्षक व काही अन्य व्यवसायातील

असूनही त्यांनी शाळा व महाविद्यालयात अध्यापनाचे कार्य केले. काही समाजसुधारकांनी पाठ्यपुस्तके तयार केली तर काहींनी ग्रंथालये व वाचनालये सुरु केली. अनेक सामाजिक-धार्मिक सुधारणा चळवळींनी शाळा व महाविद्यालये सुरु केली. आधुनिक शिक्षणामुळे शास्त्रीय, बुद्धिवादी, तार्कीक, उदारमतवादी दृष्टीकोन निर्माण झाला. या प्रयत्नांमुळे विशिष्ट वर्गाकडे असलेली शिक्षणाची मक्तेदारी संपुष्टात आली. आधुनिक शिक्षणाच्या प्रसारामुळे उच्चशिक्षीत भारतीयांना पाश्चात्य ज्ञान व संस्कृतीची ओळख झाली. तसेच विज्ञान व साहित्यातील ज्ञानाची कवाडे खुली झाली व त्यामुळे सुशिक्षित भारतीयांच्या विचारात प्रगल्भता आली.

**४. वृत्तपत्रांचा विकास :**

वृत्तपत्रे हे जनसंपर्काचे एक उत्कृष्ट माध्यम असल्यामुळे वस्तुतः प्रत्येक समाज सुधारकांने आणि प्रत्येक सुधारणा संस्थाने स्वतःची वृत्तपत्रे सुरु केली. ही वृत्तपत्रे इंग्रजी बरोबरच स्थानिक भाषेतूनही प्रकाशित झाली. काही सुधारकांनी वृत्तपत्रांच्या स्वातंत्र्यासाठी संघर्ष केला. काही वृत्तपत्रे ही स्त्रीयांच्या उद्धारासाठी तर काही कामगारांच्या उन्नतीसाठी वाहिलेली होती. तर काही वृत्तपत्रे अस्पृश्यता उच्चाटनासाठी अर्पण केलेली होती. थोडक्यात वृत्तपत्रांच्या माध्यमातून सुधारकांनी प्रबोधन घडवून आणले.

**५. साहित्यातील योगदान :**

आपल्या विचारांचा व कल्पनांचा प्रसार करण्यासाठी सुधारक मोठ्या प्रमाणात साहित्यावर अवलंबून राहिले. अनेक सामाजिक अनिष्ट प्रथांच्या उच्चाटनासाठी सुधारकांनी आत्मचरित्रे, ललित साहित्य, कादंबऱ्या आणि नाटके ह्यांचा उपयोग केला. सुधारकांनी एका भाषेतील पुस्तकांचा अन्य भाषेत अनुवाद केला. काही सुधारकांनी वेद आणि उपनिषदांचा अनुवाद भारतीय स्थानीक भाषेत केलयामुळे लोकांना ते वाचण्यास व त्यांचे आकलन होण्यास मदत झाली. सुधारणा चळवळीच्या काळात युरोपियन पुस्तकांची भाषांते भारतीय भाषांमध्ये झाली. अशा प्रकारे साहित्य निर्मितीमुळे जनतेत आपला देश, धर्म, संस्कृती व तत्त्वज्ञानाबद्दल आदर आणि अभिमान निर्माण झाला.

**६. स्त्रीयांचा उद्धार**

आज स्त्रीया पुरुषांच्या खांद्याला खांदा भिडवून कार्य करीत आहेत. किंबहुना जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रांत झळकत आहेत आणि त्यापलीकडे तर काही क्षेत्रांत स्त्रीया पुरुषांहूनही उत्कृष्ट कार्य करीत आहेत. परंतु हे परिवर्तन काही अचानक घडून आले नाही. हे फक्त केवळ अनेक सुधारक आणि सुधारणा चळवळींच्या अथक प्रयत्नाने साध्य झालेले आहे. स्त्रीशिक्षण तसेच स्त्रीयांमध्ये आत्मविश्वासाची निर्मिती घडवून आणण्याचे महान कार्य सुधारणा चळवळींनी केलेले आहे.

**७. राजकीय जागृती :**

भारतात राजकीय जागृती आणि राजकीय नेतृत्त्व निर्माण करण्याचे थोर कार्य सुधारकांनी केले. सामाजिक-धार्मिक सुधारणा चळवळींमुळे भारतात देशव्यापी राष्ट्रीय चळवळ निर्माण होणे सहज शक्य झाले. लोकशाही, स्वातंत्र्य व समता या तत्त्वांची भारतीयांना ओळख झाली. आपल्या गुलामगिरीची जाणीव झाली आणि त्यातून राष्ट्रवादाच्या उदयाची पार्श्वभूमी तयार झाली. राष्ट्रवादाच्या जाणीवेमुळे पुढील काळात भारतात स्वातत्र्यसंग्रमाच्या पर्वाला सुरुवात झाली.

**८. समानतेस चालना :**

भारतातील सर्व लोकांना आदराने वागविले पाहिजे अशी सुधारकांनी कास धरल्यामुळे समानतेला चालना देण्यात आली. सर्व लोक जन्माने समानच आहेत. कोणाही श्रेष्ठ अगर कनिष्ठ नाही असा सुधारकांनी उपदेश केला. जात व पंथ यावर आधारीत भेदभाव त्यांनी केला नाही. त्यामुळे विषमतेवर आधारलेलया जातिव्यवस्थेच्या जागी समानतेवर आधारित व्यवस्था प्रस्थापित होण्यास चालना मिळाली.

**९. ऐक्याची गरज :**

समाज सुधारकांच्या प्रयत्नामुळे समानतेला चालना मिळाल्यामुळे भारतातील विविध जातींमध्ये सलोखा निर्माण होण्यास सुरुवात झाली. समाजसुधारकांनी स्वातंत्र्य, समता व बंधुता ह्यांचा पुरस्कार केल्यामुळे ऐक्यभावना वाढीस लागली. सर्व मानवजात एकाच ईश्वराची लेकरे असून परमेश्वराने मानवा-मानवांमध्ये भेदभाव केला नाही. समाजातील व धर्मातील अज्ञानामुळे, अंधश्रद्धेमुळे भारतात ऐक्यभावना निर्माण होत नव्हती परंतु १९व्या शतकात ज्या समाज व धर्म सुधारकांनी असंख्य चळवळी केल्या त्याचा सर्वात चांगला परिणाम म्हणजे समाज व धर्म एक होऊ लागला.

अशा प्रकारे १९व्या शतकातील भारतातील सामाजिक-धार्मिक सुधारणा चळवळींनी समाजासाठी अनुलनीय असे महान कार्य केले व त्यासाठी सुधारकांना अनेक हालअपेष्टांना सामोरे जावे लागले.

**आपली प्रगती तपासा:**

१) समाजसुधारणा चळवळींवर प्रकाश टाका.

## २.५ सारांश

पाश्चात्य संस्कृतीच्या श्रेष्ठत्वाच्या कल्पनेने 'स्व' त्व गमावून बसलेल्या सुशिक्षित भारतीयांमध्ये सुधारणा चळवळींनी पुन्हा आत्मविश्वास निर्माण करण्याचे अत्यंत महत्त्वाचे कार्य केले. सुधारणा चळवळींमुळे आपला प्राचीन धर्म व सांस्कृतिक ठेव्याची महानता भारतीयांच्या नजरेस आली. विशेषतः सुशिक्षित वर्गाला अत्यंत आवश्यक असणारी अशी स्वतःचीच ओळख पटली. सुधारणा चळवळींमुळे भारतीयांना आपल्या जुन्या, टाकाऊ, खोट्या प्रथापरंपरांचा त्याग करण्याची संधी मिळाली. व नव्या विज्ञानाधिष्ठीत आणि तर्कसंगत विचारांच्या वातावरणात आपल्या धार्मिक श्रद्धा, विचार ह्यांना जुळवून घेण्यास सहाय्य मिळाले. नवा राष्ट्रवादी व धर्मनिरपेक्ष दृष्टिकोन विकसित होणे ही चळवळीची महत्वाची उपलब्धी ठरली.

## २.६ प्रश्न

१) ब्राम्हणेतर चळवळ म्हणून सत्यशोधक समाजाच्या कार्याचा आढावा घ्या.
२) सर सय्यद अहमद खान ह्यांच्या खास संदर्भात मुस्लीम समाजाच्या प्रगतीशील अलिगढ चळवळीने बजावलेलया भूमिकेचे परीक्षण करा.
३) सिंग सभा चळवळीचे उद्देश व उद्दिष्ट्ये तसेच कामगिरी स्पष्ट करा.
४) सुधारणा चळवळींचा भारतीय समाजावर झालेल्या प्रभावाचा आढावा घ्या.

## २.७ संदर्भ सूची


१) आचार्य धनंजय, भारताचा इतिहास (१७६१-१९७१), श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, २००९.
२) कोलारकर, श.गो.,भारताचा इतिहास (१७०७-१९५०), श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, १९९५.
३) ग्रोवर बी.एल.व बेल्हेकर एन.के., आधुनिक भारताचा इतिहास, एस.चंद आणि कंपनी लि., नवी दिल्ली, २००३.
४) पंडित सुधाकर वि., अर्वाचीन भारताचा इतिहास (१८००-१९६४), प्राची प्रकाशन, मुंबई-१९९४.
५) भिडे गजानन, आधुनिक भारताचा इतिहास, अनिरुद्ध पब्लिशिंग हाऊस, पुणे,२०००.
६) जाधव वसंत, आधुनिक महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास, विद्या प्रकाशन, नागपूर, १९९८.
७) वक्काणी नि.आ. आधुनिक भारताचा इतिहास, श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर,१९९४.
८) वैद्य सुमन व कोठेकर शांता, आधुनिक भारताचा इतिहास (१८५७-१९२०), श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर,२०१५.
९) शहा जी.बी.भामरे आर.पी.आणि पवार एम.डी., आधुनिक भारताचा इतिहास (१७५७ ते १९५०) प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव, २०१४.


❖❖❖❖

# ३

# शिक्षण, वृत्तपत्र आणि वाहतूक
# पाश्चिमात्य शिक्षणाची सुरुवात आणि त्याचे परिणाम

**प्रकरणाची रचना :**

३.० उद्दिष्टे
३.१ प्रस्तावना
३.२ पाश्चिमात्य शिक्षणास प्रारंभ
३.३ लॉर्ड मेकॉलेच्या सुधारणा
३.४ वुडचा खलिता
३.५ १८५८ नंतर पाश्चात्य शिक्षणाचा विकास
३.६ हंटर समिती
३.७ लॉर्ड कर्झन व विद्यापीठ कायदा
३.८ इ.स.१९१३ चा ठराव
३.९ सॅडलर कमिशन
३.१० उच्च शिक्षणात वाढ
३.११ प्राथमिक व माध्यमिक शिक्षण
३.१२ स्त्रिया व मागास गटात शिक्षणाचा प्रसार
३.१३ पाश्चिमात्य शिक्षणाचा प्रभाव
३.१४ सारांश
३.१५ संदर्भ सूची

## ३.० उद्दिष्टे

१. पाश्चिमात्य शिक्षणाचा प्रारंभ समजावून घेणे.
२. पाश्चिमात्य शिक्षणातील महत्वाचे टप्पे अभ्यासणे.
३. पाश्चिमात्य शिक्षणाचा प्रभाव समजावून घेणे.

## ३.१ प्रस्तावना

प्राचीन व मध्ययुगीन कालखंडात कोणाचेही राज्य असले तरी प्रचलीत शिक्षणव्यवस्थेत फारसे बदल होत नसत. कारण शिक्षण ही आपली जबाबदारी आहे असे राजसत्तेला कधी वाटलेच नाही. मध्ययुगीन राज्यव्यवस्थेचे स्वरुप लष्करी असल्यामुळे शिक्षणाकडे लक्ष द्यायला कुणाला वेळ नव्हता. वेदाध्ययनाचे अधिकार ठराविक वर्गाला असल्याने अन्य कोणी ते शिकू शकत नसे. पेशवेकाळात नाशिक, पैठण, सांगली, मिरज, भोर, फलटन, त्र्यंबकेश्वर, सातारा, वाई येथे पाठशाळा होत्या. १९व्या शतकाच्या सुरुवातीला संपूर्ण देशातील शिक्षणाची परिस्थिती दयनीय होती. ब्राह्मणांशिवाय इतर जाती शिक्षणात रस घेत नव्हत्या. शिक्षणाचे व्यावहारिक जगात किती फायदे आहेत याचा समाजाला बोध झाला नव्हता. या काळात छापील पुस्तके नव्हती, शाळांच्या निश्चित वेळा नव्हत्या, अभ्यासक्रम नव्हते, मागास जातींना व स्त्रियांना शिक्षणापासून वंचीत ठेवले होते. विद्यार्थी ब्राह्मण व शिक्षकही ब्राह्मण असल्यामुळे हे शिक्षण ब्राह्मणांचे हितसंबंध जोपासण्यासाठी चालू ठेवण्यात आले. सार्वत्रिक शिक्षणपद्धती १८व्या शतकापर्यंत अस्तित्वात नव्हती. सैनिक, शिलेदार शिक्षणाला महत्त्व देत नसत. युद्धोपयोगी शिक्षण घेण्याकडे त्यांचा कल होता. व्यवसायाशिक्षण हे जातीनिष्ठ व आनुवांशिक होते. शिक्षण हे आधुनिक प्रकारचे नसल्याने समाजात अज्ञान, अंधश्रद्धा, जातीभेद, स्त्रियांच्या समस्या यांनी उग्र स्वरुप धारण केले होते.

## ३.२ पाश्चिमात्य शिक्षणास प्रारंभ

भारतात शिक्षणाचा प्रसार करण्याची जबाबदारी शासनाची आहे असे कंपनी सरकारने १९व्या शतकापर्यंत कधी मानलेच नाही. भारतात आलेले काही ख्रिश्चन मिशनरी व जनसेवेचे व्रत घेतलेले काही भारतीय नेते यांच्या प्रयत्नांमुळे त्याकाळी पाश्चात्य शिक्षणाची चाहूल भारतात लागली. परंतु १७८१ मध्ये लॉर्ड हेस्टिंग्जने सुरु केलेले 'कलकत्ता मदरसा, १७७१ साली जोनायन डंकन याने सुरु केलेले बनारस येथील संस्कृत महाविद्यालय, १७९४ मध्ये विल्यम जोन्स यांनी प्रस्थापित केलेले 'बंगाल एशियाटिक सोसायटी" या १८व्या शतकात स्थापन झालेल्या शिक्षणसंस्था पाश्चात्य शिक्षणावर भर देणाऱ्या होत्या. मुंबईचे विल्सन कॉलेज व मद्रासचे ख्रिश्चन कॉलेज ही त्याकाळी मिशनऱ्यांनी चालवलेली महत्वाची शिक्षणकेंद्रें होती.

१९व्या शतकाच्या पूर्वार्धात राजा राममोहन रॉय, राधाकांत देव, महाराजा तेजचंद्र रायबहादूर यांनी आधुनिक शिक्षणाच्या प्रसाराकरिता नेटाने प्रयत्न केले. १८१८मध्ये भारतात ब्रिटीश सार्वभौमत्व प्रस्थापित झाल्यानंतर ब्रिटीश राज्यकर्त्यांनाही भारतात इंग्रजी शिक्षणाचा प्रसार व्हावा याची गरज वाटू लागली.त्यांनी भारतात प्रस्थापित केलेली शासकीय व न्याय व्यवस्था चालविण्याकरिता तसेच ब्रिटीश व्यापारी कंपन्यात कनिष्ठ स्तरावर नोकरवर्गाचा भरणा करण्यासाठी सुशिक्षित माणसांची गरज त्यांना वाटू लागली. त्या दृष्टीने इंग्रजी शिक्षण आवश्यक असल्याने १८३३च्या सुमारास आधुनिक इंग्रजी शिक्षणाची सुरुवात भारतात झाली.

## ३.३ लॉर्ड मेकॉलेच्या सुधारणा

लॉर्ड मेकॉले हा लॉर्ड विल्यम बेंटिकच्या गव्हर्नर जनरलच्या परिषदेत विधी सदस्य होता. त्याने भारतात इंग्रजी भाषेच्या माध्यमातून युरोपियन वाङ्मय व विज्ञानाचे शिक्षण देण्यात यावे असा विचार मांडला. राजा राम मोहन रॉय यांनीही त्यांना समर्थन दिले. लॉर्ड मेकॉलच्या प्रभावी समर्थनामुळे बेंटिकने ७ मार्च १८३५ रोजी इंग्रजी शिक्षणाचा व पाश्चात्य विज्ञानाचा प्रसार भारतात व्हावा असा ठराव पास केला. या दिवसापासून इंग्रजी माध्यमाचा भारतीय शिक्षणव्यवस्थेत शिरकाव झाला. या निर्णयामुळे मेकॉलेच्या मतानुसार क्लर्कसारख्या पदांसाठी भारतीयांना नोकरीत लावता येणार होते, त्यांना कमी पगारावर नियुक्त केल्यामुळे कंपनीला कमी खर्च येईल, अनेक भारतीय इंग्रजी भाषेचे समर्थक होतील त्यामुळे इंग्रजी साम्राज्य, त्यांची राहणी व पाश्चात्य सभ्यता यांचा प्रभाव पडेल त्यातून भारतात इंग्लंडच्या मालाची मागणी वाढेल व भारतीयांवर इंग्रजांनी लादलेल्या गुलामगिरीचा विरोध करण्याची इच्छा भारतीयांना होणार नाही अशी मेकॉलेची योजना होती. बेंटिकने १८३५ मध्ये कलकत्ता येथे एक मेडिकल कॉलेज स्थापन केले.

## ३.४ वुडचा खलिता

१९ जुलै १८५४ रोजी बोर्ड ऑफ कंट्रोलचा अध्यक्ष सर चार्लस वुड याने त्याच्या शिक्षणाविषयक खलित्यात विशद केलेली निती भारतातील आधुनिक शिक्षणाचा मूलाधार मानला जातो. पाश्चात्य शिक्षणाने ब्रिटीश सत्तेच्या स्थैर्याला धोका निर्माण होईल ही भिती वुडला निराधार वाटत होती. उलट ब्रिटीशांकरिता भारतीयांच्या शैक्षणिक हिताची जपणूक व विकास करणे हे सरकारचे कर्तव्य ठरते असे त्याचे मत होते. त्याच्या खलित्यात पुढील शिफारसी होत्या.

१. जबाबदारीच्या पदांवर भारतीयांच्या नेमणूका करणे शक्य व्हावे याकरिता पाश्चात्य तत्वज्ञान, विज्ञान व कला यांचा प्रसार करणे हे शिक्षण पद्धतीचे उद्दिष्ट असावे.
२. भारतीय भाषांना उत्तेजन देण्यात यावे.
३. कायदा, कृषी व औषधी विज्ञान यांच्या प्रशिक्षणाकरिता वेगळी शिक्षणकेंद्रे सुरु करण्यात यावी.
४. स्त्रीशिक्षणाला प्रोत्साहन व सवलती देण्यात याव्या.
५. संचालकांच्या मार्गदर्शनाखाली सार्वजनिक शिक्षण खाते प्रत्येक प्रांतात प्रस्थापित करावे व त्या त्या प्रांतातील शैक्षणिक संस्थाच्या कामकाजावर देखरेख ठेवण्याकरता तपासनिसांची नियुक्ती करावी.
६. लंडन विद्यापीठाच्या धर्तीवर नवी विद्यापीठे स्थापन करण्यात यावी व इंटरमिजिएट ते पदवी स्तरापयंत शिक्षण देण्याचे कार्य विद्यापीठांनी करावे.
७. प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावर देशी भाषा शिक्षणाचे माध्यम असावे.

वुडचा खलिता भारतीय शिक्षणपद्धतीची जणू सनद मानली जाते. वुडने केलेल्या शिफारसीनुसार मुंबई, मद्रास व कलकत्ता या इलाख्यात शिक्षण खात्याची स्थापना करण्यात आली. १८५७ मध्ये मुंबई, मद्रास, कलकत्ता येथे विद्यापीठेही स्थापन झाली.

## ३.५ १८५८ नंतर पाश्चात्य शिक्षणाचा विकास

वुडच्या शिफारसींना वास्तव रुप देण्याचे थोडेफार प्रयत्न १८५८ नंतर झाले. १८६६ पर्यंत प्रत्येक प्रांतात संचालकाच्या मार्गदर्शनाखाली सार्वजनिक शिक्षण खात्याची निर्मिती झाली. शिक्षक व तपासनीस नियुक्त करण्यात आले. मुंबई, मद्रास, कलकत्ता येथील वैद्यकीय महाविद्यालयांच्या शैक्षणिक दर्जात व कामकाजात सुधारणा घडून आली. १८५८ नंतर मिशनरी शाळांना सरकारकडून मिळणाऱ्या अनुदानात बरीच कपात करण्यात आली.

स्त्री शिक्षणाच्या क्षेत्रात काही हिंदू व पारशी समाजाच्या कार्यकर्त्यांनी पुढाकर घेऊन मुलींकरिता शाळा सुरु केल्या. परंतु पुरेशा सरकारी पाठींब्याच्या अभावी व्हावी तेवढी प्रगती होत नव्हती. १८८२ पर्यंत एक टक्के मुलीही शाळेत जात नव्हत्या.

१८५१ मध्ये लॉर्ड मेयोने मुसलमानांच्या शिक्षणाकडे विशेष लक्ष पुरविले. सर सय्यद अहमदखान व तत्कालीन गर्व्हनर जनरल लॉर्ड नॉर्थब्रुक यांच्या प्रयत्नांनी अलीगढ येथे १८७५मध्ये मुसलमानांकरिता एक उच्च माध्यमिक विद्यालय सुरु झाले. या संस्थेचे व्यवस्थापन युरोपीय प्राचर्यांच्या हाती होते. पंजाबात सुरु करण्यात आलेल्या अँग्लो ओरिएंटल महाविद्यालयाचे रुपांतर १८८२ मध्ये पंजाब विद्यापीठात झाले १८७१ साली लॉर्ड मेयोने प्रत्येक प्रांतात शिक्षणावर खर्च करण्यासाठी रक्कम नेमून दिली तसेच केंद्राकडून गरजेनुसार थोडे जास्तीचे अनुदान दिले जाऊ लागले. १८६९ मध्ये लाहोर विद्यापीठाच्या स्थापनेला सरकार मान्यता मिळाली. २३ सप्टेंबर १८८७ रोजी एका कायद्याद्वारे उत्तर प्रदेशात अलाहाबाद येथे विद्यापीठ स्थापन करण्यात आले. १८८१-८२ मध्ये ब्रह्मदेश व अजमीर वगळता एकूण ३९ कला महाविद्यालयाचे भारतात विद्या दानाचे कार्य करीत होती व त्यात ५३९९ विद्यार्थी शिक्षण घेत होते.

## ३.६ हंटर समिती

भारतात शिक्षणाला थोडी वेगाने चालना मिळाली ती गव्हर्नर जनरल लॉर्ड रिपन यांच्या धोरणामुळे. वुडच्या खलित्यात विशद केलेल्या तत्वांना कितपत व कोणत्या प्रकारे मूर्त स्वरूप दिले जात आहे व ती निती साकार करण्याकरिता कशा स्वरूपाची कार्यवाही आवश्यक आहे. यासंबंधी मार्गदर्शन व्हावे या हेतूने रिपनने डब्लू. डब्लू. हंटर यांच्या अध्यक्षतेखाली १८८२-८३ मध्ये २२ सदस्यांची एक समिती नेमली. या समितीने शिक्षणाविषयक प्रश्नांचा सांगोपांग अभ्यास करुन पुढील शिफारसी केल्या.

१. उच्च शिक्षण संस्थांचे व्यवस्थापन करणे व त्यांना प्रत्यक्षपणे मदत करणे सरकारने हळूहळू बंद करावे त्याऐवजी महाविद्यालयांना आवश्यक तेवढे द्रव्यसहाय्य व खास अनुदाने द्यावीत.

२. नैतिक शिक्षणाकडे लक्ष पुरवावे व त्या दृष्टीने धर्म तत्वावर आधारित क्रमिक पुस्तके तयार करावीत. सर्व सरकारी व सरकारी मदत घेणाऱ्या शिक्षण केंद्रातुन एक व्यक्ती व नागरिक म्हणून प्रत्येकाची कर्तव्ये समजावून सांगण्याकरिता व्याख्यानमाला आयोजित कराव्यात.
३. महाविद्यालयात विद्यार्थ्यांनी दयावयाचे शुल्क, त्यासंबंधी देण्यात येणाऱ्या सवलती याबाबत निश्चित नियम घालून देण्यात यावे व त्याचे पालन काटेकोरपणे व्हावे.
४. शिष्यवृत्यांकरिता खास नियम तयार करण्यात यावे उच्च माध्यमिक शिक्षणाचे दोन विभाग असावेत. एक विभाग ती परीक्षा उत्तीर्ण होऊन महाविद्यालयात जाणाऱ्या विद्यार्थ्यांचा व दुसरा व्यापार-व्यवसायाकडे वळणाऱ्या विद्यार्थ्यांचा असेल. सर्व उच्च माध्यमिक विद्यालयांना ग्रंथालय, टेबलखुर्च्या व अन्य साहित्य याकरिता अनुदान देण्याची तरतुद करण्यात यावी.
५. शिक्षणाची पातळी घसरणार नाही याबद्दल जागरुकता राखावी, त्याकरिता तपासनीस नेमून विद्यालयांच्या कामकाजावर देखरेख ठेवावी.
६. औद्योगिक व व्यापारी शिक्षणाची तरतुद करावी व शिक्षणाच्या प्रसाराकरिता खाजगी व्यवस्थापन व पुढाकार यांना उत्तेजन द्यावे.

हंटर कमिशनने केलेल्या सर्व सूचना भारत सरकारने मान्य केल्या. १९व्या शतकाच्या शेवटच्या दोन दशकात दुष्काळ, प्लेग यासारख्या दैवी आपत्ती विरुद्ध एकीकडे झगडा चालू असतांना शिक्षण क्षेत्रात मात्र बरीच प्रगती झाली.

## ३.७ लॉर्ड कर्झन व विद्यापीठ कायदा :

लॉर्ड कर्झन हा पक्का साम्राज्यवादी प्रवृत्तीचा शासक होता. भारतावरील ब्रिटीश पकड जास्तीत जास्त दृढ व्हावी हे त्याचे प्रमुख उद्दिष्ट होते. त्या दृष्टीने देशातील शिक्षणसंस्थांवर, विशेष करुन उच्च शिक्षणावर कडक सरकारी नियंत्रण असावे हे त्याला आवश्यक वाटत होते. शिवाय सरकारी नियंत्रणाशिवाय शिक्षणसंस्था भारतीयांच्या हाती जात असल्याचे पाहून कर्झन अस्वस्थ झाला होता. लॉर्ड कर्झनने काही प्रारंभिक चौकशीनंतर, देशातील उच्च शिक्षण अधिकाऱ्यांची एक परिषद सप्टेंबर १९०१ मध्ये सिमला येथे आयोजित केली त्या परिषदेत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार १९०२ मध्ये व्हॉईस रॉयच्या कार्यकारी मंडळाचा विधी सदस्य सर टॉमस रॅले यांच्या अध्यक्षतेखाली एक विद्यापीठ समिती कर्झनने नेमली. या समितीने सर्व विद्यापीठांना व संलग्न महाविद्यालयांना भेटी दिल्या व तीन महिन्याच्या चौकशीनंतर जून १९०२ मध्ये आपला अहवाल सरकारला सादर केला. या अहवालाच्या आधारे २१मार्च १९०४रोजी विद्यापीठ कायदा पास करण्यात आला यात पुढील तरतुदी होत्या.

१. मुंबई, मद्रास व कलकत्ता या तीन विद्यापीठात कमीत कमी ५० व जास्तीत जास्त १०० शिष्यगुरु असावेत आणि लाहोर, अलाहाबाद या दोन विद्यापीठात ती संख्या ४० ते ७५ असावी असे ठरवून देण्यात आले. त्यात कुलपती, कुलगुरु व सिनेटचे सदस्य असलेले पदासिद्ध शिष्यगुरु यांचा समावेश नव्हता.
२. निर्वाचित शिष्यगुरुंची संख्या मुंबई, मद्रास व कलकत्ता या तीन विद्यापीठात २० तर नव्या दोन विद्यापीठात १५ असावी.

३. सिंडीकेटमध्ये विद्यापीठाचा कुलगुरु, सार्वजनिक शिक्षण खात्याचा संचालक व सिनेटचे निवडलेले सात ते पंधरा शिष्यगुरु असावेत. विद्यापीठातील शिक्षकांना सिंडीकेटवर पुरेसे प्रतिनिधीत्व दिले जावे.

४. नव्या महाविद्यालयांच्या संलग्नतेसंबंधी नियम अधिक कडक करण्यात यावेत. महाविद्यालयाला योग्य अशी मोठी इमारत, किंमती अद्ययावत उपकरणे व ग्रंथालय यासारख्या आवश्यक सर्व सोई उपलब्ध असाव्यात. संलग्न महाविद्यालयांची तपासणी करण्याकरिता विद्यापीठांना जास्तीचे आधिकार दिले जावे.

५. प्राध्यापक, प्रपाठक व अधिव्याख्याता यांच्या नेमणूकांना सरकारी मान्यता अनिवार्य मानली जावी व कुलगुरुंची नेमणूक सरकारकडून व्हावी.

६. इंटरमिजिएट स्तरापर्यंत शिक्षण देणाऱ्या संस्था बंद करण्यात याव्यात. शिक्षणखात्याने घालून दिलेल्या नियमांचे पालन करणाऱ्या विद्यालयांनाच सरकार मान्यता दिली जावी.

या कायद्याने विद्यापीठांवर लादलेली नियंत्रणे इतकी कडक होती की गौण प्रश्नासंबंधीही स्वतंत्रपणे निर्णयघेणे विद्यापीठांना अशक्य झाले. या कायद्याने भारतीयांना उच्च शिक्षणसंस्था चालविण्याच्या मार्गात अडचणी निर्माण होणार होत्या असे असले तरी या कायद्याने विद्यापीठाच्या शासनपद्धतीत सुधारणा घडवून आणली. औषधीशास्त्र, पशुवैद्यक, शिल्पशास्त्र या विषयांच्या शिक्षणाला कर्झनने प्रोत्साहन दिले.

## ३.८ इ.स.१९१३ चा ठराव

या ठरावाद्वारे भारत सरकारने आपली शिक्षण विषयक निती विशद केली. त्यावेळी भारतात फक्त पाच विद्यापीठे होती व एकूण १८५ कला व व्यावसायिक महाविद्यालये त्या विद्यापीठाशी संलग्न होती. परंतु भारताच्या प्रत्येक मोठ्या प्रांतात स्वतंत्र विद्यापीठ असावे. एवढेच नव्हे तर स्थानिक पातळीवर नवी महाविद्यालये व निवासी विद्यापीठे स्थापन व्हावीत याची आवश्यकता त्या नितीनुसार प्रतिपादीत करण्यात आली. त्याचबरोबर प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांच्या प्रशिक्षणाकरिता आधिक सोई उपलब्ध करण्यात याव्या व त्या शिक्षणाचा दर्जा सुधारण्यात यावा व माध्यमिक शिक्षणाबाबत स्थानिक नेत्यांचा पुढाकार व सरकारी अनुदान यावर भर देण्यात यावा अशा आशयाची सरकारी निती घोषीत करण्यात आली.

## ३.९ सॅडलर कमिशन

इ.स. १९१७ मध्ये लॉर्ड चेम्सफर्ड यांनी कलकत्ता विद्यापीठाच्या गरजा व कामकाज यांची चौकशी करण्याकरिता सर मायकेल सॅडलर यांच्या अध्यक्षतेखाली एक कलकत्ता विद्यापीठ समिती नेमली. या कमिशनने १९१३ च्या ठरावाद्वारे सरकारने प्रतिपादीत केलेल्या शिक्षणानितीवर शिक्कामोर्तब केले व पुढील शिफारसी केल्या.

१. विद्याक्षेत्रात सरकारी ढवळाढवळ कमीत कमी असावी, प्रोफेसर, प्रपाठक यांच्या नेमणूका तज्ज्ञांनी केलेल्या निवडीच्या आधारे व्हाव्यात.

२. पास अभ्यासक्रमाबरोबर ऑनर्स अभ्यासक्रम विद्यापीठात सुरु करण्यात यावे.

३. विद्यापीठाकडे असलेले इंटरमिजीएटचे वर्ग माध्यमिक शिक्षण संस्थांकडे सोपविण्यात यावे व ती परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना विद्यापीठात प्रवेश देण्यात यावा.

४. माध्यमिक व इंटरमिजीएट शिक्षणावर नियंत्रण विद्यापीठाचे नव्हे तर बोर्ड ऑफ सेकेंडरी एज्युकेशनचे असावे. कलकत्ता विद्यापीठ केंद्र सरकारच्या नव्हे तर बंगाल सरकारच्या देखरेखीखाली असावे.
५. इंटरमीजिएट नंतरचा पदवी अभ्यासक्रम तीन वर्षाचा असावा.

## ३.१० उच्च शिक्षणात वाढ

१९१९ नंतरच्या कालावधीत सुमारे १७नवी विद्यापीठे निरनिराळ्या प्रांतात स्थापन करण्यात आली. यापैकी १९२० साली स्थापन झालेली अलाहाबाद व अलीगड मुस्लिम विद्यापीठे, १९२१ साली आग्रा विद्यापीठ, १९२२ साली दिल्ली, लखनौ, ढाका विद्यापीठे, १९२३ मध्ये नागपूर विद्यापीठ, १९२६ साली आंध्र विद्यापीठ, १९४३साली उत्कल विद्यापीठ ही विद्यापीठ होती. याखेरीज बनारस हिंदू विद्यापीठ, विश्वभारती व नाथीबाई ठाकरसी महिला विद्यापीठ ही सुप्रसिद्ध विद्यापीठेही स्थापन झाली.

१९२१ साली केद्रीय शिक्षण सल्लागार मंडळ स्थापन करण्यात आले. वेळोवेळी शैक्षणिक समस्यांवर विचारविनीमय करून त्याबाबत सरकारला सल्ला देणे हे या मंडळाचे काम होते. १९२४ साली सिमला येथे भारतीय विद्यापीठ परिषद आयोजित करण्यात आली. या परिषदेत आंतर विद्यापीठ मंडळ स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. भारत स्वतंत्र झाला त्यावेळी देशात २० विद्यापीठे, त्यांच्याशी संलग्न असलेल्या २२९ विविध विद्याशाखा व ६४३ महाविद्यालये अस्तित्वात होती. संशोधन कार्याचा पायाही घातला गेला होता. जगदीशचंद्र बोस, सी.व्ही. रमण, पी.सी.रे यांच्यासारखे जगप्रसिद्ध शास्त्रज्ञ याच काळात भारतात उदयास आले. तसेच निरनिराळ्या क्षेत्रातील तज्ञ मंडळींनी एकत्र येऊन प्रस्थापित केलेल्या ओरिएंटल कान्फरन्स, इंडियन ॲकॅडमी ऑफ सायन्सेस, नॅशनल इन्स्टिटय़ूट ऑफ सायन्सेस, नॅशनल ॲकॅडमी ऑफ सायन्सेस, इंडियन हिस्ट्री रेकॉर्ड कमिशन, इंडियन हिस्ट्री काँग्रेस, पोलिटीकल सायन्स कॉन्फरन्स इ. अखिल भारतीय संघटनांनी आपापल्या क्षेत्रात संशोधनाला चालना दिली.

## ३.११ प्राथमिक व माध्यमिक शिक्षण

१९१९च्या सुधारणा कायद्याने शिक्षण हा सोपीव विषय ठरविल्यानंतर मुंबई, संयुक्त प्रांत, पंजाब, बिहार, ओरिसा, मध्य प्रांत, आसाम इ. प्रांतातून प्राथमिक शिक्षण सक्तीचे व निःशुल्क करणारे कायदे पास झाले. १९३७ साली काँग्रेसच्या प्रांतीय सरकारांनी ज्या ग्रामीण भागात शाळा आस्तित्वात नव्हत्या तेथे शाळा स्थापन करण्यास चालना दिली, स्थानिक शिक्षण संस्थांना प्राथमिक शिक्षणाच्या विकासासाठी अनुदान देण्याची व्यवस्था केली. आणि ह्या शाळातून प्रशिक्षीत शिक्षक नेमण्याकडे लक्ष पुरविले.

सॅडलर समितीने १९१९सालच्या आपल्या अहवालात महाविद्यालयातील इंटर पर्यंतचे वर्ग आणि त्या विद्यार्थ्यांच्या परिक्षा हे काम माध्यमिक शिक्षण मंडळाकडे सोपवावे अशी सूचना केली होती. कलकत्ता विद्यापीठ सोडून इतर विद्यापीठांनी ती अंमलात आणली. १९२१-२२च्या दरम्यान देशातील माध्यमिक शाळांची संख्या सुमारे साडेसात हजार आणि त्यातील विद्यार्थ्यांची संख्या सुमारे ११ लक्ष होती. शिक्षणाचे माध्यम बहुधा इंग्रजी असे. १९३७मध्ये काँग्रेसच्या प्रांतीय सरकारांनी माध्यमिक शाळातून मातृभाषेतून शिक्षण देण्यास प्रोत्साहन दिले आणि नव्या

माध्यमिक शाळा सुरु केल्या. १९३८मध्ये शाळांची संख्या १३ हजारापर्यंत आणि विद्यार्थ्यांची संख्या २३ लक्षापर्यंत गेली होती.

## ३.१२ स्त्रिया व मागास गटात शिक्षणाचा प्रसार :

१९२० सालानंतर स्त्रीशिक्षण व दलित वर्गाच्या शिक्षणावरही लक्ष केंद्रित होऊ लागले. स्त्रियांच्या समस्या कमी होऊ लागल्याने शिक्षण घेणाऱ्या मुलींची संख्या वाढू लागली आणि सहशिक्षणाची कल्पनाही समाजात रुजू लागली. गांधीजींनी भारतीय महिलांना चार भिंतीच्या बंदीस्त चाकोरीतून बाहेर काढून त्यांच्यात सामाजिक जाण व राष्ट्रीय भावना जागृत केल्यामुळे आणि स्त्री शिक्षणाचा आग्रह धरल्यामुळे स्त्रीशिक्षणाला चालना मिळाली. १९३३च्या सुमारास शिक्षण घेणाऱ्या मुलींची संख्या सुमारे ३० लक्ष होती व १९४७ पर्यंत ४२ लक्षावर गेली. मुस्लिम मुलींचीही शिक्षणात संख्या वाढू लागली. १९१७ साली शाळेतील मुस्लिम मुलींची २ लक्ष असलेली संख्या १९२७ पर्यंत ३ लक्षावर गेली. उच्च माध्यमिक शाळेत मात्र त्यांची संख्या कमी दिसून येई. १९२०नंतर शाळेत जाणाऱ्या दलित मुलांची संख्या बरीच वाढली. परंतु ती उच्च माध्यमिक स्तरापर्यंत टिकली नाही. १९३७ साली अधिकारावर आलेल्या कॉंग्रेस मंत्रीमंडळांनी दलितांमध्ये शिक्षणाचा प्रसार होण्यासाठी काही सवलती दिल्या त्यानंतर शाळातील दलितांची संख्या वाढू लागली.

## ३.१३ पाश्चात्य शिक्षणाचा प्रभाव

ज्यावेळी इंग्रजांनी भारतात आपली सत्ता निर्माण केली त्यावेळी भारतात अनेक प्रांत व त्यांच्या विविध भाषा प्रचलीत होत्या त्यामुळे प्रशासन चालवतांना भारतातील सर्व भाषा शिकून घेणे इंग्रजांसाठी कठीण होते. म्हणूनच त्यांनी संपूर्ण हिंदूस्थानावर आपली इंग्रजी भाषा लादली. पाश्चिमात्य शिक्षणाचा भारतीयांना फार मोठा फायदा झाला. लॉर्ड बेंटिक व मेकॉलेच्या प्रयत्नांमुळे भारतात इंग्रजीतून पाश्चिमात्य शिक्षण सुरु झाले. जागतिक ज्ञानाची गंगोत्री भारताच्या कानाकोपऱ्यात वाहू लागली. स्वातंत्र्य, समता, बंधुता, उदारमतवाद, मानवतावाद, राष्ट्रवाद या पाश्चात्य विचारांचा प्रसार होऊ लागला. भारतात इंग्रजी साहित्य मोठ्या प्रमाणात येऊ लागल्याने जगात घडलेल्या अमेरिकन राज्यक्रांती, फ्रेंच राज्यक्रांती, इटली व जर्मनीचे एकीकरण अशा स्वातंत्र्यसंग्रामांची माहिती भारतीयांना होऊ लागली.

**आपली प्रगती तपासा.**

१) पाश्चात्य शिक्षणाची भारतीयांना कशी ओळख झाली ते सांगून त्याची प्रगती कशी झाली ते लिहा.

## ३.१४ सारांश

पाश्चात्य शिक्षणामुळे भारतीय तरुणांमध्ये कमालीची ज्ञानलालसा वाढली त्यातुन अनेक तरूण इंग्लंडमध्ये उच्च शिक्षणासाठी जाऊ लागले. त्यांच्यावर इंग्लंडमधील लोकशाही, औद्यगिक प्रगती, उदारमतवाद यांचा प्रभाव पडला व त्यांनी भारतात येऊन त्याचा प्रसार सुरु केला. भारतातील भिन्न भाषिक प्रांतात वैचारिक देवाणघेवाणीसाठी इंग्रजी भाषा वरदान ठरली. इंग्रजीमुळे भारतीयांना ज्ञान-विज्ञान-तंत्रज्ञानाची ओळख झाली. त्यातून अज्ञान, अंधश्रद्धा, संकूचित निष्ठा दूर होऊन नवा शास्त्रीय दृष्टीकोन मिळाला. सामाजिक व धार्मिक पुनरुज्जीवनामध्ये भारतीय सुशिक्षित तरुणांनी महत्वाची भूमिका बजावली. भारतीय ऐक्य राष्ट्रवाद वाढवण्यात पाश्चात्य शिक्षणाने महत्वाची भूमिका बजावल्याने अनेक विद्वानांनी इंग्रजी भाषेला भारतीय स्वातंत्र्याची भाषा म्हणून गौरविले आहे. चिपळूणकरांच्या मते, ''इंग्रजी शिक्षण हे भारतीयांना लढाऊ राष्ट्रवादाचे बाळकडू पाजणारे वाघीणीचे दूध ठरले.''

## ३.१५ संदर्भ सूची


१) डॉ. नि.आ. वक्काणी - आधुनिक भारताचा इतिहास - श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर
२) डॉ. सुमन वैद्य, डॉ. शांता कोठेकर - आधुनिक भारताचा इतिहास (१८५७ - १९२०) - श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर
३) डॉ. सुमन वैद्य, डॉ.शांता कोठेकर आधुनिक भारताचा इतिहास (१९२१ – १९४७) - श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर
४) Prakash Chandar – India Past and present – APH Publishing Corporation, New Delhi.
५) विद्याविकास (शैक्षणिक मासिक पत्रिका) अंक १६ जानेवारी १९८४ - विकास प्रकाशन
६) ना.सी., दिक्षीत - भारताचा इतिहास - पिंपळपुरे प्रकाशन, नागपूर
७) डॉ. बी. एल. ग्रोवर व डॉ. बेल्हेकर - आधुनिक भारताचा इतिहास - एस चंद आणि कंपनी प्रकाशन
८) मोहनदास करमचंद गांधी - संक्षिप्त आत्मकथा - नवजीवन प्रकाशन मंदिर, अहमदाबाद.
९) गायकवाड, भिडे, भोसले, पाटील - आधुनिक भारत व चीन -फडके प्रकाशन, कोल्हापूर.


❖❖❖❖

# ४

# वृत्तपत्रांचा विकास

**प्रकरणाची रचना :**

४.० उद्दिष्टे

४.१ प्रस्तावना

४.२ मुद्रण व्यवसायाचा प्रारंभ-विकास

४.३ वृत्तपत्रांचा उद्देश - प्रारंभ

४.४ भारतीय भाषेतील वृत्तपत्रांचा विकास

४.५ स्वातंत्र्य चळवळीसंदर्भात वृत्तपत्रांची भूमिका

४.६ ब्रिटिश सरकारचे वृत्तपत्रांसंदर्भातले धोरण.

४.७ स्वातंत्र्यप्राप्ती नंतरची वृत्तपत्रे.

४.८ सारांश

४.९ प्रश्न

४.१० संदर्भ सूची

## ४.० उद्दिष्टे

१) भारतातील मुद्रण व वृत्तपत्रांचा प्रारंभी महिती मिळविणे.

२) भारतीय वृत्तपत्रांच्या विकासाचे ज्ञान मिळविणे.

३) भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील वृत्तपत्राची भूमिका समाजावून देणे.

४) वृत्तपत्रासंदर्भात ब्रिटिश सरकारचे धोरण समजावून घेणे.

## ४.१ प्रस्तावना

प्राचीन काळापासून ते मराठेशाहीच्या काळापर्यंत विविध स्तरातील माहिती, अधिकारी, सुभेदार, व्यापारी इ. मंडळींच्या माध्यमातून विशिष्ट घटनेच्या स्वरुपात केंद्रस्थानी असलेल्या व्यक्तीला म्हणजे महाराज, बादशाहा यांना पोहचविली जाते ती माहिती म्हणजे बातमी होय. इंग्रज राजवटीत ती बातमी जनसामान्यात विशिष्ट विचार प्रवाहाचे साधन म्हणून ओळखले. ब्रिटिशांनी वृत्तपत्राची सुरवात मनोरंजनासाठी केली असली तरीही त्याचा सर्वसामान्य लोकांपर्यंत शासनाची कार्यप्रणाली पोहचविण्यासाठी उपयोग केला. इंग्रजी शिक्षणामुळे वृत्तपत्रांना भारतीय वाचक मोठ्या प्रमाणात मिळाल्याने इंग्रजी वृत्तपत्रांबरोबर प्रादेशिक भाषेतील वृत्तपत्रांचा विकास झाला. या वृत्तपत्रातून आपल्या हक्कांच्या मागण्या सुरू झाल्याने ब्रिटिश शासनाच्या धोरणात ही बदल

होत गेले. स्वातंत्र्य चळवळीला पाठिंबा देण्यासाठी लोक जागृतीचे प्रभावीपणे कार्य केले. या सर्व घटकांचा सविस्तर अभ्यास या प्रकरणामध्ये करावयाचा आहे.

## ४.२ मुद्रण व्यवसायाचा प्रारंभ व विकास

वृत्तपत्रे व मुद्रणकला अतिशय जवळचा संबंध आहे. १५व्या शतकात मुद्रणकेलेचा उदय युरोपमध्ये झाला. युरोपीयांमार्फत १६व्या शतकात मुद्रणकलेने भारतात प्रेवश केला. गोव्याच्या पोर्तुगीज मिशनऱ्यांनी भारतात छापखाना सुरु करून १५५० मध्ये पहिले पुस्तक छापले. डॅनिश मिशनऱ्यांनी १७११ मध्ये तमिळी मुद्रणालयाची स्थापना केली. ईस्ट इंडिया कंपनीने पहिला छापखाना १६८४ मध्ये मुंबई येथे सुरु केला. बंगाल मधील श्रीरामपूर येथील डॅनिश मिशनरी डॉ. कॅरे या धर्मगुरुंनी भारतीय भोषेतील साधारणपणे ३०-४० प्रकारच्या लिप्यांचे टाईप तयार केले. त्यामुळे भारतीय मुद्रणकलेच्या प्रारंभाचे व विस्ताराचे श्रेय डॉ. कॅरे यांनाच दिले जाते. मुंबई इलाक्यात मुंबई येथून १८१० मध्ये पहिला मराठी ग्रंथ छापण्यात आला. मुद्रण केलेच्या विकासाबरोबरच वृत्तपत्रांचा प्रारंभ व विकास सुरू झाला.

## ४.३ वृत्तपत्रांचा उद्देश व प्रारंभ

१) धर्म श्रेष्ठत्वाचा प्रसार करणे.

२) अधिकारी वर्गाचे मनोरंजन व शासनाची कार्यपध्दती व निर्णय लोकांपर्यंत पोहचविणे.

३) सामान्यांचे हक्क व अधिकार व प्रबोधन यासंदर्भात प्रचार व प्रसार करणे.

४) स्वातंत्र्य प्राप्तीसाठी व शासनाच्या अन्यायकारी धोरणाविरुद्ध लोकजागृतीचे कार्य करणे या उद्देशाने इंग्रजी व प्रादेशिक वृत्तपत्रे सुरु करण्यात आली.

**वृत्तपत्रांचा प्रारंभ :-**

भारतीय वृत्तपत्रांचा प्रारंभ हा मनोरंजन व ज्ञान या हेतूने झाला. मुंबई, मद्रास इलाखा व ब्रिटिश प्रांत यामध्ये इंग्रजी वृत्तपत्रे सुरु झाली. विल्यम बोल्टसने १७७६ मध्ये इंग्रजी वृत्तपत्र सुरु करण्याचा प्रयास केला. पण अपयश आले. वॅरन हेस्टिंग्जच्या काळात २९ जानेवारी १७८० रोजी बंगाल गॅझेट नावाचे भारतातील पहिले वृत्तपत्र कलकत्ता येथून जेम्स ऑग्सटस व्हिकी यांनी सुरु कले. महाराष्ट्रात पहिले इंग्रजी वृत्तपत्र १७८९ मध्ये दि बॉम्बे हेरॉल्ड नावाचे सुरु झाले. भारतीय भाषेतील पहिले मासिक वर्तमानपत्र बंगाली भाषेमधून १८१८ मध्ये दिग्दर्शन नावाचे श्रीरामपूर येथील मिशनऱ्यांनी सुरु केले. मराठी भाषेतील पहिले साप्ताहिक वर्तमानपत्रे ६ जानेवारी १८३२ रोजी हरी बाळशास्त्री जांभेकर यांनी दर्पण नावाचे सुरु केले. बाळशास्त्री जांभेकर यांनी भौतिकशास्त्राच्या ज्ञानासाठी भाऊ महाजन यांच्या मदतीने महाराष्ट्रातील १८४० मध्ये दिग्दर्शन नावाचे पहिले नियतकालिक मासिक सुरु केले. महाराष्ट्रात पुणे येथून १२ फेब्रुवारी १८४९ रोजी ज्ञानप्रकाश हे पहिले साप्ताहिक वर्तमानपत्र सुरु करण्यात आले. श्रीरामपूरच्या मिशनऱ्यांने संपूर्ण बायबलचे पहिले मराठी भाषेत रुपांतर १८११ मध्ये केले.

## ४.४ भारतीय वृत्तपत्रांचा विकास

भारतामध्ये युरोपीयनांच्या माध्यमातून भारतीय वृत्तपत्रांचा प्रारंभ झाला. तर भारतीयांनी इंग्रजी व प्रादेशिकभाषेतून त्याचा विकास केला. भारतात प्रबोधन चळवळ, स्वातंत्र्य चळवळ, स्वदेशी चळवळ सुरू असताना चळवळीला पुरक असे लोक जागृतीचे व ऐक्याचे भरीव कार्य करून आपली भूमिका स्पष्ट केली. तसेच ब्रिटिश प्रशासनाच्या अन्याया विरुध्द आवाज उठविण्याचे कार्य केले. त्यातून भारतीय वृत्तपत्रांचा समृद्ध असा विकास झालेला दिसून येतो.

### १) १८५७ पूर्वीची (कंपनी राजवटीतील) वृत्तपत्रांचा विकास :

जेम्स व्हिकीचे बेंगॉल गॅझेट (कलकत्ता जनरल ॲडव्हटयिझर) १७८०), पीटर रोड व बी. मेसिन्कचे इंडिया गॅझेट, रिचर्ड जॉनस्टनचे मद्रास कुरिअर (१७८५) मुंबईतले पहिले अथवा मुंबई इलाख्यातील पहिले इंग्रजी वृत्तपत्र बॉम्बे हेरॉल्ड (१७८९), गंगाधर भट्टाचार्यांचे बेंगॉल गॅझेट (१८१६), श्रीरामपूर मिशनऱ्यांचे दिग्दर्शन - साप्ताहिक (१८१८), देशी भाषेतील पहिले वृत्तपत्र श्रीरामपूर मिशनऱ्यांचे समाचारदर्पण-दैनिक (१८१८), इंग्रजी व बंगाली द्विभाषिक वर्तमानपत्र भवानीचरण बॅनर्जीने संवाद कौमुदी (१८२१), फारसी भाषेतील पहिले वृत्तपत्र राजा राममोहन रॉय यांचे मिरात-उल - अखबार, उर्दूभाषेतील पहिले वृत्तपत्र हरिदासदत्तांचे जामा-एजहॉनूमा (१८२१), मराठीतील पहिले वृत्तपत्र रघुनाथ हरिश्चंद्रजीचे दर्पण (१८३२) संपादक बाळशास्त्री जांभेकर त्याचे भाऊ महाजनचे प्रभाकर (१८४१), नगरच्या अमेरिकन मिशनऱ्यांचे ज्ञानोदय (१८४२), कृष्णशास्त्री चिपळूणकरांचे ज्ञानप्रकाश (१८४९), कृष्णाजी रानड्यांचे ज्ञान प्रकाश (१८४९)इ. इंग्रजी व भारतीय भाषेतील वृत्तपत्रे सुरु झालेली होती.

### २) १८५७ नंतरची (ब्रिटिश शासनाच्या राजवटीतील) वूतपत्रांचा विकास :-

भाऊ महाजन यांचे धुमकेतू (१८५३), ज्ञानदर्शन (१८५४), कृष्णाजी चिपळूणकरांचे विचार (१८५२), विष्णूशास्त्री पंडितांचे इंदूप्रकाश (१८६२), विश्वनाथ महाडीकांचे नेटिव ओपिनियन (१८६४), विष्णूशास्त्री चिपळूणकरांचे निबंधमाला (१८७४), लोकमान्य टिळकांचे केसरी (१८८३) व मराठा (१८८७), दादाभाई नौरोजी. इंडिया (१८९०), डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मूकनायक (१९२०), ब्रहिष्कृत भारत (१९२७), अरविंद घोष व भुपेंद्रनाथ यांचे युगांतर, कर्मयोगी, डॉ. ॲनीबेझेंट यांचे न्यू इंडिया (१९१४), लाला लजपतराय ट्रिब्यून (१९१३),साने गुरुजींचे साधना (१९४८, महर्षि कर्वे यांचे मानवी समता (१९४४) इ. वृत्तपत्रे या काळात सुरू झाली.

## ४.५ भारतीय वृत्तपत्रांची भूमिका-कार्य

ब्रिटिशांनी भारतामध्ये वृत्तपत्रांची सुरुवात भारतीयांच्या भावना, अपेक्षा समजावून घेऊन त्याला पुरक कार्य करणे. या हेतूने केलेली होती. परंतू भारतीयांच्या झालेल्या लोकजागृतीमुळे भारतातील परिस्थिती व इंग्रज सरकारची असणारी दुटप्पी भूमिका याचे वृत्तपत्रातून विचारमंथन सुरू झाले. त्यातूनच भारतीय वृत्तपत्रांची भूमिका व कार्य स्पष्ट दिसून येते.

**१) इंग्रजी वृत्तपत्रांची भूमिका :**

बिटिशांनी भारतात वृत्तपत्रे मनोरंजन आणि शासन व जनता यांच्यात सुसंवाद साधण्याच्या हेतूने सुरु केली. परंतु या वृत्तपत्रांच्या संपादकांनी इंग्लंडमधील सरकारी व समाजातील घडामोडी प्रसिध्द केल्या. त्यामुळे इंग्लंडमध्ये सरकारीच भूमिका काय आहे याची माहिती भारतीय जनतेला होऊ लागली. तसेच मिशनऱ्यांनी आपल्या वृत्तपत्रातून धर्मप्रसाराची प्रमुख भूमिका सोडून भारतातील धर्म व धर्म व्यवस्थेवर टिका केली. त्यामुळे इंग्रजी भारतीत प्रबोधन चळवळीला प्रेरणा मिळाली.

**२) ज्ञान प्रसार, धर्मप्रसार आणि ख्रिस्ती धर्मप्रसारास विरोध:**

ख्रिस्ती धर्मप्रसारकांनी धर्म प्रसाराच्या हेतूने भारतीय धर्मातील दोष दाखवून धर्म प्रसाराचे कार्य सुरु केले. ख्रिस्ती धर्म प्रसाराच्या आक्रमकतेचा विरोध कमी करणे, पाश्चात्य ज्ञानाचा प्रसार करणे आणि हिंदू धर्माचा प्रसार करणे हे कार्य साधारणपणे १८६० पर्यंत अनेक वृत्तपत्रांनी केले.

**३) प्रबोधन चळवळी संदर्भातील भूमिका -**

ब्रिटिश सरकारने सामाजिक व धार्मिक जीवनातील अनेक अनिष्ठ प्रथा, परंपरा, रूढी, संकेत नष्ट करण्याचा प्रयत्न कायद्याच्या आधारे केला. त्यातूनच इस्टेट भागीदार कायदा, विधवा विवाह कायदा, सती बंदी कायदा केला. त्याच प्रमाणे रेल्वे, रस्ते, दळणवळण यामध्ये मोठया प्रमाणात सुधारणा झाली त्यातूनच अनेक दोष दिसून आले. इतर राष्ट्रांबरोबर टिकायचे असेल तर समाजातील दोष नष्ट करणे, या नव्या विचारांचा उदय झाला. पुराणमतवादी व नवे विचार यांच्यात संघर्ष सुरु झाला त्यातून धर्मप्रसाराची भूमिका मागे पडून समाजकारण ही वृत्पत्रांची प्रमुख भूमिका बनली.

**४) उपेक्षितांबद्दलची भूमिका :**

१८५८ पर्यंत वृत्तपत्रांची भूमिक पांढरपेशी वर्गापुरती मर्यादीत स्वरूपाची होती. विद्यापीठ स्थापनेनंतर ज्ञानाची क्षेत्रे विस्तारली. याचवेळी म.फुले हे पांढरपेशी वर्गाच्या पलीकडे उपेक्षित, दलित वर्गाच्या गाऱ्हाणी सोडवणारा नेता निर्माण झाला. त्यांनी ब्राह्मणी विचारांच्या विरोधात बंड करून समाज सुधारण्यास अनुकूल वातावरण निर्माण केले त्यातूनच उपेक्षित वर्गा संदर्भातील भूमिकेतून वृत्तपत्रांनी कार्य सुरु केले.

**५) राजकीय चळवळीच्या प्रेरणे संदर्भात भूमिका :**

या काळात राजकारण पूर्णपणे उपेक्षित नव्हते. राजकारणापेक्षा समाजकारण व धर्मसुधारणा याला केंद्रबिंदू मानून वृत्तपत्रे कार्य करत होते. ब्रिटिश सत्तेला विरोध करण्यापेक्षा त्यांच्याकडूनच सामाजिक, धार्मिक सुधारणा घडवून आणले यावर विशेष भर होता. त्यानुसार आपले कर्तव्य मानून कार्य केले. यातून भारतीय राजकारण व स्वातंत्र्य चळवळींची बीजारोपण झाले.

**६) भारतीय राजकारण व स्वातंत्र्य चळवळी संदर्भात भूमिका :**

१८८५ मध्ये राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना होऊन भारतीय राजकारणात नवा प्रवाह सुरु झाला. काँग्रेस नेत्यांचे विचार, कार्य, सरकारी मागण्या त्या विरोधातील भूमिका यांचा प्रचार व प्रसार हा वृत्तपत्रांचा प्रवाह बनलेला होता. ब्रिटिश सरकार मागण्यांना विरोध करू लागले तसतसे

स्वातंत्र्याची भावना जागृत होऊ लागली. स्वातंत्र्याचे विचार लोकांच्यात प्रसार करून भारतीय स्वातंत्र्यासाठी लोक जागृती करणे हा प्रवाह वृत्तपत्राचा होता.

### ७) स्वदेशी चळवळी संदर्भात भूमिका :

लो. टिळकांनी चतु:सुत्री कार्यक्रम जाहिर करून स्वदेशीचे महत्व लोकांच्या समोर मांडण्याचा प्रयत्न केला. लोकमान्य टिळकांच्या आक्रमक विचारांमुळे जहाल व क्रांतीकारी विचार प्रवाह निर्माण झाला. या काळातील वृत्तत्रांनी स्वदेशीचा पुरस्कार करून प्रचार व प्रसाराची भूमिका मांडण्याचा प्रवाह निर्माण केला. परकीयाबाबत बहिष्काराचे तंत्र स्विकारत प्रसाराचे कार्य केले.

### ८) स्वातंत्र्य चळवळ व स्वातंत्र्य प्राप्तीची भूमिका :

१९२० मध्ये म. गांधीजींनी भारतीय स्वातंत्र्य लढ्याचे नेतृत्व स्विकारून स्वातंत्र्य चळवळ सुरु केली. बिटिश सरकारचे धोरण, कायदा आणि भूमिका यासंदर्भात गांधीजींनी विरोधकाची भूमिक घेतली तर सामाजिक व आर्थीक विषमता नष्ट करण्याच्या हेतूने सकारात्मक कार्यक्रम हाती घेतले. वरील भूमिके संदर्भात कॉंग्रेस व नेते त्यांचे विचार व कार्यक्रम या माध्यमातून स्वातंत्र्य चळवळ व स्वातंत्र्य प्राप्ती वातावरण अनुकूल करण्यासाठी लोक जागृती केली. त्यातून स्वातंत्र्य प्राप्त करणे या विचार प्रवाहाचे वृत्तपत्रे कार्य करत होती.

### ९) स्वातंत्र्य प्राप्ती नंतरची वृत्तपत्रांची भूमिका :

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर सर्वेस्तरांवर समृध्द, सामर्थ्यशाली भारत बनविण्यासाठी व्यापक विचार प्रणालीचा प्रवाह वृत्तपत्रांमध्ये निर्माण झाला. तसे वर्तमान काळातील घटनांचे, प्रसंगांचे, कार्याचे गुणदोष दाखवून समाजापर्यंत पोहचविण्याचे कार्य सुरु झाले. त्याचबरोबर ज्ञान, मनोरंजन, कला-क्रीडा, विज्ञान, मार्गदर्शनपर लेख देऊन समाज मने सुदृढ बनविण्याचा प्रयत्न सध्याची वृत्तपत्रे करत आहेत.

## ४.६ बिटिशांची वृत्तपत्रासंदर्भात भूमिका

ईस्ट इंडिया कंपनीच्या राजवटीमध्ये इंग्रजी वृत्तपत्रकारांनी आधुनिक वृत्तपत्रांचा उदय घडवून आणला. त्याप्रमाणात इंग्रजी शिक्षणाचा विकास झाला. त्याप्रमाणे वृत्तपत्रांचा विस्तार झाला. कारण वृत्तपत्रांना अनेक हिंदी वाचक मिळाले त्यातून अनेक हिंदी वृत्तपत्रकारांनी आपल्या मागण्या, न्यायी विचार, प्रबोधन इ. साठी वृत्तपत्र सुरु केली. त्यामुळे बिटिश सरकारवृ त्तपत्रे यांच्यात नेहमी वाद निर्माण होत असे. त्यातून अनेक बंधने वृत्तपत्रांवर लादण्यात आली व काही वेळा तरी बंधने कमी करण्यात आली.

### अ) वृत्तपत्र संदर्भात १८५७ पूर्वीची भूमिका :

वॉरन हेस्टिंग्जच्या काळात आधुनिक वृत्तपत्रांचा उदय झाला. त्याच्या काळात भारतीय वृत्तपत्रांवर बंधने लादण्यात सुरुवात झाली. जेम्स व्हिकीने बेंगाल गॅझटे वृत्तपत्रातून इंग्रजी राजवटीवर टिका केल्याने ते वृत्तपत्र बंद केले व त्याला देशाबाहेर पाठवून दिले. वृत्तपत्रासंदर्भात वॉरन हेस्टिंगजची भूमिका लॉर्ड कॉर्नवॉली, सर जॉन शोअर यांनी स्विकारली. लॉड वेलस्लीने सरकारवर होण्याच्या टिकेचा बंदोबस्त करण्यासाठी १७९९ मध्ये ५ कलमांचा नियंत्रण कायदा मंजूर करून वृत्तपत्रांवर बंधने घातली. वृत्तपत्रांवर मालक, संपादक यांची नावे छापावीत.

युरोपीयन बातम्या छापू नये. नियमांचे उल्लंघन केल्यास वृत्तपत्र बंद, छापखाना जप्त, दंड, इ. स्वरुपात शिक्षा जाहिर केली. हेच धोरण पुढे लॉर्ड मिंटोने याने सुरू ठेवले.

लॉर्ड. हेस्टिंग्ज हा उदारमतवादी विचारसरणीचा असल्याने त्याने वृत्तपत्रांवरील अनेक बंधने रद्द करून स्वातंत्र्य दिले. तरीपण १८२१ मध्ये वृत्तपत्रा संदर्भात नवीन कायदा पास करून काही अटी लादल्या. कार्यकारी मंडळ, न्यायाधीश, बिशप यांच्या कृती संदर्भात आक्षेपार्ह विधाने - टिका करू नये. राजकीय व्यवहार, संस्थानिक संबंध सरकारचे धार्मिक धोरण या संदर्भात आक्षेपार्ह विधान छापू नये.

लॉर्ड. हेस्टिंग्जने वृत्तपत्रांना दिलेले स्वातंत्र्य दिर्घकाळ टिकले नाही. लॉर्ड अॅडम्स याला वृत्तपत्रांना स्वातंत्र्य हे धोरण मान्य नव्हते. या संदर्भात अभ्यास करण्यासाठी सर थॉमस मन्रो याची नेमणूक केली. याने सादर केलेल्या अहवालात म्हंटले की, लष्करात असंतोष निर्माण होईल. इंग्रजी स्त्ता नष्ट होईल आणि हिंदी लोकांच्यात स्वातंत्र्याची भावना निर्माण होईल. या अहवालाच्या आधारे १८२३ मध्ये कायदा मंजूर करून अनेक बंधने लादली. कोणतेही साहित्य प्रकाशनापूर्वी तपासणी करून घेणे. आक्षेपार्ह मजकूर असल्यास वृत्तपत्र बंद, परवानगी शिवाय प्रकाशने केल्यास दंड व कैद ची शिक्षा इ. अनेक कलमे लादली.

चार्ल्स मेटकाफ हा हंगमी गव्हर्नर जनरल बनला. त्याच्या एक वर्षाच्या काळात वृत्तपत्रांना स्वातंत्र्य दिले. १९२३ चा कायदा रद्द केला. त्यामुळे भारतीय वृत्तपत्रांच्या मुक्तीचा काळ होता.

**ब) ब्रिटिश शासनाचे १८५७ नंतरचे धोरण :**

**१) १८५७चा कायदा :**

१) वृत्तपत्रे मुद्रणालयासाठी सरकारी परवाना घेणे बंधनकारक केली.
२) परवाना देणे किंवा रद्द करणे सरकारच्या मर्जीवर अबलंबून असे.
३) कोणतेही छापील साहित्याचे अभिसरण थांबविण्याचा अधिकार सरकारला असे.

**२) १८६७ चा रजिस्ट्रेशन अॅक्ट :**

१) १८३५ चा कायदा रद्द करून रजिस्ट्रेशन अॅक्ट करण्यात आला.
२) प्रत्येक छापील साहित्यावर प्रकाशन, मुद्रक, प्रकाशनाचे नाव छापणे.
३) पुस्तक प्रसिध्द झाल्यापासून एक महिन्याच्या आत एक प्रत सरकारकडे पाठवावी.
४) प्रकाशक व मुद्रकांनी चांगल्या वागणूकीची हमी देणारी प्रकटने मॅजिस्ट्रेट पुढे दिली पाहिजे.

**३) लॉर्ड लिटनचा व्हर्नाक्यूलर प्रेस अॅक्ट - १८७८ चा गॅगिग अॅक्ट.**

१) मुद्रक व प्रकाशक यांनी लोकांत द्वेषभाव, वैरभाव व सरकार विरोधी टिका प्रसिद्ध करणार नाही याची हमी करार लिहून देणे किंवा रक्कम डिपॉझिट ठेवणे.
२) या संदर्भात सर्व अधिकार मॅजिस्ट्रेटला दिले.
३) नियमांचे उल्लंघन केल्यास डिपॉझिट, मुद्रण साहित्य जप्त करावे.

### ४) १९०८ चा न्यूजपेपर्स ॲक्ट.

१) आक्षेपार्ह, हिंसाचारास उत्तेजन मजकूर छापणाऱ्या वृत्तपत्राचे सर्व मालमत्ता जप्त करण्याचा अधिकार डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटला आहे.
२) गरजेनुसार वृत्तपत्राबद्दल स्पष्टीकरण मागण्याचा अधिकार डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटला आहे.
३) आणीबाणी प्रसंगी स्पष्टीकरण न मागता एखाद्या वृत्तपत्राची मालमत्ता जप्त करण्याचा अधिकार डिस्ट्रिक्ट मॅजेस्ट्रिटला देणे.
४) आदेश दिल्यापासून १५ दिवसात हायकोर्टाकडे त्याविरुद्ध दाद मागण्याची सवलत वर्तमानपत्रांना दिली.

### ५) इंडियन प्रेस ॲक्ट १९१०.

१) नविन मुद्रणालयाकडून व वृत्तपत्राकडुन ५०० ते २००० रू. जामिन ठेव म्हणून मागण्याचा अधिकार मॅजिस्ट्रेटला दिला.
२) जुन्या मुद्रणालयाकडून व वृत्तपत्रांकडून ५०० ते ५००० रु. जामिन ठेव म्हणून मागण्याचा अधिकार स्थानिक सरकारला देण्यात आले.
३) संशय असलेले सर्व साहित्य प्रांतिक सरकारकडे पाठवून देण्याचा अधिकार जकात व टपाल खात्यातील अधिकाऱ्यांना देण्यात आले.
४) प्रत्येक वर्तमानपत्राच्या मुद्रकाने दोन प्रति सरकारकडे पाठवाव्यात.

### ६) इंडियन प्रेस ॲक्ट-१९३१.

१) मुद्रक व वृत्तपत्रांचे प्रकाशक यांनी सरकारकडे अनामत रक्कम ठेवावी
२) मॅजिस्ट्रेट ठरवतील त्याप्रमाणे कमीत कमी ७००० ते १०,००० रु. अनामत ठेवणे.
३) जप्ती विरुद्धात हायकोर्टाकडे दाद मागितली जावी.

### ७) फॉरिन रिलेशन्स ॲक्ट-१९३२.

१) ब्रिटिश सरकार व पर राज्यातील संबंधात बिघाड आणणारे लिखाण प्रसिध्द करू नये.
२) परराज्याचा प्रशासनातील प्रमुख व्यक्तीची बेअब्रू करणारे लिखाण प्रसिद्ध करू नये.
३) परराज्याच्या अंतर्गत बाबीत हस्तक्षेप होईल असे लेखन प्रसिध्द करू नये.

### ८) इंडियन स्ट्रेट्रस प्रोटेक्शन ॲक्ट-१९३४.

ब्रिटिश सरकार -हिंदी संस्थानिकांच्या सबंधावर टिका करू नये.

## ४.७ स्वातंत्र्य प्राप्ती नंतरची वृत्तपत्रे

ब्रिटिशांच्या विरोधात वृत्तपत्रांनी भारतीय समाजामध्ये स्वातंत्र्य चळवळीचा प्रसार करून लोक सहभाग वाढविण्याचा प्रयत्न केला. १९४६ मध्ये हंगामी सरकार स्थापन झाल्यानंतर अनेक बंधने कमी झाली. परंतु याच काळात भारत-पाकिस्तान विभाजनाची संकल्पना निर्माण झाल्याने परिस्थितीत नियंत्रण ठेवण्याच्या उद्देशाने प्रांतिक सरकारला काही अध्यादेश काढणे आवश्यक होते. भारतातील वृत्तपत्रांच्या कायद्याचे परीक्षण करण्यासाठी मार्च १९४७ मध्ये भारत सरकारने प्रेस लॉज इन्कॉयरी कमिटी स्थापन केली. या कमिटने प्रेस ॲन्ड रजिस्ट्रेशन ऑफ बुक ॲक्ट या कायद्यात दुरुस्ती केल्या. तसेच इंडियन स्टेट प्रोटेक्शन ॲक्ट, व इंडियन प्रेस इमर्जन्सी पॉवर ॲक्ट हे कायदे रद्द करावे. त्यातील योग्य तरतुदी सर्वसाधारण

कायद्यात कराव्यात. १९५१च्या प्रेस ॲक्टनुसार वृत्तपत्रांवरील काही नैतिक बंधने कायद्याने घातली. १९५२ मध्ये प्रेस कमिशनची नियुक्ती करण्यात आली. १९६६ मध्ये प्रेस कौन्सिल ॲक्ट नुसार राष्ट्रीय व्यवसाय वृत्तसमितीची स्थापना करण्यात आली. वृत्त व्यवसायाच्या कामाचा दर्जा सुधारणे आणि या क्षेत्रातील तक्रारीची दखल घेऊन तिचे निराकरण करणे ही कामे या समितीकडे सोपविण्यात आली आहे.

**आपली प्रगती तपासा**

१) वृत्तपत्रासंदर्भात ब्रिटिश सरकारचा दृष्टिकोन स्पष्ट करा.

## ४.८ सारांश

आधुनिक काळातील वृत्तपत्रांची सुरुवात ब्रिटिशांच्या काळात झाली. वृत्तपत्रांची प्रारंभीची भूमिका मर्यादित स्वरुपाची असून ब्रिटिश सरकार व अधिकारी यांना मार्गदर्शन देण्याच्या स्वरूपात होती. वृत्तपत्राचे स्वरूप जसजसे उग्र व आक्रमक होत गेले तस तसे ब्रिटिशांनी अन्यायकारक कायदे लादण्याचे प्रयत्न सुरू केले. वृत्तपत्रे ही वर्तमानकाळातील समाजाचे प्रतिबिंब असते. त्यानुसार त्याला काळातील राजकीय, आर्थिक, सामाजिक धार्मिक परिस्थितीचे चिकित्स पध्दतीने लोकांच्या समोर मांडण्याचे कार्य करून लोक जागृतीचे भरीव कार्य केले.

## ४.९ प्रश्न

(१) भारतीय वृत्तपत्रांच्या विकासाचा आढावा घ्या.
(२) भारतीय वृत्तपत्रांच्या कार्यांचे मूल्यमापन करा.
(३) भारतीय वृत्तपत्रां सदर्भात ब्रिटिश सरकारची भूमिका सांगा.

## ४.१० संदर्भ सूची

(१) आचार्य धनंजय, भारताचा इतिहास (१७६१-१९७१), श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, २००९.

(२) कोलारकर, श.गो.,भारताचा इतिहास (१७०७-१९५०), श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, १९९५.

(३) ग्रोवर बी.एल.व बेल्हेकर एन.के., आधुनिक भारताचा इतिहास, एस.चंद आणि कंपनी लि., नवी दिल्ली, २००३.

(४) पंडित सुधाकर वि., अर्वाचीन भारताचा इतिहास (१८००-१९६४), प्राची प्रकाशन, मुंबई-१९९४.

(५) भिडे गजानन, आधुनिक भारताचा इतिहास, अनिरुद्ध पब्लिशिंग हाऊस, पुणे,२०००.

(६) जाधव वसंत, आधुनिक महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास, विद्या प्रकाशन, नागपूर, १९९८.

(७) वक्काणी नि.आ. आधुनिक भारताचा इतिहास, श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर,१९९४.

(८) वैद्य सुमन व कोठेकर शांता, आधुनिक भारताचा इतिहास (१८५७-१९२०), श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर,२०१५.

(९) शहा जी.बी.भामरे आर.पी.आणि पवार एम.डी., आधुनिक भारताचा इतिहास (१७५७ ते १९५०) प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव,२०१४.

❖❖❖❖

# ५

# दळणवळण व वाहतूक क्षेत्रातील प्रगती

**प्रकरणाची रचना :**


५.० उद्दिष्टे
५.१ प्रस्तावना
५.२ दळणवळण क्षेत्रातील विविध प्रकार
५.३ दळणवळण साधने व त्यांची प्रगती
५.३.१ भारतातील रस्ते व वाहतूक
५.३.२ भारतातील रेल्वे वाहतुकीचा विकास
५.३.३ भारतीय जलमार्ग व जलवाहतूक
५.३.४ भारतीय हवाई वाहतूक
५.४ सारांश
५.५ प्रश्न
५.६ संदर्भ सूची


## ५.० उद्दिष्ट्ये :

आधुनिक कालखंडामध्ये ब्रिटिश कंपनी व सरकारने दळणवळण व्यवस्थेत अनेक सुधारणा केल्या. त्यामध्ये काही भारतीय नेत्यांचा, कंपन्यांचा सहभाग होता. याचा अभ्यास आपण या प्रकरणामध्ये करणार आहोत.

१) भारतातील पारंपारिक वाहतूकीच्या साधनाची माहिती घेणे.
२) दळणवळण क्षेत्रातील विविध प्रकारचे ज्ञान प्राप्त करणे.
३) रस्ते वाहतूकी संदर्भात झालेल्या सुधारणांचा अभ्यास करणे.
४) भारतीय रेल्वे विषयी माहिती मिळविणे.
५) भारतातील जलवाहतूकाचे ज्ञान मिळविणे.
६) हवाई वाहतूक संदर्भात माहिती प्राप्त करणे.

## ५.१ प्रस्तावना

कोणत्याही देशाच्या आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक विकासाची एक मुलभूत गरज म्हणजे वाहतूक व दळणवळणाचा विकास करणे महत्त्वाचे आहे. मानवी समाजरचनेच्या स्थित्यंतरात वाहतूकीच्या विविध साधनांचा फार मोठा वाटा आहे. आर्थिक विकासाचा केंद्रबिंदू

हा व्यापारी मार्गाचा विकास होय. जी.डी. दप्तरी यांच्या मते अन्न, वस्त्र, निवारा व वाहतूक दळणवळण इत्यादी आधारभूत मानवी आवश्यकता आहे. या दळणवळण व वाहतूक साधनांच्या आधारेच देशाची आर्थिक प्रगती घडून येते. या क्षेत्रातील प्रगतीचा व वहातूकीच्या साधनांचा शोध घेणे क्रमप्राप्त होते.

## ५.२ दळणवळण क्षेत्रातील विविध प्रकार व प्रगती

१) स्थल वाहतूक :अ) रस्ते वाहतूक ब) रेल्वे वाहतूक
२) जलवाहतूक : अ) अंतर्गत जलवाहतूक ब) सागरी जल वाहतूक
३) हवाई वाहतूक : अ) देशांतर्गत वाहतूक ब)आंतरराष्ट्रीय वाहतूक

## ५.३. दळणवळण साधनातील प्रगती

### ५.३.१.भारतातील रस्ते वाहतूक :

ब्रिटिश पूर्व काळात दळणवळण व्यवस्था अविकसित व पारंपारिक स्वरूपात होती. बहुतांश रस्ते हे कच्च्या स्वरुपात असून पावसाळ्यात ते वहातूकीसाठी अयोग्य होते. मालवाहतूकीसाठी प्रामुख्याने बैल, उंट, गाढव, माणूस, बैलगाडी, घोडागाडी याचा प्रामुख्याने उपयोग केला जात होता. व्यापार करण्याच्या हेतूने ईस्ट-इंडिया कंपनीने भारतातील प्रमुख शहरामध्ये आपल्या वखारी स्थापन केल्या. स्थानिक सत्ताधिशांकडून अनेक सवलती प्राप्त करून व्यापार वाढीचे धोरण स्विकारले. कमी किंमतीत माल खरेदी करून जलद वहातूकीने मायदेशी पाठविणे व जास्त नफा प्राप्त करणे, या उद्देश्यानेच वाहतूक व दळणवळण साधनात सुधारणा करण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे भारतात ब्रिटिशांनी अनेक प्रकारच्या सुधारणा घडवून आणल्या. सुखकर प्रवासासाठी वेगवेगळ्या योजना निर्माण केल्या. त्यातून टांगा, घोडा ट्राम, विजेवर चालणारा ट्राम, दुमजली ट्राम गाड्या, बस गाड्या व प्रवासी व मालवाहतूकीच्या गाड्या सुरू झाल्या.

भारतामध्ये सत्ता स्थिर झाल्यानंतर, शहरे, व्यापारी केंद्रांना, ग्रामीण भागांना जोडणारे रस्ते निर्माण करण्यास प्रोत्साहन दिले. १८२८ नंतर लॉर्ड विल्यम बेंटिकच्या काळात सैन्याच्या हालचालीसाठी रस्ते तयार करण्यास प्रारंभ झाला. त्यांनी राष्ट्रीय हमरस्ते, मिर्झापूर ते नागपूर, मुंबई ते आग्रा रस्ता सुरू केला. या काळात रस्त्यांची निर्मिती व व्यवस्थेच्या कामाची जबाबदारी मिलटरी बोर्डाकडे होती. लॉर्ड डलहौसीने १८५५ मध्ये मिलटरी बोर्ड रद्द करून स्वतंत्र सार्वजनिक बांधकाम विभाग स्थापन केला. १८५२ मध्ये ईस्ट-इंडिया कंपनीकडून भारताची स्तता ब्रिटिश सरकारकडे गेली. रस्ते विकासाला अधिक चालना दिली ती १९१९ च्या माँटेग्यू चेम्ससफर्ड अहवालाने. या कायद्याने रस्ते ही केंद्रा ऐवजी प्रांतीय सरकारची जवाबदारी बनली. देशातील महत्वाच्या शहरांना जोडण्याची जबाबदारी केंद्र सरकारची आहे तर प्रांतीय सरकारने राज्यातील रस्ते तयार करणे, दुरुस्ती, देखभालीची जबाबदारी स्विकारावी हे स्पष्ट करण्यात आले.

सन १९२७ मध्ये बॅरिस्ट मु.रा. जयकर यांच्या अध्यक्षतेखाली सरकारने रस्ते विकास समिती स्थापन केली. हमरस्ते बांधण्याची व दुरुस्तीची जबाबदारी केंद्रशासनाने घ्यावी. हा खर्च वसूल करण्यासाठी पेट्रोल व मोटार वाहनावर कर बसवावा. राज्यातील लहान रस्ते व

खेडेगावातील रस्ते याची जबाबदारी प्रांतिक व स्थानिक शासनाने घ्यावी. तसेच विकासासाठी स्वतंत्र रस्ते निधी मंडळ स्थापन करावे. या निधितून प्रांतीय सरकारला रस्ते विकासासाठी आर्थिक मदत करावी. इ. शिफारसी या समितीने केल्या. बॅ. जयकर समितीच्या सूचनेनुसार १९२९ मध्ये रस्ते विकास निधी स्थापन केले. यातून विविध प्रांताला अनुदान देऊन देशभर रस्ते तयार करण्याचे काम हाती घेतले. समितीच्या सूचनेनुसार १९३४ मध्ये तांत्रिकतेच्या संदर्भात सल्ला देण्यासाठी इंडियन रोड काँग्रेस ही निमसरकारी संस्था स्थापन केली. वाहतूकी संदर्भातील प्रश्न सोडविण्याचे काम सुरू केले.

१९२८ मध्ये रॉयल कमिशनने रस्त्याच्या विकासावर भर देण्याबाबत सूचना केल्या. त्यानुसार रस्त्याचा विकास केंद्र सराकारने करावा. रस्ते विकास निधी स्थापन करून प्रति गॅलन पेट्रोलवर ४ आण्यांवरून ६ आण्यापर्यंत अबकारी कर वाढविण्यात यावा. अतिरिक्त शुल्कामुळे प्राप्त झालेली राशी रस्ते विकासासाठी अनुदान म्हणून दिली जावी अशी शिफारस केली.

रेल्वे व रस्ते वाहतुकीत समन्वय प्रस्थापित व्हावा या करिता उपाय योजना सुचविण्यासाठी १९३२ मध्ये सरकारने श्री. के.जी. माइकल (रस्ते इंजिनिअर) व श्री. एल.एच. किर्कनस (रेल्वे अधिकारी) यांची समिती स्थापन केली. या समितीने पुढील प्रमाणे शिफारसी सुचविल्या. १) वाहतूक नियंत्रक अधिकाऱ्याने मोटार वाहतूकीवर कडक नियंत्रण करावे. २) मोटार वाहतुकीवरील कारभार वाढविण्यात यावा ३) मोटार वाहतूकीचे भाडे निश्चित करण्यात यावे ४) मोटार वाहतूकीवर प्रतिबंधाकरिता कडक कायदे करण्यात यावे. ५) रेल्वे व रस्ते वाहतुकीत समन्वय व सहकार्य राखण्यासाठी केंद्रीय सल्लागार समिती स्थापना करण्यात यावी.

सरकारने शिफारसी स्विकारून रेल्वे व रस्ते वाहतूकीत समन्वयासाठी १९३५ मध्ये परिवहन सल्लागार समितीची स्थापना करून मोटार वाहतूक विधेयक संसदेसमोर मांडले. रेल्वे व रस्ते वाहतुकीत होणाऱ्या निरंतर स्पर्धांवर उपाययोजना करण्याकरिता आर.एल. वैजवूड यांच्या अध्यक्षतेखाली १९३६ मध्ये समिती स्थापना केली. या समितीचा मुख्य उद्दिष्ट रस्ते वाहतूकीच्या स्पर्धेपासून रेल्वेला संरक्षण देण्यावर उपाययोजना देणे.

१९३९ मध्ये मोटार वाहतूक कायदा करण्यात आला. या कायद्यामध्ये मोटार वाहन परवाना, वाहनांची नोंदणी, भाडे निश्चिती, वाहनाचे अनिवार्य विमा, मोटार वाहतूकीचा नियम, राज्य मोटार परिवहन विभागाची स्थापना करणे इत्यादी तरतुदीचा समावेश करण्यात आला.

**नागपूर योजना :** राष्ट्रीय स्तरावर रस्त्यांसंबंधी विचार करण्यासाठी १९४३ मध्ये नागपूर येथे भारतातील सर्व राज्यातील प्रमुख अभियंते, संरक्षण खात्यातील अभियंते, भारत सरकारच्या दळणवळण खात्यातील अधिकारी यांचे एकत्र अधिवेशन केंद्र सरकारने आयोजीत केले होते. या अधिवेशनात २० वर्षांची रस्ते विकास योजना तयार करण्यात आली, त्यालाच नागपूर आराखडा म्हणतात. या योजनेत रस्त्याचे दोन विभाग करण्यात आले. अ) प्रमुख रस्ते - राष्ट्रीय महामार्ग, राज्यमार्ग, प्रमुख जिल्हारस्ते ब) ग्रामीण रस्ते - इतर जिल्हा रस्ते, ग्रामीण रस्ते. या योजनेचा मुख्य हेतू म्हणजे मुख्य रस्त्याशी खेडी जोडणे. सूपिक भागातील खेडे ८ कि.मी. व मागास भागातील खेडे ३२ कि.मी. मुख्य रस्त्यापासून दुर असावेत. या योजनेतंर्गत २० वर्षात ३ लक्ष ३१ हजार मैल लांब रस्ते तयार केले. त्यासाठी ३७३ कोटी रूपये खर्च करण्यात आले.

राज्यांनी वाहतूक व्यवस्था सांभाळणे, खाजगी वाहतूकीवर नियंत्रण ठेवणे या हेतूने सरकारने रोड ट्रान्सपोर्ट कारर्पोरेशन ॲक्ट १९४८ मध्ये मंजुर केला. या कायद्यात दुरुस्ती करून १९५० मध्ये नवीन रोड ट्रान्सपोर्ट कारपोरेशन ॲक्ट मंजूर केला. कायद्यानुसार वाहतुकिकरिता महामंडळ केंद्र व राज्य सरकार शिवाय सामान्य जनताही भागीदार होऊ शकते. महामंडळामध्ये राज्य सरकारने २/३ तर केंद्र सरकारने १/३ अंशदान तरतुद करण्यात आली. भारतात प्रवासी रस्ते वाहतूकीचे राष्ट्रीयकरण करण्याचा कायदेशीर अधिकार केंद्र व राज्य सरकारला झाला. १९५० मध्ये मोटार वाहनावरील कराबाबत चौकशी करण्याच्या उद्देशाने एम.एम. दलाल यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन झाली.

नविन रस्ते योजना २० वर्षाकरिता तयार करण्यासाठी १९६१ मध्ये मुंबई येथे अधिवेशन भरविण्यात आले. ६ लक्ष ५७ हजार मैल लांब रस्ते निर्माण करण्याचे उद्दिष्ट ठरविण्यात आले. त्यापैकी ४० टक्के पक्के रस्ते असावेत. कोणतेही खेडे मुख्य रस्त्यापासून ४ कि.मी पेक्षा जास्त अंतरावर असू नये. १९५५ मध्ये श्री मीनू यांच्या अध्यक्षतेखाली रस्ते वाहतूक पूनर्गठन समिती व १९५९ मध्ये न्या.के.सी. नियोगी यांच्या अध्यक्षतेखाली वाहतूक निती व समन्वय समिती स्थापित करण्यात आली. १९३५ च्या कायद्यात दुरुस्ती करून १९५६ मध्ये मोटार वाहन कायदा समन्वय समिती स्थापित करण्यात आली. मोटार वाहनावरील कराबाबत चौकशी समिती १९६६-६७ मध्ये स्थापन करण्यात आली.

१९८१-२००१ या २० वर्षाच्या कालावधीकरिता रस्ते विकासाची योजना तयार करण्याच्या उद्देशाने भारतीय रोड कॉंग्रेसचे त्रिवेंद्रम येथे अधिवेशन भरविण्यात आले. रस्ते व रेल्वेची मालवाहतूकची भागीदारी ५६:४४ व प्रवासी वाहतूकीची भागीदारी ७३:२७ असावी असा निर्णय घेण्यात आला. जानेवारी १९८४ मध्ये नवीन अध्यावत मोटर वाहन कायदा सरल व न्यायोचित करण्यासाठी एक समिती स्थापन केली. १९३९ व १९५६ च्या कायद्याचे पुनरावलोकन करून नवीन विधेयक तयार केले. ते केंद्र सरकारने नवीन मोटार वाहन कायदा १९८८ मध्ये संमत केली. भारतात २००३ पर्यंत ३३ लक्ष कि.मी. लांबीचे रस्ते तयार झालेले असून ५८,११२ किमी. लांबीचे राष्ट्रीय महार्गाचा समावेश आहे. या रस्त्यावरून २० टक्के मालवाहतूक, ८० टक्के प्रवासी वाहतूक होत आहे. नवीन चौपदरी व सहापदरी रस्त्याचे निर्माण कार्य बांधा, वापरा आणि हस्तांतरित करा या तत्वावर ५४ हजार कोटी खर्च करून २००७ अखेर १३ हजार किमी. राष्ट्रीय महामार्ग तयार करण्याची योजना आहे. ३३,००० कि.मी राष्ट्रीय महामार्गाची दुरुस्ती करण्याची योजनाही सुरु आहे.

### ५.३.२ भारतातील रेल्वे वाहतुकीचा विकास :

इंग्लंडमध्ये जगातील पहिली प्रवासी रेल्वे २७ सप्टेंबर १८२५ रोजी सुरु झाली. १८३२ मध्ये रेल्वे सुरु करण्याची पहिली योजना भारतात मद्रास येथे बनविण्यात आली. त्यानुसार कावेरीपट्टम ते कुरूर पर्यंतचा १५० मैल लांबीचा मार्ग तयार करण्याची योजना होती. इंजन ऐवजी पशुद्वारे रेल्वे सुरु करण्याचा प्रस्ताव होता. भारतात रेल्वेचे प्रथम सफलतापूर्वक प्रयत्न करणारे सर रॉलेट मॅकडोनल्ड स्टीफसन यांनी इ.स.१८४१ मध्ये कलकत्ता ते उत्त्तरी पश्चिमी सिमांपर्यंत रेल्वे बनविण्याचा प्रस्ताव मांडला. १८४४ मध्ये लंडन येथे ईस्ट इंडिया रेल्वे कंपनीची स्थापना करून रेल्वेच्या कामाला सुरवात केली. दरम्यान मुंबई शासनाचे मुख्य अभियंता जॉर्ज क्लार्क यांनी मुंबई ते कल्याण, थालघाट, भोरघाट या मार्गाची योजना मोडली. या कामासाठी १५ जुलै १८४४ मध्ये लंडन येथे ग्रेट इंडियन पेन्सुला रेल्वे कंपनीची स्थापना झाली. बोरीबंदर ते कल्याण या रेल्वे मार्गाच्या कामाला ३१ ऑक्टोबर १८५० रोजी प्रारंभ करून

शनिवार दिनांक १६ एप्रिल १८५३ रोजी बोरीबंदर (मुंबई) ते ठाणे ३४ कि.मी. (२१ मैली) हा रेल्वे मार्ग भारतात सर्वप्रथम वाहतुकीसाठी सुरू झाली. तीन इंजिने व १४ डब्बे बोरीबंदरहून ५५ मिनिटात ठाण्याला पोहचली.१ मे १८५४ रोजी कल्याणला वाढविण्यात आला. १८४४-१८६० या काळात १२ रेल्वे कंपन्या स्थापन होऊन विकास घडवून आणला. या रेल्वेचे पहिले कार्यालय ठाकूरद्वारमधील नाना शंकरशेठ यांच्या वाड्यात होते. नानांना रेल्वेच्या प्रथम वर्गाचा प्रवास करण्यासाठी नाना शंकरशेठ यांना सोन्याचा पास देण्यात आला होता.

१५ ऑगस्ट१८५४ रोजी ईस्ट इंडिया रेल्वे कंपनीने हावडा ते हुबळी पर्यंतच्या कामाला प्रारंभ केला. नंतर ४ फेब्रुवारी १८५५ रोजी राणीगंज पर्यंत वाढविण्यात आला. याच काळात कलकत्ता, मद्रास, बडोदा इ. ठिकाणी रेल्वे वाहतूक सुरु झाली. भारतात रेल्वे मार्गाचा विकास व्हावा या हेतूने भांडवलदारा बाबात जुनी हमी या पध्दतीचा स्वीकार केला. या पध्दतीनुसार रेल्वे वाहतूकीतून होणारा फायदा त्यांच्या देशात नेण्यास परवानगी देण्यात आली. तसेच रेल्वे मार्ग टाकताना शासनाकडून अनेक प्रकारच्या सवलती दिल्या. लॉर्ड डलहौसीने रेल्वेमुळे भारताला व इंग्लंडला कसा सामाजिक, आर्थिक फायदा होईल हे पटवून दिल्याने रेल्वेचा विकास जलगद गतीने झाला. लॉर्ड डलहौसीने रेल्वे वाहतूकीच्या वाढीबरोबरच रेल्वेच्या विकासाची दिशाही ठरवून दिली. १८६९ पर्यंत भारतात रुंदी रेल्वे मार्गाचे ६,४३७ किमी. बांधकाम पूर्ण झाले होते.

सर जॉन लॉरेन्स व लॉर्ड मेयो यांनी मध्यम रुंदी (मिटरगेज) रेल्वेमार्ग निर्माण करण्याची शिफार केली. १८६९ नंतर सरकारने स्वतः लोहमार्ग बांधण्याचे धोरण स्विकारले. खर्च कमी करण्याच्या हेतूने मीटरगेज रेल्वे बांधण्याचे धोरण ठरविले. नंतरच्या काळात स्वतःच्या भांडवलाने रेल्वे मार्ग तयार करणे अशक्य झाले. १८८० मध्ये नवी हमी पध्दती स्विकार करून १८८१ मध्ये रेल्वे मार्गाच्या कामासाठी खाजगी कंपन्यांबरोबर सहमती दिली. जुन्य हमी पध्दतीमध्ये १५ टक्के तर नवी हमी पध्दती मध्ये भांडवलदाराला ३ टक्के व्याजापोटी रक्कम देण्याचे मान्य केले. नवी हमी पध्दतीने रेल्वे मार्गाची मालकी सरकारकडे राहणार होती.

१९०१ मध्ये रेल्वे प्रशासनाचा अभ्यास करण्यासाठी थॉमस रॉबर्टसनच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन केली. या समितीने लोहमार्ग बांधण्यासाठी स्वतंत्र रेल्वे निधी निर्माण करावा. या पैशातून जुन्या रेल्वे मार्गाची दुरुस्ती करावी व नविन रेल्वे मार्गाची बांधणी करावी. रेल्वे मार्ग चालविण्यासाठी खाजगी कंपन्यांना परवानगी द्यावी तसेच हमी पध्दत सुरु ठेवली. रेल्वेमध्ये मोठया प्रमाणात फायदा होऊ लागल्याने सरकारने रेल्वे स्वतंत्र खात्याची स्थापना १९०५ मध्ये केली. १९०७ मध्ये रेल्वे प्रशासनाची आर्थिक बाजू तपासण्यासाठी मॅक समितीची स्थापना करण्यात आली. या समितीच्या शिफारसी - (१) देशाला १ लाख मैल लांबीच्या रेल्वेमार्गाची गरज आहे. (२) प्रतिवर्षी १ कोटी २५ लाख पौड रक्कम लोहमार्गाच्या विकासासाठी खर्च केली जावी. (३) रेल्वेचे उपमार्ग असतील त्याची मालकी मुख्य व लोहमार्गाची मालकी ज्यांच्या कडे असेल त्यांच्याकडेच असावी.

### रेल्वे विकासासाठी विविध समित्या व त्यांच्या शिफारसी :

१९०० ते १९१४ या काळात रेल्वेचा विकास मोठ्या प्रमाणात झाला. तसेच फायदाही प्रचंड झाला. १९१४ पर्यंत ३४,५५६ मैल लांबीचे रेल्वे मार्ग व ४९५ कोटी रुपयांपर्यंत खर्च वाढविण्यात आला. पहिल्या महायुध्दाचा भारतीय रेल्वेवर वाईट परिणाम झाला. १५० मैलचा रस्ता उध्वस्त झाला. रेल्वेच्या विकासासाठी ब्रिटिश सरकारने विविध समित्या स्थापन केल्या. रेल्वेच्या कारभारावर शासनाचे किंवा खाजगी कंपनीचे नियंत्रण असावे यासंदर्भात वादविवाद

झाला. म्हणून ब्रिटिश सरकारने १ नोव्हेंबर १९२० रोजी ब्रिटिश रेल्वे तज्ञ सर विलीयम ऑकवर्थ यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली. त्यांनी १९२१ मध्ये आपल्या शिफारसी शासनाला सादर केल्या.

(१) रेल्वेचे व्यवस्थापन व नियंत्रण सरकारकडे असावे (२) सर्वसाधारण अंदाजपत्रकापासून रेल्वेचे अंदाजपत्रक वेगळे असावे. (३) मुख्य रेल्वे मार्गाला पुरक असे कमी रुंदीचे मार्ग तयार करावे. (४) रेल्वे मंडळाचे रुपांतर रेल्वे आयोगात करावे. (५) रेल्वेचे हळूहळू भारतीयकरण करावे (५) रेल्वेच्या विकासासाठी राखीव निधी निर्माण करण्यात यावा.

सर ऑकवर्थ यांच्या शिफारसी भारतीय रेल्वे इतिहासात सर्वात मोठी घटना मानली जाते त्यामुळे अनेक कंपन्यांचे करार नष्ट करून रेल्वेचा मालकी हक्क शासनाने स्वतःकडे घेण्यास सुरुवात केली. त्यातून रेल्वेच्या राष्ट्रीयकरणाला प्रारंभ होऊन १ जानेवारी १९२५ रोजी शासनाने ईस्ट इंडिया रेल्वे कंपनी नाव देऊन राष्ट्रीयकरण करण्यास सुरुवात केली. २० सप्टेंबर १९२४ च्या प्रथीत प्रस्तावानुसार १९२४-२५ पासून सर्वसाधारण अंदाजपत्रकापूर्वी रेल्वेचे अंदाज पत्रक वेगळे मांडण्यात येऊ लागले. ३ फेब्रुवारी १९२५ रोजी ग्रेट इंडियन पेन्सुला कंपनीने बोरीबंदर ते कुर्ला या रेल्वे मार्गावर सर्व प्रथम विद्युतचा उपयोग केला. ही कंपनी १९२५ मध्ये सरकारने ताब्यात घेतली. १९२६ मध्ये दिल्ली-अंबाला-कालका रेल्वे, १९२८ मध्ये बर्मा रेल्वे व १९३० मध्ये सदर्न पंजाब रेल्वे सरकारने स्वतःकडे घेतली.

महामंदी, रस्ता वाहतूकीची स्पर्धा यामुळे रेल्वेला तोटा होऊ लागला. प्रशासनात काटकसर कशी करता येईल यासाठी १९३२ मध्ये पोप यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली. या समितीने रेल्वेचे भाडे आकारताना शास्त्रशुध्द पध्दत आकारावी, उतारुंच्या सोईत वाढ करावी व प्रत्येक कामाचे विश्लेषण शास्त्रशुद्ध पध्दतीने करावे अशी शिफारस केली.

रेल्वे उत्पन्नात वाढ कशी होईल याचा अभ्यास करण्यासाठी बेजवूड समिती १९३६ मध्ये स्थापन केली. या समितीच्या शिफारसी पुढील प्रमाणे - (१) रेल्वे खर्चात काटकसर केली जावी (२) रेल्वेच्या राखीव निधीत वाढ करावी. (३) रेल्वेची लोकप्रियता वाढविण्यासाठी जनता संपर्क स्थापन केला जावा (४) रेल्वे व रस्ता वाहतूक यांच्यामध्ये योग्य असा समन्वय निर्माण करावा.

१९४७ ला भारताला स्वातंत्र्य मिळाले. फाळणीमुळे ६,९५७ मैलांचा लोहमार्ग साधारणा १३५.५७ कोटी रुपयांची रेल्वे पाकिस्तानात गेली. आर.एल.वेजवुड समितीच्या शिफारसीनुसार १९३७ मध्ये सरकारने रेल्वेचे विभाग निर्माण केले. १९६६ मध्ये एक विभाग वाढवून ९ विभाग रेल्वेचे केले. २००२ मध्ये रेल्वेने ७ उपविभाग निर्माण केले. सध्या भारतीय रेल्वेचे एकूण १६ रेल्वे विभाग (झोन) असून प्रत्येक विभागातंर्गत ४ ते ५ विभागीय क्षेत्र कार्यरत आहेत. असे एकूण ६५ विभागीय क्षेत्र आहेत. १८५३ ला सुरु झालेली रेल्वे २००३ ला १५० वर्षे पूर्ण झालेली आहे. देशाच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय विकासात मोलाचा वाटा आहे. रेल्वेने रेल्वे इंजिन, प्रवासी डब्बा, धावगती, विद्युतीकरण, संगणकीकरण इत्यादीवर विशेष लक्ष देऊन प्रवासांना जास्तीत जास्त सुविधा देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

**आपली प्रगती तपासा**

१) भारतातील रेल्वे वाहतुकीवर थोडक्यात माहिती लिहा.

### ५.३.३ भारतीय जलमार्ग व जलवाहतूक

लाकडाचा पाण्यावर तरंगण्याचा सिद्धांत माहित झाल्यापासून जलवाहतुकीचा उपयोग माल वाहतुक व प्रवासी वाहतूक यासाठी मोठ्या प्रमाणात होऊ लागला. रस्ते व रेल्वे वाहतूक अस्तित्वात नव्हती त्याकाळात नदी, कालवे, सरोवर, समुद्र मार्गेने जलवाहतूक होत होती. जलवाहतूकीचे दोन प्रकार देशांतर्गत पाण्यावर चालणारी वाहतूक होय . सागरी जल वाहतूक म्हणजे देशातील विविध बदरांशी जोडले. देशांतर्गत जलवाहबतूक करणे दुसऱ्या देशांच्या बंदराशी जोडून जलवाहतूक करणे म्हणजे विदेशी जल वाहतूक होय. डॉ. राधाकुमूद मुखर्जी यांनी भारतीय नौकानयनाच्या इतिहासावर केलेल्या संशोधनावर ३९ शतके भारताने दर्यावदी जगात आपले स्थान टिकवून ठेवले होते. १७८९ मध्ये लॉर्ड वेलस्लीने ब्रिटिश पार्लमेंटमध्ये माहिती सादर करताना ईस्ट इंडिया कंपनी, डच, फ्रान्स, अमेरिका या देशात असलेला जहाजांपेक्षा भारतात जहाजांची संख्या दुप्पट आहे.

ब्रिटिशांनी भारतात सत्ता स्थापन केल्यानंतर देशांतर्गत जलवाहतूकी कडे फारसे लक्ष दिले नाही. १८१३ मध्ये वाफेवर चालणाऱ्या जहाजांच्या मदतीने काल्पी ते कलकत्ता जलवाहतूक सुरु केली. १८४२ मध्ये आग्रा ते कलकत्ता जलवाहतूक सुरु केली. बंगाल व मद्रास प्रांतामध्ये जलवाहतूकीच्या विकासासाठी चालना दिली. मद्रास मध्ये बकिंग हॅम कालव्यातून २६२ मैल जलवाहतूक सुरु केली. बंगाल मध्ये कालव्यातून ७२५ मैल लांबीची जलवाहतूक सुरु केली. रेल्वे वाहतूकीबरोबरच जलवाहतूकीचा विकास केल्यास वाईट परिणाम होतो असे ॲक्वर्थ समितीने वर्तविले होते. १९३८ मध्ये राष्ट्रीय नियोजन समितीने शेती, उद्योग, व्यापार विकासासाठी जलवाहतूक उपयुक्त आहे अशी सुचना करूनही ब्रिटिश सरकारने जलवाहतूकीकडे पूर्णपणे दुर्लक्ष केलेले होते.

इंग्रजांच्या राजवटीत सागरीमार्गे परदेशी व्यापाराला चालना मिळाली. १८२५ मध्ये इंग्लंडमधील साऊथ हॅमपासून भारतातील कलकत्यापर्यंत पहिले जहाज भारतात आले. हे जहाज आफ्रिकेतील केप गुड होपला वळसा घालून आले होते. नंतरच्या काळात आलेली जहाजे तांबडा समुद्र व पर्शियन आखातातून मुंबई व कलकत्ता येथे येत होती. १८४० मध्ये इंग्लंड व भारताच्या दरम्यान प्रवासी व टपाल वाहतूक सुरू करण्यासाठी पेनीन शुलर ॲड ओरिंएंटल स्टिम नेव्हीगेशन या कंपनी बरोबर करार करण्यात आलेला होता. सागरी मार्गावर ब्रिटिश कंपन्याचे वर्चस्व कायम होते. त्याचा अभ्यास करण्यासाठी श्री. हैडलँब यांच्या अध्यक्षतेखाली दि मर्कन्टाईल मरिन कमिटी स्थापन करण्यात आली. या कमिटीने ज्या शिफारसी केल्या त्या पुढील प्रमाणे :-

(१) भारताच्या सागरी किनाऱ्यावरील वाहतूक भारतीय लोकांसाठी राखून ठेवले.
(२) २५ वर्षात जलवाहतूकीचे राष्ट्रीयकरण करणे
(३) भारतीय जलवाहतूक कंपन्यांना आर्थिक मदत करणे.

परंतू या शिफारस सरकारने अमान्य केल्या. १८६० ते १९७२ या काळात जलवाहतूक करणाऱ्या १९५ कंपन्या होत्या. त्यामध्ये १८९४ मध्ये जे.एन.टाटा यांनी स्थापन केलेली टाटा लाईन्स व १९०६ मध्ये चिंतंबरम् पिल्ले यांनी स्वदेशी शिपिंग कंपनी स्थापन केली.

स्टिम शिप नेव्हीगेशन या कंपनीने ५ एप्रिल १९१९ रोजी भारतीय झेंड्याखाली प्रथमच प्रवासीसह स्टीम बोट इंग्लडला पाठवली. हा दिवस महत्वपूर्ण बनविला. १९६४ पासून ५ एप्रिल हा दिवस नौकानय दिवस म्हणून पाळला जातो. १९२७-२८ मध्ये भारतीय सागरी वाहतुकीच्या संदर्भी मांडलेली विधेयक ब्रिटिश शासनाने नाकारले.

भारताला १४,५०० किम.ी लांबाची किनारा लाभलेला आहे. त्यापैकी भारताच्या एकूण ५,६६१ किमी. किनारपट्टी वर ३२ प्रमुख बंदरे व १६१ लहान १ मध्यम बंदर असे १७३ बंदरे आहेत. गुजरात १६०० किमी, तामिळनाडू ९९२ किमी. आंध्रप्रदेश ९६० किमी तर महाराष्ट्र ७२० किमी. किनारपट्टी लाभलेली असून महाराष्ट्रात ४९, गुजरात ४०, कर्नाटक २० लहान-मोठी एकुण बंदरे आहे. भारतात एकूण १२ मोठी, २३ मध्यम, १३८ लहान अशी १७३ बंदरे आहेत. १९९४ पर्यंत ४३८ जहाज भारताकडे होती. ३१ मार्च २००३ पर्यंत ३६३ मिलीयन इतकी क्षमता असेलली बंदरे आहेत. ही क्षमता वाढवून २००७ पर्यंत ४७० मिलियन टन करण्याचा प्रयास केला.

**आपली प्रगती तपासा**

१) भारतीय जलवाहतुकीचा विकास स्पष्ट करा.

---

---

---

---

---

**५.३.४ भारतीय हवाई वाहतूक :**

वाहतुकीच्या प्रकारात सर्वात वेगवान साधन म्हणजे हवाई वाहतुक होय. कमी वजनाची वस्तू व प्रवासी या वाहतुकीद्वारे मोठ्या प्रमाणात केल्या जातात. हवाई वाहतूकीत विमान व हेलीक्रॉप्टर या साधनाचा वापर केला जातो. हवाई वाहतूक देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय अशा दोन प्रकारची वाहतूक कण्यात येते.

भारतात सर्वप्रथम १९११ मध्ये गव्हर्नर सर जॉर्ज लॉईड यांनी मुंबई ते कराची या मार्गावर हवाई वाहतूकीस प्रारंभ केला. १९१९ मध्ये पॅरिस मध्ये हवाई वाहतुकीबाबत भारताने आंतरराष्ट्रीय करावावर सही केली. १९२६ मध्ये भारतात मुलकी हवाई खात्याची स्थापना करण्यात आली. तेव्हापासून विमान चालक प्रशिक्षण व हवाई मार्ग तयार करण्यात येऊ लागले. मुंबई, कलकत्ता, मद्रास या शहरात विमान सेवा सुरू झाली. इम्पीरियल एयरवेज या ब्रिटिश

कंपनीने १९२९ मध्ये लंडन ते कराची व नंतर दिल्ली पर्यंत विमानसेवा सुरु केली. १९३२ मध्ये इंडियन नॅशनल एअरवेज कंपनी स्थापन केली. १५ ऑक्टोबर १९३५ रोजी मुंबई-मद्रास हवाई वाहतूक सुरु झाली. १९३९ मध्ये तीन भारतीय कंपन्यांनी हवाई वाहतूक सुरु केली.

नागरिक उड्डायनाचे संचालक सर फ्रेडरिक टिम्स यांनी हवाई वाहतूकीच्या विकासा संदर्भात सरकारला शिफारसी सादर केल्या (१) चार पेक्षा कमी खाजगी कंपन्यांना देशांतर्गत हवाई संचालनाचे कार्य करण्याची परवानगी द्यावी. (२) खाजगी कंपन्यांना परवानगी देणे.

१ ऑक्टोबर १९४६ पासून कोणत्याही विमान सेवांना विमान परिवहन बोर्डाच्या सहमती शिवाय देशात हवाई वाहतूक करू नये असा आदेश दिला. त्यावेळी खाजगी कंनप्यांनी बोर्डाच्या परवानगीने वाहतूक करावी असे जहिर केले. त्यामुळे याकाळात डेक्कन एअरवेज, भारत एअरवेज, इंडियन ओव्हरसीज-एजन्सीज, अंबिका एअरलाईन्स, एअरवेज (इंडिया) ओरिएंट एअरवेज अशा विमान वाहतूक संस्था स्थापन झाल्या. हवाई वाहतूकीच्या मार्गाने प्रवासी, टपाल व मालाची ने आण सूरू झाली.

भारतात स्वातंत्र्या नंतर १९४८ पासून एअर इंडिया इंटनरनॅशनल या संस्थेची स्थापना केली. १९४९ मध्ये भारत एअरवेज लि. स्थापन केली या दोन कंपन्यांनी आंतरराष्ट्रीय विमानसेवा सुरु केली. नोव्हेंबर १९४९ मध्ये सरकारने न्यामूर्ती राज्याध्यक्ष यांच्या अध्यक्षतेखाली नागरिक उड्डानाची चौकशी करण्यासाठी समिती स्थापन केली. ५ सप्टेंबर १९५० रोजी या समितीने सुधारात्मक शिफारशी सरकारला सादर केल्या. त्यात सर्व विमान कंपनीचे चार विभागात संघटन केले व हवाई सेवाचे राष्ट्रीयकरण करावे अश्या सूचना दिल्या.

भारत सरकारने देशांतर्गत हवाई वाहतूक सेवेसाठी इंडियन एयरलाईन्स कार्पोरेशन व विदेशी सेवेकरिता एअर इंडिया इन्टरनॅशनल कार्पोरेशन या संस्थांची स्थापना केली. हवाई वाहतुकीचे १ ऑगस्ट १९५३ रोजी राष्ट्रीयकरण केले. इंडियन एअरलाईन्स कार्पोरेशनमध्ये भारत एअरवेज, डेक्कन एअरवेज, हिमालयीन एव्हीएशन, एअरवेज इंडिया, एअर इंडिया, एअर सर्व्हिसेस ऑफ इंडिया, कलिंग एअरवेज आणि इंडियन नॅशनल एअरवेज अश्या आठ खाजगी कंपनीचे विलिनीकरण करण्यात आले. १९८५ मध्ये नागरिक विमान परिवाहनाच्या अंतर्गत १०.५० लाख मीटर वाहतूक केली. १०८ लाख प्रवासी व १२७९ लाख किलो मालाची वाहतूक केली.

१९९० नंतर भारत सरकारने मुक्त आर्थिक धोरण स्विकारल्यामुळे खाजगी क्षेत्राला एअरटॅक्सी चालविण्याची संधी दिली. खाजगी कंपन्यांना देशातील सर्वच हावाई वाहतूक केंद्राचा वापर व प्रवासी भाडे निर्धरणाची सवलत दिली. खाजगी कंपन्यांना विमानतळ विकसित करण्याची परवानीगी दिली. भारतात इंडियन एअरलाईन्स, खाजगी शेड्युल्ड एअरलाईन्स, नॉन शेड्युल्ड ऑपरेटर्स, इ. कंपन्या देशांतर्गत हवाई सेवा देत आहेत. एअर इंडिया, इंडियन एअरलाईन्स या आंतरराष्ट्रीय हवाई सेवा देतात. पवनहंस हेलिकॉप्टर लि. हे हेलिकॉप्टर सेवा देत आहे. १९९७ पासून देशआंतर्गत सेवा देणाऱ्या हवाई वाहतूक कंपन्यांना मुक्त वाहतुकीची परवानगी देण्यात आलेली आहे.

भारतात मुंबई, आग्रा, अहमदाबाद, अमृतसर, कोलकाता, चेन्नई, कोचीन, अमृतसर, दिल्ली, गोवा, हैदराबाद, पोर्टल्बेअर, गोहाटी, तिरूअनंतपुरम, जयपूर आणि वाराणसी अशी

एकूण १६ ठिकाणी आंतरराष्ट्रीय हवाई अड्डे असून १२४ देशी हवाई अड्डे आहेत. ३१ मे २००३ मध्ये भारत सरकारने विदेशी हवाई सेवा कराराअंतर्गत ९७ देशांशी हवाई वाहतूक करार केला. एअर इंडियाकडे ३२ विमाने असून ३७ ठिकाणी (१२ देशआंतर्गत व २५ आंतरराष्ट्रीय) सेवांचा समावेश आहे. २००२-०३ पर्यंत ३.३ दशलक्ष प्रवाशांना सेवा दिली. इंडियन एअर लाईन्सकडे ५९ विमाने असून ७५ ठिकाणी (५९ देशआंतर्गत १६ आंतरराष्ट्रीय) सेवेचा समावेश आहे. पवनहंस कडे ३१ हेलिकॉप्टर असून ५२ लाख प्रवाशांना सेवा दिली.

**आपली प्रगती तपासा**

१) भारतीय हवाई वाहतुकीवर थोडक्यात माहिती लिहा.

## ५.४ सारांश

ब्रिटिशांच्या आगमनाने भारतात अनेक प्रकारच्या सुधारणा व बदल घडून आले. त्यामध्ये भारतातील दळणवळण व वाहतूक व्यवस्थेत झालेले बदल महत्वाचे आहेत. कच्या व पक्क्या मालाची वाहतूक, लष्कराच्या जलद हालचाली या हेतूने ब्रिटिश कंपनी व सरकार यांनी भारतात अनेक बदल घडवून आणले. इंग्रजांनी सर्वात जास्त लक्ष रेल्वे वाहतूकीवर केंद्रित केलेले होते. रेल्वे वाहतूक सुलभ व्हावी या उद्देशाने रेल्वे मार्गाला पुरक असे रस्ते वाहतूकीत सुधारणा घडवून आणल्या. इंग्रजांनी जलवाहतूक व हवाई वाहतूक या क्षेत्राकडे फारसे लक्ष दिले नाही. त्यामळे यामध्ये अपेक्षा प्रमाणे सुधारणा झाली नाही.

## ५.५ प्रश्न

(१) भारतीय रस्ते वाहतूकी संदर्भात ब्रिटिशांनी केलेल्या सुधारणा स्पष्ट करा.
(२) भारतातील रेल्वे वाहतूकीच्या विकासातील विविध टप्पे सांगा.
(३) भारतीय जलवाहतूकीवर निबंध लिहा
(४) भारतातील हवाई वाहतूकीवर टिप लिहा.

## ५.६ संदर्भ सूची

(१) आचार्य धनंजय, भारताचा इतिहास (१७६१-१९७१), श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, २००९.
(२) कोलारकर, श.गो.,भारताचा इतिहास (१७०७-१९५०), श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, १९९५.

(३) ग्रोवर बी.एल.व बेल्हेकर एन.के., आधुनिक भारताचा इतिहास, एस.चंद आणि कंपनी लि., नवी दिल्ली, २००३.
(४) पंडित सुधाकर वि., अर्वाचीन भारताचा इतिहास (१८००-१९६४), प्राची प्रकाशन, मुंबई-१९९४.
(५) भिडे गजानन, आधुनिक भारताचा इतिहास, अनिरुद्ध पब्लिशिंग हाऊस, पुणे,२०००.
(६) जाधव वसंत, आधुनिक महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास, विद्या प्रकाशन, नागपूर, १९९८.
(७) वक्काणी नि.आ. आधुनिक भारताचा इतिहास, श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर,१९९४.
(८) वैद्य सुमन व कोठेकर शांता, आधुनिक भारताचा इतिहास (१८५७-१९२०), श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर,२०१५.
(९) शहा जी.बी.भामरे आर.पी.आणि पवार एम.डी., आधुनिक भारताचा इतिहास (१७५७ ते १९५०) प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव,२०१४.

❖❖❖❖

६

# भारतीय अर्थव्यवस्थेवर ब्रिटीश राजवटीचा परिणाम

**प्रकरणाची रचना :**


६.० उद्दिष्टे

६.१ प्रस्तावना

६.२ दुहेरी राज्यव्यवस्था

६.२.१ कायमधारा पद्धती

६.२.२ कायमधारा पद्धतीचे ब्रिटीशांना झालेले फायदे

६.२.३ कायमधारा पद्धतीचे दुष्परीणाम

६.३ रयतवारी पद्धती

६.३.१ रयतवारी पद्धतीची वैशिष्ट्ये

६.३.२ रयतवारी पद्धतीचे दोष

६.४ महालवारी पद्धती

६.५ शेतीचे व्यापारी करण

६.५.१ शेतीच्या व्यापारीकरणाची कारणे

६.५.२ शेतीच्या व्यापारीकरणाचे परिणाम

६.६ ब्रिटीश शासनाच्या धोरणांचा कृषीक्षेत्रावर झालेला परिणाम

६.७ आर्थिक वाहनाचा सिद्धांत

६.७.१ दादाभाई नौरोजी यांच्या आर्थिक वहन सिद्धांत

६.७.२ आर्थिक वहनाचे परिणाम

६.८ निरऔद्योगिकरण व आधुनिक उद्योगधंदयांचा विकास

६.८.१ निरऔद्योगिकरण

६.८.२ निरऔद्योगिकरणाची परिणाम

६.८.३ भारतीय लघु उद्योगाचा ऱ्हास

६.८.४ भारतातील प्रमुख उद्योगधंदे

६.९ सारांश

६.१० प्रश्न

६.११ संदर्भ सूची

## ६.० उद्दिष्टे

(१) विविध शेतसारा पद्धतींचे आकलन होणे.
(२) कायमधारा पद्धती, रयतवारी पद्धती यातील फरक समजणे.
(३) शेतीच्या व्यापारीकरणाची प्रक्रिया उमगणे.
(४) औद्योगिकरणाची कारणे व परिणाम यांचे आकलन होणे.

## ६.१ प्रस्तावना

ब्रिटीशांचे भारतातील आगमन हे व्यापारी प्रेरणेतून झाले होते. १८व्या शतकाच्या उत्तरार्धात त्यांनी बंगालपासून राजकीय सत्ताही प्रस्थापित केली व कालांतराने पूर्ण भारतावर आपला राजकीय अंमल बसवला. इंग्रजांची भारतात येण्याची मूळ प्रेरणा ही व्यापार व नफा हीच असल्याने राजकीय सत्ता ताब्यात आल्यावर त्यांनी त्याच दिशेने पावले टाकायला सुरुवात केली. भारतामध्ये स्वयंपूर्ण अर्थव्यवस्था ब्रिटीश राजवट प्रस्थापित होईपर्यंत अबाधित होती. प्राचीन व मध्ययुगीन कालखंडात राज्यकर्ते बदलले तरी मूलगामी असा बदल भारतीय अर्थव्यवस्थेत झाला नाही. त्यामुळे स्वयंपूर्ण खेड्यांचा देश म्हणून त्याची ओळख अबाधित राहीली. परकीय सत्तांनी प्रचलित अर्थव्यवस्थेस धक्का लावला नाही मात्र इंग्रज हे मूळातच व्यापारी प्रेरणेतून भारतात आले असल्यामुळे त्यांनी देशातील नैसर्गिक साधनसंपत्तीची पुरेपुर लूट केली. शेती व नैसर्गिक साधनसंपत्ती यांना उपजिविकेचे साधन न मानता आर्थिक गरजेनुसार त्यांचे शोषण करण्यात आले. इंग्रज या देशामधे राहूनही इतर राजकर्त्याप्रमाणे ते भारताशी एकरुप झाले नाही. भारतातील साधनसंपत्तीचे शोषण करुन त्यांनी मोठ्या प्रमाणावर पैसा इंग्लडला नेला. यामुळे परंपरागत भारतीय अर्थव्यवस्थेस हादरा बसला. शेतीतून आधिक उत्पन्न घेण्यासाठी शेतकऱ्याला वेठीस धरले गेले. इंग्लंडमधील कारखानदारीस लागणार कच्च्यामालाची मागणी पूर्ण करण्यासाठी भारतीय शेती व इतर साधनसंपत्तीची लूट करण्यात आली. याचाच परिणाम म्हणून बदलती महसूल व्यवस्था, शेतीचे व्यापारीकरण व आर्थिक निस्सारण यासारखे परिणाम घडून आले.

## ६.२ दुहेरी राज्यव्यवस्था १७६५

बंगालमधील इस्ट इंडिया कंपनीला १८५७च्या प्लासीच्या लढाईत जय मिळाला. तेव्हापासून बंगालमध्ये कंपनीने आपल्या मर्जीनुसार मुलकी प्रशासन राबवले. त्यात १७६५मध्ये कंपनीला बंगाल, बिहार व ओरिसा या प्रांताचे दिवाणी अधिकार मिळाले. याच काळात रॉबर्ट क्लाईवने (१७६५मध्ये) त्याच्या कार्यकाळात दुहेरी राज्यव्यवस्था आणली. या पद्धतीमध्ये कंपनीला फक्त शेतकऱ्यांकडून शेतसारा वसूल करायचा होता व राज्यातील कायदा व सुव्यवस्थेची जबाबदारी नबाबावर टाकण्यात आली होती. त्यामुळे शेतकरी वर्गाची दुहेरी पिळवणूक सुरु झाली. या पार्श्वभूमीवर लॉर्ड कॉर्नवॉलिस याने शेतसारा वसूलीची सुरु केलेली कायमधारा पद्धती १७९३ पासून राबवण्यात आली.

### ६.२.१ कायमधारा पद्धती

भारतातील शेतीकडून जास्तीत जास्त कर मिळवणे हास उद्देश डोळयासमोर ठेवून ब्रिटीश इस्ट इंडिया कंपनीने विविध शेतसारा पद्धती आणल्या होत्या. लॉर्ड कॉर्नवालिसने सुरु केलेली कायमधारा पद्धत याचाच एक भाग होती. युरोपप्रमाणे भारतात जमीनदार वर्ग अस्तित्वात नसताही कॉर्नवालीसने महसूल गोळा करण्याचे अधिकार जमीनदार वर्गास दिले व त्यासोबतच कायदयाने शांतता व सुव्यवस्था राखण्याचेही अधिकार प्रदान केले गेले.

जॉन शोर याच्या मदतीने कॉर्नवालिसने कायमधारा पद्धत रुजवली. १९९०मध्ये जमीनदारांना दहा वर्षाच्या कराराने जमिनी देण्यात आल्या व मागील उत्पन्नाचा आढावा घेऊन किती शेतसारा घ्यावा हे ठरविण्यात आले मात्र १७९३मध्ये जमिनी कायमच्या या जमीनदारांना देण्यात आल्या व महसूल ठरवण्यात आला म्हणून या पद्धतीस कायमधारा पद्धती असे म्हटले जाऊ लागले. शेतकऱ्यांकडून घेण्यात येणाऱ्या हिश्श्याचा ८९टक्के भाग सरकारला तर ११टक्के भाग जमीनदाराला मिळावा अशी तरतूद होती.

जमीनदाराने ही रक्कम न भरल्यास त्याला महसूल गोळा करण्याचा हक्क व जमीन काढून टाकण्याचा अधिकार कंपनीला होता. या पद्धतीमुळे अंतर्गत जीवनात हस्तक्षेप न करता भारतीय शेतकऱ्यांकडून कर गोळा करणे हे प्रमुख उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवले गेले.

### ६.२.२ कायमधारा पद्धतीचे ब्रिटीशांना झालेले फायदे :

१) **शेतसारा निश्चित झाला** - कायमधारा पद्धतीनुसार शेतावरील कर अथवा शेतसारा हा निश्चित केला गेला होता. शेतकऱ्याचे पीक आले किंवा नाही, दुष्काळ पडला तरी त्याला ठरवून दिलेले कर भरणे अपेक्षितच होते. त्यामुळे ठराविक उत्पन्न दरवर्षी कंपनीला मिळण्याची सोय झाली.

२) **जमिनीचे मालकीचे स्थित्यंतर** - बंगालमधे नबाबाच्या काळात जमीन कसणारेच जमिनीचे मालक होते. पण कंपनीने शेतसारा सुलभतेने व सहजतेने गोळा व्हावा म्हणून काही मूठभर जमीनदारांना शेतीची मालकी दिली. त्यातही त्यांनी कर भरण्यात दिरंगाई केली तर जमिनीची मालकी आपसूकच सरकारकडे जाण्याची सोय होती.

३) **उत्पन्नामध्ये वाढ** - महसूल निश्चिती झाल्याने विशिष्ट उत्पन्न सरकारला मिळणे अपेक्षितच होते. त्यामुळे दुष्काळ किंवा पूर अशा नैसर्गिक अपत्तीमधेही सरकारला मिळणाऱ्या उत्पन्नावर कोणताही विपरीत परिणाम होणार नव्हता.

४) **कंपनीशी एकनिष्ठ जमीनदार वर्गाचा उदय** - भारतामधे जमीनदार वर्ग हा इंग्लंडप्रमाणे बहुसंख्य जमिनीचा मालक नव्हता. परंतू ब्रिटीशांनी त्याला कर गोळा करण्याच्या निमित्ताने जमिनीचा मालक बनवले त्यामुळे हा वर्ग ब्रिटीशांशी नेहमी प्रामाणिक राहीला. त्याचे आर्थिक हितसंबंध ब्रिटीश शासनासोबत गुंतल्यामुळे दोघांची युती ही पूरक ठरली.

### ६.२.३ कायमधारा पद्धतीचे दुष्परीणाम

१) **शेतकऱ्यांचे लूट/आर्थिक शोषण** - कायमधारा पद्धतीही मुळातच शेतकऱ्यांच्या आर्थिक हितसंबंधापेक्षा जमीनदार व इस्ट इंडिया कंपनी यांच्या हितसंबंधास जपणारी होती. या

पद्धतीत शेतकऱ्यांची शेतीवरील मालकी हक्क संपुष्टात आला व पूर्णपणे जमीनदाऱ्यांच्या मर्जीवर सोडण्यात आले. जमीनदार वर्गाने ठरवून दिलेल्या महसूलापेक्षा जास्त महसूल गोळा करण्यास सुरुवात केली. त्यातच कंपनीने कायदा व सुव्यवस्थेचे काही अधिकार जमीनदारांनाच बहाल केले असल्याने त्यांच्याविरुद्ध दाद मागणेही अशक्य होते. जमीनदार वर्ग शेतकऱ्यांकडून भरमसाठ वसूली करत असे त्यातून जमीनदार वर्ग सधन तर शेतकरी निर्धन बनले.

२) **शेतकऱ्यांचे निर्धन मजूर बनले** - कायमधारा पद्धतीनुसार जमिनीचा शेतसारा वेळेवर भरला नाही तर शेतकऱ्याची मालमत्ता जप्त करण्याचे अधिकार जमिनदाराला होते. त्यामुळे शेतकरी कर्जे काढून हा शेतसारा देऊ लागले. यातूनच शेतकऱ्याला कर्जे देण्यासाठीचा सावकार वर्ग बलवान बनला. कर्ज फेड न झाल्यावर जमिनी विकाव्या लागल्या. अशा प्रकारच्या दृष्ट चक्राची परिणीती शेवटी शेतकऱ्याच्या दैन्यावस्थेत होई. शेताची मालकी जावून तो शेतमजूर बनला.

३) **शेतीचे उत्पन्न घटले** - कायमधार पद्धतीस महसुल गोळा करण्यात जमीनदारांकडून लूट केली गेली. यामुळे शेतीमधे गुंतवणुक करण्यास व सुधारणा घडवून आणणे शेतकरी वर्गाला अशक्य बनले. त्यातच जमीनदारवर्गाला शेतीविषयी कोणतेही प्रेम अथवा आस्था नव्हती. त्यामुळे शेतीचे उत्पन्न दिवसेंदिवस घटू लागले. एकीकडे प्रचंड श्रीमंत झालेला जमीनदार वर्ग दुसरीकडे हलाखीचे जीवन जगणारा शेतमजूर वर्ग अशा प्रकारची वर्गवारी दिसत होती.

४) **शेतमालाची किंमत कमी झाली** - कायमधारा पद्धतीत शेतसारा हा पैशाच्या स्वरूपातच भरणे आवश्यक होते. त्यामुळे पीक हाती येताच शेतकरी बाजारात विक्री भरू लागले. अचानक बाजारात धान्य मालाचा पुरवठा वाढल्याने शेतमालाची किंमत झपाट्याने कमी होत असे. यामुळे व्यापारी कमीत कमी पैशात जास्तीत जास्त शेतमाल विकत घेत. यामुळे अन्नधान्य व्यापाऱ्यांकडे जमा झाले तर शेतकऱ्यांकडे आलेला पैसा शेतसाऱ्याच्या रूपाने शासनाला गेला. अशा रितीने कायमधारा पद्धतीने आर्थिक दृष्ट्या सुफलाम व सुफलाम असलेला बंगाल दारीद्र्याच्या भीषण खाईत लोटला गेला. शेतकऱ्यांच्या हालअपेष्टांना कोणीही वाली राहीला नव्हता. शेतीचे मालक भूमिहीन मजूर झाले.

### आपली प्रगती तपासा

१) कायमधारा पद्धतीवर टीप लिहा.

## ६.३ रयतवारी पद्धती

बंगालमधील कायमधारा पद्धतीचे भीषण परिणाम पहाता इस्ट इंडिया कंपनीने भारतामधे इतर ठिकाणी वेगवेगळ्या जमीन महसूल पद्धती लागू केल्या. रयतवारी पद्धती हा प्रमुख पर्याय कंपनीने निवडला. मुंबई, मद्रास व आसामच्या काही भागात रयतवारी पद्धती राबवण्यात आली. रयत म्हणजे प्रजा अर्थात शेतकरी. रयतवारी पद्धतीमधे जमीनदारांसारखे मध्यस्त न घेता सरळ रयतेकडून म्हणजे शेतकऱ्यांकडून शेतसारा गोळा करणे अपेक्षित होते. थॉमस मन्रो याने १८२०-२१ मधे ही पद्धती लागू केली. शेतसाऱ्याचे प्रमाण काही काळ पुरतेच निश्चित करण्यात आले. शेतकऱ्यांकडेच जमिनीची मालकी राहील्याने ते शासनाश एकनिष्ठ राहतील व कंपनीची सत्ता स्थिर राहू शकेल तसेच महसूल गोळा करण्याचे काम प्रत्यक्ष शासनाने हाती घेतल्यामुळे सामान्य जनतेशी शासनाची नाळ जोडलेली राहील असाही एक मतप्रवाह होता.

### ६.३.१ रयतवारी पद्धतीची वैशिष्ट्ये

१) **शेतकऱ्यांचे मालकी हक्क अबाधित** - शेतकरी हे खरे जमिनीचे मालक आहे हे सूत्र स्विकारण्यात आले. कायमधारा पद्धतीप्रमाणे त्यांचा मालकी हक्क झुगारण्यात आला नाही. शेतकऱ्यांचा मालकी हक्क स्विकारून जमीन विकणे, गहाण ठेवणे अथवा हस्तांतर करणे हे त्यांचे अधिकार अबाधित ठेवण्यात आले.

२) **प्रत्यक्ष रयतेशी करारामुळे पिळवणूक कमी झाली** - रयतवारी पद्धतीत कर गोळा करण्यासाठी कोणत्याही मध्यस्थाची नेमणूक नव्हती त्यामुळे त्यांची होणारी पिळवणूक टळली.

३) **शेती सुधारणा शक्य झाली** - शेतजमीनीची मालकी शेतकऱ्यांकडेच राहील्याने शेतकऱ्याला जमीनी विषयी आत्मीयता कायम राहीली. त्याने शेती सुधारणेकडे व लागवडीकडे लक्ष दिले. त्यामुळे शेती उत्पन्नात वाढ झाली.

४) **सवलती** - शासनाच्या शेतकऱ्यांशी सरळ संबंध आल्यामुळे दुष्काळ, पूर इत्यादी नैसर्गिक आपत्तीच्या काळात शेतकऱ्यांना शासनाकडून शेतसाऱ्यात सवलत दिली जात असे.

### ६.३.२ रयतवारी पद्धतीचे दोष

रयतवारी पद्धत राबवताना कायमधारा पद्धतीतील अनेक दोष काढून टाकण्यात आले होते तरी देखील प्रत्यक्ष ही पद्धत राबवताना त्यातील मुलभूत दोष समोर येत होते.

१) **जमीन महसुलाचे प्रमाण जास्त** - रयतवारील पद्धतीमध्ये जमीन महसुलाचे प्रमाणे मुळातच जास्त होते. जमीन महसुलामधून जास्तीत जास्त उत्पन्न गोळा करणे हेच ब्रिटीशांना अपेक्षित होते. त्यामुळे कायमधारा पद्धतीप्रमाणे पिळवणूक करणारा मध्यस्थ वर्ग नसला तरी वाढीव शेतसाऱ्यामुळे त्यांची पिळवणूक थांबली नाही.

२) **सावकारांचे प्रस्थ वाढले** - जमीनीचा कर देण्यासाठी अनेक शेतकरी सावकारांकडून कर्ज घेत व शेतसारा भरत असत. कर्जाच्या विळख्यात अडकलेल्या शेतकऱ्यांना काही वेळेस

जमिनी पुन्हा ताब्यात घेणे जवळ जवळ अशक्य बनले. सावकारी पाशअत अडकून अनेक शेतकरी शेतमजून बनले. सावकऱ्यांनी ताब्यात घेतलेल्या त्यांच्याच जमिनीवर त्यांना वेठाबिगार म्हणून रहावे लागले.

३) **अधिकाऱ्यांकडून अन्याय वसूली** - सरकारी अधिकारी हे शेतकऱ्यांकडून शेतसारा वसूल करताना कोणतीही दयामाया दाखवत नसत. अधिकाऱ्यांना शेतीची मुळातच जाण नव्हती त्यामुळे शेतकऱ्यांच्या हालअपेष्टा समजून न घेता ते वसूलीचा तगादा लावीत असत. रयतवारी पद्धतीतील हे दोष असतानाही कायमधारा पद्धतीपेक्षा ती कमी हानीकारक होती हे निश्चितच खरे होते. रयतवारी पद्धतीमद्ये शेतकऱ्यांचा मालकी हक्क कायम करण्यात आला होता व त्यांना आवश्यक त्या सवलती देण्याबाबत सरकारकडून तरतूदी होत्या.

**आपली प्रगती तपासा**

१) रयतवारी पद्धतीची वैशिष्ट्ये सांगा.

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

## ६.४ महालवारी पद्धती

महालवारी पद्धतीमध्ये प्रत्येक शेतकऱ्यासोबत वैयक्तीक करार न करता संपूर्ण गावासोबत करार करुन शेतसारा निश्चित केला जात असे. गावाचा महसूल गोळा करण्याची जबाबदारी गावच्या प्रमुखास देण्यात आली होती. ही पद्धती लॉर्ड बेंटिंग याने व्होल्ट मॅकेन्सी याच्या सल्ल्यानुसार अमलात आणली. उत्तर भारत, पंजाब आग्रा, अवध रोहिलाखंड इत्यादी भागात ही शेतसारा पद्धती लागू करण्यात आली. गावातील शेतजमीनीतून येणाऱ्या उत्पन्नाचा अंदाज घेऊन महसूली निश्चित करताना त्यांच्या शेतीची पाहणी केली जात असल्याने अंदाजे केल्या जाणाऱ्या कर आकारणीपेक्षा ही पद्धत अधिक सयुक्तीक होती.

महलवारी पद्धतीत गावातील संपूर्ण शेतीचा कर गोळा करण्याचे अधिकार गावप्रमुखाला असल्याने हा वर्ग मातब्बर झाला व शेतकऱ्यांची पिळवणूक करू लागला. तसेच या पद्धतीतही कर पैशांच्याच स्वरूपात भरावा लागत असे त्यामुळे लोक कापूस व नीळ यासारखे नगदी पिके घेऊ लागली. स्वयंपूर्ण शेतीव्यवस्था कोलमडून पडली.

अशा रीतीने कायमधारा, रयतवारी व महलवारी या शेतसारा गोळा करण्याच्या पद्धती ब्रिटीश शासनाने लागू केल्या. गुणात्मकरित्या त्यांच्यामधे फरक असला तरी सर्वामध्ये एका बाबतीत समानता होती. ती म्हणजे सर्व पद्धतीत कर हा पैशाच्या स्वरूपात भरावा लागत असे. त्यामुळे पारंपारिक अर्थव्यवस्थेला व वस्तु विनिमय पद्धतीला हादरे बसू लागले. पैशाच्या अतिरिक्त मागणीमुळे शेतकऱ्यांचे शोषण वाढले. ब्रिटीश साम्राज्यवादाचे आर्थिक शोषणाचे स्वरूप उघड होऊ लागले.

## ६.५ शेतीचे व्यापारीकरण

भारतामध्ये शेतीसोबत शेतकऱ्याची भावनिक नाळ जोडलेली आहे. शेती हे त्याच्या उपजीविकेचे प्रमुखे साधन होते. युरोपमध्ये जमीनीची मालकी ही जमीनदार वर्गाकडे होती. याउलट भारतात राजा किंवा सरंजामदार हे जमिनीचे मालक नव्हते. गावपातळीवर जमिनीची मालकी असे व जमीन कसणाऱ्याचा तीच्यावर मालकी हक्क नसला तरी ब्रिटीश आगमनापर्यंत जमीन कसणारा हाच अघोषितपणे जमीनचीचा उपभोग घेत असे. वस्तु विनिमय पद्धतीनुसार शेतातून मिळणारे अन्नधान्य व गावातील इतर कारागीर यांचे उत्पादन यांच्यात देवाणघेवाण होत असे. शासनयंत्रणेला महसूलाचा काही भाग धान्य रूपानेच मिळत असे.

ब्रिटीश सत्तेचा उगम आल्यानंतर मात्र ही परिस्थिती पूर्णपणे बदलली. इंग्रज हे मुळातच व्यापारी असल्याने त्यांनी शेतीलादेखील हेच परिणाम लागू केले. गावाच्या गरजा पूरवणारी अर्थव्यवस्थेतील एक महत्वाचा घटक म्हणून शेतीची ओळख त्यांनी नष्ट केली. याऊलट शासनाला पैसे रुपात कर देणारी एक व्यवस्था व इंग्लडमधील कारखान्यांना कच्चा माल पुरवणारी एक बाजारपेठ म्हणून ते शेती उद्योगांकडे पाहू लागले. यामधूनच शेतीच्या व्यापारी करणास चालना मिळाली.

शेतामधून खाद्यान्न पिके न घेता नफा देणारी पिके घेणे म्हणजेच शेतीचे व्यापारीकरण होय. शेतकरी ही गहू, ज्वारी, तांदूळ यासारखी खाद्यपिके घेत होता त्यामुळे त्याला मुबलक संपत्ती मिळत नसली तरी त्याची उपासमार होत नव्हती. व्यापारीकरणाने खाद्यपिके न पिकवता नफा देणारी व औदयौगिकरणासाठी कच्चा माल म्हणून लागणारी नीळ, तंबाखू, ताग यासारखी पिके घेण्यास शेतकऱ्यांना प्रवृत्त केले. त्यामुळे अन्नधान्याची स्वयंपूर्णता आपोआप संपुष्टात आली व भारत इंग्लंडला कच्चा माल पुरवणारा एक देश बनला.

### ६.५.१ शेतीच्या व्यापारीकरणाची कारणे

(१) शेतसाऱ्याचा भरणा रोख स्वरूपात देण्याची सक्ती भारतात प्राचीन काळापासूनच राज्यकर्त्यांकडे शेतसारा धान्याच्या रूपाने दिला जात असे. मध्ययुगीन कालखंडात यामधे बदल झाला नाही. परंतू ब्रिटीशांनी धान्यरूपात शेतसारा घेण्यास अनुकूलता दर्शवली नाही. सुरुवातीपासूनच त्यांनी शेतसारा पैशाच्या रुपात घेण्यास सुरुवात केली. त्यामुळे शेतकरी धान्य बाजारात विकू लागले. सर्वांनीच धान्य बाजारात विकल्यामुळे त्यांचा भाव कमी होऊ लागला. त्यातून शेतसारा भागवणे अशक्य बनले. त्यामुळे शेतकरी नगदी पिकांकडे वळले. नगदी पिके ही औद्योगिकरणाच्यासाठी कच्चा माल म्हणून वापरली जाऊ लागली. यामधूनच शेतीच्या व्यापारीकरणाला चालना मिळाली.

(२) दळणवळण सुविधा - ब्रिटीशांच्या भारतातील सत्तेचा दळणवळण सुविधा हा प्रमुख आधार होता. अप्रत्यक्षपणे त्याचा परिणाम शेती उद्योगावरदेखील झाला. ब्रिटीशांनी जहाजे, रस्ते, तारायंत्र इत्यादी सोई आणल्या. वाहतुकीच्या साधनांमुळे गावातील शेती उत्पादने दुसऱ्या ठिकाणी अथवा मुख्य बाजारपेठेच्या जवळ नेणे सुलभ झाले. यामुळे शेतीच्या व्यापारी पिकांचेही वाहतुक शक्य झाली. त्यामुळे व्यापारी पिकांना शेतीच्या नजीक वाव नसला तरी जेथे त्यांचा उपयोग होवू शकतो अशा ठिकाणी दळणवळणांच्या सुविधेने ने आण करणे शक्य झाले.

(३) पाणी पुरवठ्याच्या सुविधा - पारंपारिक खादय पिकांना कृत्रिम पाणी पुरवठ्याची मोठया प्रमाणार जरुरी नव्हती. विहिरी व तलाव यासारख्या साधनातुन काही शेतकरी पाणी वापरात आणत. बहुसंख्य शेतकरी पावसाच्या पाण्यावरच शेती करत असत ब्रिटीशांनी नगदी पिकांच्या लागवडीसाठी कालवे, बंधारे व तलाव बांधले. त्यामुळे व्यापारी उत्पादने घेण्यासाठी शेतकरी उद्युक्त झाले.

(४) अमेरिकन यादवी युद्ध (१८६१) - अमेरिकेत १८६१मध्ये गुलामगिरीच्या प्रश्नावरुन उत्तर व दक्षिण भागांमधे नागरी युद्ध सुरु झाले. त्याचा परिणाम अमेरिकन व इंग्लडच्या अर्थव्यवस्थेवर झाला. अमेरीकेकडून होणारी कापसाची निर्यात थांबल्यामुळे इंग्लडमधील कारखान्यांसमोर कच्च्या मालासाठी संकट उभे राहिले. या वेळेस भारतामधून मोठ्या प्रमाणात व वाढीव दरांमधे कापूस आयात केला गेला. कापसाची मागणी व किंमत वाढल्यामुळे शेतकरी मोठ्या प्रमाणावर कापसाची लागवड करु लागले. त्याचसोबत इतर नगदी पिकांचीही लागवड सुरु झाली. सुएझ कालव्याची निर्मिती (१८६९) - इजिप्त मध्ये तांबडा समुद्र व मेडीटेरीनीयन (भूमध्ये) समुद्र यांना जोडणारा कालवा बांधल्यामुळे मुंबईपासून इंग्लडपर्यंत हजारो किमीचे अंतर कमी झाले. त्यामुळे व्यापार व दळणवळण वेगाने वाढले. भारतातील कच्चा माल मोठ्या प्रमाणावर इंग्लडमध्ये जाऊ लागला तर इंग्लंडमधून पक्का माल भारतात विक्रीसाठी येऊ लागला. यामुळे नगदी पिकाच्या उत्पादनास मोठ्या प्रमाणावर चलाना मिळाली व शेतीचे व्यापारीकरण वेगावे होऊ लागले.

### ६.५.२ शेतीच्या व्यापारीकरणाचे परिणाम

(१) धान्यपिकांपेक्षा नगदी पिकांकडे ओढा वाढला - शेती उत्पादनामधे व्यापारीकरणाने आमूलाग्र बदल झाले. पिकांच्या उपयुवततेपेक्षा त्यांचा बाजारातील मोलभाव यावर त्यांची लागवड ठरु लागली. निळ, ताग, कापूस, चहा यासारख्या पिकांना जास्त मागणी असल्याने व त्यांची किंमत बाजारात पारंपारिक पिकांपेक्षा जास्त असल्याने शेतकरी नगदी पिके घेऊ लागले.

(२) अन्नधान्याच्या टचाई - इंग्रजांच्या व्यापारी वृत्तीला बळी पडून अनेक शेतकऱ्यांनी नगदी पिके मोठ्या प्रमाणावर घेतली त्यामुळे अन्नधान्य पिके कमी प्रमाणात उपलब्ध झाली. त्यामुळे बाजारात अन्नधान्याची भीषण टंचाई जाणवू लागली.

(३) पारंपारिक अर्थव्यवस्था कोसळली - खेड्यांच्या स्वयंपूर्णतेवर नगदी पिकांचा मोठा आघात झाला. वस्तु विनिमय पद्धतच नगदी पिकांमुळे धोवयात आली त्यामुळे स्वयंपूर्णता आपोआपच लयाला गेली. पारंपारिक लघुउदयोग व व्यवसाय नष्ट होऊ लागले. शेतकरी व कुशल कारागीर यांच्यावरही याचा परिणाम झाला.

(४) नगदी पिकांची वर्गवारी - रेशीम : बंगाल प्रांतात रेशीम घेतले जात असे. इंग्रजांना भारतातील कच्चे रेशीम कच्च्या मालाच्या स्वरूपात हवे होते. त्यांनी हे रेशीम इंग्लंडला नेऊन तेथे यंत्राद्वारे पक्के रेशीम बनवले जाई.

(२) नीळ : सुती कपड्यांना रंग देण्यासाठी नीळ या पिकाचा उपयोग होत होता. नीळ हे पिक जमिनीच्या दृष्टीने घातक होते. त्यामुळे जमिनीची उत्पादकता कमी होत होती पण ब्रिटीशांनी सक्तीने शेतकऱ्यांना हे पिक घेण्यास भाग पाडले. ब्रिटीश हेच अशा नीळमळ्यांचे मालक बनले.

(३) कापूस : कापूस हा भारतात आधीपासूनच पिकवला जात असे. मात्र इंग्लंडमध्ये कापड गिरण्यासाठी आवश्यक म्हणून कच्चा माल असे त्याचे स्वरूप बनल्यावर कापसाच्या लागवडीला मोठ्या प्रमाणावर सुरुवात झाली.

(४) चहा : आसाम व ईशान्य भारतात ब्रिटीशांनी चहाची लागवड केली. याव्यतिरिक्त कॉफी, साखर, रबर इत्यादी पिकांनाही प्रोत्साहन दिले.

**आपली प्रगती तपासा**

१) भारतातील शेतीच्या व्यापारीकरणावर थोडक्यात टीप लिहा.

## ६.६ ब्रिटीश शासनाच्या धोरणांचा कृषीक्षेत्रावर झालेला परिणाम

ब्रिटीशांच्या अर्थव्यवस्था विषयक धोरणामुळे कृषीक्षेत्रावर मूलभूत बदल झाले.

(१) जमीन महसूल व्यवस्थेतील बदल

(२) शेतीमधील अन्नधान्य उत्पादनांमधे घट

(३) नगदी पिकांची वाढती मागणी

(४) शेतकऱ्यांचे शोषण

या व्यतिरिक्त सर्वात महत्वाचा परिणाम म्हणजे देशातील, मुख्यत्वेकरुन बंगालमधील १८५३ ते १९४३ पर्यंतचे भीषण दुष्काळ.

या कालावधीमधे भारतात दुष्काळांत लाखो लोक मरण पावले. १८६० मध्ये वायव्य सरहद्द प्रांत येथे पाऊसाचे प्रमाणे कमी झाल्यामुळे दुष्काळ पडला. सन १८६६-६७मध्ये ओरिसा मद्रास व बंगाल येथे मोठ्या प्रमाणावर दुष्काळ पडला. या दुष्काळात जवळजवळ १३ लाख लोक मरण पावले. पावसाचे अत्यल्प प्रमाण हे एक प्रमुख कारण यामागे होते. ब्रिटीश शासनाने सुमारे १०,००० टन तांदूळ या दुष्काळावर मात करण्यासाठी आयात केला. पण तोपर्यंत फार उशीर झाला होता. दुष्काळ व कॉलेरा अशा दुहेरी संकटात लोक सापडले होते. दुष्काळाविषयक संकटांचा मागोवा घेण्यासाठी व प्रतिबंधात्मक उपाय थोपवण्यासाठी शासनाने स्वतंत्र आयोग नेमला. तथापि या उपाययोजना अपूर्ण ठरल्या.

**१८७३ ते १८७४चा दुष्काळ :** बिहारमध्ये १८७३च्या सुमारास भीषण दुष्काळाने पुन्हा एकदा थैमान घातले. यावेळेस सर रिचर्ड टेम्पल यांनी आवश्यक त्या सर्व उपाययोजना राबवल्या. त्यामुळे वित्तहानी टळू शकली नसली तरी जिवितहानी मोठ्या प्रमाणावर झाली नाही. या उपाययोजनाचा पुरेसा अनुभव असतानाही १८७६ ते १८७८ च्या दुष्काळात शासनाने खबरदारी घेतली नाही त्यामुळे लोकांच्या हालअपेष्टांना पारावार राहीला नाही.

**१८७६ ते १८७८च्या दुष्काळ :** भारतामध्ये १८७६च्या दुष्काळाने मोठ्या प्रमाणावर जिवितहानी झाली. मद्रास, म्हैसूर, हैदराबाद, पंजाब मध्ये दुष्कालक्षेत्र पसरले होते. जमिनीची लागवडही घटली. त्यामुळे अन्नधान्य उत्पादन आणखी घटले. सुमारे साडेपाच कोटी लोकांना याचा फटका बसला. उपासमारीचे प्रमाण भयंकर होते. बंगलोर, मद्रास इ. प्रांतात हाडांचे सापळे झालेले लोक दिसत असत. रिचर्ड टेम्पल यांच्या नेतृत्वाखाली दुष्काळ निवारण्याचे कार्य ब्रिटीश शासनाने सुरु केले. त्यांने दुष्काळग्रस्त लोकांना शिजवलेले अन्न व पैसे देण्याची सोय केली. टेम्पल याने अशा वेळेस काय करण्यात यावे यासंबंधीही सूचना केल्या. केन्द्रीय, प्रांतिक व स्थानिक संस्थांनी मिळून दुष्काळ निवारण्याचे कार्य करावे. जनावरांच्या रक्षणासाठी स्वतंत्र छावण्या उभारण्यात, दुष्काळग्रस्तांतील तंदुरुस्त लोकांना काम द्यावे व निर्बलांना विनामोबदला अन्नधान्य पुरवठा करावा. यासाठी अंदाजपत्रकातही विशिष्ट रक्कम निश्चित करण्यात आली होती.

**१८९६-९७च्या दुष्काळ :** हा दुष्काळ देशातील जवळजवळ सर्वच भागात पसरला होता. बुंदेलखंड प्रांतामधून दुष्काळाचे सावट सुरू झाले होते. ते मध्यप्रांत, मुंबई, मद्रास, पंजाब, राजपुताना इत्यादी प्रांतात पसरले. सुमारे साडेसहा कोटी लोकांच्या जीवनावर या दुष्काळाने परिणाम केला होता. दुष्काळसमवेतच मलेरिया व प्लेग यासारख्या रोगांनी मोठ्या प्रमाणावर लोकांचा बळी घेतला होता.

या दुष्काळाचा नैसर्गिक बाबींशी संबंध दिसत असला तरी सर्वच बाबतीत दुष्काळातील मनुष्यहानी ही अवर्षण, पूर यामुळे झालेली नव्हती. बंगालमधील दुष्काळाची दाहकता ही मानवनिर्मित होती. ब्रिटीशांच्या शेती विषयक धोरणांमुळे अन्नधान्ने पिके नाहीशी होऊन त्याची जागा नगदी पिकांनी घेतली होती. त्यामुळे साहाजिकच अन्नधान्याचा तुटवडा हे देखील दुष्काळातील मनुष्यहानीचे एक प्रमुख कारण होते. दुष्काळनंतर शेती व्यवस्था पूर्णपणे विस्कळीत होत असे. स्थलांतर व इतर कारणांमुळे शेती पूर्वपदावर येण्यास वेळ लागत असे. दुष्काळात अनेक शेतीच्या कामालागी लागणारे प्राणी मरण पावत असत. त्यामुळे दुष्काळानंतर अनेक संकटांना तोडं द्यावे लागत असे. ब्रिटीश शासनाने ह्या दुष्काळांना भारतातील वाढती लोकसंख्येला जबाबदार ठरवले होते. मात्र आर.सी.दत्त या आघाडीच्या इतिहासकाराने अभ्यासाअंती हे मत खोडून काढले आहे. इतर देशांच्या तुलनेत भारताचे क्षेत्रफळ मोठे होते व लोकसंख्यावाढीचा विचार करता इतर देशांपेक्षा ती जास्त प्रमाणात वाढल्याचे दिसून येत नाही. दुष्काळशी सामना करताना ब्रिटीश शासनाने तात्पुरत्या उपाययोजना केल्या परंतू मूलगामी अशी उपाययोजना त्यांनी राबवली नाही कारण भारतातून जास्तीत जास्त कर गोळा करणे व पैसा कमवणे हे याचे उद्दीष्ट असल्याने दुष्काळासारख्या आपत्तीवर जास्त खर्च करणे त्यांच्या साम्राज्यवाढी व्यवस्थेत बसत नव्हते.

ब्रिटीशांनी सुरु केलेल्या जमीन महसुल पद्धतींचा प्रमुख उद्देश हा शेतीचा कर प्रत्यक्ष पाहणी करुन वसूल करण्यापेक्षा आपली जबाबदारी टाळून कर गोळा करणे हा होता. त्यामुळे सरकार व शेतकरी यांच्यात सामंजस्य राहील नाही. जनतेच्या समस्यांपासून सरकार अलीप्त राहीले. ब्रिटीश शासनाला कायमधारा पद्धती, रयतवारी पद्धती व महालवारी पद्धती यातून भरपूर उत्पन्न मिळाले पण सामान्य शेतकरी मात्र देशोधडीला लागला.

## ६.७ आर्थिक वहनाचा सिद्धांत

ब्रिटीश वसाहतीची स्थापना हीच मुळी आर्थिक प्रेरणेतून झाली असल्याने इस्ट इंडिया कंपनीने भारतातून मोठ्या प्रमाणावर संपत्तीचे वहन केले. प्राचीन काळी व मध्ययुगीन काळात अनेक आक्रमकांनी भारतातील संपत्तीची लूट केली होती. परंतू ब्रिटीशांनी केलेल्या आर्थिक लूटीमध्ये एक सुव्यवस्थित पद्धती होती. त्यामुळे दरवर्षी नित्यनियमाने भारतातील संपत्तीचे अभिसरण इंग्लंडला होऊ लागले. ब्रिटीशांनी विविध मार्गाने येथील पैसा नेला. भारत सरकारच्या कर्जावरील व्याज, लष्करी खर्च, वाहतूक, युद्धखर्च, प्रशासकीय खर्च इत्यादींच्या नावे भारतातील संपत्तीचे वहन सुरु झाले. १७५७ प्लासीच्या लढाईनंतर सुरु झालेले हे संपत्तीचे वहन देशास स्वातंत्र्य मिळेपर्यंत अव्याहतपणे सुरु होते.

इस्ट इंडिया कंपनीला बंगालच्या दिवाणी मिळाल्यापासून कंपनीकडे प्रचंड मोठ्या प्रमाणावर पैसा जमा झाला. या देशातून भारतातील कच्चा माल मोठ्या प्रमाणात खरेदी केला जाई. याशिवाय कंपनीच्या नोकरांवरील पगार, निवृत्तीवेतन याचा खर्चही यामधुन भागवला जात.

कार्लमार्क्सने भारताविषयी लिहिलेल्या निबंधात ''ब्रिटीश वसाहतवादामुळे भारतावर झालेल्या अनिष्ट आर्थिक परिणामांचे'''' विश्लेषण केले होते. रामकृष्ण विश्वनाथ यांनी १८४३साली एका निबंधात मुस्लीम राज्यकर्त्यांपेक्षा इंग्रजांची आर्थिक पिळवणूक घातक असल्याचे उदाहरणासहित पटवून दिले होते. डॉ. आत्माराम पांडुरंग तर्खडकर यांनी देखील आर्थिक वहन टाळण्यासाठी स्वावलंबनाचा उपाय सुचविला होता. भारतीय विचारवंतापैकी दादाभाई नौरोजी यांनी ब्रिटीश भारताचे शोषण कोणत्या मार्गाने करीत आहेत याची जाणीव झाली. भारतातील संपत्तीचे वहन याची कारणे भारतीय राष्ट्रवादी नेत्यांनी शोधून काढली. दादाभाई नौरोजी यांनी सखोल अभ्यास करुन या वहनाचे स्वरुप मांडले. भारतातील गोळा केलेला कर, शेतीमाल व खनिज संपत्तीचा इंग्लंडमधील उद्योगधंदयांना होणारा उपयोग हा आर्थिक वहन सिद्धांताचा मूळाधार होता.

### ६.७.१ दादाभाई नौरोजी यांच्या आर्थिक वहन सिद्धांत –

भारतातील पहिल्या फळीतील राष्ट्रवादी नेत्यांपैकी दादाभाई नौरोजी यांनी ''भारतातील दारिद्र्य आणि भारतातील अब्रिटीश राज्य" (१९०१) नावाचा ग्रंथ लिहून त्यामधे भारतातील गरीबी ही ब्रिटीशांच्या नियोजित आर्थिक धोरणांमुळे असल्याचे सविस्तरपणे दाखवून दिले. ब्रिटीशांनी सुमारे २९९ ते ३०० दसलक्ष पौंडांची संपत्ती भारतातून इंग्लंडला नेल्याचे प्रतिपादन केले. दादाभाईंचा हा सिद्धांत पुढे आर.सी.दत्त व न्यायमूर्ती रानडे यांनी पुढे नेला.

दादाभाई यांनी हा सिद्धांत १८७१मधे ईस्ट इंडिया फायनान्स कमिटी समोर मांडला. यामधे त्यांनी पुढील गोष्टी मांडल्या.

(१) अंतर्गत वहन : भारतामधे सर्वकष ब्रिटीश राजवट असल्याने भारतातील आर्थिक साधने, औद्योगिक विकास यावर ब्रिटीशांचे वर्चस्व होते. यामुळे ब्रिटीश अधिकाऱ्यांचे वेतन, निवृत्तीवेतन, बक्षिसी इत्यादी खर्च भारताच्या तिजोरीतूनच केला जात असे. ब्रिटीशांचे जगभरातील साम्राज्य विस्तारासाठी भारतातील आर्थिक लूटीचा उपयोग केला जात असे. पुढे ब्रिटीश शासनाने होम चार्जेसच्या नावाखाली हीच लूट कशी सुरु ठेवली याची माहीती आर.सी.दत्त यांनी दिली आहे.

| वितरण | खर्च |
| --- | --- |
| (१) व्याज व कर्ज | ३,०५२,४१० |
| (२) इरतारी यंत्रणा | २२२,२८८ |
| (३) रेल्वे खर्च | ६,४१६,३७३ |
| (४) लोकोपयोगी कामे | ५१,२७४ |
| (५) नौसेना खर्च | १७३,५०२ |
| (६) लष्करी खर्च | २,९४५,६१४ |
| (७) संरक्षण खर्च | २,०५७,९३४ |
| एकूण : | १७,३५९,७०५ |

(१९०१-०२ मधील आकडेवारी)

**बहिर्गत आर्थिक वहन** – दादाभाई यांनी ब्रिटीशांनी केलेल्या आर्थिक वहनाची तुलना मुहमद गजनीच्या स्वाऱ्यांशी केली आहे. यांच्या मते गझनीच्या स्वाऱ्यांपेक्षा ब्रिटीशांनी अधिक प्रमाणात भारताची आर्थिक लूट केली होती. विविध सुविधा परकीय खर्चफेड तसेच वसाहतींच्या व्यवस्थापनासाठीचा खर्च हा भारताकडूनच वसूल केला जात होता. त्यामुळे वर्षाअखेर सुमारे ३ पौंड संपत्तीचे वहन सुरु होते.

१) ब्रिटीशांचे व्यापारी धोरण : ब्रिटीश हे भारतात व्यापारी म्हणूनच आले होते. राज्यकर्ते बनल्यावरही त्यांनी व्यापारी वृत्तीमुळीच सोडली नव्हती. उलट राजकीय सत्तेचा उपयोग ते व्यापारासाठीच करुन घेत असत. इंग्लडमधील औद्योगिकरणासाठी भारतातून स्वस्ता कच्चा माल इंग्लडला पाठविला गेला. इंग्लंडमधील कारख्यान्यातील पक्का माल भारतात व इतर वसाहतीत विकला जाऊ लागला. कच्च्या मालाची किंमत व पक्या मालाची किंमत यामधे भयंकर तफावर होती. त्यामुळे आपोआपच भारतातील संपत्ती इंग्लंडला जात होती.

२) युद्ध खर्च : ईस्ट इंडिया कंपनी व ब्रिटीश सरकारने केलेल्या विविध युद्धाचा खर्चही भारताच्या तिजोरीतून केला जात होता. मराठा युद्धे, म्हैसूर युद्ध या खेरीज ब्रह्मी युद्ध व इतर देशांसोबत केले गेलेल्या युद्धाचा खर्चही भारतावर पडत होता. भारतातील सैन्यबल व लष्करी ताकद ही बाहेर वापरली जात होती.

३) ईस्ट इंडिया कपनीने इंग्लडंला अनेक गोदामे खरीदी केली होती. ही गोदामे विकत घेताना भारतीय तिजोरीतुनच पैसा खर्च केला जात होता.

४) भारतीय मजुरांकडून चहाचे मळे व नीळ मळे येथे स्वस्तात काम करुन घेतले जाई. त्यामधे कमीत कमी पैसे खर्च करुन पुढे नीळ व चहा इंग्लडमंध्ये पाठवला जाई. तेथे पक्का माल म्हणून त्याची विक्री म्हणून भारतासारख्या इतर देशात केली जाई. यामधून कंपनीला व १८५७ नंतर ब्रिटीश सत्तेला प्रचंड नफा होत होता.

अशा रितीने आर्थिक वहनाची व्याप्ती प्रचंड मोठी होती. अमृत बझार पत्रिका या तत्कालीन नियमकालिकाने आपल्या १४ एप्रिल १८८१ च्या अंकात आर्थिक वहनात समाविष्ट असलेली उत्पादनांची यादीच दिली होती. प्लासीच्या लढाईनंतर नाणी, सोने, व इतर मौल्यवान व वस्तूंच्या द्वारे बंगालमधून प्रत्येक वर्षी ९८,८२,३५९ रुपयांचे वहन इंग्लडला होत असे.

विल्यम डिग्बी यांच्या मते १७५७ ते १८१५ या कालावधीत सुमारे शंभर दशलक्ष पाऊंड एवढ्या संपतीचे वहन भारतातून इंग्लंडला झाले. आर.सी.दत्त यांच्या मते भारतातून गोळा करण्यात आलेल्या करांपैकी सुमारे एक चतुर्थांश हिस्सा आर्थिक वहनाद्वारे इंग्लंडला जात होता.

### ६.७.२ आर्थिक वहनाचे परिणाम

भारतातील गरीबी ही ब्रिटीशांच्या आर्थिक धोरणांमुळे आली आहे. हे दादाभाई यांनी सप्रमाण दाखवून दिले. या आर्थिक लूटीचे परिणामही दादाभाई नौरोजी, आर.सी.दत्त व न्यायमूर्ती रानडे यांच्या लिखाणात पहावयास मिळतात.

(१) भारतीय उद्योगधंद्यांचा ऱ्हास : ब्रिटीशांच्या आर्थिक वहन नितीमुळे भारतीय उदयोगधंदे बुडीत निघाले. भारतीय मालावर कबर जकात बसवल्याने त्यांची किंमत वाढली. याउलट परदेशातून येणाऱ्या पक्या मालावर तुलनेने जकात कमी केली गेली. त्यामुळे इंग्लंडमधील औद्योगिक कारखान्यांच्या नफ्यात वाढ झाली तरी भारतीय उद्योगधंदे नष्ट झाले.

(२) भारतातून केल्या गेलेल्या आर्थिक वहनाच्या जोरावर इंग्लंडमधेही उदयोगधंदयांना आयतेच भांडवल मिळत होते.

(३) भारतातील दरिद्रय व बेकारी वाढत चालली होती.

(४) बंगालमधील भयंकर दुष्काळ हा नैसर्गिक नसून ब्रिटीशांच्या आर्थिक वहनाचा एक भीषण परिणाम होता. कारखानदारीसाठी भारतीय शेतकऱ्यांनी अन्नधान्य उत्पादनाऐवजी नगदी पिके लावण्यास प्रवृत्त केले गेले. शक्य तेथे बळाचा वापर केला गेला. त्यामुळे एकंदरीत लोकसंख्येस पुरेल एवढेही अन्नधान्याचे उत्पादन झाले नाही. नगदी पिकांचा उपयोग इंग्लंडमधील कारखानदारीस झाला.

ब्रिटीशांनी भारतातील राजकीय स्थितीत हस्तक्षेप केल्यानंतर भारताची आर्थिक पिळवणूक करण्याचे कार्य पद्धतशीरपणे सुरु केले. भारतातील कच्चा माल स्वस्तात निर्यात करुन, ब्रिटीश औदौगिक क्षेत्रातून पक्का माल भारतात विकण्यात आला. याचीच परिणीती म्हणून भारतातील संपत्ती आपोआप इंग्लंडला जावू लागली. दादाभाई नौरोजींनी आपल्या लिखाणातून ही लूट दाखवून दिली. पुढे भारतीय राष्ट्रवादी विचारांचा वारसा हा आर्थिक पिळवणूकीचाच परिणाम असल्याचे दिसून आले.

### आपली प्रगती तपासा

१) दादाभाई नौरोजी यांचा 'आर्थिक वहन' सिद्धांत स्पष्ट करा.

## ६.८ निरौद्योगिकरण व आधुनिक उद्योगधंद्याचा विकास

अठरावे शतक हे इंग्लडमधील औदयोगिक क्रांतीच्या वैभवाचे शतक होते. १७व्या शतकात सुरू झालेल्या औद्योगिक क्रांतीचा विकास १८व्या शतकाच्या मध्यापर्यंत झाला होता. त्यातच १७५७ च्या प्लासीच्या लढाईनंतर या औद्योगिकरणासाठी लागणारा कच्चा माल स्वस्तात मिळण्याची सोय झाली होती. भारतातील लघुउद्योग व हस्तोद्योग मोडीत काढल्याशिवाय ब्रिटीशांना त्यांच्या कारखान्यांच्या उत्पादनांना वाव देणे सहज सोपे नव्हते. त्यासाठी त्यांना भारतातील प्रमुख कापडउद्योग व हस्तोद्योग यांचे निरौद्योगिकरण गरजेचे होते.

### ६.८.१ निरौद्योगिकरण :

औद्योगिकरण म्हणजे उद्योगधंदे व कारखाने यांचा विकास अगदी याच्याच उलट निरौद्योगिकरण म्हणजे अस्तित्वात असलेल्या उदयोगधंद्यांचा विनाश घडवून आणणे. भारतातील कुटीरउदयोग, हस्तोद्योग व कापडउद्योग हा अत्यंत भरभराटीस आलेला होता. भारतात उत्तम प्रतीचे कापड तयार होत असे. भारतीय कापडाला युरोपमध्ये मागणी होती. भारतात ईस्ट इंडिया कंपनीची राजवट स्थापन होण्याआधी भारतीय उदयोग हे प्रगतीपथावर होते. पण एकोणीसाव्या शतकाच्या सुरुवातीस ब्रिटीशांनी राबवलेल्या राजकीय व आर्थिक धोरणांमुळे भारतीय उदयोगधंद्यांना उतरती कळा आली. ब्रिटीश उद्योगधंद्यांचे हितसंबंध जोपासण्याच्या वृत्तीने भारतातील उद्योगधंदे बंद पडले याच प्रक्रियेला निरौद्योगिकरण म्हटले जाते.

ब्रिटनमधील पक्का माल भारतात आल्यावर त्याला भारतीय उद्योधंद्याशी आधी तीव्र स्पर्धा करावी लागत होती ब्रिटीशांनी राबवलेल्या धोरणांमुळेच भारतीय उदयोगच बंद पडल्यामुळे आता ब्रिटीश कारखान्यातील माल भारतात सहजपणे विकला जाऊ लागला. कारागीर बेरोजगार झाल्याने ते शेतीकडे वळले पण कायमधार पद्धतीमुळे शेतीची आधी दुर्दशा झाली होती. ब्रिटीशांच्या कपटनीतीमुळे हातमाग, कापडउद्योग, सोने चांदी दागिन्यांचे उदयोग असे सर्वच उद्योगांना ओहोटी लागली.

### (१) ब्रिटीशांचे आपमतलबी आर्थिक धोरण :

भारतात ब्रिटीशांनी स्थापन केलेल्या राजकीय सत्तेचा उपयोग करुन स्थानिक उद्योगांना घातक असे आर्थिक धोरण अंमलात आणले. इंग्लंडमधील कारखान्यांना लागणारा कच्चा माल पुरवणारा देश म्हणून ते भारताकडे पहात असत. भारतातून ज्या वस्तू निर्यात केल्या जात असत त्यावर जबर कर लादल्यामुळे विक्रीमूल्य वाढले परिणामी त्याची विक्री कमी होवू लागली. याउलट इंग्लंडच्या कारखान्यातून तयार होणाऱ्या मालावर भारतात कमीत कमी शुल्क आकारले जाई. त्यामुळे भारतातदेखील भारतीय बनावटीच्या मालापेक्षा ब्रिटीशांचा माल व उत्पादने स्वस्त झाल्या. त्याचाच परिणाम म्हणून भारतीय उत्पादकता घटली. भारतातील बाजारपेठा ब्रिटीश उत्पादनांनी गजबजल्या. यातच इंग्रजांनी कुशल वस्त्रे विकणाऱ्या विणकरावरही अत्याचार केले. त्यांना त्रास दिला. त्यामुळे त्यांनी उत्पादन थांबवले. निरौद्योगिकरणांचे सर्वात महत्वाचे कारण हेच बनले.

**(२) भारतातून कच्चा मालाची निर्यात :**

ब्रिटनमधील उद्योगधंद्याना कच्च्या मालाची नितांत आवश्यकता होती. इंग्लड हा आकाराने छोटा देश असल्याने त्या देशातून कारखान्यासाठी लागणाऱ्या कच्च्या मालाची पूर्तता होणे शक्य नव्हते. भारत मात्र कृषीप्रधान देश असल्याने कापूस, चहा, नीळ व इतर नगदी पिके सहजपणे येत. खनिज संपत्तीदेखील भारतात उपलब्द होती. ब्रिटीशांनी याच कच्च्या मालाचा उपयोग करुन इंग्लंडमधील कारखान्यात पक्का माल तयार केला व तोच भारतीय बाजारपेठेत विकला. त्यांना उपलब्ध झालेल्या कच्च्या मालाची किंमत व बाजारपेठेत त्यांना मिळालेला नफा यात फार मोठी तफावत होती त्यामुळे त्यांचे भाग भांडवल वाढत गेले व भारतीय उदयोग त्यांच्यापुढे टिकू शकले नाहीत.

**(३) दळणवळणाची साधने :**

भारतामधे ब्रिटीशांनी व्यापारी म्हणून आपले चांगले बस्तान बसवले होते. समुद्रावरुन त्यांच्या नौसेनेचे वर्चस्व होते त्यामुळे भारतातील कच्चा माल इंग्लडपर्यंत नेणे व तेथील पक्कामाल भारतीय बाजारपेठेत आणणे त्यांना सहज शक्य होते. याशिवाय त्यांनी मालाची वाहतुक सुरळीत होण्यासाठी भारतातही चांगले रस्ते तयार केले. खेडोपाडयातील शेतीमधील कच्च्या मालाची ने आण करण्यासाठी खेडे शहरांना जोडली. त्यामुळे त्यांना व्यापार करण्यात कोणतीही अडचण येत नव्हती. रस्ते, कालवे, रेल्वेमार्ग इत्यांदींचे जाळे विणले गेल्यामुळे अनेक उदयोगांच्या विकासाला चालना मिळाली. भारतीय उदयोग या अत्याधुनिक उपायांपुढे टिकाव धरु शकले नाहीत. भारतातील हातमाग व इतर लघुउद्योगांना भारतीय राजे व इतर सत्ता अशा प्रकारचे सहाय्य करु शकल्या नाहीत. त्यामुळे त्यांचे निरौद्यौगिकण झपाट्याने घडून आले.

**(४)** इंग्लडमधील औद्योगिक क्रांती युरोपमध्ये व प्रामुख्याने इंग्लडमध्ये १८वे शतक हे औद्योगिक क्रांतीचे युग होते. तेथे धावता धोटा, स्पिन्नींग जेनी, स्पिनींग म्यूल अशा विविध कापड यंत्रांचे शोध लागले होते. त्यामुळे कमीत कमी मनुष्यबळ वापरुन जास्तीत जास्त उत्पादन करणे शक्य झाले होते. विज्ञानातील प्रगतीमुळे आधुनिक कारखानदारीने वेग घेतला होता. कमी वेळात चांगल्या दर्जाची उत्पादने बाजारपेठेत उपलब्ध होऊ लागली. भारतात मात्र अशा कोणत्याही प्रकारची औद्योगिक प्रगतीचा मागमूस नव्हता त्यामुळे इंग्लंडमधील औद्योगिकरणाच्या तुलनेत भारतातील हातमाग व इतर उद्योग टिकणे शक्य नव्हते.

**(५) आधुनिक शिक्षण प्रणालीचा अभाव :**

भारतात आधुनिक शिक्षणाची कोणतीही सोय नव्हती. इंग्लंडमध्ये त्या शिक्षणाचा फायदा घेऊन अनेक शोध लागले व यंत्रे निर्माण झाली. भौगोलिक ज्ञान वाढल्यामुळे लोक प्रवास करू लागले. भारतातही कालांतराने आधुनिक शक्षण सुरु झाल्यावर दादाभाई नौरोजी व न्यायमूर्ती रानडे यांनी औद्योगिकरणाविषयी विचार मांडले.

### ६.८.२ निरौद्योगिकरणाचा परिणाम

**(१) भारतीय कापड उद्योगाला ओहोटी लागली :** भारतातील कापड हे उत्कृष्ट दर्जाचे होते. जगभरात त्याला मागणी होती. ढाका येथील मलमल प्रसिद्ध होती. पण ब्रिटीशांच्या मतलबी आर्थिक धोरणांमुळे कापड उद्योग बुडीत निघाला व कारागीर बेरोजगार झाले. त्यांना संरक्षण देण्यास अंतदेशीय सत्ता समर्थ नसल्याने त्यांच्या हालांना पारावार उरला नाही. कापड उद्योगाखेरीज अनेक छोटेमोठे हस्तोद्योग व कुटिरोद्योगही बंद पडले.

**(२) भारतीय संपत्तीचे वहन :** भारतातील उदयोगधंदे बंद पडल्यामुळे भारतातील बाजारपेठेत ब्रिटीश उत्पादने दाखल झाली. भारतातून निर्माण होणारा कच्चा माल व भारतात ब्रिटीशांती आयात केलेला पक्का माल यांच्या किमतीत प्रचंड तफावत होती. ही तफावत म्हणजेच इंग्लंडला झालेले भारतीय संपत्तीचे वहन होते.

**(३) नागरीकरण वाढले :** भारतातील वस्त्रोद्योग व कुटीरोद्योग हे खेड्यात वसलेले होते पण निरौद्योगिकरणामुळे कारागीर बेकार झाल्याने ते शहरांकडे स्थलांतरीत झाले. त्यामुळे देशाची नागरीकरणाकडे वाटचाल सुरु झाली.

**(४) दारीद्र्य वाढले :** निरौद्योगिकरणामुळे हजारो कारागीर बेकार झाले होते. त्यांच्यासमोर शेतीशिवाय कोणताही पर्याय नव्हता. त्यातच शेतीची ब्रिटीशांनी लूट केली होती त्यामुळे समाजात बेकारीचे प्रमाण प्रचंड वाढले होते. परिणामी दारिद्रय वाढले होते वस्तु विनिमय पद्धतीची उपयुक्तता संपुष्टात येत चालली होती व पैसा हेच मुख्य चलन बनत चालले होते.

**(५) परंपरागत अर्थव्यवस्थेचा नाश :** निरौद्योगिकरणामुळे भारतातील स्वयंपूर्ण खेडेदेखील संकटात सापडले होते. भारतातील खेड्याची स्वयंपूर्णता व लघुउद्योग हे एकमेकांना पूरक होते. ब्रिटीशांच्या आर्थिक धोरणामुळे कृषी, भारतातील उद्योग दोघांचेही जबर नुकसान झाले.

भारतामधील आधुनिक उद्योगधंद्यांचा विकास ब्रिटीशांचे भारतातील आगमन हे व्यापारी म्हणून झाले होते. व्यापार करतानाच राजकीय परिस्थितीचा अंदाज घेऊन त्यांनी आपले वर्चस्व वाढवले व भारत ब्रिटीशांची राजकीय वसाहत बनला. परंतू ब्रिटीश हे मुळातच व्यापारी वृत्तीचे असल्याने व त्यांच्या देशात औद्योगिक क्रांतीने वेग पकडल्यामुळे त्याचा परिणाम भारतावर होणे अपरिहार्य होते. भारतातही आधुनिक उदयोधंदे ब्रिटीश कालावधीत उभे राहीले. त्याची कारणमीमांसा पुढीलप्रमाणे करता येईल.

**आपली प्रगती तपासा**

१) निरौद्योगिकरण ही संकल्पना स्पष्ट करा.

### ६.८.३ भारतातील आधुनिक उद्योगधंदे

(१) भारतीय लघुउद्योगांचा ऱ्हास : ब्रिटीशांनी त्यांच्या आर्थिक फायद्यासाठी राबवलेल्या धोरणांमुळे अनेक भारतीय लघुउद्योग नाश पावले होते. हस्तोद्योग बंद पडले होते. त्यामुळे आर्थिक पोकळी तयार झाली होती. आधुनिक उद्योगधंद्यासाठी बेरोजगार मजूर व बाजारपेठ उपलब्ध होतीच.

(२) परंपरागत अर्थव्यवस्थेचा नाश : भारतातील अर्थव्यवस्था ही स्वयंपूर्ण अशी शेती व गावाशी निगडीत होती. ब्रिटीशांही ही व्यवस्थाच व्यापारी केन्द्रीय केली होती त्यामुळे औद्योगिकरणासाठी त्यांना कच्चा माल मिळणे शक्य झाले होते. पारंपारीक अर्थव्यवस्थाही धोक्यात आली असल्याने अनेक बेरोजगार शेतकरी व कारागीर स्वस्तात आधुनिक कारखान्यात काम करायला तयार होते.

(३) दळणवळण सुविधांचा विकास : ब्रिटीश कालावधीत भारतातील अनेक खेडी व शहरे व बंदरे दळणवळणाच्या सोयीने एकमेकांना जोडली गेली. आधुनिक उद्योगधंद्यात कच्चा मालाचे पक्या मालात रुपांतर करुन तो बाजार पेठेत नेणे यासाठी पक्के रस्ते व चांगली दळणवळण आवश्यक होते. ब्रिटीशांनी आधुनिक कालात पक्के रस्ते बांधले व रेल्वेमार्गही सुरु केला. याबाबी उद्योगांसाठी उपयुक्त ठरल्या.

(४) आधुनिक शिक्षण : भारतात ब्रिटीशांनी प्रथमच आधुनिक शिक्षणाचा पाया घातला. त्यांचा हेतूच शिक्षित कामगार मिळवणे हा होता. त्यांच्या शिक्षणाने जीवनाशी संबंध नसणाऱ्या प्राचीन मौखिक अर्थशून्य पाठांतर पद्धती नाहीशी होऊन जीवनाच्या विकासाला उपकारक असे विज्ञान व गणित हे विषय शिकवले जाऊ लागले. एकंदरीतच भारतीयांनाही आधुनिक कारखान्यात काम करता येण्याजोगे व त्यात प्रगती करण्या सारखे ज्ञान मिळू लागले. याचाचा उपयोग करुन भारतीय उद्योजकांनी देखील तंत्रज्ञान, दळणवळण व व्यवस्थापन या उद्योगाशी संबंधित बाबींमध्ये प्राविण्य मिळवले.

(५) औद्योगिक केन्द्रे निर्माण झाली : औद्योगिकरणासाठी आवश्यक असणारी केन्द्रे ब्रिटीशांच्या व्यापार विषयक धोरणांमुळे उदयाला आली. मुंबई, पुणे, कानपूर, अहमदाबाद कलकत्ता यासारखी नवीन शहरे व बंदरे औद्योगीकरणाचा कणा बनली.

(६) भांडवलदारांचा उदय : औद्योगिकरणासाठी मोठ्या प्रमाणावर भांडवल आवश्यक असते. ब्रिटीश व्यापाऱ्यांनी भारतासोबत केलेल्या व्यापारामुळे पुष्कळ भांडवल जमा केले होते. ब्रिटीश भांडवलदार भारतातील उदयोगांमध्ये पैसा गुंतवणुक करण्यास उत्सुक होते. भारतातील जमीनदार व व्यापारीवर्ग भांडवल पुरवठा करण्यास तयार होता.

(७) ब्रिटीशांनी पूर्ण भारताचे राजकीय एकीकरण केल्यामुळे त्यांचा एकछत्री अंमल देशावर सुरु झाला. आधुनिक भांडवलशाहीस व उद्योगधंद्यासाठी अशा एकछत्री अंमलामधे पोषक वातावरण असते. संपूर्ण देशात एकच कायदा असल्याने उद्योगधंद्यांना विविध प्रादेशिक सत्तांशी काहीही घेणे देणे नव्हते. भारतातील नैसर्गिक साधनसंपत्तीचा उपयोग करणेही त्यांना सोपे गेले.

### ६.८.४ भारतातील प्रमुख उद्योगधंदे

भारतामध्ये अनेक उद्योगधंदे सुरु झाले असले तरी कापडउद्योग, ताग उद्योग, लोहपोलाद उद्योग या क्षेत्रामध्ये जास्त तेजी दिसून येत होती.

(१) कापडद्योग : कापडउद्योगामधे आधुनिक कारखानदारीने मुंबईमधे जम बसवला. भारतातील पारशी उद्योगपती कावसजी दावर यांच्या प्रयत्नातून १८५४मधे दि बॉम्बे स्पिनिंग ॲण्ड विव्हिंग कंपनी स्थापन झाली. १८६५ च्या सुमारास मुंबईत सुमारे १० कापडगिरण्या सुरू

झाल्या. मुंबईमधे भारतातील कापूस मोठ्या प्रमाणात येऊ लागला. १८८७पर्यंत अहमदाबाद, नागपूर, सोलापूर इत्यादी शहरामध्येही कापड उद्योग सुरु झाले.

(२) खाण व लोह-पोलाद उद्योग : भारतामधे नेसर्गिक साधनसंपती विपुल प्रमाणात उपलब्ध होती. भारतात अनेक ठिकाणी लोह कोळसा यांचे साठे होते. १७४४मधे ब्रिटीशांनी कोळसा खाण उद्योगात पाय रोवण्याचे प्रयत्न केले १८१५ मधे बिहार, ओरिसा या प्रांतामधे ब्रिटीशांनी कोळसा खाणी सुरु केल्या. पुढे रेल्वे सुरु झाल्यावर येथील कोळश्यांच्या खाणींना महत्व आले. भारतातून उच्च प्रतीच्या कोळसा निर्यातही होऊ लागला. बंगाल, ओरीसा व बिहार प्रांत या खाणीसाठी प्रसिद्ध बनला. ब्रिटीशांनी औद्योगिकरणासाठी भारतातील कोळशाचा पुरेपुर वापर केल्याचे दिसते.

भारतामध्ये औद्योगिकरणाच्या या लाटेपूर्वी लोहउद्योग अस्तित्वात होता पण ब्रिटीशांच्या व्यापारी धोरणामुळे त्याला आणखी चालना मिळाली. अवजारे, शस्त्रास्त्रे, यंत्रसामग्री व वाहतुकीची साधने अशअ विविध टीकाणी लोह व पोलादाची आवश्यकता असते. आधुनिक काळात १८३०मधे जे. एम. होथ याने १८३०मधे पहिला लोहउद्योग सुरू केला. पण त्याला अपेक्षित असे यश मिळाले नाही. १८७५मधे बंगालमधे एक लोहकारखाना सुरु झाला. या पार्श्वभूमीवर जमशेटजी टाटा यांचे मोठ्या हिमतीवर १९०७मधे टाटा आर्यन ॲण्ड स्टील कंपनी जमशेदपूर येथे स्थापन केली व लोहउद्योगाची मुर्हूतमेढ रोवली. या कंपनीने सर्व अडचणींवर मात करीत लोह उद्योग यशस्वीपणे उभा केला. या कंपनीने भारतीय रेल्वेला पोलादी रूळ पुरवले.

(३) ताग उद्योग : भारतामधे असलेली सुपीक जमीन तागाच्या पिकासाठी उपयुक्त होती. तागापासून गोणपाट बनवण्याचा उद्योग भारतात हस्तोद्योग रूपात होता परंतू ब्रिटीशांनी त्याचे रुपांतर आधुनिक कारखानदारीत केले बंगालमधे अनेक शेतकऱ्यांना ताग उत्पादने घेण्याची सक्ती ब्रिटीशअंनी केली होती. त्यामुळे तागाचे भरपूर उत्पादन होत होते. याचा फायदा घेत १८५५मधे भारतात ताग गिरणीची सुरुवात झाली. पुढे अनेक ठिकाणी ताग गिरण्या उभ्या राहिल्या.

(४) नीळ व चहाउद्योग : निळ या पिकापासून कपड्यांना रंग देण्याचे उत्पादन सुरु केले गेले. बंगालमधे हे नीळ उत्पादनामुळे जमीन मोठ्या प्रमाणावर नापीक झाल्या त्यामुळे शेतकऱ्यांनीह हे उत्पादन थांबवले. त्यामुळे उद्योगजकांनी चहा व कॉफी उद्योगांकडे मोर्चा वळवला. आसाम, बंगाल व दक्षिण भारतामधे डोंगर उतारावर चहाचे म्ले उभारले गेले त्यातून या उदयोगांना भरपूर नफा मिळाला. मात्र सर्वसामान्य जनतेला याचा फारसा उपयोग झाला नाही.

### आधुनिक उद्योगधंद्याचे भारतावरील अनुकूल परिणाम :

(१) भारताचे आधुनिकीकरण : भारतामधील परंपरागत अर्थव्यवस्था ब्रिटीशांपूर्वी मूलगामी बदलांपासून अनभिज्ञ राहीली. ब्रिटीशांच्या कारखानदारीच्या धोरणामुळे प्रथमच भारताचे औद्योगिकीकरण सुरु झाले. यामुळे आधुनिक बँकप्रणाली, व्यापार उद्योग व देशाची औद्योगिक प्रगती सुरू झाली. मध्ययुगीन मानसिकतेतून बाहेर पडून भारतामधे आधुनिकीकरणाचे वारे वाहू लागले.

(२) दळणवळण सुविधा : दळणवळण सुविधा हा आधुनिक उद्योगधंद्याचा पाया आहे. औद्योगिकरणासाठी दळणळणाच्या सुविधा असणे अगत्याचे असते. त्यामुळे आदुनिकरणामुळे भारतात दळणवळणाच्या सुविधा मोठ्या प्रमाणावर वाढल्या. देशातील लक्षावधी खेडी-तालुके व जिल्हे एकमेकांना जोडले गेले.

(३) जातिव्यवस्थेस हादरा : आधुनिकीकरणाच्या क्षेत्रात कारखान्यात सर्व कामगारांनी एकाच नियमाखाली काम करणे अपेक्षित होते. त्यामुळे भारतातील 'जातिनुसार काम" हे तत्व कमी होण्यास मदत झाली. अनेक जातीची माणसे एकाच उद्योगधंद्यात काम करु लागली. सरंजामशाही मानसिकतेतील हा बदल औद्योगिकरणाने घडवून आणण्यास मदत केली.

**आधुनिक उद्योगांचे भारतावरील प्रतिकूल परिणाम :**

**(१) पारंपारिक सुती उद्योगांना टाळे लागले :** भारतातील ब्रिटीशाकालीन उद्योगधंद्यांना उभारी मिळाली. परंतू पारंपारिक भारतीय सुती उद्योगाला त्यामुळे टाळे लागले. भारतातील कापड हे जगप्रसिद्ध होते. ते कापड तयार करणाऱ्या कारागिरांचा उद्योगच नष्ट झाला. ते आता मोठमोठ्या उद्योगधंद्यामधे कामगार म्हणून काम करू लागले. त्यांचा नफा कायमचा नाहीसा झाला. आता पगारी नोकर या रुपातच त्यांची ओळख तयार झाली.

**(२) भारतीय संपत्तीचा विनियोग इंग्लंडसाठी :** भारतात आधुनिक उदयोगधंदे सुरु झाले खरे पण त्यांची मालकी प्रामुख्याने ब्रिटीशांकडेच होती त्यामुळे उद्योगातील नफ्याचा हिस्सा इंग्लंडला जात असे. भारतीय अर्थव्यवस्थेत त्याचे स्थान नगण्य होते.

**(३) कच्चा माल कवडीमोलभावाने निर्यात :** भारतीय कच्चा माल इंग्लंडला जाऊ लागला. कोळसा उद्योगामध्ये सुरुवातीच्या काळामधे कोळशाची निर्यात इंग्लंडला होत असे. कोळशाच्या खाणीमुळे स्थानिक लोकांना अत्यल्प दराचा रोजगार मिळाला परंतू भारतीय वनसंपत्तीवर त्याचा प्रतिकूल परिणाम झाला.

**आपली प्रगती तपासा**

१) ब्रिटीशकालीन भारतातील प्रमूख उद्योगधंद्याची माहिती सांगा.

## ६.९ सारांश

भारतामधले ब्रिटीश आगमनावेळेस भरभराटीस असलेले लघुउद्योग निरऔद्योगिकरणा धोरणामुळे नष्ट पावले. भारतीय कारागीर बेरोजगार झाले व त्याचे पर्यवसन ब्रिटीश उदयोगधंद्यांच्या विकासात झाले. भारतीय उद्योग नष्ट पावल्यामुळे बाजारपेठेत इंग्लंडमधील माल सहजपणे खूप लागला. तसेच औद्योगिक क्रांतीची पार्श्वभूमी व उपलब्ध

अतिरिक्त धन यामुळे ब्रिटीशांनी भारतात आधुनिक उद्योगांमधे गुंतवणूक केली. त्यामधूनच आधुनिक उद्योगधंदयांचा पाया घातला गेला.

## ६.१० प्रश्न

१) ब्रिटीशांनी कोणत्या जमीन महसूली पद्धती भारतात लागू केल्या त्याची सविस्तर चर्चा करा.
२) ब्रिटीशांनी लागू केलेल्या जमीन महसूल पद्धतीची वैशिष्ट्ये व त्याचे कृषी क्षेत्रावरील परिणाम स्पष्ट करा.
३) भारतातील शेतीचे व्यापारीकरण कसे झाले ?
४) दादाभाई नौरोजी यांनी मांडलेला आर्थिक वहन सिद्धांत स्पष्ट करा.
५) ब्रिटीशांनी केलेल्या आर्थिक शोषणाचे भारतीय अर्थव्यवस्थेवर कोणते परिणाम झाले ?
६) निरऔद्योगिकरण ही संकल्पना स्पष्ट करा व त्यास कारणीभूत घटक कोणते ते स्पष्ट करा.
७) निरऔद्योगिकरणाचे कारणे व परिणाम यावर सविस्तर टीप लिहा.
८) भारतात आधुनिक उद्योगधंद्यांचा विकास कसा झाला ?

## ६.११ संदर्भ सूची


१) बिपीन चंद्र, अमलेश त्रिपाठी, बरुण डे:स्वातंत्र्याचा लढा
२) ग्रोव्हर आणि बेल्हेकर आधुनिक भारताचा इतिहास
३) सुमन वैद्य व शांता कोठेकर:
   १) आधुनिक भारताचा इतिहास (१८५७-१९२०)
   २) आधुनिक भारताचा इतिहास (१९२०-१९४७)
४) सुमित सरकार: आधुनिक भारत – के.सागरप्रकाशन
५) डॉ.जयसिंगराव पवार आधुनिक हिंदुस्तानचा इतिहास
६) धनंजय आचार्य: आधुनिक भारत (१७५०-१९५०)


❖❖❖❖

# ७

# ब्रिटीश काळातील सामाजिक घटक - महिला

**प्रकरणाची रचना :**

७.० उद्दिष्ट्ये
७.१ प्रस्तावना
७.२ ऐतिहासिक पार्श्वभूमी
७.३ ब्रिटीश आगमनामुळे झालेल्या सुधारणा व कायदे
७.४ स्त्री – शिक्षण
७.५ विधवा पुर्नविवाह
७.६ बालविवाह बंदी
७.७ समाजसुधारकांनी स्त्री उद्धारासाठी केलेले कार्य
७.७.१ महात्मा जोतीबा फुले (१८२७-१८९०)
७.७.२ सावित्रीबाई फुले (१८३१ ते १८९७)
७.७.३ गोपाळ गणेश आगरकर
७.७.४ विष्णुबुवा ब्रम्हचारी
७.७.५ पंडिता रमाबाई (१८५८-१९२२)
७.७.६ डॉ. बाबासाहेब आंबेडकर (१८९१ - १९५२)
७.८ भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील महिलांची कामगिरी
७.९ सारांश
७.१० प्रश्न
७.११ संदर्भ सूची

## ७.० उद्दिष्ट्ये

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपल्याला

१. ऐतिहासिक पार्श्वभूमीची माहिती मिळविणे.
२. ब्रिटीश आगमनामुळे झालेल्या सुधारणा व कायद्याचा आढावा घेणे.
३. समाजसुधारकांनी स्त्री उद्धारासाठी केलेल्या कार्याची माहिती मिळविणे.
४. भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील महिलांचा सहभाग व कार्याचा परिचय करून देणे.

## ७.१ प्रस्तावना

सामाजिक सुधारणा व स्त्रीविषयक प्रश्न यांचा अत्यंत निकटचा संबंध आहे. ज्या समाज्यातील स्त्री उपेक्षित असेल, अविकसित असेल तो समाज विकसित होणे शक्य नाही. स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये स्त्रीला मानव म्हणून जीवन व्यतीत करण्याचे स्वातंत्र्य नव्हते. 'चूल आणि मूल', भोगवस्तु किंवा खाजगी मालमत्ता म्हणुन तिच्याकडे बघण्याची मानसिकता समाज्याची होती. कालातंराने ब्रिटिश काळात, विशेष करून १९व्या शतकापासून स्त्री आणि स्त्री जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलू लागला होता. भारतीय समाजामध्ये विज्ञाननिष्ठ, पाश्चात्य शिक्षणामुळे समता हे मुल्य समाजात रुजू लागले होते. स्त्रीला शिक्षण देणे, तिला स्वावलंबी बनविणे, अनिष्ट चालींविरूद्ध लढा देणे, चळवळ करणे यासाठी समाज सुधारकांचे संस्थात्मक कार्य सुरू झाले. ब्रिटिश राज्यकर्त्यांची संवैधानिक, कायदेशीर मदतही या चळवळींना झाली. २०व्या शतकाच्या प्रारंभापासून स्त्री जीवनात परिवर्तन घडुन येऊ लागले होते. १९व्या शतकाच्या प्रारंभापासून भारतात राष्ट्रवादाचे वारे वाहू लागले होते. भारतातील शेतकरी, आदिवासी यानी आर्थिक शोषणाच्या विरोधात सशस्त्र लढा दिला. यात महिलांचाही सहभाग होता. भारतीय स्वातंत्र्य लढ्यात महिला शक्तीचा (गटाचा) उदय झाला. भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात स्त्रियांनीही मोठे योगदान दिले होते. त्याचा अभ्यास आपण या घटकात करणार आहोत.

## ७.२ ऐतिहासिक पार्श्वभूमी

वैदिकाळातील स्त्रीला पुरुषाचा बरोबरीने स्थान होते. वेदाध्यान, उपनयनाचा त्यांना पूर्ण अधिकार होता. ऋग्वेदातील अनेक सुत्रांची रचना त्याकाळातील स्त्रियांनी केलेली दिसते. स्त्रिया ज्ञानदान, मंत्रघोष व वेदपठणही करत असत. त्याचप्रमाणे विवाहपूर्वी ६४ कला अवगत करण्याची मुभा होती व विवाहानंतर पतीच्या संमतीने त्या कलात पारंगत होणाची मुभा होती. बालविवाहांची पध्दत रुढ नव्हती. लग्नाचे वय सामान्यतः १६वर्षे असे. त्याचप्रमाणे स्वयंवर पध्दतीही रुढ होती.एक पत्नीत्वाची चाल रुढी असली तरीदेखील बहुपत्नीत्वाची अनेक उदाहरणे आढळतात. विवाह ही आवश्यक बाब मानली असली तरी अपरिहार्य मानली जात नसे. कित्येक मुली वडिलांच्या घरी अविवाहित म्हणून रहात. परंतु वेदकाळातील स्त्रियांची ही स्थिती फार काळ तशीच राहिली नाही. रामायण – महाभारत या काळात थोडीशी बंधने येण्यास सुरुवात झाली व स्मृतीपुराण काळापासून स्त्रियांचा दर्जा घसरत जाण्यास सुरुवात झाली. हळूहळू स्त्री शिक्षणाविषयी दृष्टीकोन संकुचित बनला. विवाहाची वयोमर्यादाही कमी झाली. मुलींचा उपनयन विधीही बंद झाला. वेदाध्ययनाचा अधिकार बंद झाला. त्यांचे स्थान शुद्रांचा बरोबरीने मानले जाऊ लागले. बालविवाह रुढ झाले. जन्मापासून मृत्यूपर्यत स्त्रीचे जीवन नियंत्रित करण्यात आले.

१९व्या शतकात सामाजिक चळवळीला सुरुवात झाली. तेव्हा सुधारकांचे लक्ष प्रथम गेले ते स्त्री विषयक प्रश्नांकडे. स्त्रियांची स्थिती अत्यंत निकृष्टावस्थेला पोहोचलेली होती. बालविवाह, केशवपन, सती अशा अनिष्ट चाली रुढी होत्या. विधवांची स्थिती अतिशय दयानीय होती. स्त्रीच्या दु:खाला, कुचंबनेला धर्माच्या सोज्वळ नावाखाली प्रतिष्ठा प्राप्त होत गेली. धर्माच्या प्रभावाखाली सर्वच समाज असल्याने त्याच समाजाचा घटक असलेली स्त्रीलाही दिली जाणारी हीन वागणूक दिली जात असे. अशा परिस्थितीत सुधारकांच्या सुधारणेचे लक्ष स्त्री विषयक प्रश्नाकडे जाणे हे साहजिकच होते. स्त्रीयांचा समाजातील ही अध:पतीत अवस्था

सुरुवातीच्या काळापासून होती असे मात्र नाही तर काळाच्या ओघात अनेक स्थित्यंतरे होत ही स्थिती निर्माण झाली होती.

## ७.३ ब्रिटीश आगमनामुळे झालेल्या सुधारणा व कायदे

ब्रिटीश आगमनाच्या प्राथमिक अवस्थेत पश्चिम भारतातील समाज स्थिर प्रवाहापासून विभक्त आणि संकुचित बंधनात होता. जरी महाराष्ट्रीयन शासक आणि समाज यांच्यात समरुपता असली तरी इतर सर्वाप्रमाणेच महाराष्ट्रातही जातीप्रथा प्रबळ होती. ब्रिटीश भारतात आले तेव्हा स्त्रीयांच्या स्वातंत्र्यावर आत्यंतिक मर्यादा घातलेल्या होत्या. समाजात तिचे स्थान अत्यंत हीन दर्जाचे होते. स्त्रीची गुलामगिरी दृढ करणाऱ्या सती, बालविवाह, विधवा, केशवपन, जरठ बालविवाह, इ. रुढी अस्तित्वात होत्या. या काळात स्त्रीला शिक्षणापासून पूर्ण वंचित ठेवण्यात आले होते. याकाळातच महाराष्ट्रात काही समाजसुधारकांचा उदय होऊन त्यांनी स्त्री सुधारात्मक कार्याचा पुरस्कार केला व व्यापक आघाडी उभारली. समाजसुधारक महात्मा ज्योतीबा फुले, सावित्रीबाई फुले, म.गो. रानडे, बहरामजी मलबारी, विष्णुशास्त्री पंडित,पंडिता रमाबाई, महर्षी कर्वे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदींनी या कार्याची धुरा वाहिली. त्यांनी ब्रिटीशांकडून स्त्री सुधारणेसाठी काही कायदे संमत करुन घेतले. ते खालीलप्रमाणे आहेत.

१. इ.स. १८२९मध्ये लॉर्ड बेंटिकने सती बंदीचा कायदा केला.
२. तसेच इ.स.१८५६ मध्ये विधवांना जाचातून सोडविणारा पुर्नविवाहाचा कायदा पास करण्यात आला. तसेच स्त्रियांना शिक्षण घेता यावे म्हणून काही कायदे करणात आले.

इ.स.१८७२ मध्ये नोंदणी विवाहाचा कायदा पास केला गेला. परंतु केवळ कायदा करुन स्त्रियांचे प्रश्न सुटणारे नव्हते तर स्त्री विषयक प्रगत विचार हे समाज मनात रुजणे आवश्यक होते. हे करण्यासाठी अनेक प्रयत्न करण्यात आले. हे प्रयत्न करण्यात अनेक समाजसुधारकांचा पुढाकार होता.

## ७.४ स्त्री – शिक्षण

काही इंग्रज अधिकाऱ्यांनी आपल्या प्रयत्नाने मुंबई आणि पुणे या ठिकाणी स्त्री – शिक्षण चालविण्यासाठी शाळा उघडल्या. उत्साही लोकांनी ''स्टुडेंटस लिटररी आणि सायंटिफिक सोसायटी''" स्थापन केली. या सोसायटीने स्त्री – शिक्षण आघाडी उभारली. तसेच पुढे ज्ञान प्रसारक मंडळाने श्रीमंत वर्ग तसेच सावकारांचा मदतीने मुलींसाठी शाळा उघडली. प्रारंभिक यशानंतर त्याच धर्तीवर इतर भागातही अशा आणि गुजराती भाषांच्या शाळा उघडण्यात आल्या.

नाना शंकरशेट आणि इतर सुधारक प्रवृत्तीच्या उद्योजकांनी या कामी पुढाकार घेतला होता. गुजराती आणि पारशी शाळांना त्यांचा समुदायाचा सक्रीय सहयोग प्राप्त होता. मराठी माधमांच्या शाळांना या कामी कमी यश प्राप्त झाले. कारण जगन्नाथ शंकरशेट सोडल्यास, त्या ठिकाणी दुसरा कोणीही उदयोजक नव्हता.

सनातनांच्या आक्षेपांना प्रत्युत्तर देण्यासाठी महात्मा ज्योतीबा फुलेंनी प्रथम स्त्रीशिक्षणाचे कार्य हाती घेतले. जोतीबांनी स्त्रीशिक्षणाला प्रारंभ केला. त्याकाळी स्त्रीशिक्षणाची

पुण्यात अजिबात सोय नव्हती. अशा प्रतिकुल परिस्थितीत ज्योतीबा फुले यांनी पुण्यात इ.स. १८४८ मधे मुलींसाठी एक शाळा सुरु केली. अस्पृश्य समाजातील स्त्रियांना तेथे शिक्षण दिले जात होते. त्या शाळेत ज्योतीबा स्वतः शिक्षकाचे काम करीत होते. या शाळेत अस्पृश्यांच्या मुलींना शिकविण्यासाठी शिक्षिका मिळेना म्हणून ज्योतीबांनी सावित्रीबाईंना शिकवून शिक्षिका म्हणून नेमले. सनातन्यांना ही गोष्ट समाजद्रोही आणि धर्मद्रोही वाटली. त्यांच्या विरुध्द प्रचंड संतापाची लाट उसळली. सनातन्यांनी सावित्रीबाईंना अनेक प्रकारे त्रास दिला. परंतु त्यांनी आपला सुधारणेचा मार्ग सोडला नाही. त्यांनी आपले कार्य अत्यंत नेटाने चालू ठेवले. परंतु ही पहिली मुलींची शाळा बंद पडली. म्हणून ज्योतीबा नाउमेद झाले नाहीत. त्यांनी १८५१ मध्ये बुधवार पेठेत दुसरी मुलीचीं शाळा सुरु केली. १८५१ मध्येच रास्ता पेठेत चौथी मुलीची शाळा सुरु केली. या कार्याला सुव्यवस्थित स्वरुप प्राप्त व्हावे म्हणून ज्योतीबांनी आपल्या मित्रांच्या सहाय्याने एक कार्यकारी समिती स्थापन केली. त्यात अनेक मान्यवर व्यक्ती होत्या. सरकारनेही या कार्याला यथाशक्ती सहकार्य केले. ज्योतीबांचा या अभिनव उपक्रमाबद्दल विश्रामबाग येथे सत्कार करण्यात आला.

## ७.५ विधवा पुर्नविवाह

तत्कालिन हिंदु समाजात संयुक्त कुंटुंब पध्दती अस्तित्वात होती. त्याकाळी व्यक्ती स्वातंत्र्याची संकल्पना नव्हती. शिवाय स्त्रियांवर घरगुती जबाबदाऱ्या होत्या. त्यांना संपत्तीच्या हक्काची परवानगी नव्हती. हिंदु विवाहात संपत्ती घरातच राहणार याची दखल घेणात येई. त्याचा जबर फटका विधवांना बसत असे. विवाह धार्मिक विधी मानण्यात येत असे. शिवाय पतीच्या मृत्यूने अथवा घटस्फोटाने विवाह बंधन तुटत नसे. ही प्रथा ताठरपणे जरी उच्च वर्गात पाळण्यात येत असली तरी पण त्यांचे अनुकरण निम्न वर्गीय करीत. विधवा पुर्नविवाह ही अशीच एक अडचण होती. ब्रिटीश न्यायालयाने आपला आरंभिक दिवसांत 'हिंदु सिव्हिल कोड' अस्तित्वात आणला. त्या काळात पुरुषांना एकापेक्षा अधिक विवाह करण्याची सुट होती. परंतु त्या ठिकाणी कोणत्याही प्रकारचा कायदा अशा पध्दतीला आळा घालणासाठी अस्तित्वात नव्हता. इतकेच नाही तर पतीच्या मृत्यूनंतर स्त्री दुसरे लग्न करु शकत नसे. कोणत्याही वक्तीने विधवा अथवा आधीच विवाहित स्त्रीशी विवाह केलास ते शिक्षापात्र ठरत असे. अशा अवस्थेतून सुटण्याचा एकमेव मार्ग म्हणजे धर्मातरण मुस्लिम अथवा ख्रिश्चन धर्माचा स्वीकार केल्यास ही अवस्था बदलत असे.

मुंबईत दादाभाई नौरोजी, दादोबा पांडुरंग, बाळ शास्त्री जांभेकर, बाबा पद्मनजी आदींनी विधवा पुर्नविवाहाच्या या प्रक्रियेला आपला पाठिंबा जाहीर केला. पुण्यात लोकहितवादी, विष्णु शास्त्री, न्या. रानडे इत्यादींनी या विरुध्द आंदोलन चालवले. त्यासाठी वेदांचे प्रमाण देण्यास आरंभ केला. १८६६ मध्ये विधवा विवाहोत्तेजक मंडळ स्थापन केले गेले. त्यानुसार विधवा पुर्नविवाहासाठी प्रयत्न करण्यात आले. अशा अवस्थेत या सुधारणेविरुध्दही आंदोलन छेडण्यात आले. काही वर्गाने विधवा पुर्नविवाहाच्या १८५६ मधील कायादयाच्या विरोधात शासनाला आपला लिखित विरोध नोंदवला. हिंदू धर्माच्या सुरक्षेसाठी सोसायटी स्थापन करण्यात आली. विष्णु शास्त्री यांनी पं. ईश्वरचंद्र विदयासागर यांच्या लेखनाचे मराठीत भाषांतर केले शिवाय दख्खनमधील विविध ठिकाणी त्यांनी चर्चासत्रात भाग घेतला. शिवाय त्यांनी सनातनी वर्गाला या विचारावर चर्चा करण्यासाठी पाचारण केले. मार्च १८७० मध्ये पुणे या ठिकाणी चर्चा करणासाठी हे दोन्ही वर्ग जमले. त्याचे अध्यक्षपद कांचीचे शंकराचार्य यांनी केले.

परंतू १८७० मध्ये गोपाळ हरी देशमुख यांचा अहमदाबाद या ठिकाणी 'प्रायश्चित' करुन माघार घेण्याचा घटनेने या आंदोलनाला कमकुवत केले. तसेच, १८७६मध्ये विष्णु शास्त्रींच्या मृत्यूने या आंदोलनाचा धक्काच बसला. तरीही सुमारे दशकभराचा काळ हे आंदोलन मुंबईत माधवराव व रघुनाथराव तसेच प्रार्थना समाज यांनी चालवले. या क्षेत्रात महर्षी धोंडो केशव कर्वे यांनीही उल्लेखनाय कामगिरी केली. त्याची सुरुवात तांनी गोदूबाई नावांच्या विधवेशी १८८३ मध्ये विवाह करुन केली. त्यामुळे त्यांना सनातनी लोकांचा विरोध सहन करावा लागला, आर.जी. भांडारकर यांच्या मदतीने त्यांनी विधवा विवाह संस्था स्थापन केली. त्या कामी त्यांना रमाबाईची प्रेरणा मिळाली. रानडे व भांडारकर यांचाशी संबंधित होते. तसेच त्यांनी विधवांना स्वयंपूर्ण करण्यासाठी संस्था स्थापन केली की ज्यात त्यांना शिक्षक, परिचारिका इ. विषायी प्रशिक्षण देण्यात योत असे. १८८९ ते या काळात 'हिंदू विधवाश्रम' मध्ये सुमारे २५ लग्ने झाली. अशाप्रकारे मुंबईतील सुधारक तसेच पुणेमधील समाजसुधारक, इंदुप्रकाशसारखा मासीकांनी तसेच विष्णुशास्त्री आणि कर्वे यांच्या प्रयत्नानी या समस्यांपासून काही प्रमाणात सुटका मिळाली. २०व्या शतकात या प्रश्नांविषायी समाजात आणखी जागरुकता निर्माण झाली.

## ७.६ बालविवाह बंदी

प्राचीन काळापासून भारताच्या विविध भागात बालविवाह घडून येत. बालविवाह हे सामाजिक सोपास्कार या नावाने भारताच्या विविध भागात सुरु झाले. पण १९ व्या शतकात भांडारकर, रानडे मलबारी यासारख्या समाज सुधारकांनी या असामाजिक प्रथेला विरोध केला. हे सर्व पाहता त्याचा परिणाम म्हणून शासनाने १८७२ मध्ये विवाह कायदा पास केला. तसेच त्यानुसार विधवाविवाह, आंतरजातीय विवाह, यावर शिक्कामोर्तब केले. पण हे पुरेसे ठरले नाही. कारण बऱ्याच भागात अजूनही हीच अवस्था कायम होती.

आपले धोरण व्यक्त करताना बहरामजी मलबारी यांनी समाज आणि सरकार यांच्यासमोरील दोन घटकांमध्ये विवेचन केले. त्यानुसार त्यांनी विदयापीठांना आग्रह धरला की विवाहीत विदयार्थ्यांना परीक्षेला बसू देवू नये. तसे अविवाहितांना प्राधान्य दयावे व या समस्येचा समावेश शालेय अभ्यासक्रमात करण्यात यावा. या कामी त्यांना रानडे, भांडारकर, चंदावरकर, तेलंग इ. चे समर्थन प्राप्त होते. तसेच शासनाने विवाहासाठी मुलाचे वय १६ ते १८ व मुलीचे वय १० ते १२ असावे अशा नियम करावा यावरही रानडे यांनी भर दिला. तसेच 'पिनल कोड' मध्ये १४ वर्षाखालील मुलीबरोबर होणारा शारिरीक संबंध 'बलात्कार' ठरवण्यात यावा असे त्यांनी सुचविले. तसेच मुलीपेक्षा वयाने जास्त असणाऱ्या व्यक्तीबरोबर विवाह निषिध्द ठरवण्यात यावा. रानडे यांनी मुलीचे वय १० ते १२ वर वाढवण्यात यावे असेही प्रयत्न करीत होते.

मलबारी व रानडे यांच्या विचारांनी महाराष्ट्रात नवीन वैचारिक प्रश्न उभे केले. त्याच्याविरुध्द लो. टिळक यांनी विरोध दर्शविला. या स्वरुपाच्या मागण्यांनी शासन आपल्या परंपरांगत धर्मात ढवळाढवळ करणार असे त्यांचे मत होते. पण शासनाने सुधारकांच्या या मागण्यांवर आपले निर्णय राखून ठेवले होते. कारण दरम्यान त्यांनी तटस्थतेचा मार्ग स्वीकारला होता. परिणामी मलबारी इंग्लंडला गेले आणि त्यांनी जनमत आपल्या बाजूने वळवण्याचा प्रयत्न केला. तरीही मलबारी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी आपल्या चळवळीला मागे घेतले नाही. शेवटी १८९१ मध्ये त्यांच्या प्रयत्नांना यश आले आणि बालविवाह कायदा अंमलात आला.

**आपली प्रगती तपासा:**

१) ब्रिटीश आगमनामुळे झालेल्या स्त्री सुधारणा थोडक्यात सांगा.

## ७.७ समाजसुधारकांनी स्त्री उद्धारासाठी केलेले कार्य

### ७.७.१ महात्मा ज्योतीबा फुले (१८२७ ते १८९०)

महात्मा ज्योतीबा फुले यांनी आपले व्यक्तिमत्व स्वयंप्रेरणेने आणि आपल्या स्वतःच्या प्रयत्नांनी घडविले होते. त्यांचा पिंड हा कृतिशील क्रांतीकारकाचा होता. महाराष्ट्राच्या समाजसेवेसाठी ध्येयाने भारावून जाऊन सर्व जीवन समर्पित करणारे ते थोर पुरुष होते. आधुनिक भारतातले पहिले समाजक्रांतिकारक म्हणजे महात्मा फुले होत. कारण ते सामान्यांतील असले तरी विचाराने व कर्तृत्वाने असामान्य होते. ते नुसते बोलघेवडे सुधारक नव्हते. तर कर्ते सुधारक होते. सामाजिक न्यायासाठी संघर्ष केला पाहिजे असा त्यांनी निर्धार केला. समाजात विषमता, जातिभेद, अज्ञान, स्त्रीदास्य यासारख्या अनिष्ट गोष्टी केवळ धर्माज्ञा म्हणून निर्माण झाल्या आहेत त्या बदलणे आवश्यक आहे याची खात्री त्यांना पटली. ज्योतीबांनी स्त्री उधारासाठी, अस्पृश्यांच्या उध्दारासाठी, शेतकऱ्यांच्या उध्दारासाठी अशा अनेक क्षेत्रात कार्य केले. अशा या थोर महात्म्याच्या मृत्यू इ.स. १८९० मध्ये झाला.

ज्योतीबांनी सर्व बाबींचा विचार करुन प्रथम स्त्रियांच्या उध्दाराचे कार्य हाती घेतले हिंदू स्त्रियांना गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी प्रयत्न करावयाचे ठरविले. भारतीय समाजाने स्त्रियांना समतेपासून व शिक्षणापासून वंचित ठेवले होते. व्यक्तीचे जीवन विकसित करण्यासाठी शिक्षण हे एक प्रमुख साधन आहे असे जोतीबांचे मत होते. शिक्षणामुळे मनुष्यात स्वाभिमान निर्माण होतो. सत्य - असत्याचा उलगडा होतो. म्हणून शिक्षण हे सर्व सुधारणाचे मूळ आहे असे त्यांचे मत होते. 'जिच्या हाती पाळण्याची दोरी, ती जगाते उध्दारी' या तत्वाचे ते पाईक होते. मुलांच्या कर्तव्याचे मार्गदर्शन मातेकडून होत असते. कर्तव्याची जाणीव झाली तरच देशाची प्रगती होते. या विचाराचे ते होते. सनातन्याच्या मते स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार नाही. त्यांना शिक्षण देणे म्हणजे देवे, धर्म व समाज यांच्या विरुध्द वर्तन करणे होय. एखादया स्त्रीने शिक्षण घेणे म्हणजे भ्रष्टाचार करणे, कुमार्गाला लागणे, तिला अकाली वैधव्य येणे, अशा खुल्या समजुती समाजात रुढ होत्या. विधवा स्त्रियांची स्थिती दयनीय होती. एकंदरीत त्या काळात समाजाच्या स्त्रीबाबतच्या अपेक्षा, अन्यायी व पक्षप्रातीप्रणाच्या होत्या. क्रुर व लज्जास्पद चालीरीतीमुळे स्त्रियांची दैन्यावस्था झाली होती.

समाजाने अनेक बंधनांनी स्त्रियांना जखडून ठेवले होते. त्यांचे सर्व हक्क डावलेले होते. समानता व मानवतेच्या भूमिकेतून त्यांच्याकडे पहिले जात नव्हते. उपभोग्य वस्तू अशीच त्यांच्याकडे पाहण्याची वृत्ती होती. अशा वेळी महात्मा जोतीबा फुल्यांनी स्त्रियांच्या उध्दाराचे कार्य हाती घेतले. त्यासाठी त्यांनी फार मोठे कष्ट सहन केले. स्त्री ही समाजाचे मूळ आहे. असे मानून

जोतीबांनी स्त्रीशिक्षण, विधवा विवाह, बालहत्या प्रतिबंध , केशवपन यासारख्या महत्वाच्या सामाजिक समस्येबाबत भरीव कार्य केले.

### १. स्त्रीशिक्षण

सनातन्यांच्या आक्षेपांना प्रत्युत्तर देण्यासाठी जोतीबांनी प्रथम स्त्रीशिक्षणाचे कार्य हाती घेतले. स्त्रीशिक्षण म्हणजे पर्यायाने तिच्या मुलाचे शिक्षण. आपण जर एखादया पुरुषाला शिक्षण दिले तर ते एकटयाला दिल्यासारखे आहे. परंतु जर एका स्त्रीला शिक्षण दिले तर ते सर्व कुटुंबाला दिल्यासारखे आहे. हे ओळखून जोतीबांनी स्त्रीशिक्षणाला प्रारंभ केला. त्याकाळी स्त्रीशिक्षणाची पुण्यात अजिबात सोय नव्हती. अशा प्रतिकुल परिस्थितीत जोतीबा फुले यांनी पुण्यात इ.स. १८४८ मध्ये मुलीसाठी एक शाळा सुरु केली. अस्पृश्य समाजातील स्त्रियांना तेथे शिक्षण दिले जात होते. त्या शाळेत जोतीबा स्वतः शिक्षकाचे काम करीत होते. या शाळेत अस्पृश्यांच्या मुलींना शिकविण्यासाठी शिक्षिका मिळेना म्हणून जोतीबांनी सावित्रीबाईंना शिकवून शिक्षिका म्हणून नेमले. सनातन्यांना ही गोष्ट समाजद्रोही आणि धर्मद्रोही वाटली. त्यांच्या विरुध्द प्रचंड संतापाची लाट उसळली सनातन्यांनी सावित्रीबाईंना अनेक प्रकारे त्रास दिला. परंतु त्यांनी आपला सुधारणेचा मार्ग सोडला नाही. त्यांनी आपले कार्य अत्यंत नेटाने चालू ठेवले

परंतु ही पहिली मुलींची शाळा बंद पडली. म्हणून जोतीबा नाउमेद झाले नाहीत. त्यांनी १८५१ मध्ये बुधवार पेठेत दुसरी मुलीनी शाळा सुरु केली. १८५१ मध्येच रास्ता पेठेत चौथी मुलीची शाळा सुरु केली. या कार्याला सुव्यवस्थित स्वरुप प्राप्त व्हावे म्हणून जोतीबांनी आपल्या मित्रांच्या साहाययाने एक कार्यकारी समिती स्थापन केली. त्यात अनेक मान्यवर व्यक्ती होत्या. सरकारनेही या कार्याला यथाशक्ती सहकार्य केले. जोतीबांच्या या अभिनव उपक्रमाबददल विश्रामबाग येथे सत्कार करण्यात आला.

### २. विधवा पुनर्विवाह

जोतीबा फुले ब्राम्हणदेष्टे होते असे म्हटले जाते. परंतु समाजातील कोणत्याही घटकावरील अन्यायाने त्यांचे मन व्याकुळ होत असे. त्या काळी ब्राम्हण समाजात विधवा स्त्रियांचे फार हाल असत. हे पाहून त्यांचे मन अस्वस्थ झाले. स्त्रियांचे हाल थांबवित. त्यांच्या जीवनाला चांगले वळण लागावे म्हणून जोतीबांनी विधवा पुनर्विवाहाचा धडाडीने पुरस्कार केला. त्यांनी इ.स. १८६४ मध्ये पुण्यातील गोखल्यांच्या बागेत एक विधवा पुनर्विवाह घडवून आणला.

### ३. बालहत्या प्रतिबंधक गृह

विधवा पुनर्विवाहाची सुधारणा त्या काळी समाजाला पचनी पडणे कठीण होते. त्याला बराच अवधी लागणार होता. एखादया विधवेचे चुकून वाकडे पाऊल पडले तर तिची वाईट अवस्था होई. अशा विधवा पतितांना त्या काळी भ्रूणहत्या, आत्महत्या याशिवाय गत्यंतर नव्हते. अशा आपत्तीतून विधवांची सुटका व्हावी म्हणून जोतीबांनी विधवांना गुप्तपणे येऊन बा होण्यासाठी व आपले मूल तेथे ठेवण्यासाठी बालहत्या प्रतिबंधक गश्ह आपल्या घराशेजारी उघडले. त्या संदर्भात सर्वत्र भित्तीधमके वाटण्यात आली. त्यात असे म्हटले होते की, 'विधवांनो, इथे येऊन गुप्तपणे आणि सुरक्षितपणे बाळंत व्हा. तुम्ही आपले मूल न्यावे किंवा ठेवावे हे तुमच्या खुशीवर अवलंबून आहे. त्या मुलाची काळजी हा अनाथश्रम घेईल. जोतीबांनी सुरु केलेले बालहत्या प्रतिबंधक गृह हे भारतातील पहिलेच होते. यावरुन त्यांच्या दूरदश्ष्टीची कल्पना येते.

### ७.७.२ सावित्रीबाई फुले (१८३१ ते १८९७)

महात्मा जोतीबा फुले यांच्या पत्नी म्हणून सावित्रीबाई महाराष्ट्राला परिचित आहेत. आपल्या कर्तबगार व असामान्य पतीच्या प्रत्येक कामात त्यांनी पतीस आयुष्यभर निष्ठेने साथ दिली होती; परंतु सावित्रीबाईंची ओळख तेवढयापुरतीच मर्यादित नाही. समाज सुधारणेच्या क्षेत्रात त्यांनी स्वकर्तृत्वाने आपले स्वतंत्र स्थान निर्माण केले आहे.

#### स्त्रीशिक्षण

जोतीबा फुले यांनी पुण्यात इ.स. १८४८ मध्ये मुलीसाठी एक शाळा सुरु केली. अस्पृश्य समाजातील स्त्रियांना तेथे शिक्षण दिले जात होते. त्या शाळेत जोतीबा स्वतः शिक्षकाचे काम करीत होते. या शाळेत अस्पृश्यांच्या मुलींना शिकविण्यासाठी शिक्षिका मिळेना म्हणून जोतीबांनी सावित्रीबाईंना शिकवून शिक्षिका म्हणून नेमले. सनातन्यांना ही गोष्ट समाजद्रोही आणि धर्मद्रोही वाटली. त्यांच्या विरुध्द प्रचंड संतापाची लाट उसळली सनातन्यांनी सावित्रीबाईंना अनेक प्रकारे त्रास दिला. परंतु त्यांनी आपला सुधारणेचा मार्ग सोडला नाही. त्यांनी आपले कार्य अत्यंत नेटाने चालू ठेवले.

#### विधवांना आश्रय

महात्मा फुले यांना आपल्या समाजात विधवा स्त्रियांना भोगाव्या लागणाऱ्या यातना पाहून त्यांच्यासाठी काहीतरी कृती करण्याची गरज वाटू लागली. त्या काळी विधवा स्त्रियांचे जीवन म्हणजे एक प्रकारे नरकयातना भोगण्याची शिक्षा होती. तत्कालीन समाजाकडून त्यांना अतिशय वाईट प्रकारची वागणूक दिली जात असे. विधवा स्त्रीचे दर्शनदेखील अशुभ मानले जात असे. त्यातून एखाद्या विधवा स्त्रिने तारूण्यसुलभ भावनेच्या आहारी जाउन काही गैरकृत्य केले आणि त्यातून तिच्यावर अनवस्था प्रसंग ओढवला, तर अशा वेळी त्या अभागी बाईपुढे आत्मघात किंवा भ्रुणहत्या याशिवाय अन्य पर्याय उरत नसे. अशा दुर्दैवी स्त्रियांना दिलासा व आधार मिळवून देण्यासाठी महात्मा फुल्यांनी १८६३ मध्ये एक बालहत्याप्रतिबंधक गृह सुरू केले. त्यासंबंधी त्यांनी प्रसिध्द केलेल्या पत्रकात असे म्हटले होते की,'विधवांनो, इथे येउन गुप्तपणे आणि सुरक्षितपणे बाळंत व्हा. तुम्ही आपले मुल न्यावे किंवा इथे ठेवावे हे तुमच्या खुशीवर अवलंबून राहील. तुमच्या मुलांची काळजी हा अनाथश्रम घेईल. महात्मा फुल्यांनी सुरू केलेल्या या बालहत्याप्रतिबंधक गृहातील मुलांची काळजी घेण्याचे काम सावित्रीबाई करीत. हे गृह सुरू करण्यात त्यांचाही पुढाकार होता. तेथील अनाथ मुलांवार त्या मातेच्या वात्सल्याने प्रेम करीत व त्यांची सर्व प्रकारची सेवा करीत. सावित्रीबाईंना स्वतःचे अपत्य नव्हते; पण या बालहत्याप्रतिबंधक गृहातील सर्व अनाथ बालकांना त्यांनी आपलीच मुले मानले होते. पुढे अशाच एका अनाथ मुलाला त्यांनी दत्तक घेतले.

#### आपली प्रगती तपासा

१) महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी स्त्री उद्धारासाठी केलेले कार्य सांगा.

### ७.७.३ गोपाळ गणेश आगरकर

समाज बदलण्यासाठी विचार परिवर्तन व विचार परिवर्तनासाठी ज्ञानप्रसार आवश्यक आहे असे गोपाळ गणेश आगरकरांचे स्पष्ट मत होते. लोकशिक्षणासाठी पत्रकारिता व शिक्षकीपेशा त्यांनी निवडला.

### कुंटुंबातील स्त्रीचे स्थान

आगरकरांच्या सामाजिक विचारात कुंटुंबसंस्थेच्या सुधारणेचा प्राधान्याने विचार केलेला आहे. ज्या समाजाची कुंटुंबव्यवस्था विस्कळीत झालेली आहे तो समाज ही प्रगती करु शकत नाही ज्या समाजात ऐक्याची भावना निर्माण होत नाही या समाजाला जुन्या विचारातून बाहेर पडून नवीन विचार स्विकारता येत नाही. कुंटुंबव्यवस्था ही एकत्र असावी. कुंटुंबव्यवस्थेत स्त्रीचे स्थान काय आहे उच्च असावे, त्यांना शिक्षण देणे असे आवश्यक आहे. अशा विविध प्रकारे आगरकरांनी मत मांडली आहेत. कुंटुंबाचे स्त्री व पुरुष दोन प्रमुख घटक असतात पुरुषाने घराबाहेर उपजिविकेची साधने मिळवून आणतो, स्त्री त्या साधनांचा उपयोग करुन कुंटुंबातील लहान - लहान माणसाची उपजिविका व्हावी अशी विभागणी अनेक वर्ष चालत आलेली आहे.

आगरकरांनी स्त्रीया शिक्षणाचा अधिकार असला पाहिजे. त्याकाळात स्त्रीला शिक्षण देणे म्हणजे सामाजिकदृष्टया काहीतरी विपरित घडण्यासारखे आहे असे मानत होते. स्त्रीचे कार्यक्षेत्र उंबराच्या आत असावे असे म्हटले जात होते पण त्यावर आगरकरांनी टिकेचे ताशेरे ओढले आहे. हिंदूधर्म विचारात व सामाजिक आचारात जे काही चांगले आहे त्याला कोणाचीही भिती नाही पण जे काही वाईट आहे. त्याचा मात्र निष्कळ केला पाहिजे हिंदूधर्माची सामाजिक चौकट ज्या स्मृतीग्रंथावर उभारलेली आहे ते स्मृतीग्रंथ विज्ञानाच्या प्रकारात कालबाहय ठरतात. म्हणून स्मृतीग्रंथाचा आधार घेणे समाजाला उपयोगी ठरणार नाही. या स्मृतीग्रंथानी स्त्रीवर अनेक प्रकारची बंधने घातली आहेत. ती बंधने नष्ट केली पाहिजे त्यासाठी स्त्रीशिक्षणाला चालना देणे, बालविवाह थांबवणे, विधवाविवाहाला चालना देणे यासारख्या सुधारणांचा आगरकरांनी पुरस्कार केला आहे या सुधारणा आता समाजात होण्यास सुरुवात झाली आहे.

### बालविवाह विरोध

कुंटुंबव्यवस्थेत व स्त्रीजीवन यांच्या संबंधीत आगरकरांनी जे विचार सांगितले आहेत. त्यानुसार बालविवाहाला प्रतिबंध, पुर्नविवाहाला चालना, घटस्फोटाची तरतूद, स्त्री शिक्षण, स्त्री - पुरुष समानता होय. ते म्हणतात बालविवाहाची चाल बंद केली तरी या चालीविरुध्द वर्तन केले तरी ते धर्मबाहय ठरत नाही बालविवाह शारिरीकदृष्टया फारच अपायकारक आहे. शिक्षणामुळे बौध्दिक व मानसिक वाढ चांगली होते. मुलामुलीची शारिरीक वाढीचा विचार न करता लहानपणी लग्न करणे समाजाच्या दृष्टीने हितकारक नाही.

शिक्षण झालेल्या मुलीचा विवाह झाल्यावर ती मुलगी कुंटुंबाला चांगला आकार देते. कुंटुंबात येणाऱ्या अडचणी दूर करु शकते. बालविवाहाला प्रतिबंध करण्यासाठी संमतिवयाचा कायदा केला पाहिजे संमतीवयामुळे काही लोकांना असे वाटेल की इंग्रज हस्तक्षेप करतात पण संमतिवयामुळे इंग्रजांचा हस्तक्षेप होत नाही.

**पुर्नविवाहाला मान्यता**

आगरकरांनी बालविवाहाला विरोध केला व पुर्नविवाहाला मान्यता दिली आहे. पतीच्या निधनानंतर हिंदू समाजात त्याकाळी स्त्रीला वैधव्याचे दुःख सहन करावे लागत होते. अनेक जातिबंधने, ब्राम्हण यांना पुर्नविवाह योग्य वाटत नव्हता त्यामुळे स्त्रीचे राहिलेले आयुष्य दुःखी होते त्यामुळे त्यांच्या मनात स्त्री पणाची भावना निर्माण होत होती त्यासाठी त्यांना पुनर्विवाह योग्य वाटत होता. सर्व स्तरात पुनर्विवाहाला विरोध होता. त्यामुळे पुर्नविवाहाला मान्यता मिळण्याची स्थिती वाटत नव्हती अशावेळी समाजातील सुशिक्षित वर्गाने पुढाकार घेऊन पुर्नविवाह करावे स्त्रीजीवनातील दुःखे नष्ट करावित.

हिंदू समाजात पुरुषाला पुनर्विवाह करता येतो पण स्त्रीला मात्र विवाह करता येत नाही स्त्री - पुरुष यांचे धर्मशास्त्र हे वेगळे आहे काय. प्रौढ वयाच्या मुलाबरोबर लहान मुलीचा विवाह लावणे योग्य आहे का ? त्यानंतर पती निधनानंतर मुलीला आपले आयुष्य दुःखात घालवावे लागते म्हणून 'स्त्री' ना पुनर्विवाहास मान्यता दिली पाहिजे. असे मत त्यांनी मांडले.

**७.७.४ विष्णुबुवा ब्रम्हचारी**

विष्णुबुवा ब्रम्हचारींच्या मते, आपल्या समाजातील सामाजिक विषमतेमुळे परकियांच्या प्रबळ आक्रमणाला आपण संघटीतपणे तोंड देऊ शकलो नाही. जातिव्यवस्थेमधील जन्मसिदध उच्चनीचतेमुळे निर्माण झालेली विषमता त्यांना मान्य नव्हती. वेदकालीन वर्णव्यवस्थेत जातिभेदी नव्हता असे ते म्हणतात. तत्कालीन अनिष्ठ रुढींपैकी जरठ बाल विवाह, पडदा, बहुपत्नीत्व, सती इ. चालींना ते विरोध करतात तर स्त्रीशिक्षण, प्रौढविवाह, पुनर्विवाह, घटस्फोट, जलपर्यटन, शुध्दीकरण, मंदिरप्रवेश या गोष्टींचा हिरोरीने पुरस्कार करतात. वैयक्तिक जीवनात ते स्वतः जातिभेद पाळत नसत. न्यायदानात त्याकाळी वेगवेगळया जातीच्या लोकांना वेगवेगळा न्याय असे. न्यायाधीशाने महार व ब्राम्हण यांना सारखे वागवावे असे ते सांगतात. त्याकाळात नऊ वर्षाच्या पुढे स्त्री विवाहाची राहिली तर समाजविरोधी कृत्य असे. त्यामुळे एखाद्या व्यक्तीची पत्नी निर्वतली तरी ती व्यक्ती कितीही वयाची असली तरी आठ - नऊ वर्षाच्या मुलीशी लग्न होई. विष्णुबुवा सांगतात ३० वर्षावरील पुरुषाने गतभर्तुकेबरोबर विवाह करावा. सुसंस्कारीत मनात सुधारणांची गंगोत्री असते. व्यक्तिच्या मनावर सुसंस्कार कौटुंबिक जीवनात होतात. कुटुंबातील संस्कार प्रामुख्याने स्त्रीद्वारा होतात. त्यामुळे तिची प्रथम दास्यातून मुक्तता झाली पाहिजे. असे ते सांगतात. यासाठी स्त्रीशिक्षण गरजेचे आहे. विवाहात स्वयंवर पदधती त्यांना योग्य वाटते. विधवा विवाहाबरोबर घटस्फोटाची कल्पनाही त्यांना मान्य होती.

**७.७.५ पंडिता रमाबाई (१८५८-१९२२)**

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात महाष्ट्रात ज्या काही विद्वान व कर्तबगार स्त्रिया होउन गेल्या त्यांमध्ये पंडिता रमाबाई यांचे नाव प्रामुख्याने घ्यावे लागते. त्या काळात स्त्रियांच्या कर्तबगारीला आपल्या समाजात फारच थोडा वाव मिळत असे; कारण आपली कर्तबगारी किंवा कर्तृत्व दाखविण्याची संधीच त्यांना दिली जात नसे. परंतु अशा प्रतिकूल परिस्थितीत देखील पंडिता रमाबाईंनी आपली बुध्दिमत्ता व कर्तबगारी यांच्या जोरावर अलौकिक कामगिरी करून दाखविली होती. त्या काळातील अनेक मान्यवर व्यक्तींचा विरोधही त्यांना सहन करावा लागला होता; परंतु कसल्याही प्रकारच्या विरोधाला न जुमानता किंवा या विरोधापुढे जराही खचून न जाता त्यांनी अनाथ स्त्रियांच्या उध्दाराचे आणि स्त्री-शिक्षणाचे कार्य मोठया जिद्दीने चालू ठेवले.

**स्त्री-उध्दाराचे कार्य**

पंडिता रमाबाईंना प्रथमपासूनच स्त्रियांच्या प्रश्नात रस होता. भारतीय स्त्रियांची स्थिती व त्यांना भोगावी लागणारी दुःखे त्यांनी जवळून पाहिली होती; म्हणून येथील स्त्रियांची स्थिती सुधारण्यासाठी प्रयत्न करण्याचे त्यांनी ठरविले. कोलकत्याहून मुंबईस आल्यानंतर त्यांनी त्या दश्ष्टीने कामाला सुरूवात केली होती. प्रार्थना समाजाच्या सहकार्याने त्यांनी मुंबईत स्थापन केलेल्या 'आर्य महिला समाज' या संस्थेचा उल्लेख वर आलेलाच आहे. स्त्रियांच्या प्रश्नांवर जनमत जागश्त करण्यासाठी त्यांनी मुंबई व पुण्यात जाहीर व्याख्याने दिली होती. त्या इंग्लंड-अमेरिकेत असतानाही त्यांना भारतीय स्त्रियांच्या प्रश्नाचा विसर पडला नव्हता. अमेरिकेहून भारतात परतल्यानंतर तर रमाबाईंनी सर्वस्वी स्त्रियांच्या उध्दाराच्या कार्यालाच वाहून घेतले. त्यांच्या काही कृतींबद्दल वादळे उठली असतील; परंतु त्यांनी ज्या समर्पित वृत्तीने या कामात स्वतःला झोकून दिले त्याविषयी कुणालाही आदरच वाटेल.

पंडिता रमाबाईंनी स्त्रियांसाठी केलेले महत्वाचे कार्य म्हणजे 'शारदासदन' या संस्थेची केलेली स्थापना होय. त्यांनी आपल्या अमेरिकेतील वास्तव्यात स्वतःच्या विद्वत्तेची छाप अमेरिकन लोकांवरही पाडली होती. रमाबाईंनी अमेरिकेत ठिकठिकाणी व्याख्याने देउन भारतीय स्त्रियांच्या शिक्षणासाठी निधी गोळा केला होता. भारतात आल्यावर पंडिता रमाबाईंनी मुंबई येथे ११ मार्च १८८९ रोजी 'शारदासदन' नावाची एक संस्था स्थापन केली. या संस्थेत निराश्रित विधवा व अनाथ स्त्रिया यांच्या राहण्याजेवण्याची मोफत व्यवस्था करण्यात आली होती. त्याचप्रमाणे या स्त्रियांना शिक्षण देण्याची व्यवस्थाही शारदासदनने केली होती. तथापि, त्यापेक्षाही महत्वाची गोष्ट म्हणजे ज्या स्त्रियांना आजवर कधी सुखाचा एखादा शब्दही ऐकायला मिळाला नव्हता, अशा अनाथ व विधवा स्त्रियांना रमाबाईंनी 'शारदासदन'त खरेखुरे प्रेम व आपुलकी यांचा प्रत्यय आणून दिला. गोदुताई जोशी ही शारदासदनमध्ये प्रवेश घेतलेली पहिली बालविधवा होती. याच गोदुताईंशी पुढे महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी पुनर्विवाह केला.

मुंबईतील अल्प प्रतिसाद पाहून रमाबाईंनी शारदासदन मुंबईहून पुण्याला हलविण्याचा विचार चालविला. त्यानुसार १ नोव्हेंबर, १८९० रोजी शारदासदनचे पुण्याला स्थलांतर करण्यात आले. रमाबाईंची संस्था पुण्यात मात्र चांगलीच नावारूपाला आली. रमाबाईंनी ख्रिस्ती धर्माचा स्वीकार केला असला तरी, त्यांच्या शारदासदन संस्थेला पुण्यातील अनेक हिंदू नेत्यांनी व विचारवंतांनी पाठिंबा दिला होता. शारदा सदनच्या सल्लागार मंडळात न्यायमुर्ती रानडे, न्यायमूर्ती तेलंग, डॉ. भांडारकर यांसारख्या मान्यवर व्यक्तींचा समावेश होता.

शारदासदनच्या स्थापनेनंतर पंडिता रमाबाईंनी पुण्यापासून थोडया अंतरावर असलेल्या केडगाव या गावी जमीन खरेदी केली आणि त्या जमिनीवर आपली स्वतंत्र वसाहत उभी केली. याच ठिकाणी त्यांनी मुक्तिसदन नावाची आणखी एक संस्था स्थापन केली. शारदासदनप्रमाणे मुक्तिसदनातही अनाथ मुली व विधवा स्त्रिया यांच्या राहण्या-जेवण्याची तसेच शिक्षणाची मोफत सोय करण्यात आली होती. त्या ठिकाणी कोणत्याही जातीच्या गरीब, अपंग, निराश्रित, विधवा, पतित अशा स्त्रियांना मुक्त प्रवेश होता. अशा स्त्रियांविषयी रमाबाईंना अत्यंत कळवळा वाटत असे. अनाथ स्त्रियांचा उध्दार हेच त्यांनी आपले जीवितकार्य मानले होते. त्यासाठी त्यांनी आयुष्यभर अत्यंत परिश्रम घेतले.

### ७.७.६ डॉ. बाबासाहेब आंबेडकर (१८९१ – १९५६)

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्रियांच्या उध्दारासाठी आणि त्यांच्या न्याय हक्कासाठी आयुष्यभर लढा दिला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्त्रिमुक्तीचे कट्टर समर्थक होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्त्रियांच्या उध्दारासाठी आणि त्यांच्या न्याय हक्कासाठी आयुष्यभर लढा दिला. आंबेडकर यांच्या मते स्त्रियांच्या सर्व या मनुस्मृतीमुळे निर्माण झालेल्या आहेत. हा ग्रंथ सुमारे २००० वर्षापूर्वी मनूने लिहिला असला तरी तो रुढीवादी हिंदूंच्या जीवनाचे आजही नियंत्रण करतो. मनुस्मृती हा ग्रंथ स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायाचे, क्रूरतेचे व विषमतेचे प्रतीक आहे म्हणून सर्व प्रकारची विषमता व शोषण नष्ट करण्यासाठी समतेचे पुरस्कर्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी विषमतेचा पुरस्कर्ता असलेल्या मनुस्मृतीचे २५ डिसेंबर १९२७ रोजी समारंभपूर्वक जाहीरपणे दहन केले. मनुस्मृतीचे दहन ही घटना म्हणजे इतिहासातील एक महान मूर्तिभंजक कृती होती आणि हजाराहून अधिक वर्षाच्या कालावधीत बसला नसेल असा सनातनी हिंदू धर्माला बसलेला तो जबरदस्त धक्का होता.

बाबासाहेबांच्या मते कोणत्याही समाजाचे मूल्यमापन त्या समाजातल्या स्त्रियांची परिस्थिती कशी आहे, यावरुन करता येते. समाजाने स्त्रियांच्या विकासाकडे लक्ष केंद्रित करणे आवश्यक असल्याची त्यांची आग्रही भूमिका होती. ते स्त्री शिक्षणाचे कट्टर पुरस्कर्ते होते. प्रत्येकाने आपल्या घरातल्या मुलीला शिक्षणाची संधी दिली तर हा विचार समाजात सर्वत्र पसरेल. समाजाची प्रगती होण्यासाठी शिक्षणाचा प्रसार व्हायला हवा असे त्यांचे ठाम मत होते. भारतीय समाज व्यवस्थेत घट्ट रुजलेली विषमता नष्ट करण्यासाठी झटणाऱ्या बाबासाहेबांना स्त्रियांवर होणारे अन्याय-अत्याचार अस्वस्थ करत होते. पितृसत्ताक संस्कृतीचा पगडाही लक्षात येत होता. स्त्रियांचे त्यांच्या मनाविरुद्ध झालेले विवाह आणि लादली जाणारी बाळंतपणे याचाही परिणाम दिसत होता. ही परिस्थिती बदलण्याचे एकमेव प्रभावी साधन म्हणजे शिक्षण, यावर त्यांचा ठाम विश्वास होता. हा विचार समाजात रुजण्यासाठी त्यांनी आपल्या लेखांतून - व्याख्यानांतून पोटतिडकीने मांडणी केली.

स्वतंत्र भारताचे पहिले मजूर मंत्री म्हणून बाबासाहेबांनी स्त्रियांच्या सक्षमीकरणाचे अनेक निर्णय घेऊन त्यांची अंमलबजावणी केली. खाण कामगार स्त्रीला प्रसूती भत्ता, कोळसा खाणीत काम करणाऱ्या स्त्री कामगारांना पुरुषांइतकीच मजुरी, बहुपत्नीत्वाच्या प्रथेला पायबंद, मजूर व कष्टकरी स्त्रियांसाठी २१ दिवसांची किरकोळ रजा, एका महिन्याची हक्काची रजा, दुखापत झाल्यास नुकसान भरपाई आणि २० वर्षांची सेवा झाल्यावर निवृत्तिवेतनाची तरतूद यांसारख्या महत्त्वाच्या निर्णयांचा उल्लेख करायला हवा.

बाबासाहेबांनी आपल्या चळवळीत स्त्रियांना आवर्जून सहभागी करून घेतले. १९२७चा महाडचा जवदार तळ्याचा सत्याग्रह, १९३०चा नाशिकचा काळाराम मंदिर सत्याग्रह व १९४२च्या नागपुरातल्या महिला परिषदेत स्त्रिया मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या. लग्न ही मुलीच्या प्रगतीमधली अडचण असून मुलीवर ते लादले जाऊ नये, लग्नानंतर पत्नी ही नवऱ्याची मैत्रीण व समान अधिकार असलेली सहचारिणी असायला हवी. ती नवऱ्याची गुलाम व्हायला नको, असे ते म्हणत. बायको कशी असावी, याबाबत पुरुषाचे मत घेतले जाते, तद्वतच स्त्रीचेही नवऱ्याविषयीचे मत, आवडी-निवडी विचारात घेतल्या पाहिजेत. स्त्रियांनी आपले हक्क मिळवण्यासाठी पुढे यायला हवे, हा विचार आंबेडकरांनी मांडला.

**आपली प्रगती तपासा.**

१. समाजसुधारकांनी स्त्री उद्धारासाठी केलेले कार्य थोडक्यात सांगा.

## ७.८ भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील महिलांची कामगिरी

महिलांनी भारतातील स्वातंत्र्य लढ्यात सहभाग घेतला होता. यामुळे राष्ट्रीय चळवळीला लोक चळवळीचे स्वरूप प्राप्त झाले होते. भारतात ब्रिटिश सत्तेविरूद्ध संघटित उठाव प्रथम १८५७ मध्ये झाला. या उठावातील झाशीची राणी लक्ष्मीबाई, बेगम हजरत महाल यांच्या क्रांतीकार्यामुळे आणि हौतात्म्यामुळे भारतीय स्वातंत्र्य लढ्याला प्रेरणा मिळाली व महिलांनी भारतातील स्वातंत्र्य चळवळीत महत्त्वपूर्ण योगदान दिले. भगिनी निवेदिता यांनी भारतीय स्त्रीयांसाठी भरीव कार्य केले. स्त्रियांसाठी 'शारदामंदिर', वस्तीगृह स्थापन केले. त्यांनी स्वदेशीचा पुरस्कार केला. स्वदेशी चळवळ यशस्वी करण्यासाठी प्रयत्न केले. डॉ. ॲनी बेझंट १८९३ मध्ये भारतात आल्या. १९१४ मध्ये त्यांनी 'न्यू इंडिया' हे इंग्रजी दैनिक सुरू केले. तेव्हापासून त्या राजकारणात सक्रिय झाल्या होत्या. लो. टिळकांच्या बरोबरीने त्यांनी स्वातंत्र्य संग्रामात सहभाग घेतला. होमरूल चळवळ, होमरूल लीगची स्थापना आणि विस्तार त्यांनी घडवून आणला. राष्ट्रीय चळवळीत मोठा उत्साह व प्रेरणा डॉ. ॲनीबेझंट यांच्या कार्यामुळे मिळाली. महिलांना पुरूषांप्रमाणेच मताधिकार मिळाला पाहिजे अशी मागणी त्यांनी १९१७च्या काँग्रेसच्या अधिवेशनात स्वतः अध्यक्ष असताना केली होती. भारतीय महिलांमध्ये सामाजिक जागृती आणि राजकीय स्वातंत्र्याची भावना निर्माण करण्यात या महिलांनी महत्त्वपूर्ण कार्य केले होते.

इ.स.१८५७ च्या उठावानंतर भारतीयांमध्ये राष्ट्रवादी भावना वाढीस लागली. त्यातूनच राष्ट्रीय सभेची स्थापना (१८८५) झाली. सुरूवातीला मवाळ परंतु ब्रिटिशांच्या दडपशाही धोरणामुळे काँग्रेस जहाल बनली. दूष्काळ व प्लेगची साथ व ब्रिटिशांचे आर्थिक धोरण यामुळे अनेक तरुण क्रांतीकारी मार्गाकडे वळले. त्यांच्यात प्रखर राष्ट्रनिष्ठा आणि देशासाठी प्राणार्पण करण्यासाठी प्रवृत्ती निर्माण झाली होती. पुरूष क्रांतीकारकांबरोबर या स्वातंत्र्य चळवळीत इंग्रजांना विरोध करण्यासाठी महिला क्रांतीकारक देखील सहभागी झाल्या होत्या. त्यात प्रामुख्याने सौ. येसुबाई गणेश सावरकर, मादाम कामा, श्रीमती दुर्गादेवी बोहरा, सुहासिनी गांगुली, वीणा दास, प्रीतीलता वड्डेदार, कल्पना दत्त, सरलादेवी घोषाल इ. महिलांनी क्रांतीकारी चळवळीत महत्त्वपूर्ण कार्य केले होते.

म. गांधींच्या कार्यापासून प्रेरणा घेऊन कार्य करणाऱ्या महिला क्रांतीकारकांची भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील कामगिरी अतिशय उल्लेखनीय आहे. राष्ट्रीय चळवळीत कार्य करीत असताना तुरूंगवास, काठीचे प्रहार, संसारीक समस्या, लहान मुले, पती, वैयक्तिक समस्या इ.ला तोंड देत, वेळप्रसंगी प्राणाची आहुती देऊनही त्यांनी कार्य केले होते. सरोजिनी नायडू, स्वरूप राणी, कमला नेहरू, कस्तुरबा गांधी, कमलादेवी चटोपाध्याय, अरुणा असफअली,

सुचेता कृपलानी, विजयालक्ष्मी पंडित, श्रीमती इंदिरा गांधी, दुर्गाबाई देशमुख बिणा दास, अनुसयाबाई काळे, शांती घोष, लिला रॉय, राणी गाईडलू इ. महिलांनी भारतीय स्वातंत्र्य चळवळीत महत्त्वपूर्ण कार्य केले होते व योगदान दिले होते. आझाद हिंद फौजेतील महिला क्रांतीकारकांनी भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील महत्त्वपूर्ण योगदान दिले होते. भारतीय स्वातंत्र्य संग्रामात अधिक तिव्रता येण्यासाठी आजाद हिंद सेनेत स्त्री आणि पुरूष यांच्या स्वतंत्र पलटणी तयार करण्यात आल्या होत्या. आझाद हिंद सेनेमध्ये स्त्रीयांसाठी स्वतंत्र पलटण तयार करण्यात आली होती. तिचे नाव 'झाशीची राणी पलटण' असे होते. त्यांची कमांडर म्हणून कॅ. लक्ष्मी स्वामीनाथन ह्या संघटक म्हणून काम पाहत होत्या. झाशीची राणी पलटणीतील उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या स्त्री क्रांतीकारकांनी मोठे योगदान दिले होते.

**आपली प्रगती तपासा :**

१) स्वातंत्र्य चळवळीतील महिलांच्या कार्याचा मागोवा घ्या.

## ७.९ सारांश

स्त्रीने जीवनात केलेल्या महत्वाच्या कार्यामुळे मोठ्या प्रमाणावर परिवर्तन सुरू झाले. महिलांच्या चळवळीत स्त्रियांचा सहभाग सुरू झाला. विचारांची देवाण-घेवाण वाढत गेली, शिक्षणाचा प्रसार झाला. दळणवळणाची साधने वाढली, प्रसार माध्यमांचा उदय झाला. आधुनिक मुल्ये रूजु लागलीत राज्यघटनेत संवैधानिक प्रयत्न सुरू झाले. ही नवविचारांच्या मुल्यांची देणगी समजली जाते.

## ७.१० प्रश्न

(१) स्त्रियांच्या उद्धारातील ब्रिटीश शासनाच्या प्रयत्नांचा आढावा घ्या.
(२) महाराष्ट्रातील समाज सुधारकांनी स्त्री उद्धारासाठी केलेल्या कार्याचा आढावा घ्या.
(३) आदय स्त्रिसुधारक म्हणून महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या कार्याचे वर्णन करा.
(४) भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील महिलांच्या कार्याचा मागोवा घ्या.

## ७.११ संदर्भ सूची

१) बिपनचंद्र व इतरः भारतीय स्वातंत्रलढा (India's Struggle for Independence), के. सागर प्रकाशन
२) बिपीनचंद्र, अमलेश त्रिपाह्नी, बरुणडेः स्वातंत्र्याचा लढा (Freedom Struggle), National Book Trust
३) ग्रोव्हर आणि बेलेकरः आधुनिव भारताचा इतिहास (एस.चंद प्रकाशन)

४) सुमन वैद्य व शांता कोल्हेकर:
   1) आधुनिक भारताचा इतिहास (१८५७“१९२०)
   2) आधुनिक भारताचा इतिहास (१९२०“१९४७) श्री. साईनाथ प्रकाशन
५) सुमित सरकार: आधुनिक भारत“ के. सागरप्रकाशन
६) डॉं. जयसिंगराव पवार: आधुनिक हिंदुस्तानचा इतिहास“ श्री. विद्याप्रकाशन
७) धनंजय आचार्य:आधुनिक भारत (१७५०“१९५०)

❖❖❖❖

# ८

# ब्रिटीश काळातील सामाजिक घटक - दलित

**प्रकरणाची रचना :**

८.० उद्दिष्ट्ये
८.१ प्रस्तावना
८.२ दलित
८.३ दलित चळवळ (आंबेडकर पूर्व कालखंड)
    ८.३.१ महात्मा ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले
    ८.३.२ गोपाळ बाबा वळंगकर
    ८.३.३ किसन फागू बणसोडे
    ८.३.४ शिवराम जानबा कांबळे
    ८.३.५ महर्षी विठ्ठल रामजी शिंदे
    ८.३.६ नारायण गुरू
    ८.३.७ छत्रपती शाहू महाराज
८.४ दलित चळवळ व डॉ. बाबासाहेब आंबेडकर
    ८.४.१ बालपण व शिक्षण
    ८.४.२ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक कार्य
    ८.४.३ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे राजकीय कार्य
    ८.४.४ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक कार्य
    ८.४.५ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची वृत्तपत्रे
    ८.४.६ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक कार्य
८.५ महात्मा गांधीजी
८.६ सारांश
८.७ प्रश्न
८.८ संदर्भ सूची

## ८.० उद्दिष्ट्ये

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपल्याला

१. आंबेडकर पूर्व कालखंडातील दलित चळवळ अभ्यासता येईल.
२. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याचा आढावा घेणे.
३. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे राजकिय, सामाजिक व शैक्षणिक कार्य समजून घेणे.
४. महात्मा गांधीजींच्या योगदानाचा अभ्यास करणे.

## ८.१ प्रस्तावना

आधुनिक भारताच्या इतिहासाला वेगळे वळण देण्यात आणि येथील समाजव्यवस्थेत परिवर्तन घडवून आणण्यात सत्यशोधक चळवळी इतकीच दलित चळवळीने देखील महत्त्वाची भूमिका बजावली आहे. भारतीय समाजात शेकडो वर्षांपासून उपेक्षितांचे जीवन नशिबी आलेल्या दलित जातींच्या लोकांना जागृत करून त्यांना नवा आत्मविश्वास प्राप्त करून देण्याचे अत्यंत कठीण असे कार्य दलित चळवळीने केले आहे. दलितांवरील अन्यायाचे निवारण केले जावे, त्यांना समाजातील इतर घटकांच्या बरोबरीने अधिकार मिळावेत, त्यांच्या सामाजिक स्थितीत सुधारणा व्हावी म्हणून बऱ्याच जणांनी प्रयत्न केले होते. भारतात इंग्रजी सत्तेची स्थापना झाल्यानंतर इंग्रजी शिक्षणातून आधुनिक विचारांचा स्पर्श झालेली व त्या विचारांच्या संपर्कात आलेली जी नवी पिढी देशात उदयास आली; त्या पिढीतील काही तरूणांनी येथील समाजव्यवस्थेत बदल घडवून आणण्यासाठी समाजसुधारणेची चळवळ सुरू केली. या समाजसुधारकांपैकी काहींनी अस्पृश्यांची स्थिती सुधारण्यासाठी उपयुक्त कार्य केले होते. त्यामध्ये प्रामुख्याने महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, छत्रपती शाहू महाराज, महात्मा गांधीजी, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा अंतर्भाव होतो. परंपरेने शुद्र, आधुनिक काळातील अस्पृश्य, अलीकडे दलित म्हणून संबोधले जाणारे वंचित, उपेक्षित असा समाज घटक आणि त्यांचा सामाजिक स्तर उचांवण्यासाठी झालेल्या चळवळींचा अभ्यास या घटकात आपण करणार आहोत.

## ८.२ दलित

भारतीय समाज व्यवस्था प्राचीन काळापासून जाती व्यवस्थेने विभागलेली होती. या व्यवस्थेत अस्पृश्य - आदिवासी - भटके हे तळाशी होते. या कनिष्ठ वर्गावर विविध प्रकारांची बंधने लादण्यात आली होती. ती जाचक व अन्यायकारक होती. उच्चवर्णीयांना जन्मजात प्रतिष्ठा आणि शुद्रांना कर्मजात हाल अपेष्टा अशी विषम सामाजिक परीस्थिती होती. अस्पृश्यांना कनिष्ठ प्रतीचे जीवन व्यतीत करावे लागत होते. उत्पादनाची साधने उच्च वर्णीयांकडे असल्यामुळे शुद्रांना उपेक्षेबरोबरच दैन्य, दारिद्र्य, उपासमार गुलामगिरीचे जीवन जगावे लागत असे. भारतीय समाजात अस्पृश्यतेची प्रथा अगदी प्राचीन काळापासून चालत आली होती. अस्पृश्य बांधव शेकडो वर्षे सामाजिक विषमता, अन्याय व शोषण यांचे बळी ठरले होते; परंतु आपल्यावरील अन्यायाचा प्रतिकार करण्याचा विचार त्यांच्या मनात कधी आला नाही. याचे कारण असे की, त्यांना आपल्यावर होत असलेल्या अन्यायाची जाणीवच झाली नव्हती. कित्येक वर्षाच्या धार्मिक संस्कारांतून आणि त्यासंबंधीच्या प्रभावातून अस्पृश्यांची अशी मानसिकता तयार झाली होती की, आपल्या वाटयाला आलेले जीवन आपल्या नशिबाचा, कर्माचा किंवा पूर्वसंचिताचा भाग आहे. त्याबद्दल इतरांना दोष देण्याचे कारण नाही. दलित चळवळीच्या माध्यमातून अस्पृश्यांना त्यांच्यावर होत असलेल्या अन्यायाची खरी जाणीव समाजसुधारकांनी करून दिली.

भारतातील प्रबोधनाला सामाजिक सुधारणा चळवळीने सुरवात झाली. या चळवळीच्या प्रवक्त्यांत हिंदू, मुसलमान, पारशी, ख्रिस्ती अशा अनेक धर्मांचे लोक होते. या चळवळींच्या मुळाशी जातीधर्मातील अशी एक व्यापक सामाजिक दृष्टी होती. परंतू शोषितांची, पददलितांची दु:खे वेशीला टांगण्याच्या बाबतीत मात्र त्या स्त्रीदास्य विमोचनाच्या पुढे फारशा जाऊ शकल्या नाहीत. स्त्रियांच्या व शुद्रांच्या परिस्थितीत बदल करावयाचा तर धार्मिक, सामाजिक व आर्थिक

गुलामगिरी नष्ट करावयास पाहिजे असे त्यांच्या लक्षात आले. त्या काळातील समाजाचा विचार करता धर्मसंस्थेचा प्रभाव जीवनातील सर्व अंगावर होता. बहुजन समाज अज्ञान, दारिद्र्यात खितपत होता. अंधश्रद्धा, धर्मभोळेपणा, अनिष्ट चालीरिती, जातिभेदातील उच्चनीचतेचा कठोर अंमल हे सर्वच याला जबाबदार होते. अस्पृश्यता तीव्र स्वरूपात अस्तित्वात होती. या स्थितीत सुधारणा घडवून आणण्याचे कार्य १९व्या शतकात सुरू झाले. भारतीय इतिहासात १९वे शतक प्रबोधनाचे ठरले.

भारतात ब्रिटिश सत्ता स्थिर झाली आणि भारतात 'व्यक्ति स्वातंत्र्य" आणि 'उदारमतवाद" ही दोन मूल्ये भारतीय समाज जीवनात प्रसारीत झाली व त्याला अनुसरून सामाजिक सुधारणा चळवळी सुरू झाल्या. या उदारमतवादी विचार प्रवाहात व्यक्तिस्वातंत्र्य, विचारस्वातंत्र्य आणि बुद्धिप्रामाण्य ही मुख्ये तत्वे अंतर्भूत आहेत. ब्रिटिश सत्ता, सहवास, संपर्क पाश्चात्य शिक्षण यामुळे तळागातील माणसाचा उद्धार करण्यासाठी समाज सुधारकांनी कार्य केले. ब्रिटिश काळातील कायदे याला उपकारक ठरले. अस्पृश्य परंपरा नष्ट करण्यासाठी व वंचित आणि त्यांचा सामाजिक स्तर उंचावण्यासाठी मोठ्या प्रभावीपणे कार्य १९व्या शतकात सुरू झाले. हा वर्ग १९३१च्या जनगणनेच्या अहवालानुसार ५ कोटी १ लाख ९२ हजार एवढा होता. लोकसंख्येने मोठा असणाऱ्या या वंचित वर्गाचा उद्धारासाठी मानव मुक्तीसाठी, सामाजिक गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी सामाजिक आणि धार्मिक सुधारणा चळवळी उदयाला आल्या.

दलित चळवळीचे दोन पर्व आहेत.

१. आंबेडकर पूर्व चळवळ,

२. आंबेडकर चळवळ

पहिल्या पर्वात प्रामुख्याने महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, गोपाळ बाबा वलंगकर, शिवराम कांबळे, किशन बनसोडे, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, महात्मा गांधीजी, छत्रपती शाहू महाराज हे होते.

दुसऱ्या पर्वात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सामाजिक, आर्थिक, राजकीय व सांस्कश्तिक आघाडयांवर विरोध नोंदविले होते. स्वाभिमान, स्वतंत्र अस्मिता, क्रांतिकारी जाणीव, प्रचंड आत्मविश्वास, पारंपारिक गोष्टी सोडून देण्याची तयारी ही या पर्वातील ठळक वैशिष्टये होती.

## ८.३ दलित चळवळ (आंबेडकर पूर्व कालखंड)

भारतामध्ये पाश्चात्य शिक्षण घेउन विचारवंत आणि सुधारकांनी जी पहिली पिढी निर्माण झाली ती मुख्यत्वे उच्च वर्णातील होती. कारण जो मोठया संख्येत बहुजन समाज व त्यापेक्षाही कनिष्ठ असा दलित समाज सुधारणांपासुन खुप दूर होता. बहुजन समाजात शिक्षणाचा अभाव होता. बहुजन समाजात व शुद्रातिशुद्र समाजात वैचारिक जागृती करणे, धार्मिक सामाजिक गुलामगिरीतून त्यांना मुक्त करणे, त्यांचे प्रबोधन करणे व विदयेचा प्रसार करणे, शेतकऱ्यांचे दु:ख वेशीवर टांगणे, त्यांना शिक्षणाचे महत्व पटवून देणे, सक्तीच्या शिक्षणाचा पुरस्कार करणे या सर्व गोष्टी समाजसुधारकांनी केल्या. आपल्या पदरचा एक आणि एक पैसा मोजून प्राथमिक शाळा स्थापन केल्या. पद-दलितांना समाजात मानाने जगता आले पाहिजे, त्यांना स्वत:चा चरितार्थ

चांगल्या व शुद्ध मार्गाने करता आला पाहिजे यासाठी समाजसुधारकांनी मोलाचे कार्य केले. या समाजसुधारकांचा आढावा पुढीलप्रमाणे सांगता येईल.

### ८.३.१ महात्मा ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले

इ. स. १८२७ मध्ये महात्मा ज्योतिबा फुले यांचा जन्म पुणे येथे माळी कुटुंबात झाला. वयाच्या ७ व्या वर्षी त्यांच्या शालेय शिक्षणाला प्रारंभ झाला. १३ व्या वर्षी सावित्रीबाईंशी विवाह झाल्यावर शिक्षण स्काटिश मिशनरी शाळेत सुरू झाले. भारतीय समाजावर होणाऱ्या अन्यायाचे निराकारण करण्यासाठी शिक्षणाची नितांत गरज वाटू लागली. फुले यांनी शिक्षणाचे क्षेत्र वाढवण्यासाठी प्रयत्न केले. भारतातील फार मोठा वर्ग अज्ञानात होरपळत होता. अस्पृश्य, स्त्रिया, शेतकरी व मजूर हे सर्व वर्ग अनेक वर्षांपासून अन्याय सहन करीत होते यासाठी फुलेंनी इ.स. १८४८ साली मुलींसाठी पुण्यात प्रथम शाळा स्थापन केली. तसेच अस्पृश्यांच्या उद्धारासाठी फुलेंनी अस्पृश्यांसाठी शाळा स्थापन केली. इ. स. १८५२ साली अस्पृश्यांसाठी पुण्यात प्रथम शाळा स्थापन केली. अस्पृश्यांची सामाजिक गुलामगिरीतून मुक्तता व्हावी व त्यांना उदरनिर्वाहाचे साधन प्राप्त व्हावे यासाठी फुलेंनी अस्पृश्यांना शिक्षण देण्याचे कार्य केले. इ. स. १८५८ पर्यंत तीन शाळा सुरू केल्या. पुण्यात अस्पृश्यांच्या मुलींसाठी प्राथमिक शाळा सुरू केल्या. अस्पृश्यांना पाणी पिण्यासाठी स्वतःच्या घरातील पिण्याच्या पाण्याचा हौद खुला केला.

बहुजन समाजाच्या व स्त्रियांच्या उद्धारासाठी त्यांनी चळवळीला संघटनात्मक स्वरूप प्राप्त करून देण्यासाठी इ. स. १८७३ मध्ये सत्यशोधक समाजाची स्थापना केली. या अन्यायाखाली भरडलेल्या समाजाला आत्मविश्वास दाखविला. अस्पृश्यता, सामाजिक विषमता, गुलामगिरी याची खाण जातीसंस्था आहे, ही उखडून काढल्याशिवाय समानतेवर आधारलेला समाज निर्माण व्हावयाचा नाही, यासाठी सत्यशोधक समाजाची स्थापना केली त्यांच्या अनुयायांनी 'दिनबंधु' आणि 'दिनमित्र' हे वृत्तपत्र सुरू करून समाज प्रबोधनाचे कार्य केले. समता प्रधान समाजव्यवस्थेची निर्मिती त्यांना आवश्यक वाटत होती. म. फुलेंनी आपल्या 'शेतकऱ्यांचा असूड', 'गुलामगिरी', 'अस्पृश्यांची कैफियत', 'सार्वजनिक सत्यधर्म' इ. ग्रंथांतून जातिभेद व अस्पृश्यता या हिंदुधर्माच्या दोषांवर टीका केली. म. फुलेंनी समताप्रधान समाज व्यवस्था निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले.

### ८.३.२ गोपाळबाबा वळंगकर

गोपाळबाबा वळंगकर ब्रिटिशांच्या लष्करातून १८८६ साली निवृत्त झाले होते. त्यांनी आपल्या सेवानिवृत्तीनंतर अस्पृश्य समाजाची सेवा करण्यासाठी अनार्य दोष परिहार नावाची संघटना स्थापन केली होती. सन १८८८ मध्ये त्यांनी विटाळ विध्वंसन नावाची पुस्तिका लिहून अस्पृश्यतेवर विदारक प्रकाश टाकला. त्यांना जेव्हा अस्पृश्यांना ब्रिटीश लष्करात बंदी आहे कळल्यावर त्यांनी महात्मा फुले, बाबा पद्मनजी यांची भेट घेउन चर्चा केली आणि १८९४ मध्ये ब्रिटीश सरकारकडे निवेदन सादर केले. आपल्या निवेदनात म्हटले होते, अस्पृश्यांची लष्करात भरती केली पाहिजे, अस्पृश्यांनी वेळोवेळी ब्रिटीशांच्या बाजूने लढून आपले शौर्य सिद्ध केलेले आहे, ब्रिटीश सरकारने अस्पृश्यांच्या लष्कर भरतीस बंदी करू नये. अस्पृश्यांमधील पोटजातीतील तणाव संपवणे, त्यांच्यामध्ये रोटी-बेटीचा व्यवहार सुरू करणे, त्यांना मांस खाण्यापासून परावृत्त करणे, त्यांच्यात संघटनेची जाणीव निर्माण करणे यासाठी त्यांनी कार्य केले. अस्पृश्यांसाठी शाळा, वाचनालये आणि वसतीगृहे सुरू करणे, अस्पृश्यांच्या सभा व परिषदा भरवणे, अस्पृश्यांच्या प्रश्नाला वाचा फोडण्यासाठी वृत्तपत्र काढणे आणि लेखन करणे अशा प्रकारचे कार्य केले.

### ८.३.३ किसन फागू बणसोडे

किसन फागू बणसोडे यांनी १९०० च्या सुमारास आपले समाज कार्य सुरू केल्याचे दिसते. १९०७ मध्ये त्यांनी अस्पृश्य मुलींच्या शिक्षणासाठी चोखामेळा कन्या शाळा स्थापन केली. मुलींसाठी वसतीगृहे काढले. ब्रिटीश राजवटीत महारांनी गावकी सोडली आणि मोठया प्रमाणात रेल्वे, रस्ते बांधणी आणि मिलमध्ये काम करणे सुरू केले त्यामुळे अस्पृश्यांमध्ये मजूर वर्ग वाढला. महार मजूरांवर मालक आणि सवर्णांकडून सारखाच अन्याय होत असे. मजूरांचे प्रश्न सोडविण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. १९१९ मध्ये अत्यंज समाज नावाची संस्था स्थापन केली. किसन फागु बणसोडे यांनी कविता, लेख, तमाशा आणि नाटक अशा प्रकारचे लेखन करून अस्पृश्यांच्या प्रश्नाविषयी जागरूकता निर्माण केली आणि अस्पृश्यांच्या वतीने संघर्ष केला. त्यांनी सन १९१८ ते १९२२ काळा मजूर पत्रिका नावाचे पत्रक चालविले.

### ८.३.४ शिवराम जानबा कांबळे

शिवराम जानबा कांबळे अस्पृश्यांचे महत्त्वपूर्ण कार्य करणारे नेते होते. त्यांनी १९०३ मध्ये पुणे जिल्हयातील सासवड येथे ५१ गावच्या महाराची व अस्पृश्यांची पहिली परिषद बोलावली. आपल्या हक्कांसाठी अस्पृश्यांनी केलेला हा पहिला संघटीत आणि सनदशीर प्रयत्न होता. १९०८ मध्ये त्यांनी सोमवंशीय मित्र नावाची मासिक पत्रिका सुरू केली. या मासिकाचे संपादक होते. १९१० मध्ये शिवराम जानबा कांबळे यांनी जेजूरी येथे आपल्या मुलींना मुरळी म्हणून देवाला वाहू नये असे आवाहन केले. त्यांनी ब्रिटिश सरकारकडे इ.स. १९१० मध्ये त्यांनी अस्पृश्यांच्या जीवनात सुधारणा करावी अशी मागणी केली. त्यांनी आपल्या लेखनातून अस्पृश्यामधील अंधश्रध्देवर जसे प्रहार केलेले आहेत तसे सवर्ण आणि ब्रिटिशांकडून होणाऱ्या अत्याचाराविरूध्द दादही मागितली.

### ८.३.५ महर्षी विठ्ठल रामजी शिंदे

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचा जन्म २३ एप्रिल १८७३ रोजी कर्नाटकातील जमखिंडी या गावात झाला. विठ्ठल रामजी शिंदे यांनी दलितांच्या उद्धारासाठी विशेष पाउले उचलली होती. त्यांचे संपूर्ण कुटुंबच या कार्यात समाविष्ट होते. शिंदेंनी डिप्रेस्ड क्लासेस मिशनची स्थापना इ.स. १९०६ साली केली. प्रार्थना समाजाच्या प्रचार कार्यार्थ बाहेर पडल्यावर अस्पृश्य लोकांच्या उन्नतीकडे त्यांचे लक्ष वळले. महाराष्टात प्रमुख ठिकाणी अस्पश्श्यांच्या परिषदा घेउन त्यांना संघटित करण्याचे प्रयत्न केले. इ. स. १९१० साली कलकत्ता अधिवेशनात अस्पृश्यता निवारण हा ठरावही पास करून घेतला. पुण्यात या संस्थेतर्फे विदयार्थी वसतीगृह व अहिल्याश्रम चालू केले. स्वतः कुटुंबासह महारवाडयात जाउन राहिले. त्यांचे सर्व कुटुंब अस्पृश्य उद्धाराच्या कामाला लागले होते. त्यांची बहिण जन्नाका अहिल्याश्रमात स्वयंपाक करी. त्यांची पत्नी महार मांगवाडयात जाउन अडलेल्या स्त्रियांची बाळंतपणे स्वतः करी. त्यांच्या जातीतील लोकांनी महार शिंदे म्हणून त्यांची अवहेलना केली. विचारवंत व सुधारक कार्यकर्ते म्हणून विठ्ठल रामजी शिंदेचे कार्य मोलाचे आहे.

### ८.३.६ नारायण गुरू

अस्पृश्यता विरोधी चळवळ दक्षिण भारतात रामास्वामी पेरियार यांनी सुरू केली. त्याचप्रमाणे शुद्र एझवा कुटुंबात जन्माला आलेले नारायण गुरू यांनी १८८८ मध्ये शिवरात्रीच्या दिवशी ''अरवीपूरम चळवळ'' सुरू केली. मंदिर प्रवेश नाकारलेल्या एका शुद्राने अरवीपूरम येथे शिव मंदिरात शिवाच्या मूर्तीवर अभिषेक केला. या घटनेच्या स्मृतिप्रीत्यर्थ अस्पृश्यता विरोध

दर्शविण्यासाठी संत नारायण गुरू यांनी ही चळवळ सुरू केली होती. नारायण गुरू यांना डॉ. पल्पू व कुमारन आसन यांचे सहकार्य मिळाल्याने ही चळवळ जोमाने सुरू झाली.

### ८.३.७ छत्रपती शाहू महाराज

शाहू महाराजांचे वर्णन हे माणसातला राजा व राजामधील माणूस असे केले जाते. १८९४ मध्ये त्यांनी कोल्हापूरच्या गादीचा कारभार पाहण्यास सुरूवात केली. शाहू महाराजांनी भारतातील मागासलेल्या गरीब व कष्टकरी जनतेची सर्वांगीण प्रगती व्हावी यासाठी त्यांनी सतत प्रयत्न केले. जातिभेद निर्मुलन ही क्षणात होणारी गोष्ट नाही तर त्यासाठी दिर्घकाळ चिकाटीची आवश्यकता आहे, असे त्यांना वाटत होते. मागासलेल्या जातींनी शिक्षण घेउन आपले सामर्थ्य वाढविले पाहिजे या दृष्टिकोनातून ते जातिसंस्थांना व जातिपरिषदांना मदत करत. बहुजन समाजात शिक्षणाने जागृती निर्माण झाली की त्यांना आपले हक्क संपादता येतील असे ते आग्रहाने सांगत.

अतिशय गाजलेले व परिवर्तनाचा (धार्मिक) मानबिंदु असलेले वेदोक्त प्रकरण, आंतरजातीय विवाहाला प्राधान्य, अस्पृश्योद्धार, ब्राह्मण्याला, जातीभेदाला विरोध, १९०२ मध्ये अस्पृश्यांना नोकऱ्यांमध्ये आरक्षण देणारा ऐतिहासिक निर्णय, पुनर्विवाह नोंदणी कायदा, जन्माधिष्ठित भेदभाव नाकारणारी समाज सुधारक सत्यशोधक चळवळ प्रभावी पणे राबविण्यासाठी त्यानी उपाय योजना केली होती. अस्पृश्यता निवारणाच्या संदर्भात त्यांनी आपल्या राज्यात काही ठाम पावले उचलली. अस्पृश्यांची प्रत्येक तऱ्हेने काळजी घेतली पाहिजे असा हुकूम जाने.१९१९ मध्ये त्यांनी काढला. तसेच त्यांनी अस्पृश्यांना समानतेने वागवले नाही तर शिक्षकांना जाब दयावा लागेल, अशा संस्थांचे अनुदान थांबविले जाईल, असेही त्यांनी घोषित केले. तसेच महार वतने रद्द करून रयतेला जमिनी दिल्या. गंगाराम कांबळे याला भरवस्तीत चहाचे दुकान काढण्यास प्रोत्साहन दिले. एवढेच नव्हे तर ते स्वतःच त्या दुकानात चहा पिण्यास जात. होतकरू अस्पृश्य तरूणांना त्यांनी वकिलीच्या सनदा दिल्या. यामुळेच समाजातील ज्या ज्या घटकांची कुचंबणा होते, त्या सर्वांची त्यातून सोडवणूक करण्याचे त्यांनी प्रयत्न केले.

**आपली प्रगती तपासा.**

१) आंबेडकर पूर्व कालखंडातील दलित चळवळ थोडक्यात सांगा.

## ८.४ दलित चळवळ व डॉ. बाबासाहेब आंबेडकर

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चळवळीला 'दलितांच्या आत्मसन्मानाची चळवळ' असे संबोधले जाते. डॉ. भीमराव आंबेडकरांनी आपले आयुष्य दलितांच्या उद्धारासाठी खर्च केले. ते खऱ्या अर्थाने दलितांचे उद्धारक ठरतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जन्माला आले त्या काळात देशातील समाजात अस्पृश्यता, जातीयता, विषमता व अंधश्रध्दा यासारख्या अनिष्ट प्रथा प्रचलित होत्या. स्वतः डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यतेचे चटके सहन केले होते.

त्यामुळेच त्यांनी समाजपरिवर्तन आणि दलितांच्या उध्दारासाठी आयुष्यभर लढा दिला आणि त्यामध्ये ते यशस्वी झाले. त्यांच्या स्थितीत परिवर्तन घडवून आणण्यासाठी त्यांच्यात स्वाभिमान निर्माण करणे, आत्मविश्वास जागृत करणे आणि त्यांना संघटित करून न्यायासाठी संघर्ष करण्यासाठी तयार करणे महत्वाचे होते. यासाठी प्रथम दलितांचे समाजप्रबोधन आणि संघटन कार्य बाबासाहेबांनी केले. त्यांच्या या कार्यामुळेच त्यांना जनतेने 'बाबासाहेब' ही पदवी बहाल केली.

### ८.४.१ बालपण व शिक्षण

बाबासाहेब डॉ. भीमराव रामजी आंबेडकर यांचा जन्म १४ एप्रिल १८९१ रोजी मध्यप्रदेशातील महू या गावी अस्पृश्य समजल्या गेलेल्या महार जातीत झाला. त्यांचे संपूर्ण नाव भीमराव रामजी सकपाळ असे होते. बाबासाहेबांचे मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण दापोली, सातारा, मुंबई अशा निरनिराळया गावी झाले. त्यांच्या लहानपणी भारतीय समाजावर जातीयतेचा फार मोठा पगडा होता. अस्पृश्यतेचे पालन तर अतिशय काटेकोरपणे केले जात होते; त्यामुळे बाबासाहेबांना लहान वयातच अस्पृश्यतेचे चटके सहन करावे लागले होते. शाळेतही त्यांना अपमानास्पद वागणूक दिली जात होती. अशा प्रतिकूल परिस्थितीतही त्यांनी जिद्द न सोडता आपले शिक्षण चालू ठेवले होते. इ. स. १९०७ मध्ये मुंबईच्या एल्फिन्स्टन हायस्कूलमधून ते मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाले. त्यानंतर पुढील शिक्षणासाठी त्यांनी मुंबईच्या एल्फिन्स्टन कॉलेजात प्रवेश घेतला. याच कॉलजातून ते १९१२ मध्ये बी.ए. ची परीक्षा उत्तीर्ण झाले.

इ.स. १९१३ मध्ये सयाजीराव गायकवाड यांच्या आर्थिक साहाय्यामुळे बाबासाहेब उच्चशिक्षणासाठी अमेरिकेला गेले. अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठातून त्यांनी एम.ए. आणि पीएच.डी. या पदव्या संपादन केल्या. त्यानंतर पुढील अध्ययनासाठी ते इंग्लडला गेले; परंतु आर्थिक अडचणींमुळे इ.स. १९१७ मध्ये त्यांना भारतात परत यावे लागले. आंबेडकरांना शिक्षणाची अतिशय ओढ होती, त्यामुळे इंग्लंडमधील अर्धवट अवस्थेत राहिलेले शिक्षण पूर्ण करण्याची त्यांची इच्छा कायमच होती. ही इच्छा पूर्ण होण्याचा योग छत्रपती शाहू महाराजांनी दिलेल्या आर्थिक मदतीमुळे जुळून आला. इ.स. १९२० मध्ये आंबेडकर पुन्हा इंग्लंडला गेले. तेथे त्यांनी प्रथम अर्थशास्त्रात बी.एस.सी. ची पदवी संपादन केली. त्यानंतर त्यांच्या 'दि प्रॉब्लेम ऑफ रूपी' या प्रबंधाबद्दल लंडन विद्यापीठाने त्यांना डी.एस.सी. ही पदवी बहाल केली. इंग्लंडमधील या वेळच्या वास्तव्यात बाबासाहेब बॅरिस्टरदेखील झाले. अशा प्रकारे त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले.

### ८.४.२ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक कार्य

इ. स. १९२० पासून डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे सामाजिक जीवनात भाग घेऊ लागले होते. उच्चविद्या संपादन करून मुंबई हायकोर्टामध्ये ते वकिलीचा व्यवसाय करू लागले. याच काळात देशातील राजकीय चळवळ गांधीमुळे अधिक गतिमान झाली होती. सामाजिक प्रश्नांना राजकीय प्रश्नांइतकेच महत्व प्राप्त होवू लागले. या सर्व पाश्र्वभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर व त्यांची मानवमुक्तीची चळवळ समजावून घेणे आवश्यक आहे.

भारतात परतल्यावर आंबेडकरांनी काही काळ बडोदा संस्थानात नोकरी केली; परंतु त्यांना अस्पृश्यतेबाबत तेथे आलेल्या कटू अनुभवामुळे त्यांनी त्या नोकरीचा त्याग केला. त्यानंतर मुंबईच्या सिडनेहॅम कॉलेज ऑफ कॉमर्समध्ये अर्थशास्त्राचे प्राध्यापक म्हणून त्यांची नेमणूक झाली. तथापि, नोकरीत असतानाच सामाजिक कार्याकडेही त्यांचे मन ओढ घेऊ

लागले. आपल्या समाजबांधवांच्या उध्दारासाठी काहीतरी करण्याच्या इच्छेतून सामाजिक कार्याचे आकर्षण त्यांच्यात निर्माण झाले होते. कोल्हापूरचे छत्रपती शाहू महाराज यांच्याकडून मिळालेल्या मदतीच्या आधारे बाबासाहेबांनी इ. स. १९२० मध्ये 'मूकनायक' नावाचे पाक्षिक सुरू केले.

इंग्लंडहून आपले शिक्षण पूर्ण करून परत आल्यावर आंबेडकरांनी आपल्या सार्वजनिक कार्याला पुन्हा एकदा नव्या जोमाने सुरूवात केली. आपल्या अस्पृश्य बांधवांवरील अन्याय दूर करणे आणि येथील समाजव्यवस्थेत त्यांना सन्मानाचे व प्रतिष्ठेचे स्थान प्राप्त करून देणे हे उद्दिष्ट डोळयासमोर ठेवून त्यांनी सार्वजनिक जीवनात पदार्पण केले होते. अस्पृश्यांवर होत असलेल्या अन्यायाचा व त्यांच्या अमानुष शोषणाचा त्यांनी प्रत्यक्षच अनुभव घेतला होता; त्यामुळे अस्पृश्यतेच्या प्रश्नाची दाहकता तेच ओळखू शकत होते. त्यातूनच दलितांना त्यांचे न्याय्य हक्क मिळवून देण्यासाठी आपले संपूर्ण जीवन पणाला लावण्याचा चंग त्यांनी बांधला. त्याकरिता एका व्यापक सामाजिक चळवळीची पायाभरणी त्यांनी केली. या चळवळीला 'दलित चळवळ' असे संबोधले जाते. खरे तर ही दलितांच्या आत्मसन्मानाची चळवळ होती.

### बहिष्कृत हितकारिणी सभा

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सर्वप्रथम दलितांमध्ये जागृती करण्याचे आणि त्यांना संघटित करण्याचे काम हाती घेतले. २० जुलै १९२४ रोजी बहिष्कृत हितकारिणी सभा स्थापन झाली. दलित समाजात शिक्षणाचा प्रसार घडवून आणणे, दलितांची सांपत्तिक स्थिती सुधारण्यासाठी प्रयत्न करणे आणि शिक्षणाच्या माध्यमातून त्यांच्यात जागृती घडवून आणणे ही या संस्थेची प्रमुख उद्दिष्टे होती.

### डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सत्याग्रह

महाराष्ट्रातील दलितांवर अस्पृश्यतेच्या नावखाली उच्चवर्णीयांकडून फार अपमानास्पद वागणूक दिली जात होती. त्यांना सार्वजनिक पाणवठयावर पाणी भरण्याचा किंवा घेण्याचा अधिकार नव्हता. त्यामुळेच बाबासाहेबांनी दलितांमध्ये धाडस आणि आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी महाड येथे चवदार तळयातील पाण्यासाठी सत्याग्रह करण्याचे ठरविले. त्यासाठी बाबासाहेबांनी १९ व २० मार्च १९२७ रोजी महाड येथे चवदार तळयावर पाणी पिण्याचा हक्क प्रस्थापित केला. ही घटना स्पृश्यांना सहन झाली नाही. त्यांनी दलितांवर लाठया-काठयांनी हल्ले केले व महारांनी तळे बाटविले म्हणून त्यात गोमूत्र टाकून त्याचे शुध्दीकरण केले. पाण्यासाठी महाड येथे बाबासाहेबांनी केलेला सत्याग्रह हा जगाच्या इतिहासातील पहिला सत्याग्रह ठरतो.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ठरविल्यानुसार २५ व २६ डिसेंबर १९२७ रोजी महाड येथील परिषदेत मनुस्मृती हा ग्रंथ जातीव्यवस्था, अस्पश्श्यता व विषमतेचा पुरस्कर्ता असून या ग्रंथातील वचनांमुळेच जातीव्यवस्था, अस्पृश्यता व जातीनिर्बंधाना बळकटी प्राप्त झाली. या परिषदेत २५ डिसेंबर १९२७ रोंजी मनुस्मृती या ग्रंथाचे जाहिररीत्या दहन करण्यात आले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना जसा पाण्यासाठी सत्याग्रह करावा लागला त्याप्रमाणे त्यांना मंदिर प्रवेशासाठीही सत्याग्रह करावा लागला. दलितांना सार्वजनिक पाणवठयावर जसा प्रवेश नव्हता. त्याप्रमाणे त्यांना सार्वजनिक हिंदू - मंदिरातही प्रवेश करण्यास मनाई होती. त्यांच्या मंदिर प्रवेशामुळे मंदिरे बाटणार होती. माणूस म्हणून दलितांना जीवन जगता यावे हा या सत्याग्रहामागचा हेतू होता. त्यामुळे १३ ऑक्टोबर १९२९ रोजी पुणे पर्वती मंदिर सत्याग्रह सुरू झाला. नाशिक येथील काळाराम मंदिरात प्रवेश मिळविण्यासाठी ३ मार्च १९३० रोजी

सत्याग्रहाला प्रारंभ झाला. हा सत्याग्रह खूपच गाजला. या सत्याग्रहाचे नेतृत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले. अस्पश्श्यांनी मंदिरात प्रवेश करू नये म्हणून मंदिराच्या वतनदारांनी मंदिराचे चारही दरवाजे बंद केले; त्यामुळे बाबासाहेबांनी सत्याग्रहाची मोहीम बरेच दिवस चालू ठेवली. अशा प्रकारे दीर्घकाळ चालू राहिलेल्या सत्याग्रह मोहिमेमुळे मंदिरप्रवेशाच्या प्रश्नावर अस्पृश्यांत मोठीच जागृती झाली. त्यांना आपल्या हक्कांची जाणीव होऊ लागली.

### धर्मांतराचा निर्णय

हिंदू धर्मात दलितांना देण्यात येणारी असमानतेची हीन वागणूकीमुळे 'येवला' या गावी १३ ऑक्टोबर १९३५ रोजी बाबासाहेबांनी दलितांमध्ये स्वाभिमान व अस्मिता जागृत करण्यासाठी स्वतः धर्मातराची घोषणा करून बाबासाहेब म्हणाले ,''मी हिंदू धर्मात जन्माला आलो असलो तरी हिंदू म्हणूण मरणार नाही.''

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी धर्मांतर करण्याचा घेतलेला निर्णय हा त्यांच्या समाज जागृतीच्या चळवळीचाच एक भाग होता. अस्पृश्यांच्या न्याय्य हक्कांच्या मागणीसाठी त्यांनी सुरू केलेलया चळवळीच्या काळात त्यांना जे अनुभव आले; त्या अनुभवांतून सर्व हिंदूंची, विशेषतः सनातनी लोकांची मनोवृत्ती कोणत्या प्रकारची आहे हे चांगलेच कळून चुकले. ही मंडळी अस्पृश्यांना सन्मानाने व स्वाभिमानाने जगू देण्यास कधीच तयार होणार नाहीत याची बाबासाहेंबांना खात्री पटली होती. या घोषणेनुसार दि. १४ ऑक्टोबर १९५६ रोजी डॉ. आंबेडकरांनी आपल्या हजारो अनुयायांसह नागपूर मुक्कामी बौध्द धर्माची दीक्षा घेतली.

### आपली प्रगती तपासा.

१) डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे सत्याग्रह थोडक्यात स्पष्ट करा.

---

---

---

---

### ८.४.३ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे राजकीय कार्य

इ. स. १९२० पासून डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे सामाजिक व राजकीय जीवनात भाग घेऊ लागले होते. एका बाजूला चळवळ संघटित करणे, दुसऱ्या बाजूला ब्रिटीश सरकारशी लढा देणे व त्याचवेळी दलितांच्या हक्कासंबंधी मान्यता मिळविण्यासाठी वातावरण तयार करणे अशा तिहेरी पध्दतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची चळवळ कार्यरत होती. समाजाची पुर्नरचना ही समतेवर आधारीत असावी यासाठी जनजागृती आंदोलनाबरोबरच कायद्याने ती करून घ्यावी असा त्यांचा प्रयत्न होता व त्यात ते यशस्वीही झाले. त्यासाठी सनदशीर मार्गावर त्याचा जोर अधिक होता. यासाठी त्यांनी उभा केलेला संघर्ष हे जनआंदोलनाच्या रूपात होते. वास्तविक पाहता त्यांनी या चळवळीच्या माध्यमातून केलेल्या मागण्या इतक्या न्याय आणि मुख्य म्हणजे मानवतावादी होत्या की, कोणत्याही समाजाने त्यांचा लगेच स्वीकार करणे सुसंस्कृतपणाचे ठरले असते. आपल्या समाजात तसे घडू शकले नाही. बाबासाहेबांना दलितांच्या हक्कांसाठी दीर्घकाळ संघर्ष करावा लागला. त्यांच्या हयातीच्या अखेरीपर्यंत हा संघर्ष जारीच राहिला. भारतीय समाजातील उच्चवर्णीयांनी आणि हितसंबंधी घटकांनी निर्माण केलेल्या अनेक अडथळयांतून दलित चळवळीला मार्ग काढावा लागला होता. परिणामी तिची वाटचाल अतिशय खडतर

स्वरूपाची ठरली. इ.स.१९२७ ते १९४७ या काळात डॉ. आंबेडकरांनी अस्पृश्यांना राजकीय हक्क मिळावेत यासाठी चळवळ केली. डॉ. आंबेडकरांची चळवळ, त्यांचे सामाजिक-राजकिय स्वरूप, त्यावेळच्या राष्ट्रीय कॉंग्रेसच्या नेत्यांबरोबरचा त्यांचा संघर्ष यासंबंधीची माहिती व त्याबाबतचा तपशील बघणे आवश्यक आहे.

## सायमन कमिशन १९२८

इ.स.१९२८ मध्ये सायमन कमिशन समोर आपली बाजू मांडली. भावी भारताचा राज्यकारभार कसा चालावा व तो सर्वांना सहभागी करून घेणारा कसा असावा यासाठी त्यानी वेळोवेळी अनेक मार्ग सांगितले. लोकशाहीमार्गाने सर्व नागरिकांस मतदानाचा अधिकार असला पाहिजे. तसे झाले तरच समतेचे तत्व राजकीय क्षेत्रात अंमलात येऊ शकेल, हे त्यांनी सायमन कमिशनला साक्ष देवून पटवून दिले.

## गोलमेज परिषदा व पुणे करार १९३०-१९३२

इंग्लंडच्या सरकारने भारताच्या घटनात्मक प्रश्नांसंबंधी विचारविनिमय करण्यासाठी इ. स. १९३० ते १९३२ च्या दरम्यान तीन गोलमेज परिषदांचे आयोजन केले होते. या परिषदांना अस्पृश्यांचे प्रतिनिधी म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर उपस्थित राहिले होते. या वेळी त्यांनी अस्पृश्यांसाठी स्वतंत्र मतदारसंघाची मागणी केली. अस्पृश्यांसाठी वेगळे मतदारसंघ असल्याखेरीज या समाजात त्यांना कायदेमंडळावर प्रतिनिधित्व मिळणार नाही असे त्यांचे प्रतिपादन होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी इंग्लंडमधील दुसऱ्या गोलमेज परिषदेत दलितांच्या राजकीय अधिकारांसाठी प्रभावीपणे त्यांची बाजू मांडली. त्या वेळेला डिप्रेस्ड क्लासच्या वतीने राव बहादूर श्रीनिवास प्रतिनिधी म्हणून हजर होते. स्वतंत्र मतदार संघाची मागणी त्यानी केली. दुसऱ्या गोलमेज परिषदेच्या वेळी अस्पृश्यांसाठी स्वतंत्र मतदारसंघाच्या प्रश्नावरून बाबासाहेबांचे गांधींशी मतभेदही झाले होते.

ब्रिटिश पंतप्रधान रॅम्से मॅकडोनाल्ड यांनी १६ ऑगस्ट १९३२ रोजी आपला जातीय निवाडा जाहीर केला. या निर्णयानुसार मुसलमान, अस्पृश्य, शीख, ख्रिश्चन, युरोपियन व अँग्लोइंडियन या सर्वांना अल्पसंख्याक समजून त्यांना स्वतंत्र मतदारसंघ देण्याची घोषणा केली. स्वतंत्र मतदारसंघाचा निर्णय रद्द न केल्यास मी आमरण उपोषण करीन. त्यानुसार त्यांनी २० सप्टेंबर १९३२ रोजी येरवडयाच्या कारागृहात आमरण उपोषण सुरू केले. या आमरण उपोषणामुळे राजकीय परिस्थिती अस्थिर बनली. अस्पृश्यांसाठी स्वतंत्र मतदारसंघ नाकारावा असा आग्रह गांधीजींनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांकडे धरला; परंतु बाबासाहेब आणि गांधीजी आपापल्या भूमिकेवर ठाम होते. २४ सप्टेंबर १९३२ रोजी त्यांच्यात समेट घडून आला. यालाच पुणे करार या नावाने ओळखले जाते. या करारानुसार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यांसाठी स्वतंत्र मतदारसंघाचा त्याग करून त्यांच्या मनाविरूध्द राखीव जागांचा स्विकार केला. परंतु हा पुणे करार दलितांचे राजकीय अस्तित्व संपुष्टात आणणारा ठरला. त्यामुळे बाबासाहेबांनी पुढे आपल्या हयातीतच पुणे करारास विरोध केला. पुढे गांधींनी व कॉंग्रेसने आपला शब्द पाळला नाही व त्यांनी पुणे करारानंतर अस्तित्वात आलेल्या मंत्रिमंडळात एकाही दलिताला स्थान दिले नाही. त्यामुळे पुणे कराराचा भंग कॉंग्रेस व गांधींनी केला हे दिसून येते.

## राजकीय पक्षाची स्थापना

आधुनिक राजकीय व्यवस्थेत राजकीय पक्षांना प्राप्त झालेले मध्यवर्ती स्थान बाबासाहेब पूर्णपणे ओळखत होते. आपल्या चळवळीची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी राजकीय संघटन आवश्यक आहे, हे लक्षात घेऊन त्यांनी राजकीय पक्ष स्थापन करण्याचा निर्णय घेतला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १५ ऑगस्ट १९३६ रोजी स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली. काबाडकष्ट करणा-या वर्गाचे हित पाहणे हे या पक्षाचे ध्येय होते. पक्षाचे दरवाजे सर्व कष्टकरी जनतेसाठी खुले होते. इ.स. १९३७ मध्ये मुंबई प्रांताच्या निवडणुका या पक्षाने लढविल्या. व-हाड मध्यप्रांतात १५ पैकी ५ जागा आणि मुंबई कायदेमंडळात १५ पैकी ११ जागा स्वतंत्र मजूर पक्षाने जिंकल्या होत्या. इ. स. १९३७ ते इ.स. १९३९ या काळात स्वतंत्र मजूर पक्षाच्या आमदारांनी मुंबई कायदे मंडळात उत्कृष्टपणे कार्य केले. बाबासाहेबांनी १७ सप्टेंबर १९३७ रोजी खोती पध्दती व महार वतन नष्ट करण्यासंबंधीचे विधेयक मुंबई कायदेमंडळात मांडले. शेतकरी आणि कामगारांचे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न स्वतंत्र मजूर पक्षाने केला.

इ. स. १९ जुलै १९४२ मध्ये अखिल भारतीय शेडयूल कास्ट फेडरेशन या नव्या पक्षाची स्थापना करण्यात आली. या पक्षाने अस्पृश्यांच्या प्रश्नांना प्राधान्य देण्याचे उद्दिष्ट ठेवले होते. प्राप्त परिस्थितीत अस्पृश्यांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्याच्या आणि त्यांना न्याय मिळवून देण्याच्या कार्याला अग्रक्रम दिला पाहिजे, असा विचार बाबासाहेबांनी केला. अस्पृश्यांच्या प्रश्नांना सनदशीर मार्गाने वाचा फोडण्यासाठी आणि त्यांच्या रास्त मागण्या मार्गी लावण्यासाठी या पक्षाची स्थापना करणे त्यांना आवश्यक वाटले. स्वातंत्रपूर्व काळातील १९४६ च्या निवडणुकीत, पुढे १९५२ च्या सार्वत्रिक निवडणुकीत आणि १९५४ च्या पोटनिवडणूकीत शेडयूल्ड कास्ट फेडरेशनच्या दारूण पराभव झाला. कारण शेडयूल्ड कास्ट फेडरेशनच्या उमेदवारांना हिंदूची मते मिळत नव्हती. त्यामुळे आपल्या पक्षाला भविष्यात निवडणुका जिंकणे अवघड होणार आहे अशा प्रकारचा विचार बाबासाहेब आंबेडकरांनी केला. कॉग्रेसविरोधी प्रबळ विरोधी पक्ष उभा राहण्याची आवश्यकता त्यंना वाटु लागली. लोकशाहित विरोधी पक्षाची अत्यंत आवश्यकता असते, यावर त्यांची दृढ श्रध्दा असल्यामुळे कॉग्रेसचे कट्टर विरोधक आचार्य अत्रे आणि एस.एम. जोशी हयांच्याशी डॉ. आंबेकरांनी पत्रव्यवहार सुरू केला.बाबासाहेब आंबेडकरांना व्यापक राजकीय पक्षाची स्थापना करावयाची होती, ज्यांना दलितांविषयी सहानुभूती वाटते अशांना एकत्र करून अन्य जातींच्या नेत्यांबरोबर काम करणे आवश्यक आहे असे आंबेडकरांना वाटू लागले. हया राजकीय उर्मीतूनच बाबासाहेब आंबेडकरांनी रिपब्लीकन पक्ष स्थापन करण्याचा संकल्प केलला होता.

## भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार

डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी भारतीय राज्य घटनेचा मसुदा तयार केला. मसुदा (लेखन) समितीचे ते अध्यक्ष होते. सामाजिक, राजकीय व आर्थिक न्याय अस्पृश्यांसह सर्व वंचित गटांना मिळावा यावर त्यांचा कटाक्ष होता आणि त्यात त्यांनी मोलाची कामगिरी केली त्यांच्यामुळे ते शक्यही झाले. आधुनिक भारताच्या इतिहासात सामाजिक न्याय, आर्थिक शोषणा विरूद्धचा आवाज, जातीभेद निर्मूलन, अस्पृश्योद्धार, आणि अस्पृश्यता नष्ट करण्यासाठीची चळवळ, कामगारांचे प्रश्न, राजकीय आणि शासकीय नोकऱ्यांमधील आरक्षण इ.साठी ऐतिहासिक कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले. घटनेचा मसुदा तयार करताना व घटनेचा सरनामा पाहिल्यास हे चिरकाल टिकणारे कार्य केवळ बाबासाहेबांमुळे आहे हे स्पष्ट होते. त्यामुळे भारतात सामाजिक एकात्मता निर्माण होण्यास मदत झाली. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार म्हणून त्यांना आजही मानाचे स्थान आहे.

**आपली प्रगती तपासा.**

१) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे राजकीय कार्य थोडक्यात सांगा.

### ८.४.४ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक कार्य

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलितांना शिका, संघटित व्हा व संघर्ष करा हा महत्वाचा संदेश दिला. शिक्षणामुळे मनुष्य जागृत होतो व त्याला आपल्या हक्क व अधिकारांची जाणीव होते. त्यामुळे दलितांना शिक्षणाशिवाय पर्याय नाही, असे बाबासाहेबांचे मत होते. शिक्षणामुळे दलितांची अस्पृश्यांच्या सामाजिक व धार्मिक गुलामगिरीतूनही सूटका होण्यास मदत होणार होती. त्यामुळे बाबासाहेबांनी बहिष्कश्त हितकारिणी सभेच्या माध्यमातून वसतिगृहे, वाचनालय व प्रौढांसाठी रात्रीच्या शाळा सुरू केल्या. दलित व बहुजनांच्या शिक्षणासाठी बाबासाहेबांनी इ. स. १९४५ मध्ये मुंबई येथे पीपल्स एज्युकेशन सोसायटी स्थापन केली. या सोसायटीने २० जून १९४६ मध्ये मुंबईला सिध्दार्थ कॉलेज तर १९ जून १९५० रोजी औरंगाबाद येथे मिलिंद महाविद्यालय सुरू केले. आज या सोसायटीच्या शाळा तसेच महाविद्यालये मुंबई, औरंगाबाद, नांदेड आणि आंध्रप्रदेश व कर्नाटकात आहेत. मराठवाडा विभागासाठी स्वतंत्र विद्यापीठ असावे असे बाबासाहेबांना वाटत होते. त्यामुळे त्यांनी औरंगाबादला मराठवाडा विद्यापीठ स्थापन करण्यात पुढाकार घेतला. इ. स. १९५८ साली औरंगाबादला मराठवाडा विद्यापीठ स्थापन झाले.

### डॉ. आंबेडकरांच्या चळवळीचे महत्व

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीने दलितांना स्वाभिमानाची शिकवण दिली आणि त्यांची अस्मिता जागृत केली. वर्षानुवर्षे जगावे लागलेले उपेक्षितांचे जिणे आणि उच्चवर्णीयांकडून झालेली अवहेलना यामुळे दलित समाज आत्मविश्वास गमावून बसला होता. बाबासाहेबांनी दलित चळवळीच्या माध्यमातून केलेल्या वरील कार्यामुळे दलितांना आत्मविश्वास प्राप्त झाला. आंबेडकरांनी दलितांना संघटित करून त्यांच्यामध्ये अभेद्य एकजूट निर्माण केली आणि त्याच्या जोरावर आपल्या राजकीय व सार्वजनिक जीवनातील अनेक लढे यशस्वी करून दाखविले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सुरू केलेल्या चळवळीने दलितांना त्यांच्या हक्कांची जाणीव करून दिली. डॉ. आंबेडकरांनी दलितांना त्यांच्या हक्कांची जाणीव करून देण्याबरोबरच त्या हक्कांच्या प्राप्तीसाठी आवश्यकता भासल्यास संघर्ष करण्याचीही प्रेरणा दिली.

## ८.५ महात्मा गांधीजी

महात्मा गांधींनी अस्पृश्यता निवारणाचा प्रश्न जन जागरणातून आणि चळवळीतून करण्याचा प्रयत्न केला. भारतीय स्वातंत्र्य चळवळ तळागाळापर्यंत पोहोचविण्याचे कार्य गांधीयुगात झाले. ते दलितांना 'हरिजन' आणि आदीवासींना 'गिरिजन' या नावाने संबोधत होते. दलित आणि पीडित वर्गाची सेवा करून त्यांना समता व न्याय मिळवून दिला पाहिजे. उच्चनीच भाव आणि अस्पृश्यता नष्ट करणे हे सामाजिक प्रगतीसाठी गरजेचे आहे, असे विचार गांधीजीचे होते. सामाजिक प्रश्न सोडविण्यासाठी म. गांधींनी प्रत्यक्ष कृतीवर भर दिला. त्यांच्या सामाजिक

चळवळीला अध्यात्मनिष्ठा आणि मानवतावादाची पार्श्वभूमी होती. यासाठीच त्यांनी अस्पृश्यांना 'हरिजन' असे नाव दिले. अस्पृश्यता हा हिंदु समाजाला लागलेला कलंक आहे, असे विचार म. गांधीचे होते. सामाजिक संबंधांची पूर्नरचना झाली पाहिजे. लोकशाही समता, बंधुभाव, मानवी हक्क जोपासले गेले पाहिजेत. त्यासाठी म. गांधींनी 'ऑल इंडिया हरिजन सेवक संघाची' स्थापना १९३२ मध्ये केली. या संघाच्या माध्यमातून अस्पृश्य वर्गाची उन्नती करण्यासाठी कार्य केले. जनजागरणासाठी व प्रबोधनासाठी 'हरिजन' हे साप्ताहिक सुरू केले. दलित वस्तीत जावून राहणे. हाती झाडू घेवून स्वच्छता करणे. टाकलेली कामे करून लोकांपुढे एक वेगळा आदर्श गांधींनी ठेवला. म. गांधींनी शाळा सुरू केल्या. शिक्षण, आरोग्याचे महत्त्व पटवून दिले. आश्रम, वसतीगृह स्थापन करून तळागाळातील वंचितांच्या उद्धाराचे कार्य केले. ब्रिटिश सरकारने १९३२ मध्ये जातीय निवाडा जाहीर करून अस्पृश्यांसाठी स्वतंत्र्य मतदार संघ निर्माण करण्याचा प्रयत्न केला.त्यावेळी म. गांधींनी त्यांना स्पष्टपणे सांगितले कि अस्पृश्य हा हिंदु समाजाचा अविभाज्य घटक आहे. आणि त्यांनी आम्ही वेगळे होऊ देणार नाही. हा राजकीय प्रश्न डॉ. आंबेडकर यांच्याशी चर्चा करून पुणे कराराच्या द्वारे त्यानी सोडविला. गांधीजींनी त्यांच्याच विचार दृष्टीने अस्पृश्यता निवारण्याच्या प्रश्नाला चालना दिली.

## ८.६ सारांश

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या चळवळीच्या जोरावर या देशतील दलितांना सामाजिक व राजकीय प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. अगदी विसाव्या शतकातही भारतीय समाजातील उच्चवर्णीयांचा अस्पृश्यांकडे पाहण्याचा दृष्टिकोन कसा होता, तसेच त्यांचा अस्पृश्यांशी कशा प्रकारचा व्यवहार होता, याविषयी आणखी काही सांगण्याची गरज नाही; परंतु डॉ. आंबेडकर यांनी सुरू केलेल्या चळवळीमुळे भारतीय समाजाची वृत्ती व वर्तन यांत मंद गतीने का असेना, पण परिवर्तन होऊ लागले. अस्पृश्य समाजही आपल्या हक्कांविषयी जागरूक बनू लागला. आपले न्याय्य हक्क मागून मिळत नसतील तर ते संघर्षाच्या मार्गाने हिसकावून घेऊ अशी जिद्द त्यांच्यात निर्माण झाली; त्यामुळे अस्पृश्य समाजाच्या लोकांना सामाजिक जीवनात प्रतिष्ठा मिळू लागली. त्यांचा सामाजिक दर्जा उंचावला गेला. समाजात इतर जातींच्या लोकांच्या बरोबरीचे स्थान त्यांना मिळू लागले. त्यांच्याविषयी केला जाणारा भेदभाव दूर होत गेला. डॉ. आंबेडकरांच्या चळवळीने दलितांना सामाजिक प्रतिष्ठेच्या जोडीने राजकीय प्रतिष्ठाही मिळवून दिली. बाबासाहेबांच्या शिकवणुकीमुळे दलितांना संघटनेचे महत्व कळून चुकले. ते संघटित होऊ लागले. त्यांच्या राजकीय जाणिवाही प्रगल्भ होत गेल्या. भारतीय राजकारणातील एक प्रभावी शक्ती म्हणून दलितांचा उदय झाला; त्यामुळे देशातील सर्व राजकीय पक्ष व संघटना यांना दलितांना या संघटित शक्तीची दखल घेणे भाग पडले. त्यातून देशाच्या राजकीय जीवनात त्यांना प्रतिष्ठेचे स्थान प्राप्त झाले.

## ८.७ प्रश्न

(१) आंबेडकर पूर्व दलित चळवळीचा आढावा घ्या.

(२) दलितांची स्थिती सुधारण्यासाठी आदय समाजसुधारकांनी केलेल्या कार्याचे वर्णन करा.

(3) दलित चळवळीतील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याची माहिती द्या.

(४) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक व राजकिय कार्याचे मूल्यमापन करा.

(५) महात्मा गांधींचे दलित चळवळीतील योगदान स्पष्ट करा

## ८.८ संदर्भ सूची

(१) डॉ.बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे महाराष्ट्र शासन प्रकाशन, मुंबई
(२) गोखले द.न.,'डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे अंतरगं, मौज प्रकाशन मुंबई 2003
(३) कांबळे बि.सी.,समग्र आंबेडकर चरित्र कांबळे बि.सी. प्रकाशन, मुंबई
(४) कीर धनजा, डॉ. बाबासाहेब आबेडकर पॉपुलर प्रकाशन, मुंबई १९८४
(५) खैरमोडे चा. भ.,डॉ. भिमराव रामजी आंबेडकर भाग 1 ते 12 सुगावा प्रकाशन, पुणे.

❖❖❖❖

# ९

# शेतकरी चळवळ

**प्रकरण रचना :**


९.० उद्दिष्टये

९.१ प्रस्तावना

९.२ शेतकरी चळवळ

९.३ शेतकऱ्यांचे उठाव

९.४ दक्षिणेतील शेतकऱ्यांचे बंड : दख्खनचे दंगे

९.५ सारांश

९.६ प्रश्न

९.७ संदर्भ सूची


## ९.० उद्दिष्टये

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपल्याला

१. भारतात ब्रिटीश कालखंडात शेतकरी यांच्यावर झालेल्या अन्याय, अत्याचार व दडपशाहीची माहिती मिळेल.
२. ब्रिटीश वसाहतवाद्यांनी शेतकरी यांची केलेल्या आर्थिक शोषणाची कल्पना येईल.
३. जमीनदार, सावकार, व्यापारी, इ. वसाहतवाद्यांच्या हस्तकांनी शेतकऱ्यांवर केलेल्या अन्यायाची कल्पना येईल.
४. शेतकरी अन्यायाच्या प्रतिकारासाठी केलेल्या चळवळीची माहिती मिळेल.
५. शेतकरी चळवळी मोडून काढण्यासाठी ब्रिटीशांनी केलेल्या हस्तक्षेपाची कल्पना येईल.
६. शेतकरी चळवळीचा राष्ट्रवादी चळवळीशी असलेला संबंध लक्षात येईल.

## ९.१ प्रस्तावना

भारत हा एक शेतीप्रधान देश असून भारताच्या अर्थव्यवस्थेत शेती हे महत्वाचे क्षेत्र असुन शेतीक्षेत्रात घडणाऱ्या गोष्टींचा, बदलांचा परिणाम एकंदर अर्थव्यवस्थेवर होत असतो. शेतीक्षेत्रातील समस्या व शेतकऱ्यांच्या आंदोलनांची परंपरा समजून घेण्यासाठी आपल्याला ब्रिटीश राजवटीतील राज्यकर्त्यांनी राबविलेली धोरणे पहावी लागतील. त्या धोरणांचे शेतीक्षेत्रातील वर्गरचनेवर मूलगामी परिणाम झाले. तसेच त्यांची एकंदर परिणती शेतीच्या व शेतकऱ्यांच्या शोषणात झाली. या शोषणाविरूध्द ब्रिटीश राजवटीत निरनिराळया ठिकाणी शेतकऱ्यांनी आपला आवाज उठविला होता, आंदोलने केली होती, त्यांची माहिती करून घेणे अगत्याचे ठरते, कारण त्या सर्वांचा परिणाम भारताच्या कृषी अर्थव्यवस्थेवर व शेतकऱ्यांच्या

जीवनावर झाला आहे. ब्रिटीशपूर्व काळात भारतात ग्रामीण भागात शेतकरी स्वतंत्र होता. इंग्रजांच्या आगमनानंतर जमीन महसूल पद्धती, जमीन मालकी इत्यादीमध्ये अमूलाग्र बदल घडून आला. जास्तीत जास्त महसूल मिळविण्यासाठी त्यांनी जमीनदार वर्गाला हाताशी धरुन शेतकऱ्यांची पिळवणूक केली. शेतकऱ्यांनी जुलूम जबरदस्ती, अन्याय अत्याचार, पिळवूणक असह्य झाल्यानंतर प्रतिकाराला सुरवात केली. काही काळातच वसाहतवादी परकीय सत्ता हाच आपला खरा शत्रू असल्याची त्यांना जाणीव झाली. त्यांनी वसाहतवादाच्या विरोधात चळवळ सुरू केली.

## १.२ शेतकरी चळवळ

भारतात ब्रिटीशांच्या पिळवणूकीने शेतकऱ्यांच्या असंतोषाला जन्म दिला. शेतकऱ्यांनी काही काळ अन्याय सहन केला. परंतु सहनशक्ती संपल्यावर आपल्यावर अन्याय करणाऱ्या प्रत्येक गोष्टीला विरोध करण्यास सुरवात केली. १८५८ नंतर राष्ट्रवादाचीही जागृती झाली होती. त्यामुळे राष्ट्रवादी चळवळींची सुरवात झाली. त्यांनी शेतकरी चळवळींना पाठींबा देण्याबरोबर आपल्यात सामावून घेण्याचा प्रयत्न केला.

### बंगालमधील नीळ उत्पादनाविरूद्ध बंड :

सर्वांना माहीत असलेला शेतकऱ्यांचा पहिला मोठा संघटित उठाव म्हणजे १८५९-६० मध्ये घडून आलेला बंगालमधील नीळ पीकवण्याऱ्या शेतकऱ्यांचा उठाव होय. बंगालमधील नीळ कारखानदार व मळेवाले शेतकऱ्यांना जबरदस्तीने नीळीचे पीक घेण्यास भाग पाडत होते. असे पीक ब्रिटीश कंपनी व व्यापाऱ्यांना कमी दराने विकावे लागत होते. नीळ उत्पादनाने जमीनीचा कस कमी होत असे व कालांतराने जमीनी नापीक होत असत. शेतकऱ्यांनी निळीचे उत्पादन घेण्यास नकार दिल्यास त्यांचा अनेक मार्गांनी छळ केला जात असे. प्रसिद्ध बंगाली लेखक दिनबंधू मित्र यांनी १८६० साली 'निलदर्पण" हे नाटक लिहून नीळ उत्पादक शेतकऱ्यांच्या व्यथांचे चीत्र रंगवले. अनेक शेतकऱ्यांनी नीळ उत्पादन कमी केले तर काहींनी उत्पादन पूर्णपणे बंद केले. बंगालमधील बुद्धिवाद्यांनी आपले बळ शेतकऱ्यांच्या बाजूने उभे केले. त्यामुळे सरकारला चौकशी आयोग नेमून शेतकऱ्यांचे उठाव सौम्य करण्याचा प्रयत्न करावा लागला. परंतु आयोगाने समस्या सुटल्या नाहीत. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये असंतोष कायम राहून त्यांचे उठाव होवू लागले. १८६० च्या शेवटी सरकारने एक आदेश काढून शेतकऱ्यांवर नीळीच्या लागवडीची सक्ती केली जाणार नाही. त्याविषयीचे सर्व तंटे कायदेशीर मार्गानेच सोडविले जातील असे स्पष्ट केले.

### बिहारमधील नीळ उत्पादनाविरूद्ध बंड :

बिहारमधील नीळ उत्पादक शेतकऱ्यांनी दरभंगा व चंपारण्य याठिकाणी १८६६-६८ च्या दरम्यान मोठ्या प्रमाणावर उठाव घडवून आणले पूर्व बंगालमध्ये शेतकऱ्यांनी १८७०च्या दशकात पुन्हा मोठे उठाव घडवून आणले. सामर्थ्यशाली व अन्यायी प्रवृत्तीच्या जमीनदारांनी आपल्या शेतावर काम करणाऱ्या कुळांवर, शेतकऱ्यांवर दडपशाही करणारे अनेक कायदे केले होते. शेतकऱ्यांच्या जमीनी लुबाडणे, त्यांचा छळ करणे, बेकायदेशीरपणे त्यांची मालमत्ता जप्त करणे, इत्यादी अनेक मार्गांनी त्यांची पिळवणूक चालवली होती. जमीनीवरील कर मोठ्या प्रमाणात वाढविले होते. शेतकऱ्यांना त्यांच्या जमीनीवरील ताबा मिळवण्यापासून वंचित ठेवले. प्रत्येक वेळी सरकारी अधिकारी जमिनदारांची बाजू घेत. त्यामुळे शेतकऱ्यांना न्याय मिळत

नव्हता. १८७२ ते १८७६ या काळात शेतकऱ्यांनी कर देण्यास नकार दिला. जमीनदार व त्यांचे गुमास्ते यांच्याविरूद्ध शेतकऱ्यांचे उठाव घडून येवू लागले. सरकारने दडपशाहीचे कायदे करून शेतकऱ्यांची चळवळ दडपण्याचा प्रयत्न केला. परंतु त्याचा उपयोग झाला नाही. सरकारने शेवटी जमीनदारांच्या दडपशाहीवर कारवाई करण्याचे आश्वासन दिले.

## १.३ शेतकऱ्यांचे उठाव

ब्रिटीशांच्या जमीन महसुलविषय, व्यापार विषयक व उद्योगाविषयक धोरणांचा एकत्रित परिणाम शेतीच्या शोषणात झाला. असहय व जाचक करव्यवस्था, अन्याय अशा व्यापाराच्या शर्ती व उद्योगधंद्यांना मारक ठरणारी धोरणे यामुळे आपला देश दरिद्री झाला व ग्रामीण भाग आणि शेती दीर्घ काळापर्यंत मागासलेली राहिली. १७६५ साली बंगालचे दिवाणी हक्क मिळाल्यावर ब्रिटीश ईस्ट इंडिया कंपनीने स्वतःचे उत्पन्न वाढविण्यासाठी जमीन महसूलविषयक धोरणांमध्ये बदल केले. सुरूवातीस बंगाल प्रांतात त्यांनी कायमधारा किंवा जमीनदारी पध्दत लागू केली. या पध्दतीत पूर्वीच्या राजवटीतील करवसुली करणाऱ्या अधिकाऱ्यांना त्यांच्या क्षेत्रातील जमिनीचे मालकी हक्क दिले. त्यांनी शेतकऱ्याकडून किती सारा गोळा करायचा त्यावर कोणतेही निर्बंध नव्हते. या प्रकरचे अधिकार मिळालेल्या जमीनदारांकडून शेतकऱ्यांची अनन्वित पिळवणूक सुरू झाली. ब्रिटींशानी अगोदरच शेतसारा दुप्पट केला असल्याने शेतकरी तर दरिद्री झालाच पण जमीनदारांना शेतीचे उत्पन्न वाढविण्यात रस नसल्यामुळे शेतीसुध्दा मागासलेली राहिली. हि जमीनदारी पध्दती ब्रिटींशानी नंतर बिहार, ओरिसा उत्तर प्रदेश व मद्रास इलाख्यांचा उत्तर भाग या प्रदेशात लागू केली. हे करीत असताना अगोदरच्या राजवटीतील जहागीरदार, अमीर उमराव, इत्यादींचे विशेधिकार गेल्यामुळे तो वर्ग नाराज झाला.

मुंबई, म्रदास आणि बेरार या प्रातांमध्ये ब्रिटीशांनी सारा वसुलीची ''रयतवारी" पध्दत लागू केली रयतवारी मध्ये शेतकऱ्याला त्यांच्या जमिनीचा मालकी हक्क देण्यात आला व जमीनदारीसाखा मध्यस्थ न ठेवता शेतकऱ्याने सारा सरकारकडेच थेट जमा करायचा अशी पध्दत घालून दिली. जोपर्यंत शेतकरी सारा भरेल तोपर्यंत त्यांचा जमिनीवरील हक्क अबाधित राहू शकत असे. साऱ्याची रक्कम निश्चित करण्यात आली व सुरूवातीला दर तीस वर्शानी साऱ्यात बदल किंवा वाढ करायची असे ठरविण्यात आले, मात्र प्रत्यक्षात या सुधारणा करताना प्रत्येक वेळी सरासरीने २५ ते ६० टक्क्यांनी साऱ्यांची रक्कम वाढविण्यात आली. या काळात वाढती लोकसंख्या, हस्तांद्योगांचा ऱ्हास, शेती व्यवसायाकडे वळलेले कारागीर यांच्यामुळे शेतजमिनीवर अवलंबून असणाऱ्यांची संख्या वाढली. जमिनी खंडाने देण्याचे प्रमाणे वाढले. त्यामुळे याही पध्दतीत शेतकऱ्यांमध्ये सुरक्षित मालकी हक्क असाणारा वर्ग, खंडाने जमीन कसणारा कुळांचा वर्ग तसेच शेतमजूर असे अंतर्गत वर्ग तयार झाले आणि प्रत्यक्ष जमीन करण्याची कल्पना फसली. साऱ्याचा असहय बोजा व सारा पैशाच्या रूपात देण्याची सक्ती यांचा परिणाम शेतकरी वर्ग कर्जबाजारी होण्यात झाला आणि ग्रामीण भागात सावकारांचा धनिकवर्ग निर्माण झाला. या वर्गाने मोठया प्रमाणात शेतकऱ्यांच्या जमिनी बळकावल्या. सारा पैशाच्याच रूपात देणच्या सक्तीमुळै पैसे मिळविण्यासाठी कापूस, तेलबिया, नीळ, ताग, नारळ इत्यादींची मोठया प्रमाणात लागवड सुरू झाली. तसेच ब्रिटींशानी त्यांच्या कारखान्यांसाठी लागणाऱ्या कच्चा मालासाठी शेतकऱ्यांना या पिकांच्या लागवडीसाठी उत्तेजन दिले व काही ठिकाणी सक्तीही केली त्यामुळे शेतीच्या व्यापारीकरणची प्रक्रिया गतिमान झाली.

**इतर परिणाम**

१८५० सालापासून ब्रिटींशानी भारतात रेल्वेमार्गाची बांधणी सुरू केली. रेल्वेमुळे प्रवाशी आणि माल वाहतूक सुरू झाली हा महत्वाचा परिणाम होय. भारतातील खेडयांची स्वयंपूर्णता व एकता संपूष्टात आली. आधुनिक वाहतुकीमुळे विविध प्रदेशांमधील तीव्र दुष्काळांचा धोका कमी झाला. मात्र सुबत्ता असणाऱ्या भागांतून इतरत्र होणाऱ्या धान्याच्या निर्यातीमुळै देशात सर्वत्रच कुपोषणाचे प्रमाण वाढले. ब्रिटीश राजवटीत भारतातील एकंदरीत दुष्काळांचे प्रमाण वाढले. रयत साऱ्याच्या ओझ्याखाली चिरडली जात असतानाच देशात ठिकठिकाणी सलग अनेक वर्षाचे दुष्काळ पडले. १८५७ च्या नंतर त्याहूनही गंभीर दुष्काळाची वर्षे आली. १८६५ आणि १८९९ साली दुष्काळांनी उग्र स्वरूप धारण केले होते. त्यात लाखो माणसे मेली. १८६०च्या दुष्काळात मेलेल्या माणसांतील मुख्य बळी होते भुमिहीन शेतमजुर आणि बेकार विणकर, कॅथलिन गफ या विदुषीच्या अंदाजाप्रमाणे १८६६ ते १९४३ या कालावधीत भारतामध्ये दुष्काळात २०६८७.००० माणसे मरण पावली असावीत.

याखेरी ब्रिटीश राजवटीच्या काळात आदिवासींच्या जंगल व डोंगराळ प्रदेशामध्ये युरोपीय व भारतीय मळेवाल्यांचे वाढते आक्रमण झाले. सरकारकडून, जमीनदारांकडून, सावकरांकडून, व्यापऱ्यांकडून जंगलजमिनी बळकावल्या गेल्या. याच जोडीला व्याजखोली, व्यापाराच्या विषम अटी आणि वेठबिगारी या स्वरूपातील आदिवसांची पिळवणूकही होत होती. जंगलजमिनींवर अगदी थोडया मोबदल्यात किंवा विना मोबदलाही नगरदी पिकांची लागवड करण्याची सक्ती केली जात होती. या सर्व प्रकारच्या जूलूम व पिळवणुकीला शेतकरी व आदिवासी वर्गांकडून वेळोवेळी प्रतिकार झाला. विविध ठिकाणी शेतकऱ्यांनी उठाव केले, बंडे केली. त्या उठावांची माहिति करून घेणे आवश्यक ठरते.

ब्रिटिश ईस्ट कंपनीने देशात व्यापार करण्यास सुरुवात केली. त्यामुळे युरोपातून आणलेला माल भारतात विकणे व भारतातील सुती व रेशमी कापड तसेच मसाल्याचे पदार्थ युरोपात प्रचंड प्रमाणात घेऊन जाण्यास सुरुवात केली. कंपनीचे अधिकारी आणि व्यापारी लोक देशातील शेतकरी व मजूर तसेच जनतेची आर्थिक लूट करत असत. या लोकांकडून कमी किमतीत जबदस्तीने माल घेत असात. मीर कासीम यांनी मे १७६२ मध्ये याविरुध्द गव्हर्नरकडे तक्रार केली होती. परंतू त्याकडे फारसे लक्ष दिले नाही. अनेक मार्गानी नफा मिळवून देशाची आर्थिक लूट करुन देशातील सर्व संपत्ती इंग्लंडकडे कंपनी घेऊन जात असे. ब्रिटिशांचे स्वार्थी वसाहतवादी धोरण असल्यामुळे या धोरणाचा परिणाम व्यापाराबरोबरच शेतीवरसुध्दा झाला.

शेतसारा वसूल करण्यासाठी त्यांनी जमीनदारी व रयतवारी या दोन पध्दती सुरु केल्या. जमीनदारी पध्दतीमध्ये जमिनीची मालकी आणि सारा वसुलीचा हक्क जमीनदारांना दिला. त्यामुळे प्रत्यक्षात जमिनीत कष्ट करणारे शेतकरी त्यांची कुळे बनली. जमीनदार कुळाकडून शेतसारा वसूल करत व तो सारा अधिकाधिक सरकारी तिजोरीत भरत असत. शेतीतील उत्पादनाचा अधिकाधिक भार शेतसारा म्हणून सरकारकडे जात असल्यामुळे शेतकरी सावकारांचे कर्जबाजारी झाले. शेती करण्यासाठी यांना सावकाराच्या कर्जावरच अवलंबून रहावे लागे. त्यामध्ये अतिवृष्टी आणि दुष्काळामुळे पिकावर परिणाम होत असे. शेतकरी कर्जबाजारी झाल्यामुळे त्यांच्या जमिनी सावकार, जमीनदारांच्या ताब्यात जाऊ लागल्या. त्यामुळे शेतकरी भूमिहीन बनले परिणामी त्यांच्या वाटयाला दारिद्र आले. खेडी आर्थिकदृष्टया स्पयंपूर्ण होती. परंतु ब्रिटिशांच्या आगमनानंतर या परिस्थितीत झापाटयाने बदल घडून आला.शेतकरी करांच्या ओझ्याखाली कायमचा दबला गेला.

**शेतकऱ्यांच्या कल्याणाचा प्रयत्न**

ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीच्या काळात शेती व शेतकऱ्यांच्या जीवनात सुधारणा करण्यासाठी प्रयत्न कधीच झाला नव्हता. शेतकऱ्याकडून शेतसारा घेणे व त्यांची अधिक पिळवणूक करणे एवढेच ध्येय कंपनी सरकारची होते. इ.स.१८५८ पर्यंत देशातील शेतीची आणि त्यामुळे शेतकऱ्यांची अवस्था वाईट झाली होती.

शेतकऱ्यांचे प्रश्न दूर करण्यासाठी इ.स.१८५९ मध्ये 'बंगाल रेंट कायदा' पास केला. सर जॉन लॉरेन्स यांनी पंजाब व अवध टेनन्सी कयदे पास केले. अवध टेनन्सी या कायद्यानुसार विशिष्ट खंड देणाऱ्या शेतकऱ्यांना जमीन कसण्याचा हक्क दिला. लॉर्ड रिपनच्या काळातही शेती सुधारणा आणि लोककल्याणकारी कार्ये करण्यात आली. इ.स.१८८६मध्ये कायदा पास करुन पिकाचे उत्पादन वाढविण्यासाठी खते व इतर साधनाचा वापर करण्यात यावा यासाठी शेतकऱ्यांना कर्ज पुरवठा करण्याची सोय करण्यात आली.

इ.स.१९०१ साली कर्झनने 'पंजाब लँड एलीनेशन कायदा' पास केला . या कायद्यानुसार कोणत्याही शेतकऱ्यांना कर्ज फेडीसाठी आपली जमीन सरकारच्या परवानगीशिवाय विकता योणार नाही अशी तरतूद केली.यानंतर कर्झानने शेतकऱ्यांना कर्ज मिळण्यासाठी इ. स. १९०४ मध्ये 'कोऑपरेटिव्ह सोसायटीज ॲक्ट' पास केला, या कायद्यानुसार देशात कृषी बँक व सरकारी पतपेढया स्थापन झाल्या.

शेती विकासाकडे कंपनी सरकारने तसेच ब्रिटिश सरकारने फारसे दुर्लक्ष केले असले तरी शेतीचे उत्पादन वाढविण्यासाठी अल्पसा प्रयत्न करण्यात आला होता. देशात इ.स.१८६६, इ.स.१९२०-१९२१ मध्ये चांगलेच मोठे दुष्काळ पडले. इ.स.१९४३ च्या दुष्काळात लाखो माणसे मरण पावली. दुष्काळ निवारण आयोग स्थापन केले. या आयोगाने मध्यवर्ती सरकारमध्ये 'एककृषी खाते' निर्माण करण्यासाठी शिफारस केली.

इ.स.१९०१ नंतर देशात आलेल्या शेती खात्याची पुनर्रचना केली. कृषी संचालकाची सर्व प्रांतात नियुक्ती केली. इ.स.१९०६ मध्ये सरकारने इंपिरियल ॲग्रीकल्वरल रिसर्च इन्स्टिटयूट स्थापन केली. इ.स.१९०५ ते १४ या काळात शेतीला पाणीपुरवठा करण्यासाठी जलसिंचन योजनांची अंमलबाजवणी करण्यात आली.

कृषी विषयक समस्या सोडविण्यासाठी सरकारने इ.स. १९२६मध्ये रॉयल कमिशन ऑफ ॲग्रीकल्वर या आयोगाची नियुक्ती केली.

इ.स.१९२८ ते इ.स.१९४७ या काळात देशात मध्यवर्ती व प्रांतीय कश्षक खाती स्थापन केली. अनेक ठिकाणी कृषी संशोधन केंद्रे उभारली. कृषी महाविद्यालये उघडली. परंतु एवढे करुन शेती विकास फारसा होऊ शकला नाही. कारण आधुनिक पध्दतीने शेती करण्याचे तंत्रज्ञान सामान्य शेतकऱ्यांची इच्छा असतानासुध्दा त्याला केवळ भांडवल नसल्यामुळे नवीन तंत्रज्ञानाचा उपयोग करता आला नाही. सरकारने सुरु केलेल्या जलसिंचन योजने मुळे देशातील जमीन ओलिताखाली येऊन शेतीच्या उत्पादनात वाढ झाली परंतु ती तुटपुंजी ठरली. अशा परिस्थितीतमुळे देशातील शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीमध्ये फारसा बदल झाला नाही.शेतकऱ्यांमधील पसरलेल्या असंतोषामुळे त्यांनी सरकार व जहागीदार, जमीनदारांविरोधी अनेक उठाव केले.

इ.स.१८६७ नंतर शेकसाऱ्यांमध्ये वाढ केली. त्यामुळे अनेक शेतकरी कर्जबाजारी झाले. शेतकरी जमीनदार सावकार व मारवाडी यांचे भक्ष बनले. त्यामुळे मे ते सप्टेंबर १८७५ मध्ये पुणे व अहमदनगर जिल्हयांत सहा तालुक्यांत ३३ ठिकाणी शेतकऱ्यांनी सावकार व जमीनदार विरोधी उठाव केले. शेतकऱ्यांनी हे उठाव गावचा प्रमुख मुखिया (पटेल)नेतृत्वाखाली केले. त्यामुहे इ.स.१८७९ मध्ये डेक्कन ॲग्रीकल्चरिस्टस रिलीफ ॲक्ट पास करुन शेतसाऱ्यांना काही सवलती प्रदान केल्या, जमीनदार व सावकारविरोधी उठाव बंगालमध्येही घडून आले इ.स.१८७० ते इ.स.१८८० या दरम्यानच्या काळात सावकार विरोधी उठावाची तीव्रता वाढवली होती. शेतकरी आणि रयतेने जमीनदार, सावकार आणि ब्रिटीश सरकार यांना शेतसारा न भरण्यासाठी देशात आंदोलने केली. ठाणे, कुलाबा, रत्नागिरी, पुणे, मुबई, सुरत, नासिक, खेडा, अहमदनगर या सर्व ठिकाणी महसूल, कर विरुध्द आंदोलने करण्यात आली.

इ.स.१९२२ ते इ.स.१९२८ या काळात मुंबई प्रांतातील शेतकरी सावकरांच्या जाळयात अडकले होते. शेतकरी सावकराकडून कर्ज घेत व ते दीड ते दुप्पट व्याजाने परत करीत. धान्याच्या स्वरुपात घेतलेले कर्ज दीड ते दुप्पट पध्दतीने परत केले जात असे. विदर्भातील कापूस उत्पादक शेतकरी दलाल व अडते यांच्याकडून पिळला जात होता. यावर उपाय म्हणजे सहकारी चळवळीची वाढ व शेतकऱ्यांतील साक्षरता हाच असल्याने सरकारचे सहकारी संस्थाच्या वाढीवर भर दिला होता. सहकारी चळवळीत मुंबई प्रांत आघाडीवर होता. या प्रांतात इ.स.१९२१ व २२ मध्ये ३४११ सहकारी सोसायटया होत्या. इ.स.१९२९ मध्ये ही संख्या ५७३४ झाली. सहकारी पतसंस्था वाढल्यामुळे सावरकारांचा गैरव्यवहार कमी झाला नाही. पण थकबाकीदार शेतकऱ्यांवर मात्र पतसंस्था कार्यवाही करत नसत.

**आपली प्रगती तपासा.**

१) शेतकऱ्यांच्या उठावाची कारणे व परिणाम स्पष्ट करा.

______________________________

______________________________

______________________________

______________________________

## ९.४ दक्षिणेतील शेतकऱ्यांचे बंड : दख्खनचे दंगे

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात महाराष्टतील शेतकऱ्यांनीही त्यांच्यावर होत असलेल्या अन्यायाविरूध्द, विशेषतः सावकारी जूलूमशाहीविरूध्द मोठा उठाव केला होता. महाराष्ट्रातील बहुतांशी शेती कोरडवाहू म्हणजे पूर्णपणे पावसावर अवलंबून असणारी होती. परिणामी येथील शेतकऱ्यांना निसर्गाच्या अवकृपेने तडाखे वरचेवर सहन करावे लागत असत. वारंवार पडणाऱ्या दुष्काळांमुळे शेतीव्यवसाय आतबट्टयाचा ठरत असे. त्यात इंग्रज सरकारने सारावसुलीच्या लागू केलेल्या नव्या 'रयतवारी पध्दती' ची भर पडली. या पध्दतीत शेतक-यांनी आपल्या जमिनीच्या मालकीहक्कापोटी दरवर्षी सरकारला सारा भरणे बंधनकारक ठरले; परंतु सरकारने ठरविलेले शेतसाऱ्याचे दर अवाजवी व शेतकऱ्यांवर अन्यायकारक होते. सारा वसुलीसाठी सरकारी अधिकारी व नोकरवर्ग यांच्याकडून शेतकऱ्यांवर सक्ती केली जात असे. दुष्काळाच्या परिस्थितीतही शेतसारा भरण्यासाठी शेतकऱ्यांना भाग पाडले जात असे.

## सावकारी जुलूमशाही

अशा स्थितीत शेतक-यांवर सरकारी देणी भागविण्यासाठी कर्ज काढण्याची वेळ येत असे. महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात त्या काळी खाजगी सावकारी करणाऱ्या लोकांचा एक वर्ग सर्वत्र आढळून येत असे. यांतील बहुतेक सावकार गुजर-मारवाडी किंवा ब्राम्हण असत. हे खाजगी सावकार गरीब शेतक-यांच्या अज्ञानाचा व असहायतेचा अतिशय निष्ठुरतेने लाभ उठवित असत. त्यांचा व्याजाचा दर तर अतिशय जबर असेच; पण त्या खेरीज अडाणी शेतकऱ्यांकडून ते खोटे दस्तऐवजही करून घेत असत; त्यामुळे शेतकऱ्यांना कर्जाची परतफेड करणे अशक्य होत असे. अशा प्रकारे शेतकऱ्यांची चोहोबाजूंनी कोंडी झाली की, आपल्याकडील खोटया दस्तऐवजांच्या जोरावर शेतकऱ्यांच्या जमिनी व त्यांची घरदारे यांवर जप्ती आणण्यास सावकार टपून बसलेले असत.

## शेतकऱ्यांचे सावकारांविरूध्द उठाव

भारतीय शेतकरी हा सामान्यतः सहनशील व पापभिरू म्हणूनच सर्वांच्या परिचयाचा आहे; परंतु सावकारांनी शेतकऱ्यांवर चालविलेले जुलूम इतक्या पराकोटींचे होते की, गरीब म्हणून ओळखल्या जाणाऱ्या शेतकऱ्यांच्याही सहनशीलतेचा अंत झाला. शेवटी त्यांनी सावकारांविरूध्द उठाव केले. महाराष्ट्रातील पुणे, नगर, सोलापुर इत्यादी जिल्हयांतील दुष्काळपीडित शेतकऱ्यांनी सावकारांवर सामाजिक बहिष्कार घालण्याचे ठरविले; परंतु सामाजिक बहिष्काराचा मार्ग फारसा प्रभावी ठरत नाही असे दिसताच त्यांनी बलप्रयोगाचा अवलंब केला. सावकारांच्या अत्याचारांनी त्रस्त झालेल्या शेतकऱ्यांनी सावकरांच्या घरांवर हल्ले करून त्यांच्याकडील दस्तऐवज व अन्य कागदपत्रे हस्तगत करून ती जाळून टाकण्याचा सपाटा चालविला. कागदपत्रे देण्यास टाळाटाळ करणा-या सावकारांना मारहाण करण्यासही शेतकऱ्यांनी कमी केले नाही. तसेच काही ठिकाणी शेतकऱ्यांच्या जमावाने सावकारांच्या घरांची जाळपोळ केली व त्यांची मालमत्ताही लुटली; परंतु सावकारांना जीवे मारणे, त्यांच्या घरातील माणसांचा छळ करणे, बायका-मुलींना त्रास देणे असे प्रकार शेतकऱ्यांच्या हातून अपवाद म्हणूनही घडले नाहीत.

महाराष्ट्रात १८७४ ते १८७६ या दोन-तीन वर्षांच्या कालावधीत सावकारांविरूध्दच्या शेतकऱ्यांच्या संतापाचा असा उद्रेक जागोजागी होत होता. मात्र पुणे, नगर व सोलापून या तीन जिल्यांतच त्याचा विशेष जोर होता. शेतकऱ्यांचे हे दंगे दख्खनचे दंगे म्हणून ओळखले जातात. अर्थात या उद्रेकाचा खरा जोर इ. स. १८७५ मधील काही महिनेच टिकून राहिला होता. पुढे दोन-तीन वर्षे तो तुरळक प्रमाणात चालू राहिला.

इ.स.१८७५ मध्ये महाराष्ट्रातील पुणे व अहमदनगर जिल्ह्यात शेतकऱ्यांचे उठाव घडून आले. सरकारने महाराष्ट्रात रयतवारी महसूल पद्धत लागू केली होती. त्यामुळे जमीनदार व मध्यस्थांचा त्रास नव्हता. मात्र महसूलाचा दर खूपच मोठा होता. तो महसूल शेती उत्पान्नातून भरणे शव नव्हते. त्यांना सावकाराकडून कर्ज घ्यावे लागत असे. हे सावकार प्रामुख्याने मारवाडी व गुजराथी महाराष्ट्रात बाहेरून आलेले होते. कर्ज देताना ते शेतकऱ्यांबरोबर गहाण व्यवहार करीत असत. ते मोठ्या प्रमाणावर व्याज आकारणी करीत शेतकऱ्यांची सही घेतलेल्य कागदपत्रात परस्पर बदल करून सावकार जमीन आपल्या ताब्यात घेत असत. त्यामुळे शेतकरी व सावकार यांच्यात तणाव निर्माण झाले. अमेरिकेतील यादवी युद्ध संपुष्टात आल्यानंतर कापसाचे वाढलेले भाव कमी झाले. याचवेळी सरकारने शेतसारा वाढविला. त्यामुळे परिस्थिती आणखीनच बिघडली.

सन १८७४ मध्ये शिरूर तालुक्यातील करडे या गावी काळुराम नावाच्या सावकाराने १५०/-रूपये कर्जाच्या वसुलीसाठी बाबासाहेब देशमुख या शेतकऱ्याचे घर जप्त करण्याचे आदेश न्यायालयाकडून मिळविले. गावकऱ्यांच्या विनंतीला न जुमानता घर पाडले. परिणामी सर्व उपऱ्या सावकारांनी आपल्या मागण्या मान्य कराव्यात यासाठी गावातील शेतकऱ्यांनी त्यांच्यावर बहिष्कार टाकला. गावकरी त्यांच्या दुकानातून वस्तू विकत घेईनात व बलुतेदार त्यांना कोणतीही सेवा देत नव्हते. सावकार गावे सोडून तालुक्याकडे निघाले. अशा बहिष्काराची चळवळ लवकरच अहमदनगर, पुणे, सोलापूर व सातारा जिल्ह्यात पसरली. जेव्हा या सामाजिक बहिष्काराचा फारसा परिणाम होईना तेव्हा बहिष्काराचे रूपांतर शेतकऱ्याच्या उठावात झाले. पारनेर तालुक्यात सुपे या गावात शेतकऱ्यांनी १८७५ मध्ये सावकारांच्या घरावर व पेढ्यांवर हल्ले सुरू केले. शेतकऱ्यांनी आपली कागदपत्रे मिळवून त्यांची होळी केली. या मोहिमेचाही प्रसार झाला. आंदोलन दडपण्यासाठी सरकारला लष्कर व पोलीस यांची मदत घ्यावी लागली. सुमारे एक हजार शेतकऱ्यांना कैद केले. हे आंदोलन एवढे जबरदस्त होते की सरकारला शेतकऱ्याविरूद्ध साक्षीदारसुद्धा मिळाले नाहीत. शेवटी सरकारला दक्षिण बंड आयोगाची स्थापना करावी लागली. शेतकरी बंड करण्यास उद्युक्त का झाले याची चौकशी करण्याचे काम आयोगावर सोपविले. सरकारने ॲग्रिकल्चर रिलीफ ॲक्ट पास केला. त्यानुसार काही प्रमाणात सावकारांपासून शेतकऱ्यांना संरक्षण मिळाले.

## महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचा उठाव

इ.स.१८६६ मध्ये रयतवारी व्यवस्थेच्या अंतर्गत मुंबई प्रांतात भूमी करात अधिक वाढ केली होती. अमेरिकेत यादवी युध्द सुरु झाल्यामुळे तेथून कापूस इंग्लंडला येणे बंद झाले. त्यामुळे ब्रिटिशांनी अमेरिकेतून कापूस इंग्लंडला येणे बंद झाले. त्यामुळे ब्रिटिशांनी भारतातून कापूस मायदेशी घेऊन जाण्यास सुरुवात केली. त्यामुळे कापसाला मागणी वाढली व किमतही मायदेशी वाढली. म्हणून इ.स.१८६६ मध्ये मुंबई प्रांतात भूमी कर वाढविला. अमेरिकेतील यादवी युध्द संपल्यानंतर तेथून कापूस भरपूर प्रमाणात ब्रिटनला येऊ लागला. त्यामुळे भारतातील कापसाला मागणी न राहून त्याच्या किमती घसरल्या अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना शेती करण्यासाठी सावकाराकडून कर्ज घेणे भाग पडले. सावकाराचे कर्ज देणे शेतकऱ्यांना कठीण असल्यामुळे त्यांच्या जमिनी सावकाराच्या ताब्यात गेल्या. दिवाणी न्यायालयात सावकाराच्या बाजूनेच निर्णय लागला तर शेती सावकराच्या ताब्यात गेल्यास शेतकऱ्यांना उदरनिर्वाहाचे साधन राहत नव्हते. त्यामुळे त्यांनी सावकराविरोधी उठाव केला. शेतकऱ्यांना सावकाराची घरे, दुकाने जाळून टाकली कर्जासाठी शेतकरी व सावकार यांच्यात झालेले कराराचे दस्ताऐवज शेतकऱ्यांनी नष्ट केले. पुणे, अहमदनगर येथेही उठाव झाले, यानंतर सरकारने एका आयोगाची नियुक्ती केली. आयोगाच्या शिफारशीवरुन इ.स.१८७९ मध्ये ॲग्रीकल्वरल रिलीफ ॲक्ट पास केला या कायद्यानुसार एखाद्या शेतकऱ्याने कर्ज फेडले नाही तर जेलमध्ये बंद करता येणार नव्हते. शेतकऱ्यांचे कर्ज कमी करण्याचा हक्क या कायद्यानुसार न्यायालयास मिळाला होता.

## आपली प्रगती तपासा:

१) दख्खनचे दंगे थोडक्यात सांगा.

________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________

**महात्मा फुले व शेतकरी वर्गांमध्ये सांस्कृतिक क्रांती**

१९ व्या शतकाच्या उत्तरार्धात महाराष्ट्रातील समाजसुधारणेच्या चळवळीत ज्यांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते त जोतीराव फुले यांचा आपल्याला या ठिकाणी शेतकरी वर्गात वैचारीक व सांस्कृतिक क्रांती घडवून आणणारा चिरवंत म्हणून विचार करायचा आहे. फुले यांनी जरी प्रत्यक्ष शेतकऱ्यांची चळवळ उभी केली नसली तरी शेतकऱ्यांच्या दृष्टीकांनातून त्यांनी सामाजिक परिस्थितीचा विचार केला. शेतकऱ्यांच्या आर्थिक व सामाजिक हिताला विरोध करणाऱ्या सावकार व भटजी या वर्गांच्या कारवायांबद्दल शेतकरीवर्गात जागृती निर्माण केली. फुले यांच्या काळातील इतर समाजसुधारक व विचारवंत हे प्रामुख्याने वरिष्ठ जातींच्या संदर्भातच विचार करीत होते. फुले यांचे वैशिष्टय हे होते की त्यांनी कनिष्ठ जाती व दुर्लक्षित व उपेक्षित समाजघटकांचा विचार केला. सावकार, कुलकर्णी, भट व जमीनदार शेतकऱ्यांचे शेषण कसे करतात हे फुले यांनी आपल्या लिखाणात दाखवून दिले.

१८७३ साली फुल्यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. या समाजाचा उद्देश ब्राम्हणांच्या पिळवणुकीतून शुद्रादिशुद्रांन सोडवणे व त्यांना सामाजिक मुक्तीचा मार्ग दाखविणे हा होता. सत्यशोधक समाजाने १८७९ पासून दीनबंधू नावाचे एक साप्ताहिक सुरू केले. या साप्ताहिकात शेतकरी व कामगारांची गाऱ्हाणी मांडली जात होती. शेतकरी वर्गाच्या सांस्कृतिक उत्थानासाठी फुले यांनी जातीभेदाविरूध्द आघाडी उघडली. त्याचप्रमाणे सांस्कृतिक क्षेत्रांतील ब्राम्हणांची मक्तेदारी मोडून काढण्याचे प्रयत्न केले. त्यासाठी सत्यशोधक समाजाचा संदेश खेडयातील शेतकरीवर्गापर्यंत पोहचविण्यात आला. शिक्षणाचा प्रसार, जातीभेद नष्ट करणे, ब्राम्हण व सावकारवर्गाची मक्तेदारी नष्ट करणे ही सत्यशोधक समाजाची उद्दिष्टये होती.

महात्मा फुलेंनी सरकारकडे शेतकऱ्यांच्या मुलांना प्राथमिक शिक्षण सक्तीचे करावे.त्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळण्यासाठी वसतीगृह स्थापन करावी आणि कनिष्ठ वर्गातील शिक्षकांची प्रोत्साहन मिळण्यासाठी वसतिगृहे स्थापन करावी आणि कनिष्ठ वर्गातील शिक्षकांची नेमणूक करुन या मुलांना प्रशिक्षित करावे तसेच शेतकऱ्यांच्या मुलांना शिक्षकांची नमेणूक करुन या मुलांना प्रशिक्षित करावे तसेच शेतकऱ्यांच्या मुलांना व्यावसायिक शिक्षण यावे, या मागण्या केल्या. शेतकरी अज्ञान व अशिक्षित असल्यामुळे तो आर्थिकदृष्टया शोषित बनला आहे. तेव्हा त्यांच्या जीवनात परिवर्तन घडवून आणण्यासाठी शिक्षण हाच उपाय आहे असे महात्मा फुल्यांचे मत होते. सरकारी अधिकारी कारकून आणि सावकार हे शेतकऱ्यांचा जागोजागी अपमान करतात. त्यांची अडवणूक करतात आणि सावकार हे धोरणावर टीका करुन शेतकऱ्यांच्या स्थितीमध्ये सुधारणा करण्यासाठी कार्य सुरु केले. त्यांनी ‘दीनबंधू’ या वर्तमानपत्रातून लिखाण करुन शेतकऱ्यांवरील अन्यायाला वाचा फोडली. इ.स.१८७६-७७ मध्ये महाराष्ट्रात मोठा दुष्काळ पडला. त्यामुळे शेतकऱ्यांची स्थिती हलाखीची बनली. त्यामध्ये सुधारणा होण्यासाठी महात्मा फुलेंनी महाराष्ट्रव्यापी चळवळ सुरु केली. ही चळवळ ‘खतफोडीचे बंड’ म्हणून ओळखली जाते. इ.स.१८८८ मध्यू पुणे येथे इंग्लंडचा डयुक ऑफ कॅनॉट आला होता. त्याच्या समारंभास महात्मा फुले शेतकऱ्यांच्या वेशात उपस्थित राहिले. . यावेळी त्यांनी डयुक ऑफ कॅनॉट यांस शेतकऱ्यांना संरक्षण व उत्पन्न वाढीसाठी शेतीच्या विविध योजना आखण्याचा आग्रह धरला. महात्मा फुलेंनी शेतकऱ्यांच्या शिक्षित मुलांना कनिष्ठ नोकऱ्या देण्यासाठीही प्रयत्न केले.

शेतकरी हा समाजाचा घटक असून त्याच्या कष्टावरच समाजाची उपजीविका होते हे महात्मा फुल्यांनी ओळखले होते; परंतु शेतकरी आर्थिकदृष्टया वाईट अवस्थेत जीवन जगत

होता. तो सावरकरच्या कर्जात आणि समाजाच्या गुलामगिरीत अडकलेला होता. 'शेतकऱ्याचा आसूड' नावाचा ग्रंथ लिहून महात्मा फुलेंनी त्यामध्ये शेतकऱ्याच्या स्थितीचे वास्तव चित्रण केले. तसेच शेतकऱ्यांची गुलामगिरी, कर्जबाजारीपणा आणि त्यांच्या स्थितीत परिवर्तन घडवून आणण्यासाठी काय उपाय करावे लागतील याचीही चर्चा प्रस्तुत ग्रंथात केली आहे. थोडक्यात शेतकऱ्यांसाठी त्यांच्या स्थितीत परिवर्तनासाठी कार्य करणारे महात्मा फुले हे पहिले समाजसुधारक होय.

**कृष्णराव भालेकर व शेतकरी चळवळ**

कश्ष्णराव भालेराव हे महात्मा फुले यांचे जवळचे सहकारी होते.'दिनमित्र' या वश्त्तपत्रातून त्यांनी शेतकरीवर्गाच्या स्थितीतवर लेख प्रसिध्द केले व त्यांच्यात जागश्ती घडवून आणली. त्यांच्या मते शेतकरी व कारगीर हेच खरे देशाचे आधारस्तंभ आहेत. सावरकर आणि सरकार हे दोघोही शेतकऱ्यांचे शोषण करीत असत. त्यांनी शेतकऱ्यांनी विद्येची कास धरावी आणि आपल्या मुलांना शिक्षण द्यावे असे म्हटले आहे. ब्राह्मणाप्रमाणेच आपणही पारंपारिक व्यवसायाचा त्याग करावा असेही त्यांनी शेतकऱ्यांना आवाहन केले.

**विठ्ठल रामजी शिंदे व शेतकरी चळवळ :**

विठ्ठल रामजी शिंदे यांनी इ.स.१९२७ मध्ये मुंबई कायदेमंडळात गश्हमंत्र्याने मांडलेल्या तुकडेबंदी व सारावाढीसंबंधीच्या विधेयकास विरोध केला. २५ जुलै १९२८ रोजी पुणे येथे मुंबई इलाखा शेतकरी परिषद भरली. या परिषदेचे अध्यक्ष वि.रा.शिंदे होते. त्यांनी अध्यक्षीय भाषणातूनही या विधेयकास विरोध दर्शविला. या विधेयकामुळे शेतकरी लहान-लहान जमिनीच्या तुकडयास मुकतील, त्यांच्याजवळ पैसा राहणार नाही. तसेच सारावाढीमुळे शेतकऱ्यांवर अन्यांय होईल असे त्यांनी म्हटले. त्यांनी खानदेश, अमरावती, नाशिक, पुणे, सातारा, नागपूर आणि नगर जिल्हयांत ग्रामीण भागात शेतकऱ्यांच्या परिषदा घेतल्या.

**ब्राह्मणेतर पुढारी व शेतकरी चळवळ :**

दिनकरराव जवळकर,श्रीपतराव शिंदे, भगवंतराव पाळेकर आणि मुंकुंदराव पाटल यांनी शेतकऱ्यांना प्रश्नांवर चिंतन करुन ते सोडविण्याचा प्रयत्न केला. दिनकराव जवळकर यांनी काढलेल्या 'तेज' साप्ताहिकावर महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचे मुखपत्र असे मुद्रित केले होते. त्यांनी या साप्ताहिकावर शेतकऱ्यांच्या बाजूने लेखन दिले. ४ जुलै १९३१ च्या अंकात त्यांनी सावकार आणि जमीनदारांकडून शेतकऱ्यांवर होणारा अन्याय, अत्याचार व शोषणाविरुध्द संघर्ष करण्यासाठी शेतकरी सैन्य उभारण्याची सूचना केली. श्रीपतराव शिंदे यांनी 'विजयी मराठा' या वृत्तपत्रात शेतकऱ्यांचे म्हणणे मांडले होते. त्यांनी शेतकऱ्यांच्या संघटनांची आवश्यकता प्रतिपादन केली. अमेरिका व स्वीडनप्रमाणे शेतकऱ्यांनी दहा-दहा व वीस-वीस शेतकऱ्यांचे संघ स्थापन करुन सहकारी पध्दतीने शेती केल्यास गरिबी हटेल असे त्यांचे मत होते. शिक्षणाचा अभाव असल्यानेच शेतकऱ्यांची अधोगती झाल्याचेही त्यांनी म्हटले आहे. शेतकरी व सावकारांनी गोरक्षणाला महत्व द्यावे अशीही त्यांनी सूचना केली. त्यांनी सावकारांकडून शेतकऱ्याचे असलेल्या शोषणावर अनेक लेख लिहून टीका केली.

**चंपारण्य सत्याग्रह :**

चंपारण्य जिल्ह्यात नीळीच्या शेतीचे मालक इंग्रज होते. ते स्थानिक शेतकऱ्यांवर जुलूम जबरदस्ती करीत होते. निळीची शेती करण्यासाठी जबरदस्ती करत होते. शेतकऱ्यांमध्ये

प्रतिकार करण्याची क्षमता नव्हती. काही बिहारी तरुणांनी चंपारण्य येथील शेतकऱ्यावरील अन्यायाकडे १९१६ साली झालेल्या काँग्रेसच्या लखनौ अधिवेशनात या प्रश्नाकडे गांधीजीचे लक्ष वेधले. गांधीजींनी शेतकऱ्यांसाठी सत्याग्रह करण्याचे ठरविले. गांधीजी चंपारण्य येथे मोतीहारी या गावी गेले असता सरकारने त्यांना जिल्हाबंदीचा आदेश दिला. तो आदेश मोडला व त्यांनी कैसर-एसिंह हे सुवर्णपदक सरकारला परत केले. त्यांनी सरकारला आपण शिक्षा भोगण्यास तयार असल्याचे कळविले. त्यांच्या सत्याग्रहापुढे सरकारला नमते घ्यावे लागले. सरकारने त्यांच्यावरील खटला काढून घेतला. शेतकऱ्यांच्या परिस्थितीत त्यांना सुधारणा कराव्या लागल्या.

**खेडा सत्याग्रह :**

कलकत्ता येथील काँग्रेसच्या अधिवेशनानंतर खेडा जिल्ह्यातील दुष्काळाकडे महात्मा गांधीजींनी लक्ष दिले. पाऊस न पडल्याने लोकांची पिके बुडाली होती. तेथील शेतकरी दुष्काळी परिस्थितीमुळे शेतसारा देवू शकत नव्हते. दुष्काळी कायद्यानुसार शेतकऱ्यांना शेतसाऱ्यातून सुट मिळावयास हवी होती. परंतु सरकारने सारा माफ करण्याऐवजी सारा वसुलीबाबत शेतकऱ्यांवर जुलुम करावयास सुरुवात केली. त्यामुळे गांधीजीनी सारावंदीची चळवळ खेडा जिल्ह्यात सुरू केली. शेतकरी सरकारला सारा देणार नाहीत अशा घोषणेने चळवळीला सुरुवात झाली. ही चळवळ यशस्वी झाली.

**मोपला बंड :**

आठव्या व नवव्या शतकात केरळमध्ये येवून स्थायिक झालेल्या मुस्लिम शेतकऱ्यांना मोपला असे म्हणत. ते हिंदू जमीनदारांचे पट्टेदार म्हणून काम करीत. १९व्या शतकात जास्त कर, पट्टेदारीबाबत निश्चितता नसणे, इत्यादीबाबत त्यांच्या जमीनदारांबरोबर तक्रारी होत्या त्यामुळे त्यांनी केरळमध्ये लहान मोठे २२ उठाव घडवून आणले. त्यात मोपल्यांनी हिंदु जमीनदार व अधिकाऱ्यांच्या हत्या केल्या. सरकारने मात्र त्यास धार्मिक दंगली असे नाव दिले. १९२१ मध्ये मोपल्यांनी मोठ्या प्रमाणावर बंडाला सुरवात केली. मोपल्यांच्या नेत्याला पकडण्यासाठी इंग्रज अधिकाऱ्याने तिरूरांगडीच्या मशिदीत प्रवेश केल्याने बंडाला सुरवात झाली. हिंदु सरकारला मदत करतात असा संशय असल्याने हिंदुंच्या विरोधात हिंसाचाराला सुरूवात झाली. बंड शमल्यानंतर हिंसाचाराला बळी पडलेल्या हिंदुंना आर्य समाजाने सर्वतोपरी मदत केली.

**सेनापती बापट आणि मुळशी सत्याग्रह :**

सेनापती पांडुरंग महादेव बापट यांच्या नेतृत्वाखाली मुळशी सत्यागश्ह झाला. टाटा कंपनीने मुळशी तालुक्यातील मुळा व निळा नदीचा संगम अडवून धरण बांधण्याचे ठरविले त्यामुध्ये ५४ गावे आणि शेती जात होती. कंपनीने शेतकऱ्यावर पिस्तुल रोखले. २० व २१ मार्च १९२१ रोजी बारामती येथे परिषद भरली व त्यामध्ये शंकरराव देव, भुस्कुटे, केळकर व बापट यांनी शेतकऱ्यांसह सत्याग्रह केला. शेतकऱ्यांनी मजुरांना काम करु दिले नाही तेव्हा कपनीने त्यांच्यावर गरम पाणी टाकले. २६ एप्रिल १९२१ रोजी बापट स्वतः रुळावर आडवे झाले. शेवट त्यानाही कपनीने काटयात फेकून दिले. कंपनीच्या लोकांना बापट यांनी खडसावल्याने ते घाबरले. कंपनीने मात्र, बापट, रानडे, शेरेकर, देवराव व पौडचे हिरवे यांच्यावर खटले भरले २० ऑक्टोबर १९२१ रोजी ६ महिने कैद व १००रु.दंडाची शिक्षा ठोठावली व त्यांना येरवडा कारागश्हात डांबले. २२ एप्रिल १९२२ रोजी त्यांची सुटका झाली ११ जून १९२२ रोजी डॉ.मंजू यांच्या अध्यक्षतेखाली मराठी भाषिकांची मुळशी परिषद भरली. या परिषदेत ठरल्याप्रमाणे २ सप्टेंबर १९२२ रोजी पुन्हा सत्याग्रह सुरु केला. त्यामुळे बापट यांना पुन्हा अटक केली.

फेब्रुवारी १९२३ रोजी येरवडा येथून सुटका झाली. डिसेंबर १९२३ मध्ये शेतकऱ्यांनी नुकसान भरपाई घेतल्याने मुळशी सत्याग्रह बंद पडला.

### तुकडेबंदी व सारावाढीचे विधेयक :

मुंबई कायदेमंडळात इ.स.१९२७ मध्ये मुंबई प्रांताच्या गश्हमंत्र्याने तुकडेबंदी व सारावाढीचे एक विधेयक मांडले. हे विधेयक पास झाल्यास लहान शेतकऱ्यांना जमिनीस मुकावे लागत होते. तसेच शेतसाराही वाढणार होता. त्यामुळे केशवराव जेदे व दिनकराव जवळकर यांनी शेतकऱ्यांच्या सभा घेऊन या विधेयकाला विरोध केला.२५ जुलै १९२८ रोजी पुणे येथे त्यांनी मुंबई इलाखा शेतकरी परिषद घेतली या परिषदेत ८००० शेतकरी हजर होते तुकडेबंदी व सारावाढीचे विधेयक सरकारने पास करु नये असा ठराव या परिषदेत घेण्यात आला. ब्राह्मणेत्तर चळवळीतील कार्यकर्त्यांनी 'मुंबई इलाखा ब्राह्मणेतर शेतकरी संघ' ही संघटना स्थापन केली. शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविणे आणि त्यांना जागश्त करणे हि या संघटनेची उद्दिष्टे होती.

### बार्डोली सत्यागह :

महसूल दराची दर दहा वर्षांनी फेरतपासणी होत असे. त्याप्रमाणे गुजरातमध्ये फेरतपासणी झाली. तेव्हा शेतसाऱ्यात वाढ झाली होती. शेतकऱ्यांनी पटेलांची भेट घेतली. पटेलांनी अर्ज, विनंत्या करून पाहिले. परंतु त्याचा काही उपयोग झाला नाही. त्यामुळे पटेल यांच्या नेतृत्वाखाली सत्याग्रहाला सुरवात झाली. सरकारी अधिकाऱ्यांनी दडपशाहीचे धोरण अवलंबिले. शेतकऱ्यांचा अनेक मार्गांनी छळ केला. परंतु शेतकरी डगमगले नाहीत. अखेर पटेल व सरकार यांच्यात तडजोड घडवून आणली. त्यानुसार अत्याचारांच्या चौकशीसाठी एक समिती नेमण्याचे सरकारने मान्य केले.

### कर्षक संघम:

केरळमध्ये समाजवादी काँग्रेस पक्षाच्या प्रयत्नामुळे शेतकरी चळवळ उभारण्यात आली. १९३४ पासून संघटनेच्या बांधणीला सुरवात केली. सरंजामी पट्टी रद्द करावी, जमीन धारणा नुतनीकरण शुल्क रद्द करावे, आगाऊ खंड वसुली रद्द करावी, इत्यादी मागण्यासाठी जमीनदारांकडे मोर्चा काढून आपल्या मागण्या मान्य करून घेत. कर्षक संघमने कुळकायदा दुरूस्तीसाठी आंदोलन करून ६ नोव्हेंबर १९३८ हा दिवस कुळकायदा दुरूस्तीदिन म्हणून पाळण्यात आला. कालीकत जवळ चेवायूर येथे अखिल मलबार कर्षक संघमचे संमेलन घेण्यात आले. पी. कृष्ण. पिल्लाई हे संमेलनाचे अध्यक्ष होते. समेलनात कुळकाद्यात दुरूस्ती करण्यात यावी म्हणून ठराव पास केला गेला होता.

### फैजपूर काँग्रेस आणि शेतकऱ्यांचे प्रश्न

इ.स. १९३० मध्ये महात्मा गांधींनी सुरू केलेल्या सविनय कायदेभंगाच्या चळवळीत शेतक-यांचाही फार मोठा सहभाग होता. या चळवळीच्या काळात शेतकऱ्यांनी साराबंदी, जंगल सत्याग्रह यांसारख्या कार्यक्रमांच्या माध्यमातून तिला देशव्यापी स्वरूप प्राप्त करून देण्यात मोठाच हातभार लावला होता. पंडित जवाहरलाल मोतीलाल नेहरु यांच्या अध्यक्षतेखाली जळगाव जिल्हयातील फैजपूर येथे डिसेंबर १९३६ मध्ये झालेले काँग्रेसचे अधिवेशन हे पहिलेच ग्रामीण अधिवेशन होते. याच अधिवेश्नात अखिल भारतीय किसान सभेचे दुसरे अधिवेशन घेण्यात आले. एन.जी.रंगा हे किसान सभेचे अध्यक्ष होते. मनमाडपासून फैजपूरपर्यंत २०० मैलांची पदयात्रा किसानांनी काढली होती. पंडित नेहरुंनी आपल्या अध्यक्षीय भाषणात वर्गसंघर्षाऐवजी समाजवादी तत्वप्रणालीवर श्रध्दा व्यक्त केली. या अधिवेशनात शेकऱ्यांच्या हितासाठी ठराव पास करण्यात आले.

**अखिल भारतीय किसान सभा :**

सविनय कायदेभंगाच्या चळवळीतून पुढे आलेल्या तरुण वर्गाने शेतकरी संघटना स्थापन करणे व आहेत त्या संघटना मजबूत करणे यावर भर दिला. १९३४ मध्ये समाजवादी काँग्रेस पक्षाची स्थापना झल्यानंतर डाव्या गटाला कार्य करण्यास वाव मिळाला. त्यातूनच शेतकऱ्यांच्या चळवळीत योग्य समन्वय साधण्यासाठी 'अखिल भारतीय किसान परिषद' स्थापन करण्यात आली. त्यासाठी एन.जी. रंगा व इतर शेतकरी नेत्यांनी पुढाकार घेतला. या परिषदेचे पुढे 'अखिल भारतीय किसान सभेत' रूपांतर झाले. किसान चळवळीचे प्रवर्तक म्हणून एन. जी. रंगा यांना ओळखले जाते. १९३७ नंतर गांधीजीनी ग्रामोद्योगावर भर दिला होता. त्या उद्देशाने फैजपूर येथे १९३८ साली काँग्रेसचे ग्रामीण भागातील पहिले अधिवेशन भरविण्यात आले. पंडित नेहरूंच्या अध्यक्षतेखाली या अधिवेशनात गांधीजी जमीन सरकारची नाही, जमीनदारांचीही नाही तर ती कसणाऱ्यांची आहे असे आपल्या भाषणात म्हटले. मुंबई येथील अखिल भारतीय किसान समीतीच्या बैठठकीत किसान जाहिरनामा पूर्णत्वास आला. जाहिरनाम्यावर फैजपूर अधिवेशनाचा प्रभाव जाणवत होता. जमिन महसूल व खंडाचे प्रमाण पन्नास टक्क्यांनी कमी करावे. शेतकऱ्यांवरील कर्ज स्थगित करावे. सरंजामी पट्टी रद्द करावी. कुळांची जमीनधारा संरक्षित करावी. शेतमजूरांना योग्य वेतन मिळावे. किसान संघटनांना अधिकृत मान्यता मिळावी, इत्यादी प्रमुख मागण्या या जाहीरनाम्यात होत्या. १९३७ साली काँग्रेसची मंत्रीमंडळे सत्तेवर आल्यानंतर शेतकऱ्यांसंबंधीत कायदे पास केले. शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळावी, आर्थिक मंदीच्या काळात शेतकऱ्यांचा जप्त केलेल्या जमीनी त्यांना परत मिळाव्यात व कुळांचे जमीनधारणेचे हक्क कायम रहावेत यासंबंधीचे कायदे पास केले. प्रांत, जिल्हा, तालुका, गाव अशा विविध स्तरावर शेतकरी परिषदा व बैठका होवू लागल्या. अशा परिषदांना भारतीय काँग्रेस नेते हजर राहून मार्गदर्शन करीत आणि शेतकरी परिषदांद्वारे राष्ट्रीय जागृती करत.

**आपली प्रगती तपासा:**

१) अखिल भारतीय किसान सभेच्या कार्यावर थोडक्यात चर्चा करा.

________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________

**साने गुरुजी व शेतकरी चळवळ :**

साने गुरुजींनी खानदेशात शेतकऱ्यांचे संघटन केले. त्यासाठी सर्वत्र दौरा केला. इ.स.१९३९ मध्ये पूर्व खानदेशात अतिवृष्टी झाल्याने पिकांचे नुकसान झाले. त्यामुळे साने गृरुजींनी शेतकऱ्यांचा शेतसारा माफ करावा अशी मागणी केली. त्यांनी जळगावच्या जिल्हाधिकारी कार्यालयावर शेतकऱ्यांचा मोर्चा नेला. त्यांनी लिहिलेली स्फूर्तिदायक गीते शेतकऱ्यांनी मोर्चात म्हटली.

**शेतकरी कामगार पक्षाची स्थापना आणि शेतकरी चळवळ :**

मुंबई प्रांताचे मुख्यमंत्री बाळासाहेब खेर यांचा कारभार शेतकरी व कामगार वर्गाच्या विरोधी आणि भांडवलशाहीधार्जिणा आहे शंकरराव मोरे आणि केशवराव यांचे मंत्रिमंडळ व्यापाऱ्यांचे आहे असे मत व्यक्त होत असे. इ.स.१९४६ मध्ये केशवराव जेधे, शंकरराव मोरे, भाऊसाहेब राऊत, के.डी.पाटील, नाना पाटील, दत्ता देशमुख, यशवंतराव चव्हाण, पी.के.सावंत, आचार्य प्र.के. अत्रे , रामभाऊ नलावडे, तुळशीदास जाधव, डॉ.केशवरावजी

शंकरराव धोंडगे व गुरुनाथरावजी कुरुडे यांनी कॉँग्रेसअंतर्गत शेतकरी कामगार संघ स्थापन केला पण कॉँग्रेसअंतर्गत असे उपपक्ष असू नये अशी भूमिका अखिल भारतीय कॉँग्रेस कार्यकारिणीने घेतल्यामुळे वरील मंडळीनी २६ एप्रिल १९४८ रोजी शेतकरी कामगार पक्ष स्थापन केला. कॉँग्रेसच्या खालोखाल शेजकरी कामगार पक्ष हा पक्ष लोकप्रिय होता. शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवणे व त्यांचे कल्याण करणे या पक्षाचे मुख्य काम होते ते या पक्षाने करण्याचा प्रयत्न केला.

## दुसरे महायुद्ध व शेतकरी चळवळ

९ एप्रिल १९३९ रोजी अखिल भारतीय किसान सभेचे अधिवेशन गया येथे भरले. अध्यक्षपद नरेंद्र देव यांनी भूषविले. सुमारे एक लाखापेक्षा जास्त शेतकरी उपस्थित होते. शेतकऱ्यांच्या मागण्यांकडे कॉँग्रेसने लक्ष द्यावे व शेतकऱ्यांनी कॉँग्रेस ही संघटना आपलीच आहे असे समजावे. लवकरच महायुद्ध सुरू होईल. कॉँग्रेसने देशव्यापी लढा द्यावयाचे ठरवले आहे. अशावेळी शेतकऱ्यांनी कॉँग्रेसला मदत करावी असे ठरवण्यात आले. ३ सप्टेंबर १९३९ रोजी दुसरे महायुद्ध सुरू झाले. त्यामुळे शेतकरी चळवळ थंडावली. सुरवातीला शेतकरी नेते महायुद्धात सरकारच्य विरोधात होते. परंतु हिटलरने रशियावर आक्रमण केल्याने व रशियाने दोस्तांच्या बाजूने भाग घेताच भारतातील साम्यवादी पक्षाने सरकारला पाठींबा दिला. त्यामुळे साम्यावादी शेतकरी नेते साम्यवादी नसलेले शेतकरी नेते यांच्यात दुही निर्माण झाली. पुढे भारत छोडो आंदोलन सुरू झाल्यावर साम्यवादी व राष्ट्रवादी नेते यांच्यात मतभेद निर्माण झाले. त्यामुळे शेतकरी सभेत १९४३ साली विभाजन झाले. त्याचवर्षी बंगालमध्ये दुष्काळ पडला. त्यामुळे दैनंदिन वस्तू महाग झाल्या. त्यांचा तुटवडा निर्माण झाला. तेव्हा शेतकरी सभेने तो दूर करण्याचा प्रयत्न केला. महायुद्धानंतर सत्तांतराविषयी वाटाघाटी सुरू झाल्या. त्याबरोबर शेतकऱ्यांमध्येही नवचैतन्य निर्माण झाले. जमीनदारी पद्धात नष्ट व्हावी म्हणून मागणी करण्यात येऊ लागली. आंध्रप्रदेश, त्रावणकोर, तेलंगणा इत्यादी ठिकाणी त्याचे पडसाद उमटू लागले. सुरवातीला शेतकऱ्यांची चळवळ त्यांच्यावर होत असलेल्या अन्यायाविरूद्ध होती. या चळवळीत शेतकरी वर्ग मोठ्या प्रमाणावर असल्याने ही जनसामान्याची चळवळ होती. त्यांचा रोख परदेशी मळेवाले, जमीनदार व सावकार यांच्या विरूद्ध होता. या चळवळींचा प्रादेशिक विस्तारही मर्यादित होता. दीर्घकालीन सातत्य व संघटन यांचा अभाव होता. अत्यांतिक जुलूम अवाजवी व असामान्य शोषण व पिळवणूक आणि आपली शेती जाण्याची शक्यता निर्माण झाल्यानंतरच शेतकरी उठाव करीत असत. जमीनदारी व सावकारी पद्धतीच्या विरोधात त्यांचा लढा नव्हता. तर जमिनीवरून हाकलून लावले जाईल, अवाजवी कर आकारणी व सावकाराची फसवाफसवी यांना त्यांचा प्रखर विरोध होता. अशिक्षित, आडाणी व निाश असूनही शेतकऱ्यांचे असामान्य धैर्य, समर्पण भावना, संघटनांची कुवत, जात व धर्म यांच्या पलीकडे जाणारी ऐक्य भावना इत्यादींची प्रचीती या लढ्यात दिसून आली. शेतकरी चळवळींचा वसाहतवादास विरोध नव्हता. वसाहतवादाची नवी व गुंतागुंतीची प्रक्रिया जाणून घेण्याची त्यांची कुवत नव्हती. त्यासाठी बुद्धीजीवी विचारवंत वर्गाची गरज होती. १९३७ नंतर कॉँग्रेसने शेतकरी चळवळींना कॉँग्रेसमध्ये सामावून घेण्याचा व आपल्या चळवळीला पाठींबा मिळवण्याचा प्रयत्न केला. या चळवळींचा प्रादेशिक विस्तार मार्यादित असला तरी वेगवेगळ्या प्रांतात अवलंविण्यात आलेले चळवळीचे मार्ग साधारणतः सारखेच होते. स्वातंत्र्य चळवळीच्या शेवटच्या कालखंडात शेतकरी चळवळ व स्वातंत्र्य चळवळ नेहमी एकमेकींवर आधारित होत्या. शेतकरी चळवळीने राष्ट्रवादी भूमिका स्वीकारल्यामुळे राष्ट्रीय जागृती शहरापासून खेड्यापर्यंत जाऊन पोहोचली.

**आपली प्रगती तपासा**

१) दुसऱ्या महायुद्धकालीन भारतीय शेतकरी चळवळींवर टीप लिहा.

## १.५ सारांश

वसाहतवादी ब्रिटीशांच्या काळात शेतकरी व आदिवासी या असंघटित सर्वसामान्य जनतेने आपल्यावर होणाऱ्या अन्यायाला प्रतिकार करण्यासाठी चळवळी उभ्या केल्या व ब्रिटीश सरकार व त्यांच्या मध्यस्थांच्या विरोधात उठाव घडवून आणले. शेतकऱ्यांच्या चळवळी सुरवातीस असंघटीत स्वरूपात होत्या. कालांतराने त्या त्या प्रदेशातील शेतकरी एकसारख्या समस्यांमुळे एकत्र आले. महात्मा गांधीजींनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे लक्ष देण्यास सुरवात केल्यानंतर शेतकरी चळवळ व राष्ट्रीय चळवळ यांचा संबंध येऊ लागला. सविनय कायदेभंग चळवळीनंतर शेतकरी चळवळीला राजकीय स्वरूप येऊ लागले. समाजवादी काँग्रेस पक्षाच्या स्थापनेनंतर अखिल भारतीय किसान परिषद स्थापन झाली. त्यामुळे शेतकरी चळवळ राष्ट्रीय पातळीवर जाऊन पोहोचली.

## १.६ प्रश्न

(१) वसाहतकालीन भारतातील शेतकरी चळवळींची थोडक्यात माहिती द्या.
(२) शेतकरी चळवळी व राष्ट्रीय काँग्रेस यांच्या संबंधाची माहिती द्या.
(३) अखिल भारतीय किसान सभेच्या कार्यावर चर्चा करा.
(४) शेतकरी चळवळीचे महाराष्ट्रातील स्वरूप व कार्याबद्दल माहिती दया.
(५) भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील महाराष्ट्रातील शेतकरी चळवळींची भूमिका स्पष्ट करा.
(६) टिपा लिहा.
(अ) बंगालमधील नीळ उत्पादक शेतकऱ्यांचे बंड
(ब) महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचे उठाव
(क) महात्मा फुले व शेतकरी चळवळ

## १.७ संदर्भ सूची

(१) बिपीनचंद्र व इतर, भारतीय स्वातंत्र्य लढा, के. सागर प्रकाशन

(२) बिपीनचंद्र, अपलेश त्रिपाठी, बरूण डेः स्वातंत्र्याचा लढा,

(३) ग्रोव्हर आणि बेल्हेकरः आधुनिक भारताचा इतिहास (एस. चंद प्रकाशन)

(४) सुमन वैद्य व शांता कोठेकरः

(१) आधुनिक भारताचा इतिहास (१८५७ - १९२०)

(२) आधुनिक भारताचा इतिहास (१९२० - १९४७) श्री साईनाथ प्रकाशन

(५) सुमित सरकारः आधुनिक भारत - के. सागर प्रकाशन

(६) डॉ. जयसिंगराव पवार, आधुनिक हिंदुस्तानचा इतिहास - श्री विद्या प्रकाशन

(७) धनंजय आचार्यः आधुनिक भारताचा इतिहास (१७५० - १९५०)

❖❖❖❖

# १०

# आदिवासींचे उठाव

**प्रकरण रचना :**

१०.० उद्दिष्टये
१०.१ प्रस्तावना
१०.२ आदिवासींच्या चळवळींची पार्श्वभूमी
१०.३ संथाळांची चळवळ
१०.४ कोळी व रांपा जमातींचे उठाव
१०.५ सरदारी लराई किंवा मुक्ती लराई चळवळ
१०.६ मुंडा जमातीचा उठाव
१०.७ गुजराथमधील देवी चळवळ
१०.८ मीदनापूरमधील आदिवासी चळवळ (१९१८-१९२४)
१०.९ माल्दामधील जीतू संथाळची चळवळ
१०.१० ओरिसातील आदिवासी चळवळ
१०.११ आसाममधील आदिवासी चळवळ
१०.१२ महाराष्ट्रातील आदिवासींचे उठाव
१०.१३ सारांश
१०.१४ प्रश्न
१०.१५ संदर्भ सूची

## १०.० उद्दिष्टये

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपल्याला

१. भारतात ब्रिटीश कालखंडात आदिवासी जमाती यांच्यावर झालेल्या अन्याय, अत्याचार व दडपशाहीची माहिती मिळेल.
२. ब्रिटीश वसाहतवाद्यांनी आदिवासी यांची केलेल्या आर्थिक शोषणाची कल्पना येईल.
३. जमीनदार, सावकार, व्यापारी, इ. वसाहतवाद्यांच्या हस्तकांनी आदिवासी जमातींवर केलेल्या अन्यायाची कल्पना येईल.
४. आदिवासी जमातींनी अन्यायाच्या प्रतिकारासाठी केलेल्या चळवळीची माहिती मिळेल.
५. आदिवासी चळवळी मोडून काढण्यासाठी ब्रिटीशांनी केलेल्या हस्तक्षेपाची कल्पना येईल.
६. आदिवासी चळवळीचा राष्ट्रवादी चळवळीशी असलेला संबंध लक्षात येईल.

## १०.१ प्रस्तावना

शेतकऱ्याप्रमाणेच आदिवासी जमातीच्या जीवनातही वसाहतवाद्यांनी हस्तक्षेप केल्याने त्यांनी ही चळवळ सुरू केली. त्यांचे दैनंदिन जीवन शेती व जंगलावर अवलंबून होते.जंगल विषयक जाचक कायदे व आर्थिक शोषण वसाहतवाद्यांनी केल्याने आदिवासी जमातींनी हिंसक चळवळींना सुरूवात केली. जमीन व जंगलविषयक जाचक कायदे हे समान कारण असल्याने त्यांच्या चळवळीचा पाया व्यापक झाला. हजारो आदिवासी चळवळीत सहभागी झाले. परंपरागत शोघेवून लढणारे आदिवासी व प्रशिक्षित व सश ब्रिटिश सैनिक यांच्या असमान संघर्षात हजारो आदिवासी मरण पावले. शेतकरी व आदिवासी चळवळींनी राष्ट्रवादी चळवळींना व्यापक बनविले.

## १०.२ आदिवासींच्या चळवळींची पार्श्वभूमी

ब्रिटीशांची राजवटया देण्यात स्थापन झाल्यानंतर वसाहत वाद्यांकडून होणाऱ्या अन्याय, अत्याचाराचा प्रतिकार आदिवासी समाजानेही केला. आदिवासींच्या चळवळी दोन प्रकारच्या होत्या. एक म्हणजे त्यांचे पोषण करणारे जे वर्ग होते त्यांच्या विरूद्ध चालवलेली चळवळ. त्यावर्गात जमीनदार, सावकार, व्यापारी, ठेकेदार, सरकारी अधिकारी व ख्रिश्चन, मिशनरी यांचा प्रामुख्याने समावेश होतो. आदिवासींची दुसरी चळवळ ही भारताच्या स्वातंत्र्य चळवळाशी निगडीत होती. आदिवासी जमाती, जमीनदार, सावकार, व्यापारी, ठेकेदार यांना परकीय समजत होत्या.१७६३ पासून अशा उठावांना सुरवात झाली. १८५७ च्या उठावापूर्वी भारतात संन्याशी उठाव (१७६३), चुआर उठाव (१७६८), फकीरांचे बंड (१७७६-१८००), तमार (ऊँर्स) उठाव (१७८९), खेरवारच्या संथाळांची चळवळ (१८३३), हो जमातीचे बंड(१८२०), खासींचा उठाव (१८२४), कुकींचे बंड (१८२६), कोळ्यांचे बंड (१८३१), खोंडजमातीचा उठाव (१८३६), फराईसी व पागलपंथीयांचा उठाव (१८३८), सिंगपो जमातीचा उठाव (आसाम) उमाजी नाईकाचे बंड (१८२६), इत्यादी अनेक उठाव घडून आले होते. इ.स.१८५८ नंतर राष्ट्रवादाची जागृती व प्रसार होवू लागला होता.

## १०.३ संथाळांची चळवळ

संथाळ ही आदिवासी जमात असून बंगाल, बिहार, ओरीसा या राज्यात संथाळांची वस्ती सर्वाधिक होती. सुरवातीला ते गंगेच्या खोऱ्यात रहात होते. नंतर ते छोटा नागपूरच्या डोंगराळ भागात वस्ती करून राहू लागले. १८व्या शतकाच्या शेवगी जंगले तोडण्यास सुरवात झाल्यामुळे त्यांनी छोटा नागपूर सोडून ईशान्येकडील राजमहाल टेकड्यांकडे वस्ती केली. दमिन-इ-कोई हेत्यांनी आपले केंद्र बनविले. इंग्रजांनी जंगले तोडण्यासाठी व नवीन जमीन लागवडीखाली आणण्यासाठी संथाळांचा उपयोग करून घेतला. इंग्रजांनी त्या भागात जमीनदारी सुरू केली. बरचसे व्यापारी व सावकार त्यांनी त्या भागात आणले. त्यामुळे संथाळांची मोठी पिळवणूक सुरू झाली. संथाळांच्या जमिनी व्यापारी व सावकार यांनी बळकावून त्यांना आपले गुलाम केले. आपल्यावरील अन्याय नाहीसा करण्यासाठी संथाळांनी सुरवातीस सनदशीर मार्गाचा अवलंब केला. पण अधिकारी वर्गाने त्या मागण्यांकडे दुर्लक्ष केले. त्यामुळे संथाळ आक्रमक बनले. त्यांनी हिंसक मार्गांचा अवलंब केला.इ.स. १८५४ च्या सुमारास माझी व परगणाईत हे आदिवासी जमातींचे पुढारी एकत्रित आले.त्यांनी ३० जून १८५५ रोजी भागानिधी येथे एक सभा

घेतली. त्यांनी बंडाचा झेंडा उभारून उपरे व त्यांचे वसाहतवादी धनी यांना हाकलून लावण्याचा निर्णय घेतला. संथाळांचे नेते सिदो व कान्हू यांनी आपल्यावर देवाची मर्जी असून आपण स्वतः इंग्रजांशी लढाई करणार असून त्यात इंग्रजांचा पराभव अटळ आहे असे सांगितले. त्यामुळे आठ हजारपेक्षा जास्त संथाळ एकत्र आले. ढोल व ताशे ही परंपरागत वाद्ये वाजवताच ते एकत्र येत. साधारणपणे दीड ते दोन हजार बंडखोरांची एक अशा तुकड्या तयार करण्यात आल्या. महाजन, जमीनदार, त्यांची घरेदारे,पोलीस ठाणे, रेल्वेमार्ग बांधण्याचे काम, पोस्ट, वाहने इत्यादी कामे डिंकूकडून केल्या जाणाऱ्या शोषणाच्या व वसाहतवादी सत्तेच्या सर्व प्रतिकांवर हे बंडखोर कडाडून हल्ले चढवू लागले. आदिवासी नसलेल्या उपऱ्या परंतु गरीबांनी आदिवासींना मदत केली. गवळी आणि इतरांनी साधानसामग्री आणि सेवा पुरविल्या. लोहांरानी बंडखोरांच्या टोळ्याबरोबर राहून त्यांची सज्ज केली. सरकारने हा उठाव मोडून काढण्यासाठी सैनिकांच्या तुकड्या पाठवून उठाव व्याप्त प्रदेशात लष्करी कायदा पुकारला. बंडखोरांच्या नेत्यांना पकडण्यासाठी दहा हजार रूपयापर्यंत बक्षिसे जाहीर केली. १५००० पेक्षा जास्त संथाळांना ठार केले. अनेक खेडी उद्ध्वस्त केली. विश्वासघाताने सिदो संथाळास पकडण्यात आले. त्याला १८५५ मध्ये ठार केले. १८६६ मध्ये कान्हू पकडला गेला.

## १०.४ कोळी व रांपा जमातींचे उठाव

इ.स. १८२० नंतर छोटा नागपूर भागातील कोळी जमातीने ब्रिटीशांची सत्ता स्थिरावत असताना उठाव केला. हजारो बंडखोरांना ठार मारल्यावरच ब्रिटीशांची सत्ता या भागात पुन्हा स्थिरावली. आंध्रप्रदेशच्या किनार पट्टीतील रांपा या डोंगरी आदिवासींनी सरकारच्या पाठींब्याने मनसबदारांनी चालविलेल्या विध्वंसाविरूद्ध व जंगलनिर्बंधांविरूद्ध १८७९ च्या मार्च महिन्यात उठाव केला. बंडखोरांचा बिमोड करण्यासाठी सरकारच्या पायदळाच्या अनेक, घोडदळाची एक आणि खंदक खोदणाऱ्या व सुरूंग पेरणाऱ्या सैनिकांची एक अशा कित्येक पलटणी पाठवाव्या लागल्या. इ.स. १८८०च्या उठावाचा शेवट झाला.

## १०.५ सरदारी लराई किंवा मुक्ती लराई चळवळ

छोटा नागपूरच्या डोंगराळ भागात ही चळवळ उदयास आली. आपल्या प्रदेशातून ब्रिटीशांनी आणलेल्या जमीनदारांना हाकलून देवून आपले जमिनीवरचे प्राचीन काळापासूनचे परंपरागत हक्क पुन्हा मिळविणे हा या चळवळीचा उद्योग होता. शेतजमीनीशी संबंधित चळवळ, पुनरूज्जीवन चळवळ व राजकीय चळवळ अशा तीन टप्प्यात ही चळवळ आकाराला आली. पहिल्या दोन टप्प्यात जमिनदार आणि त्यांची कुळे यांच्यातील संघर्ष हे वैशिष्ट्ये होते. जमीनदारांनी वाढविलेल्या भाडेपट्ट्याला विरोध करण्यासाठी आदिवासी कुळांनी चळवळ सुरूकेली. जमीनदारांनी कर वाढविण्याबरोबर कुळांच्या जमीनी काढून घेण्याचा प्रयत्न केला. त्यामुळेकुळे आणि जमीनदार यांच्यात वारंवार संघर्ष होऊ लागला. १८९० पासून सरदारी चळवळीने मिशनरी आणि सरकारी अधिकारी अशा सर्व युरोपीयनांच्या विरोधात संघर्ष सुरू केला. अशा युरोपियनांचा जमीनदारांना पाठींबा होता. आपल्यावरील सर्व प्रकारच्या अन्यायाला ब्रिटीश राजवट कारणीभूत आहे असे आदिवासी लोकांना वाटू लागले. त्यामुळे ब्रिटीश राजवटीचा शेवट केला तर आपणास पूर्वीचे चांगले दिवस परत मिळतील असे त्यांना वाटू लागले.सुरवातीस सनदशीर मार्गाने अधिकाऱ्यांकडे तक्रारी केल्या. परंतु अधिकाऱ्यांनी त्यांच्याकडे दुर्लक्ष करीत असत. आपणास सनदशीर मार्गाने न्याय मिळत नाही हे पाहुन त्यांनी

हिंसाचाराला सुरवात केली. धनुष्यबाण, भाले यासारख्या परंपरागत शस्त्रांचा वापर करून जमीनदार व अधिकाऱ्यांच्या हत्या घडवून आणल्या. सप्टेंबर १८९२ मध्ये चळवळीतील लोकांनी ठेकेदार, जमीनदार व जर्मन मिशनरी यांना मारण्याचा कट रचला. परंतु त्यांचा कट फसला. कटाच्या अंमलबजावणीसाठी योग्य नेता व नियोजनाचा अभाव होता. त्यानंतर त्यांना बिरसा मुंडाचे नेतृत्व लाभले.

## १०.६ मुंडा जमातीचा उठाव

इ.स.१८९५ ते १९०१ या काळात बिरसा मुंडा याच्या नेतृत्वाखाली मुंडा या वन्य जमातीने उठाव (अलगुलान) केला. जहागीरदार, ठेकेदार, महसूलाचे मक्तेदार, व्यापारी व सावकार यांनी आदिवासींच्या सामाजिक जमीन मालकी पद्धतीवर घाला घातला होता. त्याविरूद्ध हे मुंडा सरदारतीस वर्षे संघर्ष करीत राहिले.इ.स. १८७४ मध्ये एका गरीब बटाईदार कुटुंबात जन्मलेल्या बिरसाने जर्मन मिशनरी शाळेत प्राथमिक शिक्षण घेतले होते. मिशनऱ्यांवर टिका केल्यामुळे त्याला शाळेतून काढून टाकले. या घटनेने तो युरोपीयनांचा कट्टर विरोधक बनला. तो म्हणत असे सर्व साहेब व मिशनरी यांची टोपी एकच आहे १८९५ मध्ये आपणास दैवी साक्षात्कार झाल्याचे त्याने सांगितले. त्याच्याभोवती जमलेल्या हजारो मुंडा सरदारांनी त्याला नवा धार्मिक संदश देणारा मुक्तिदाता मानले. मुंडा सरदारांच्या प्रभावाखाली या धार्मिक चळवळीने लवकरच शेतीविषयक व राजकीय आंदोलनाचे स्वरूप धारण केले. गावोगावी फिरून व मोठे मेळावे भरवून बिरसाने आपल्याअनुयायांची धार्मिक व राजकीय संघटना उभारली. १८९९च्या नाताळच्या पूर्वसंध्येला त्याने मुंडाराज्य स्थापन करण्यासाठी बंडाचा झेंडा उभारला. ठेकेदार, जहागीरदार, राजे व अंमलदारआणि ख्रिश्चन मिशनरी यांची हत्या करण्यास बंडखोरांना प्रोत्साहन दिले. प्रचलित कलियुगाऐवजी सत्ययुगाची स्थापना झाल्याचा दावा त्याने केला. उपऱ्या डिवूंशी लवकरच लढाई सुरू होईल व त्यांच्या रक्ताने येथील जमीन लाल झेंड्याप्रमाणे लाल होईल असे त्यांने जाहीरकेले. बिगर आदिवासी गरीबांना मात्र त्याने त्रास दिला नाही. मुंडा जमातीच्या मुक्ततेसाठी बिरसाने तलवारी, भाले, कुऱ्हाडी, धनुष्यबाण इत्यादी शांनीसज्ज असलेले सहा हजार बंडखोर संघटित केले होते. दुर्दैवाने फेब्रुवारी १९०० मध्ये त्यालाअटक झाली. व जून १९०० मध्ये तुरुंगात असतानाच तो मरण पावला. त्याचे बंड फसले. पण बिरसा लोकमानसात एक आख्यायिका बनला.

## १०.७ गुजराथमधील देवी चळवळ

दक्षिण गुजराथमध्ये इ.स.१९२२-२३ च्या दरम्यानं सुरू झालेली देवी चळवळ सुरवातीला सामाजिक चळवळ होती. मांस खाणे, दारू किंवा ताडी पिणे, बकरी किंवा कोंबडी कापणे किंवा विकणे यासारख्या गोष्टीपासून आदिवासी लोकांनी दूर रहावे असा आदेश सालबाई देवीने दिला आहे, असे या चळवळीमध्ये गृहीत धरले होते. दारूपुरवठा करणाऱ्या पारसी आणि जमीनदारांवरबहीष्कार टाकावा. जे लोक देवीचे आदेश मानणार नाहीत त्यांना दुर्दैवाला, कदाचित मृत्युलाही सामोरे जावे लागते असा प्रचारत्यांनी केला. डिसेंबर १९२२ पर्यंत सुरत शहरासह आदिवासी परीसरात ही चळवळ पसरली. आपले शोषण करणाऱ्या वर्गांना या चळवळीने आपले लक्ष बनविले. दारूचा व्यापार करणारे पारसी, सावकार, जमीनदार, मुस्लीम यांच्याबरोबर काम करण्याचे नाकारले. पारसी लोकांची सावली आंगावर पडली तरी आदिवासी आंघोळ करू लागले. सुरवातीला ही चळवळ धार्मिक किंवा सामाजिक स्वरूपाची असली तरी

१९२२ पासून असहकार चळवळीचा भाग बनली. परदेशी कपड्यांची होळी करा व सरकारी शाळांवर बहिष्कार टाका असे आदिवासींनी सांगण्यास सुरवात केली. जलालपूर तालुक्यातील एका ताडी दुकानदाराला दंड म्हणून राष्ट्रीय शाळेला १२० रूपये देणगी द्यावयास लावली. १९२१पासून बार्डोली तालुक्यात गांधीजींच्या कायकर्त्यांनी आदिवासी समाजात कार्य करण्यास सुरवात केली होती. सविनय कायदेभंग चळवळी पूर्वीच गांधीजींनी आदिवासींना आपल्या चळवळीत सामावून घेण्यास सुरवात केली. आदिवासींनी राष्ट्रीय चळवळीला पाठींबा देण्यास सुरवात केली.काही काळात गांधीजीचे नाव देवी चळवळीशी जोडले गेले. त्यानंतर काँग्रेस नेत्यांनी बार्डोलीला भेटी देऊन देवा ि चळवळीच्या बैठकांना खादी वापरून देवीचा संदेश पसरविण्याचा सल्ला दिला. काँग्रेसने २१जानेवारी १९२३ रोजी सरदार वल्लभभाई पटेलांच्या अध्यक्षतेखाली कालीपराज परिषद भरविली होती. या परिषदेला २०,००० आदिवासी हजर राहिले. या परिषदेने ताडीची झाडे तोडण्याचा, दारू दुकाने बंद करण्याचा व खादी वापरण्याचा संदेश देणारा ठराव पास केला. त्यानंतरच्या दोन दर्शवीत आदिवासी चळवळीने गांधीजींच्या चळवळीला पाठींबा दिला.

## १०.८ मीदनापूरमधील आदिवासी चळवळ (१९१८- १९२४)

मीदनापूर मधील जंगल महालातील संथाळ, भूमीजी व कुर्मी (महतो) या आदिवासी जमातींनी१७६० मध्ये ब्रिटीश ईस्ट इंडिया कंपनीच्या विरोधात उठाव केला होता. ब्रिटीशांनी त्याप्रदेशात आदिवासींच्या जमीन प्रमुखांऐवजी जमिनदारांची नेमणूक केली.१९व्या अतर्वाच्याशवगे बाहेरून आलेल्या जमीनदारांनी आदिवासींच्या जमिनीवर अतिक्रमण केले. इतर आदिवासी जमातीप्रमाणेच या प्रदेशातील आदिवासी जमातींचीही जमीनदार, सावकार, व्यापारी, यासारख्या उपऱ्यांकडून पिळवणूक होऊ लागली. आदिवासी जमातीमध्ये या उपऱ्यांबद्दल असंतोष निर्माण झाला.जंगल महाल आणि शेजारच्या बंकुरा व सिंगभूम पट्ट्यात ब्रिटीशांविरूद्ध आदिवासींनी १९२१ ते१९२३ च्या दरम्यान चळवळ सुरू केली. १९२१ पर्यंत काँग्रेसचा या भागात फारसा संपर्क नव्हता. १९२१ पासून सी. आर.दास यांनी या भागात जागृती सुरू केली. त्यामुळे असहकार चळवळीशी सामांतर चळवळ सुरू झाली. युरोपीयन जमीनदारांनी 'मीदनापूर जमीनदारी कंपनी' स्थापना करून आदिवासींचे शोषण सुरू केले होते. काँग्रेसने जमीनदारी कंपनीविरोधात मोहिम सुरू केली. त्यांच्या जमिनीवर काम करणाऱ्या आदिवासींचा संप घडवून आणला. जमीनदारी कंपनीने न्यायालयात जाण्याचे ठरवले. दरम्यान संपाचे रूपांतर उठावात झाले.जुलै १९२१ मध्ये २०० संतरत स्त्रियांच्या मोर्चाचे नेतृत्व शौलजानंद सेन यांनी केले. त्यांना जमीनदारांच्या भाताच्या गाड्या आडविल्या. मे १९२१ मध्ये काँग्रेसने ७०० संथाळांची एक बैठक घेवून दारू पिण्यापासून दूर रहाण्याचे ठरविले. शौलाजानंद व मुरारी मोहन रॉय यांनी आदिवासींना परदेशी मालावर व विशेषतः कपड्यांवर बहीष्कार घालण्याचे आपल्या भाषणातून अवाहन केले. १९२२ मध्ये परदेशी कपड्यावर बहीष्कार घालण्याची मोहिम खूपच प्रसिद्धीस आली. आदिवासींनी काँग्रेसबरोबर आपले चांगले संबंध असल्याचे दाखवून दिले.१९२२ मध्ये चौरीचौरा प्रसंगामुळे गांधीजींनी चळवळ आचनकपणे बंद केली. परिणामी आदिवासींची चळवळ एकाकी पडली व बाहेरच्या संबंधापासून वंचित राहिली.१५ ते २१मे १९१८ मध्ये मयूरभंजमधील संथाळांनी सरकारच्या विरोधात उठाव केला.आदिवासींची सक्तीने कामगार भरती केली जाणार होती. परंतु संथाळांच्या उठावामुळे सरकारला नोकर भरतीची योजना रद्द करावी लागली.१४ जून १९१८ रोजी संथाळांनी जंगल कायदा, चौकीदारी कर इ. बंधनांच्या विरोधात उठाव केला.संथाळांच्या एकत्रीत प्रयत्नांमुळे सरकारचे सर्व उपाय कुचकामी ठरले. संथाळांनी उठावाची

व्याप्ती वाढवूनसरकारच्या सर्व प्रकारच्या दडपशाहीतून सुटका करवून घेण्याचा प्रयत्न चालविला. ऑगस्ट१९२२ मध्ये आदिवासींनी जंगलांचा वापर करणे व तलावातून मासेमारी करणे हे आपले पारंपारिक हक्क असल्याचे ठासून सांगितले. पुढे ही चळवळ केवळ 'मीदनापूर जमीनदारी कंपनी' पुरती मर्यादित न राहता, भारतीय जमीनदारांच्या विरोधातही सुरू झाली.

## १०.९ माल्दामधील जीतू संथाळची चळवळ

इ.स. १९२४ ते १९३२ च्या दरम्यान माल्दा जिल्ह्यातील जमीनदारांच्या विरोधात संथाळांनी चळवळ चालू केली. ही चळवळ राष्ट्रीय चळवळीबरोबर गुंफली गेली. जमीनदारांबरोबरच यासंघर्षात स्वराज्य पक्षाने कुळांना पाठींबा दिला. त्यामुळे या चळवळीचा नेता जीतू संथाळचा स्वराज्य पक्षाबरोबर घनिष्ट संबंध आला. त्या भागातील आदिवासी समाजात काम करणारे स्वराज्य पक्षाचे कार्यकर्ते चक्रवर्ती 'संन्याशी बाबा' या नावाने ओळखले जात होते. जीतू संथाळच्या मदतीने त्यांनी संन्याशी दल स्थापन केले. त्यांनी आदिवासींना त्यांची आदिवासी म्हणून असलेली ओळख सोडून दिल्यास हिंदू धर्मात त्यांना चांगला दर्जा देण्याचे आश्वासन दिले. जीतूने १९२८ मध्ये संथाळांना जमीनदारांच्या पिकाची लूट करण्याच्या सूचना दिल्या. त्याने शेतकऱ्यांना कुळांचा दर्जा देण्याचे आश्वासन दिले. त्यानंतर लुटीच्या खूपच घटना घडू लागल्या.३ डिसेंबर १९३२ मध्ये जीतूने संथाळाच्या चळवळीचे हिंदुत्ववाद्यांच्या चळवळीत रूपांतर केले.पाडुआ या शहरातील आदीना मस्जीद ताब्यात घेऊन तिचे मंदिरात रूपांतर करण्याचा प्रयत्न केला. बिटीश राजवटीचा शेवट होऊन आपले स्वतःचे राज्य निर्माण झाल्याचे घोषित केले. त्याचे स्वराज्य पक्षपाशी असलेले संबंध आणि हिंदुत्ववादी चळवळीमुळे माल्दामधील राष्ट्रवादी हिंदुनी त्याला पाठिंबा दिला. या चळवळीने संथाळांना हलाखीच्या अवस्थेत आणून सोडले. या चळवळीच्या अपयशाचा परिणाम म्हणजे जीवनावश्यक वस्तुंच्या किंमती वाढल्या, कुळांना त्यांच्या जमीनीवरून हाकलून लावले, जमीनदारांनी जादा दराने कर आकरणी करण्यास सुरवात केली, आदिवासीचे इतरही मार्गांनी शोषण होवू लागले. या सर्व समस्या १९३०च्या दशकात वाढीस लागल्या.

## १०.१० ओरिसातील आदिवासी चळवळ

ओरीसा आणि बिहारमधील कटक, पुरी, बालासोर, अंगुल, खोडमाला या ओरीसा विभागात ही चळवळ विस्तारित झाली होती. शेतकऱ्यांसह आदिवासी जमातींनी १९२० व १९३०च्या दशकात राष्ट्रीय चळवळीत भाग घेतला. त्यांनी असहकार चळवळीत भाग घेऊन कर भरण्यास नकार दिला. फेब्रुवारी १९२२ मध्ये शेतकरी आणि आदिवासींनी जंगलात धाडी घालून जंगल कायदा मोडला. शेतकऱ्यांनी कर भरण्याचे नाकारले. जे कर भरतील त्यांच्यावर सामाजिक बहिष्कार टाकला. मे १९२१ मध्ये सरकारने १४४ कलम पुकारून अनेक आदिवासींना अटक केली. त्यामुळे भुयान आदिवासी संतप्त झाले व त्यांनी सुपरीटेंडेंटच्या बंगल्याला घेराव घातला. मात्र सरकारने अटक केलेल्यांना न सोडता तुरूंगात टाकले. ही चळवळ हळुहळु शांत पुढील काही दिवसात झाली. अल्लुरी सीताराम यांच्या रांम्पा उठावाने ओरीसातील आदिवासींना जंगल कायद्याविरूद्ध उठावकरण्यास प्रोत्साहित केले.१९२० ते १९३० च्या दरम्यान गुणपूरच्या आदिवासींनी कर नभरण्यासाठी संघर्ष सुरू केला. त्यांनी जंगलविषयक कायदे मोडण्यास सुरवात केली. त्यांनानियंत्रणात आणणे कठीण झाले. खोंड आदिवासींनी सुद्धा कर भरणे बंद केले. त्यांनी पोलीसांवरहल्ले केले. त्यामुळे अनेक जणांना

अटक झाली. जमीनदार, सावकार यांची दडपशाही, व शोषण, पिळवणूक आणि दोष पूर्ण जंगल कायदे यामुळे कोरापत आणि गंजम प्रदेशातील आदिवासींनी सविनय कायदेभंग चळवळीला चांगलाच प्रतिसाद दिला.

## १०.११ आसाममधील आदिवासी चळवळ

ब्रिटीशकालीन आसाम प्रांत १८७३ मध्ये आकारास आला. तत्कालीन आसाम प्रांतात आसाम,नागालँड, मेघालय व मिझोराम इ. प्रदशाचा समावश होत होता. याप्रदेशावर ब्रिटीशांचे अतिक्रमण होऊ लागल्याने आदिवासींनी विरोध करण्यास सुरवात केली. आसाममधील आदिवासींनी १८५७च्या उठावापासून प्रेरणा घेतली. १८६० मध्ये ब्रिटीशांच्या विरोधात दोन प्रमुख उठाव घडूनआले. एक म्हणजे जैंतीया डोंगराळ भागातील व दुसरा नावगाँग (Nowgong) प्रदेशातील उठाव. हे उठाव प्रामुख्याने, करामध्ये वाढ झाल्याने घडून आले होते. वाढविलेल्या करांच्याविरोधात खासी या आदिवासी जमातीने आपल्या प्रमुखांच्या नेतृत्वाखाली धनुष्य व बाण यांच्यासहाय्याने लढण्यास सुरूवात केली. १८६३ पर्यंत त्यांनी शरणागती स्वीकारली नाही. शेवगसैन्य पाठवून त्यांना पराभूत केले. १८६० मध्ये नावगाँग जिल्ह्यातील (Poppy) कॉफीउत्पादक शेतकऱ्यांनी आपल्यावर होणाऱ्या अन्यायाविरूद्ध संघर्षास सुरवात केली. या संघर्षाचे कारणही वाढविलेला कर हेच होते. तसेच या शेतकऱ्यांना पान आणि सुपारी उत्पादनावरही वाढीव कर घेण्यास सुरवात केली होती. सरकारी अधिकाऱ्यांनी वाढविलेल्या कर गोळा करण्यासाठी बळाचा वापर करण्यास सुरवात केली. नावगाँग प्रदेशातील विशेषतः फुलांगुरी भागातील आदिवासींनी ब्रिटीशांच्या विरोधात जोरदार चळवळ सुरू केली. त्यांनी जैंता या डोंगराळ प्रदेशातील आदिवासींच्या उठावापासून प्रेरणा घेतली होती.आदिवासी प्रदेश ब्रिटीशांनी आपल्या साम्राज्यात समाविष्ट करण्यापूर्वी त्यांची स्वतंत्र आर्थिक आणि सामाजिक जीवन पद्धती होती. जमीन आणि जंगल ही त्यांच्या चरीतार्थाचे प्रमुख साधनेहोती. ब्रिटीशांनी त्यांच्या प्रदेशावर वर्चस्व प्रस्थापित केल्यानंतर वसाहतवादी धोरणांचा अवलंबकरून आदिवासींची जीवनपद्धती विस्कळीत केली. नवे कायदे जमीनदारी, कारखानदारी,मध्यस्थ, सावकारी इ. सर्व वसाहतवादाचे हस्तक आदिवासी जमातींना आपले शत्रू वाटू लागले. आदिवासी जमातींनी सुरवातीला आशा (डिकू) उपऱ्याविरूद्ध संघर्षचालू केला. नंतर त्यांच्या चळवळीने वसाहतवादा विरोधी स्वरूप धारण केले. त्यांची चळवळ प्रामुख्याने हिंसक स्वरूपाचीहोती. जमीनदार, सावकार यासारख्या उपऱ्यांवर हल्ले करून त्यांना ठार करून त्यांची घरेदारे पेटवून दिली. सरकारने शांतता प्रस्थापित करण्याच्या नावाखाली त्यांना गुन्हेगार जाहीर केले.त्यांना तुरूंगात डांबून अनेकांना फासावर लटकविले. या आदिवासी जमातीच्या चळवळी राष्ट्रीय चळवळाशी सलग्न नसल्या तरी काही ठिकाणी त्या समांतर होत्या.

## १०.१२ महाराष्ट्रातील आदिवासींचे उठाव

४ जून १९१८ रोजी पेशवा बाजीराव दुसरा यांनी इंग्रजांपुढे शरणाकती पत्करली आणि पेशव्यांचे राज्य ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीच्या साम्राज्यात विलिन झाले. पेशवाईचा शेवट झाला आणि मुंबईत ब्रिटिश राजवट सुरु झाली. अनेकांना ब्रिटिश राजवट वरदान वाटली असली तरी आदिवासींना ती शाप वाटली.आदिवासींनी ब्रिटिश राजवटीवर टीका केली होती.रामोशी ही महाराष्ट्रातील वन्य जमातींपैकी एक जात आहे. ब्रिटिश काळात त्यांची लोकसंख्या अठारा हजार होती चितूरसिंग, सासवडचा सत्तू नाईक व पुरंदरचा उमाजी नाईक यांनी इंग्रजांनी वठणीवर

आणण्यासाठी लुटालूट सुर केली. उमाजी नाईक हा ब्रिटिशांना विरोध करणारा पहिला शूरवीर ठरतो. त्यांनी एका यात्रेत कोतवालाचे तलवारीने तुकडे केले व पोलिसांत दहशत बसविले. त्याने पुण्याजवळील भांबुर्डे या ठिकाणी बंदोबस्तात असलेला सरकारी खजिना लुटला व जेजुरीच्या पोलिस चौकीवर हल्ला करुन पोलिसांना ठार केले. शेवटी उमाजीला पकडण्यासाठी इंग्रजांनी पाच हजारांचे बक्षीस जाहीर केले पण उमाजी, भुजबा, पांडया व येसाजी हे इंग्रजांना सापडले नाहीत, परंतु एका हिंदू फितुरामुळे १६ डिसेंबर १८३१ रोजी भोरजवळ कॅप्टन मॅकिन्टॉशनने त्यांना पकडले त्यांच्यावर खटला भरण्यात येऊन १फेब्रुवारी १८३२ रोजी इंग्रजांनी त्यास फासावर लटकावले.

**दौलतराव नाईक**

उमाजी नाईकास इंग्रजांनी फाशी दिल्यानंतर रामोशांचे उठाव थांबतील अशी इंग्रजांची समजूत होती.परंतु तसे झाले नाही.आता रामोशाना दौलतरावाच्या नेतृत्वाखाली इंग्रजांशी लढा सुरू केला.त्यांचा जन्म उमाजी नाईकाच्या कुळात 'कोरेगाव' येथे झाला.

उमाजी नाईक, आंबेगाव तालुक्यातील (पुणे जिल्हा) जांबोरीचा होन्या केंगले कोळी व हरी रामोशी या सर्वांनी फडकेच्या मदतीने इ.स. १८७९ साली धामारी या गावातील सावरकरांच्या घरावर धाड टाकली.गुप्त पोलिसप्रमुख मेजर डॅनियलची नियुक्ती झाली होती. सहयाद्रीच्या खोऱ्यात थिसुबाईच्या डोंगरात दौलतराव नाईक व त्याचे साथीदार आणि मेजर डॅनियल यांच्यात चकमकीस प्रारंभ झाला.याच चकमकीत दौलतराव नाईक हा आपल्या काही साथीदारांसह मेजर डॅनियलकडून मारला गेला.

**पुणे जिल्हयात रामोशांचे बंड**

पुणे जिल्हयात इ.स.१८२६ पासून रामोशी लोक ब्रिटिश सरकारविरुध्द लढत होते. सरकारने प्रारंभी रामोशांशी जुळवून घेतले. त्यांना सरकारी नोकऱ्या व जमीन देऊन खुश ठेवण्याचा प्रयत्न केला. परंतु रामोशी लोक इंग्रजांच्या जाळयात अडकले नाहीत.पुरंदरचे उमाजी नाईक आणि सासवडचे सत्तु नाईक हे रामोशांचे प्रसिध्द म्होरके व लुटीच्या कामात सराईत होते. पुण्याच्या आग्नेय प्रदेशात तर रामोशांची फार दहशत होती. सरकारी अधिकारीही तिकडे फिरकत नसत. उमाजीच्या नेतृत्वाखाली पुणे जिल्हयात रामोशांनी सरकारला जंग जंग पछाडले. ते इंग्रजांशी एकनिष्ठ असणाऱ्यांना ठार करीत होते.मात्र ते बायकांवर हात टाकत नसत.महार व मांग हे त्यांचे सहकारी होते.

इ.स.१८४४ मध्ये नाशिक-अहमदनगर भागात रामोशांनी आपले स्वतंत्र अस्तित्व टिकविण्याचा प्रयत्न केला. २० सप्टेंबर १८४४ रोजी राघु आंग्रे या रामोशाने एक पोलिस अधिकारी व ७ पोलिसांना ठार केले. पुढे ब्रिटिश सरकारला साहाय्य करणाऱ्या पाटलांची नाके कापण्याचा कार्यक्रम हाती घेतला. त्याला पकडण्यासाठी सरकारने पाच हजार रुपयांचे बक्षीस जाहीर केले होते. रामोशांचा बंदोबस्त करण्यासाठी सरकारने पाटील – कुलकर्ण्यावर गावच्या संरक्षणाची सार्वत्रिक माफीही जाहीर केली. त्यांना नोकरी व जमीन देण्यास सुरुवात केली पण रामोशी मागे हटले नाहीत.

### चितूरसिंग नाईक

चिंतूरसिंग नाईक हा सातारा जिल्हयातील रामोशांचा नेता होता. त्याच्याच नेतृत्व व मार्गदर्शनाखाली सातारा, वाई, भोर व कोल्हापूर परिसरात इंग्रजांविरुध्द उठाव केले. लुटालुट केली आणि बराच पैसा जमा केला व हा पैसा त्यांना गोरगरिबांना वाटला.त्यांनी इंग्रजांना व इंग्रजनिष्ठ भारतीयांना त्रास दिला. त्यांनी स्त्रियांचा सन्मान केला.

### भिल्लांचे उठाव

खानदेशातील जमातीत भिल्लांची संख्या मोठी असून हे लोक राजपुताना, माळवा, गुजरात व वायव्य महाराष्ट्रभर पसरलेली आहे.हे लोक डोंगर कपारीत, रानावनात राहत असत. डोंगरातील टेकडयांवर वसाहत करुन भिल्ल लोक टोळया टोळयात राहत होते.इ.स.१८१८ मध्ये इंग्रजांनी खानदेशी ताब्यात घेतला.त्यामुळे भिल्लांना इंग्रजांबद्दल लढा उभारला.

### गौंड जमातीचा उठाव

महाराष्ट्रात गौंड ही एक आदिवासी जमात आहे इ.स.१८१७-१८१८ या कालखंडात नागपूरचे राजेसाहेब अप्पासाहेब भोसले यांनी गौंड जमातीच्या प्रमुखाच्या मदतीने इंग्रजांविरुध्द उठाव केले इंग्रजांनी त्यांना पकडले असतानाही ते निसटले व त्यांनी सातपुडा पर्वताचा आश्रय घेतला त्यांनी शीखांचा राजा रणजितसिंहासह अनेक हिंदी संस्थानिकांचे मन वळवून इंग्रजांविरुध्द उठाव करण्याचा प्रयत्न केला पण या कार्यात त्यांना यश मिळाले नाही शेवटी त्यांचा पराभव झाला इ. स. १८४० मध्ये जोधपूर येथे एकाकी अवस्थेत त्यांचा मृत्यू झाला.

### हटकरांचा उठाव - १८१९-२०

मराठवाडयात नांदेड हंसाजी नाईक हटकर यांचे एक लहानसे राज्य होते मराठवाडा हैदराबादच्या निझामाच्या ताब्यात होता – निझाम इंग्रजांचा मांडलिक होता तरीही हटकर स्वतंत्रतेने आपले राज्य चालवित होता त्याने २० वर्षे निझामाला दाद दिली नाही त्याने हाड आणि नांदेड भागातील नंदगिरी, कश्ष्णादुर्ग व रामगड हे किल्लेही इस १८१९ मध्ये ताब्यात घेतले हंसाजीने निझाम व इंग्रजांविरुध्द इ.स.१८१९-२० मध्ये उठाव केला त्यामुळे मेजर पिटमन, कॅप्टन इव्हान्स, डेव्हिड, कॅप्टन मेडोज टेलर यांनी चार हजारांपेक्षा नोव्हा किल्ल्यावर हल्ला केला हंसाजीने २५ दिवस इंग्रजांशी झुंज दिली इंग्रजांनी नोव्हा किल्ल्यावर तोफा डागल्या नोव्हा इंग्रजांनी घेतल्यावर हंसाजीने उमरखेड येथून इंग्रजांशी लढा दिला.

### त्रिंबकजी डेंगळे

त्रिंबकजी डेंगळे हा पेशवा दुसऱ्या बाजीरावाचा मित्र आणि मराठा सरदार होता.त्याला ठाणे येथील तुरुंगात डांबले होते.पण त्याने इंग्रजांच्या हातावर तुरी देऊन पलायन केले.यानंतर तो भिल्ल जातीत शिरला व त्याने भिल्लांना इंग्रजांविरुध्द चिथावले.इंग्रजांना ठार करा असा आदेश त्याने भिल्लांच्या या उठावाची सूत्रे आपले पुतणे गोदाजी डेंगळे व महिपा डेंगळे यांच्याकडे सोपाविली.त्यांच्या नेतश्त्वाखाली झालेल्या या उठावात आठ भिल्ल सहभागी झाले.कॅप्टन ब्रिग्ज याने हा उठाव दडपण्यासाठी भिल्लांचे मुडदे पाडले व डोंगराडोंगरातील वाटघाटांवर सैन्य ठेवून त्यांची रसद बंद केली.एलिपिफन्स्टनने मात्र भिल्लांना पेन्शन व रखवालदारीचे काम देऊन त्यांच्याकडूनच भिल्लांचा बंदोबस्त करण्याचा प्रयत्न केला.त्याने भिल्लांची लष्करात भरती केली व त्यांची एक वेगळी लष्करात तुकडी उभारली. याच लष्कराच्या मदतीने भिल्लांची धरपकड केली नादिरसिंह या भिल्ल डाकूस त्याच्याच सहकाऱ्यांच्या मदतीने पकडले.

## भिल्ल नाईक

ब्रिटिश सरकारने भिल्लांना नोकऱ्या व पेन्शन देऊन आपल्याकडे वश करण्याचा प्रयत्न केला परंतु भिल्ल शांत झाले नाहीत. त्यांनी इ.स.१८१९ मध्ये पुन्हा सगळीकडून उठाव केले. त्यांच्या नेत्यांनी महत्वाच्या लष्करी नाक्यांचा ताबा घतेला. गावे लुटण्यास प्रारंभ केला. इंग्रजांनी भिल्लांचा बंदोबस्त करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी भिलांना माफी देण्याची घोषणा केली. या लढयाचे नूतृत्व सातमाळयाचा भिल्ल नाईक हा करत होता. त्यास इ.स.१८१९ मध्ये इंग्रजांनी पकडून फासावर चढविले.

## डसरत व धानजी

इंग्रज कॅप्टन ब्रिग्ज यांनी भिल्लांचे उठाव दडपण्यासाठी त्यांच्या प्रमुखांना फासावर लटकावले पण भिल्लांचे उठाव कमी झाले नाहीत. डसरत व धानजी हे लासूरच्या भिल्लांचे प्रमुख होते. त्यांनीइ.स.१८२० मध्ये गावे आणि घरे बेचिराख करण्याचे सत्र सुरु केले. त्यांनी तापी व सातपुडा यामधील प्रदेश बेचिराख केला. त्यांच्याच टोळीत शेख दुल्ला हा पेंढारी सामील होता. त्यांनी इंग्रजात दहयशत निर्माण केली. परंतु मेजर मोरिन यांनी शंभर मैलावरील प्रदेशातील महत्वाच्या जागा जिंकल्याने दक्षिण भिल्लांच्या प्रमुखांना शरण येण्याशिवाय पर्याय राहिला नाही.

## हरिया भिल्ल व नहल भिल्ल

इ.स.१८२२ मध्ये नहासल व हरिया नावाच्या भिल्लांच्या प्रसिध्द म्होक्याने उठाव केला. या उठावामुळे संपूर्ण देशात अराजकता निर्माण झाली. अंधाधुंदी, बलात्कार व शोषणास सीमा राहिली नाही. भिल्लांनी सर्वत्र लुटामार सुरु केल्याने पाटील, कुलकर्णी व मामलेदार घाबरले, कॅप्टन रॉबिनसन यांनी मात्र भिल्लांचे उठाव उछपण्यात यश मिळविले.

## सेवाराम सोनार

इ.स.१८२५ मध्ये भिल्लांनी इंग्रजांविरुध्द पुन्हा उठाव केला. यावेळी मात्र त्यांनी राजकारणी लोकांनी पाठिंबा देणे सुरु केले. सेवाराम सोनार यांनी सातारा राजाच्या नावाची बनावट पत्रे तयार केली व ती राजाच्या आदेशानुसार बागलाण तालुक्यातील भिल्लांनी लुटालुट सुरु केली. त्यांनी उनापूरवर हल्ला केला व मिळालेला लूट मुरली महाल किल्ल्यात सुरक्षित ठेवली. लेफ्टनंट औटरॅम यांनी यातील काही लूट परत मिळविली. सेवाराम व त्यांच्या हस्तकांना पकडले, पण सर्वांनाच ठार केले नाही.

## पंडया, बंदी व सुखा भिल्ल

इंग्रजांनी भिल्लांना माफी देऊन आपलेसे करण्याचे प्रयत्न केले. त्यांनी भिल्लांना शेतीच्या धंद्याला लावले, त्यांना जमिनी दिल्या, तगाई दिली. तसेच शेतमजूर म्हणून कामाला लावले पण इ.स.१८२५ मध्ये पंडया, बंदी व सुखा या भिल्लांच्या म्होरक्यांनी इंग्रजांविरफध्द उठाव करणे चालूच ठेवले त्यांच्या लुटालूट प्रकरणामुळे इंग्रज सरकारचे अधिकारी पुन्हा हादरले गेले.

## लोहार भिल्ल

लेफ्टनंट औटरॅम यांनी भिल्लांचा उपद्रव कमी करण्यासाठी पुढील उपाय केले माफीचे जाहीरनामे भिल्लांना जमीन देणेतगाई देणेमागील गुन्हे माफ करणेसैन्यात भरती करणे सामाजिक संस्थात काम करण्यास भिल्लांना उद्युक्त करणेडोंगरातील वाटांचे रक्षण करणे हा भिल्लांचा

पारंपारिक हक्क मान्य करणेऔटरॅम हा स्वतः भिल्लासोबत राहू लागला, खाऊ लागला, नाचू लागला तो त्यांच्याशी एकजीव झाला आणि त्याने इंग्रज लोक किती प्रामाणिक आहेत हे भिल्लांना पटवून देण्याचा प्रयत्न केला – परंतु उपयोग झाला नाही इ.स. १८२६ मध्ये डांगचे प्रमुख व लोहारा भिल्ल यांनी पुन्हा लुटालूट सुरु केली पण त्यांना लवकरच इंग्रजांमुळे शरण यावे लागले.

**कोळयांचे उठाव**

पुणे आणि अहमदनगर जिल्हयातील कोळी लोकांनी भिल्ल लोकांप्रमाणेच इंग्रज राजवटीच्या विरोधात सतत उठाव केले इस१८२८, १८३९, १८४४ व १८४८ मध्ये कोळयांनी उठाव केले या उठावाचे नेतश्त्व भाऊ खेरे, चिमणाजी जाधव आणि नाना दरबारे यांनी केले हे तिघेही पेशव्यांचे अधिकरी होते म्हणूनच त्यांनीकेलेल्या उठावास राजकीय स्वरफप प्राप्त झाले इंग्रजांनी मात्र कोळयांचे उठाव मोडून टाकले त्यांनी कोळयांची धरपकड करुन त्यांना कैदेत टाकले त्यांनी ५४ कोळयांवर खटले भरले त्यापैकी कमी-अधिक प्रमाणात शिक्षा झाल्या व दोन कोळयांना फासावर लटकवले.

**मराठवाडयातील भिल्ल**

मराठवाडयात औरंगाबाद जिल्हयात भिल्ल लोकांनी कोनावर राव यांच्या नेतश्त्वाखाली इंग्रजांविरुध्द बंड केले – पण या बंडात सुसूत्रता नसल्यामुळे व संघटनात्मक पध्दतीने बंड न केल्याने इंग्रजांनी हे बंड लगेच मोडून काढले औरंगबाद जिल्हयात इ स १८२२ पासून इ स १८५७ पर्यंत अनेक ठिकाणी उठाव केले इंग्रजांनी हे उठाव मोडून काढल्याने शेकडो भिल्लांना मरण पत्करावे लागले.

**आपली प्रगती तपासा.**

१) महाराष्ट्रातील आदिवासींच्या उठावाची माहिती द्या.

---

## १०.१३ सारांश

वसाहतवादी ब्रिटीशांच्या काळात आदिवासी या असंघिटत सर्वसामान्य जनतेने आपल्यावर होणाऱ्या अन्यायाला प्रतिकार करण्यासाठी चळवळी उभ्या केल्या व ब्रिटीश सरकारवर त्यांच्या मध्यस्थांच्या विरोधात उठाव घडवून आणले. आदिवासी चळवळी सुरवातीपासून शेवटपर्यंत आपापल्या भागा पुरत्या मर्यादित राहिल्या. त्यांचे दैनंदिन जीवन अवलंबून असलेल्या जमीन पद्धती व जंगले यांच्या वापराच्या पद्धतीत ब्रटीशांच्या बदल घडवून आणला हेच त्यांच्या असंतोषाचे मुख्य कारण होते. आदिवासी जमातींनी आपापल्या जमातीच्या प्रमुखांच्या नेतृत्वाखाली हिंसक चळवळी केल्या. जमात प्रमुख आपणास दैवी शक्ती प्राप्त झाल्याचे किंवा जादू जादूटोणा येत असल्याचे सांगत. ब्रिटीशांबरोबर होणाऱ्या संघर्षात आपलाच विजय होणार असे सांगून आपल्या जमातीचा पाठिंबा मिळवत. एका बाजूला धनुष्यबाण, भाले या सारख्या परंपरागत सज्ज आदिवासी व दुसऱ्या बाजूला आधुनिक सज्ज, प्रशिक्षित ब्रिटीश सैनिक यांच्यातील असमान संघर्षात हजारो आदिवासी मरण पावले.

## १०.१४ प्रश्न

(१) वसाहतकालीन भारतातील आदिवासी जमातींनी केलेल्या चळवळींची माहिती द्या.

(२) तुमच्या अभ्यास कालखंडातील आदिवासी चळवळींचा थोडक्यात आढावा घ्या.

(३) भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील महाराष्ट्रातील आदिवासी उठावांची भूमिका स्पष्ट करा.

(४) टिपा लिहा.

(अ) संथाळांची चळवळ

(ब) मुंडा जमातीचा उठाव

(क) भिल्ल, रामोशी व कोळयांचे उठाव

## १०.१५ संदर्भ सूची


१) बिपीनचंद्र व इतर, भारतीय स्वातंत्र्य लढा (India's Struggle for Independence), के. सागर प्रकाशन

२) बिपीनचंद्र, अमलेश त्रिपाठी, बरुणडे स्वातंत्र्याचा लढा (Freedom Struggle, National Book Trust)

३) ग्रोव्हर आणि बेलेकरःआधुनिक भारताचा इतिहास (एस.चंदप्रकाशन)

४) सुमन वैद्य व शांता कोठेकरः

   १) आधुनिक भारताचा इतिहास (१८५७-१९२०)

   २) आधुनिक भारताचा इतिहास (१९२०-१९४७) श्री. साईनाथ प्रकाशन

५) सुमित सरकार आधुनिक भारत-के. सागर प्रकाशन

६) डॉ. जयसिंगराव पवार आधुनिक हिंदुस्तानचा इतिहास -श्री. विद्याप्रकाशन

७) धनंजय आचार्य आधुनिक भारत (१७५०-१९५०)


❖❖❖❖

Semester II
Subject : History

History of Modern India : (100 marks)
Society & Economy

(1) All Question are compulsory
(2) All Question Carry Equal Marks
(3) Figures to the right indicates marks to a Sub – Question

Que 1. Attempt any two of the following ( On Module – I ) (20 marks)

A)
B)
C)

Que 2. Attempt any two of the following ( On Module – II ) (20 marks)

A)
B)
C)

Que 3. Attempt any two of the following ( On Module – III ) (20 marks)

A)
B)
C)

Que 4. Attempt any two of the following ( On Module – IV ) (20 marks)

A)
B)
C)

Que 5. Write any two short notes. (20 marks)

A)
B)
C)
D)